*Progressive Education Society's*
**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**
**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra.**

**VOLUME 8, ISSUE 7** **JULY 2023**

# MODLIB

## E-Bulletin of Library and Information Centre

**Published by: Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal,**
**MCASC (Autonomous), Shivajinagar, Pune-5.**
**Editor: Dr. Shantashree Sengupta, Librarian.**
**Editorial Assistant: Mrs. Sarika Sable**
**E-mail: librarian@moderncollegepune.edu.in**

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: July 2023

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

## *Table of Contents*


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | पाऊसवेळा कलाविष्कार : Cultural Programme for Teaching and Non-teaching Staff Members | 05 |
| 2 | Glimpses of Yoga Sessions | 06 |
| 3 | Events conducted by NSS and NCC in July 2023 | |
| | • *Awareness Rally: Say no to drugs* | 08 |
| | • *Kargil Vijay Diwas* | 09 |
| 4 | Events conducted in the Library during July 2023 | |
| | • *Vasantrao Naik Jayanti* | 10 |
| | • *Lokmanya Bal Gangadhar Tilak Jayanti* | 11 - 12 |
| 5 | News related to Departmental Library of Department of Hindi | 13 |
| 6 | Practical Session of FYBA Marathi Students in Library | 14 - 15 |
| 7 | Article by Staff Member | |
| | • *प्रवासवर्णन : एक सफर गिरनारीच्या ह्रदयाची - By Sanket Mulay, Library Attendant* | 16 - 22 |
| 8 | Events conducted by the departments in July 2023 | |
| | • *NEP Week Celebration by Department of Physics* | 24 |
| | • *Guest Lecture organised by Department of Electronic Science* | 25 - 26 |

## *Table of Contents*


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 9 | **Workshops attended by Faculty Members in July 2023** | |
| | • *Dr. P. S. Varade, Assistant Professor, Department of Electronics* | 28 |
| 10 | **Modern Achievements** | |
| | • *Dr. Pooja Paratane, Assistant Professor, Department of Mathematics* | 30 |
| | • *Miss. Rutuja Jagtap, Student, B.Sc Statistics* | 31 |
| | • *Shubham Todkar, Student* | 32 |
| | • *Sanket Saalgar and Paras Patil, Alumni* | 33 |
| | • *Pranali Benke, Alumni* | 34 |
| | • *Monali Natu and Aishwarya Bodke, Alumni* | 35 |
| 11 | **Newly added and books received in Gratis during July 2023** | 36 - 39 |
| 12 | **Newspaper Clippings** | 41 - 163 |
| 13 | **Upcoming Events: August 2023** | 164 |

# पाऊसवेळा कलाविष्कार

## Cultural Programme for Teaching and Non-teaching Staff Members











# *Glimpses of Yoga Sessions*

Daily Morning Yoga Sessions organised by Department of Physical Education, Modern College, Shivajinagar, Pune-5 in Swar Samragyi Bharat Ratna Lata Mangeshkar Auditorium in New Building of Modern College, Shivajinagar, Pune-5.
































# Events Conducted by NSS and NCC in July 2023

# Awareness Rally: Say No to Drugs

## Say No to Drugs


To create the awareness in society about the causes of drugs addiction and adverse effect of drugs, NSS unit of Modern college of Arts, Science and commerce (Autonomous) in association with Modern English medium high school, PES Girls high school, Modern Boys High school and Shivajinagar Police station was organized a awareness rally. The inauguration of rally was done by the hands of Hon'ble Principal Dr. Rajendra Zunjarrao and PI of Shivajinagar Police station. 545 students were participated in this rally. NSS Programme officer, Registrar of Modern College, Vice- Principal Prof. Sanjay Thengadi, Junior College Vice- Principal , superintendent Prof. Karekar, Shri. Popat Sambare, Shri. Yogesh Thipse, Mrs. Sasane, Mr. Sagar Chavan, Mr. Vilas Lad, Mr. Mahesh Gaikwad, Mrs. Swati Patwardhan and Librarian Dr. S. Sengupta were also actively participated in the rally. Different slogans were prepared and presented on this topic. The route of rally was from Modern college –J.M. road – Ghole Road –Fergusson College Road- Dnyaneshwar Paduka Chowk – Modern College.






# *Kargil Vijay Diwas*



Date : 22/7/2023

NOITCE

VIJAY DIVAS CELEBRATION

In association with Rotary Club of Pune Shivajinagar , NCC Wings of P.E.Society's Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar, Pune 411005, is organising a celebration of **Vijay Divas** in memory of the Victory of Kargil War. The Kargil War heros, who actually participated in Kargil War , are going to share their experiences and defence expertise, through war videos, PPTs etc.

You are cordially invited.

**Date : 24th July**

**Time : 9.00 am**

**Venue : P. E. Society's Auditorium**

***Kargil War Heros and resource persons :***

***1) Lt. Gen. Sudarshan Hasbnis - Guest of Honour***

***Param Vishisht Seva Medal ( Touch the Sky with Glory), Vishisth Seva Medal, ADC ( Retd).***

***2) Major Gen. Alok Deb***

***Vishisht Seva Medal, SM ( Retd.)***

***3) Lt.Col Milind Thosar :***

***4) Lt Col (Dr.)Sanjay Borase – Animal Warriors of Indian Army***

***5) Lt Col Prshant Kakade –***

Lt Cdr A.V. kamble (ANO)
NCC officer

LT. CDR. ASHOK V. KAMBLE (ANO)
3 MHA NAVAL UNIT NCC
Modern College, Pune-5.

Dr. R.S.Zunjarrao
Principal

# Events Conducted in the Library during July 2023

## *1.Vasantrao Naik Jayanti: 01st July 2023*

On 01st July 2023, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversary of Vasantrao Naik as per the Government of Maharashtra GR.

Under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir, Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Vasantrao Naik.

Principal Sir mentioned that Vasantrao Naik was the longest serving Chief Minister of Maharashtra (1963-1975). He is considered as the father of the Green Revolution in Maharashtra. The industrialization of Maharashtra is largely the legacy of his progressive industrial policies.

I am thankful to the library staff members and students who were present during the programme.

**Regards,**

**Dr. Shantashree Sengupta,**

**Librarian.**















# *Events Conducted in the Library during July 2023*

## *2.Lokmanya Bal Gangadhar Tilak Jayanti: 23rd July 2023*

On 23rd July 2023, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversary of 'Lokmanya Bal Gangadhar Tilak' as per the instructions in Government of Maharashtra's GR under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir.

Principal Sir mentioned that Bal Gangadhar Tilak who was born as Keshav Gangadhar Tilak, was an Indian nationalist, teacher, and an independence activist. He was one third of the Lal Bal Pal triumvirate. Bal Gangadhar Tilak was the first leader of the Indian independence movement. Bal Gangadhar Tilak was one of the first and strongest advocates of Swaraj ("self-rule") and a strong radical in Indian consciousness. He is known for his quote in Marathi: "Swarajya is my birthright and I shall have it!"

Under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir, Junior College Supervisor Prof. Subhash Karekar, Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Lokmanya Bal Gangadhar Tilak.

I am thankful to the library staff members who were present during the programme.

**Regards,**

**Dr. Shantashree Sengupta,**

**Librarian.**








# *Events Conducted in the Library during July 2023*















# *News Related to Departmental Library of Department of Hindi*

## *स्व. शंकरराव कानिटकर हिंदी विभागीय ग्रंथालय को हिंदी लेखिका अलका अग्रवाल द्वारा 200 पुस्तकें भेंट*

दिनांक 10 जुलाई 2023 को महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी द्वारा बाल साहित्य का राष्ट्रीय पुरस्कार और कई साहित्यिक संस्थाओं से सम्मानित बहुआयामी वरिष्ठ बालसाहित्यिक अलका अग्रवाल जी ने अपने संचय की 200 हिंदी पुस्तकें हमारे स्व. शंकरराव कानिटकर हिंदी विभागीय ग्रंथालय को भेंट स्वरुप प्रदान की। आदरणीय अलका अग्रवाल मैडम के प्रति बहुत आभार।

**डॉ. प्रेरणा उबाळे**

**अध्यक्ष, हिंदी विभाग**








# *Practical Session of FYBA Marathi Students in Library*

वोकेशनल स्किल कोर्स वीएससी या अंतर्गत प्रथम वर्ष कला या विद्यार्थ्यांना पुस्तक परिचय आणि परीक्षण हा घटक ग्रंथालयामध्ये नेवून शिकवला. ग्रंथालयातील पुस्तके कशा प्रकारची आहेत.कथा, कादंबरी, समीक्षा, नाटक, चरित्र, आत्मचरित्र हे पुस्तके नेमके कोणत्या ठिकाणी आहेत हे दाखवले. विद्यार्थ्यांना ग्रंथालयात असलेल्या पुस्तकांबद्दल त्यामुळे माहिती प्राप्त झाली. पुस्तकांची रचना कशा पद्धतीने करतात नेमकी कोणती पुस्तके कोणत्या ठिकाणी ठेवतात त्यांचे वर्गीकरण कशा स्वरूपाचे असते याचे सुद्धा त्यांना ज्ञान मिळाले.

**-Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi**

**- Dr. Vaijayantimala Jadhav, Assistant Professor, Department of Marathi**




















# *Practical Session of FYBA Marathi Students in Library*





















# प्रवासवर्णन : एक सफर गिरनारीच्या हृदयाची

जून ची २१ तारीख होती . मी असाच दुपारी लायब्ररी मध्ये कामात असताना सहज लक्ष कॅलेंडर कडे गेलं , भिंतीवर लटकवलेल्या कॅलेंडरच्या पानांच्या फड फड आवाजाने कान जागे केले...म्हटलं हे का इतकं बडबड करत आहे आज...जून महिना संपत आला की, लक्ष्य जुलै महिन्याच्या ३ ताखेकडे गेले...अरे गुरुपौर्णिमा.... खरंच की गुरुपौर्णिमा जवळ आली...मनात आलं स्वामी या गुरुपौर्णिमेला काय करू.. कुठे नेताय मला...पण कुठे जाणार कुठे जायचं म्हटल की ट्रेन चे रिझर्व्हेशन आले 10 दिवसात तिकीट कन्फर्म होणं कठीण.. शांत बसलो....विषय सोडून दिला असो...महिना अखेर खिशात थोडेच पैसे...त्यामुळे विषय सोडून दिला आणि आपल्या नादात कामावरून घरी आलो..संध्याकाळ झाली होती..६ वाजले होते एखादा पावसाळी ढग आकाशात एकटाच फिरत होता...त्याला पाहून म्हटल तुझं बरंय बाबा तुझ्या भटकंतीला बुकिंग नसतात...आम्हा माणसांना सगळे नियम रे बाबा...पण तुझ्यात आणि आमच्यात एक गोष्ट सेम ,तुला ओझं झाला की तू बरसतो तू मोकळा होतोस....आम्हा माणसांना ही ओझं होत रे ..... असो...तर चहा पिवून देवा जवळ दिवा धूप लावलं आणि नित्य पाठ करायला बसलो....पाठ चालू असतानाच डोळे बंद झाले आणि त्या एकट्या ढगा सारखं मी पण आकाशात हरवून गेलो ... डोळे उघडले तेव्हा 8 वाजले होते...सगळं कसं शांत , आतून बाहेरून शांत , धुपाच प्रारब्ध संपलं होतं राख मात्र उरली होती तरी सुगंधाचा दर्प अजून बाकी होता ....सुगंधात सुगंधी होवून लुप्त झाला होता, समोर शंकर महाराज ,त्यांच्या डोळयात पाहिलं आणि त्याच क्षणी मनाच्या काठावर नाव उमटलं गिरनार......महाराज काय गिरनार...ही गुरुपौर्णिमा गिरनार ला...म्हटलं काय तरीच हा तुमचं, गिरनार काय सोपी गोष्ट आहे का महाराज पावसाळा चालू आहे आणि हो ट्रेन चे बुकिंग 3 महिने आधी करावे लागतात... गुरुपौर्णिमा तर फक्त दहा दिवसांवर आली आहे असं बोलून उठलोच....तीन चार दिवस गेले मी माझ्यात होतो आणि गिरनार ओढ वाढत चाली होती दत्त गुरूंच्या आठवणीने मन भरून याचं मध्येच मनाची स्थिती बदलायची ... काहीच नाही आहे माझ्याकडे ना पुरेसे पैसे ना जाण्या येण्याची सोय ..कसा जावू मी गिरनार ला महाराज स्वामी ..... शायद गिरनारी का बुलावा नाही हैं....पण स्वामी मला जायचं होतं हो गिरनारला असा मनात विचार चालू होते... गिरनार म्हटल ना की स्वामींचे धुनी या पुस्तकातील शंकर महाराजांच्या गुहे च प्रसंग आठवतो... गिरनार म्हणजे दत्त महाराजांचे हृदय..तिथे पोहोचणं सोपं तर नसणारच...गिरनार वहि जाता है जिसे गिरनारी बुलाता है....आमचं काय महाराज आम्हाला कधी येनार हो बोलावणं.... बाल मनाचे किती हट्ट असतात ना स्वामी...मी पण लहानच आहे मोठं नाही होईच मला ...लहान मुलं कसं आजोबांचं बोट धरून भटकायला जातात....तसाच गुरुंचा हात घट्ट धरवा आणि आनंदाने स्वच्छंदी शुभ्र मानस सरोवरातील हंस होवून उडावं ....मी खूप त्रास देतो ना स्वामी तुम्हाला वाटेल तसा वागतो ना कोणती रीत भात.. ना जगाशी कोणता संपर्क ..अलीकडे खूप शांत झालोय हो स्वामी ... सगळयात असून कशात नाही ...मी एकटा नाही हे मात्र नक्की ..माझे सर्व निर्णय तुम्ही घेतात हे आता पक्क झालाय स्वामी... तुम्ही जर देहात असता तर आपण दोघं सोबत गेलो असतो ना गिरनार ला...गिरनारी को मिलने हम साथ जाते....आणि तुम्ही तर गिरनार आतून पण दाखवलं असतं... तुम्ही कधी येणार स्वामी ... मै तुम्हारा इंताजार कर रहा

# प्रवासवर्णन : एक सफर गिरनारीच्या हृदयाची

हुं...मालक ...तळपती तलवार माझ्या हातात देवून तुम्ही मात्र दिसेनासे झालाय स्वामी...तुमच्या आठवणीने नाक लाल होतं हो.... याच विचारात डोळे पुसत कधी झोप लागली कळालं नाही...25 तारीख उजाडली चार वाजता ऑफिस मधून निघालो आज माझे मित्र संदिप कुलकर्णी यांच्या ऑफिसवर भेटायचं ठरलं...गप्पा आणि चहा चालू होता त्यातच गिरणारचा विषय निघाला संदीप जी सहजच बोलून गेले "माझ्या ओळखीतला एक ग्रुप गिरनार ला जाणार आहे गुरुपौर्णमेनिमित्त....... जर कोणाचे कॅन्सल झाले तर तू त्यांच्या जागेवर जाशील का? " मी : काय गिरनार? मी पण हो म्हणालो.. तळयात आणि मळयात अवस्थेत दोन तीन दिवस घालवले ,मन तर कधीच गुरुशिखरावरच्या गुरू पादुकांसमोर भिरभिरत होतं ...आजपासून जवळजवळ बारा वर्षांपूर्वी गेलो होतो मी गिरनार ला तेव्हा अगदी पोस्ट ग्रॅज्युएशन ला होतो . एक तप उलटलं होतं , एक तप , मनात आलं दहा हजार पायऱ्या बापरे....इथे सोसायटीचे चार मजले चढत नाही कधी , संकेत 10000 पायऱ्या दम काढणार वाटतं...अशा येणाऱ्या जाणाऱ्या विचारांना वाट मिळत होती... दोनच दिवस झाले होते गिरनारला जायचं असं स्वामींनी सांगितलं होतं आणि लगीच सोय पण लावली ..वा गुरू दोन आठवड्या पूर्वी माझ्या मनात गिरनार हे नाव टाकलं तुम्ही आणि स्वतः जाण्या येण्याची सोय पण करून देताय ...तेही अगदी फस्ट क्लास ट्रेन मध्ये एकदम कंफर्टेबल .... सगळं आयुष्य कंफर्टेबल करता तुम्ही ट्रेन चे काय त्यात... 29 जून रात्री 9 : 17 वाजले आणि संदीप कुलकर्णी यांचा फोन आला ...चला पॅकिंग करा तिकीट कन्फर्म झालंय उद्या म्हणजे 30 तारखेला निघायचे आहे तुम्हाला गिरनार ला.... पुण्याच्या तळयातून धाडकन गिरनारच्या मळयात पडल्याचा धक्का बसला..आणि साधनेच्या धुंदीतून ताडकन उठून उभाच राहिलो...फोन ठेवला शंकर महाराजांच्या कडे पाहून फक्त हसलो....आणि तयारीला लागलो दोन कपड्याची कसली तयारी....प्रवास कुणाचा देहाचा की माझ्यातल्या मी चा... मनात आनंदी उत्सव चालू होता ...ऑफिसची लाल रंगाची सॅक थोडी उसवली होती ती शिवायला घेतली... तसं उसवल तर खूप काही होतं ...पण गुरू कृपेने त्याकडे आता लक्ष जात नव्हतं... बॅग टाके घालून तयार झाली... थोड्या वेळात सगळं कसं रेडी......रेडी तर सगळं गुरूंनी करूनच ठेवलं होत मी तर फक्त जाण्याचं नाटक करत होते... नेणारे स्वामीच शंकर महाराज ..माझ्या अनेक जन्मांच्या प्रवासातील सखा सोबती वाटाड्या..माझ्या नौकेचा कॅप्टन.....कॅप्टन स्वामी.... तर आमची नौका आता गिरनार ला निघणार... 30 जून चा सूर्य अजून पुण्याच्या क्षितिजावर याचा होता ...आज रात्री साधनेतून पहाटे 4 वाजताच जाग आली परत काही झोप येईना ...सतरंजीवर उठून बसलो आज निघायचे आहे महाराज गिरनार ला... मनाची अवस्था अधिक शांत आणि गंभीर झाली होती नर्मदेच्या प्रवाह सारखी..उठलो सावरून आवरून बैल तयार झाला होता....प्रवासाच्या बॅगा घेतल्या , खांदे मजबूत केले , बैला वर वेसण पडते तशी बॅग खांद्यावर टाकली... नंदी बैलाने शंकराला पुन्हा नमस्कार केला...माझी कालिंदी सकाळच्या गडबडीत होती तिलाही नमस्कार केला.... सगळं घेतलं ना? हो.. म्हणून नंदिने मान हलवली ...नीट जा ...हो म्हणून निघालो...नेहमी प्रमाणे ऑफिसला आलो ... चार वाजता ऑफिस मधून निघालो गेट पाशी रिक्षा उभी .. रिक्षावर सदगुरू कृपा असं लिहिलं होत बसलो..रिक्षावाल्याला आजोबांना विचारलं सदगुरु कृपा म्हणजे कोणाची कृपा आजोबा बोले दत्त गुरू... वा रिक्षा पण तुम्हीच तयार ठेवली ना महाराज ....पुणे मुंबई राजकोट जुनागड असा प्रवास ठरला होता.... आम्ही सर्वांनी पूनेस्टेशन ला याचे ठरवले होते...चार नंबर प्लॅटफॉर्म वर inter-city ची वाट पाहत चहा चा घोट पीत मेंदूला कॉफ्फिन सप्लाय करत उभा होतो .... प्लॅटफॉर्म वरच्या सूचना चालू होत्या

# प्रवासवर्णन : एक सफर गिरनारीच्या हृदयाची

...प्रवाशांची घाई गडबड चालू असतानाच ती नजरेज पडली १७:५५ ची intercity... पुणे to मुंबई ....ती शांत पने आगमन करीत होती...आणि आम्ही सर्व प्रवासी जणू तिच्या स्वागता करिताच उभे आहोत.... मी शरीराच्या बोचक्याला घेवून डब्ब्यात चढलो...सर्व ग्रुप सोबत ओळख झाली .... मुळातच बडबडीचा कंटाळा असणारा मी .... मी नंदी सारखा तोंड संपावर ...मन गुरूनच्या स्मरणात ...डोळे आणि कान कामावर...एकूणच मजेत ...आनंदात......अधून मधून चहा वडापाव चिक्की भेळ... अगदी रिमझिम पाऊस .. गारवा... सर्वांचा उत्साह... आणि सर्वांच्याच मनात असलेलं गिरनार शिखर.......असाच आनंदात सर्व श्री दत्त गुरूंच्या लेकराण् सोबत ..... आयुष्यातला हा प्रवास काही छान दत्त भक्तीने प्रज्वलित आत्म ज्योतीच्या बरोबर होत होता याचा आनंद...


दुसऱ्या दिवशी जुनागडला पोहोचलो दुपारचे १ वाजले असावेत .... हॉटेल वर check in करून फ्रेश होवून आम्ही सगळे जेवायला जमलो ... गुजराथी थाळी..भूक तर सर्वांनाच लागली होती..आडवा हात मारला... प्रवासाने दमलो होतो ... थोडा आराम करून आज संध्याकाळी जुनागड पायथ्याशी असलेल्या भवणाथ तीर्थ आणि हनुमान मंदिर यांचे दर्शन घेतले... उद्या सकाळी पहाटे ५ वाजता गिरनार ची चढाई सुरू करण्याचा बेत ठरला... जेवून करून रूम वर आलो रोज प्रमाणे साधनेत गुप्त...बरोबर ३ वाजता जाग आली ..आवरून नित्य पाठ करून आम्ही सर्वे रिक्षा ने सकाळी ०४:३० ल गिरनार पायथ्याला आलो.... पहाटेचा गारवा, अंधुकशी वाट , सोबतीस गुरू स्मरण ..गिरनार पर्वत ..स्वच्छ सुंदर सकाळची कोवळी ताज्या दमाची झुळूक छातीत भरून घेतली , आमचा एक सात जणांचा ग्रुप पहाटे ०३:३० वाजताच पुढे गेला होता...आणि आम्ही पाच पांडव हातात काठ्या घेवून ...गिरनार च्या पायथ्याशी असलेल्या केशरी शेंदूर चढविलेल्या गिरनारी मारुती राया समोर उभे...मारुती रायाला नमस्कार केला....घेवून चल रे बाबा..शक्ती दे चढायला... बारा वर्षांनी भेटतोय रे आपण.... सोबत रहा.. त्यांनी पण हसुन अशिर्वाद दिला..पहिल्या पायरीवर नमस्कार करून वर आकाशात पाहिलं... आभाळ आलेलं पण पाऊस नाही डोळयात दोन थेंब मात्र होते... स्वामींच्या आठवणीचे ... दत्त गुरूंच्या ओढीचे ..तेच दोन थेंब माझ्या चष्म्याच्या काचेवर पडले ...भानावर आलो चष्मा पुसला.. शंकर बाबा बारा वर्षांनी पुन्हा इथेच आणून सोडलं तुम्ही... बारा वर्षांपूर्वी इथेच फोटो काढला होता..तेव्हाची याच पायरी वरची मनाची अवस्था आणि आजची मनाची अवस्था फारच वेगळी...तर जय गिरनारी चा जयघोष करून पायात बळ आणून आम्ही गिरनार चढाईला सुरवात केली .. हातात काठी पाठीवर छोटी बॅग बॅगेत दोन बॉटल पाणी आणि मोजक सामान चाळीस पन्नास पायऱ्या झाल्या असतील शरीराचं जडत्व जाणवलं..... न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा नियम शरीराला मागे खेचत होता ..पण गुरू - त्वा - आकर्षणाचा नियम मनाला भक्कम पने पुढे झोकत होता....तर असं एकेक पायरी मागे टाकत मध्येच फोटो काढत... मौनात आम्ही सगळे पायांना गती देत होतो, वेळ पाहिला पहाटे ५:३० वाजले होते....गिरनार चे जंगल आणि अर्धवट झोपेत असलेले वृक्ष ..पानांचा मध्येच सळसळ होणारा आवाज , हवेतला धुक्याचा ओलावा, हातातील काठ्यांचा ठक ठक आवाज त्या गूढ समाधीत असलेल्या जंगलाची शांतता भेदत होता... ओल्या झालेल्या झाडांचा ,पानांचा , ओल्या मातीचा थंड असा सुवास नाकात शिरत होता..... वाटेवर आम्ही फक्त पाच जण चार पाच पायऱ्या मागे पुढे १००० पायऱ्या वर येवून पोहोचलो... हसू आलं घामाने ओला झालेलो हृदयचे ठोके काय असतात ते आज स्पष्ट

# प्रवासवर्णन : एक सफर गिरनारीच्या हृदयाची














# प्रवासवर्णन : एक सफर गिरनारीच्या हृदयाची

जाणवत होतं..... मी ची जाणीव तर पळूनच गेली होती... गुरू स्मरणात फक्त चालायचं...मुसाफिर...गिरनार चा..मनात आलं..मागच्या जन्मी पण आलो असेल का मी गिरनार ला? किती जुना पर्वत आहे हा... हिमालया पेक्षा ही जुना.. हिमालयाचा वय पंचवीस लाख वर्ष , त्या पेक्षा ही जुना गिरनार पर्वत ...पुराणात उल्लेख असलेला रैवतक पर्वत ..कित्तेक देवी देवता, ऋषी, मुनी ,साधू ,सिद्ध साधक ,साधक यांच्या स्पर्शाने पावन झालेला रैवतक पर्वत .. किती युगा गेली असेल ..कित्तेक आत्मे याच गिरनार मधील गुहांमधून मुक्त झाले असतील.... ध्यान आणि ग्यान यांनी भरून असलेला गूढ गंभीर रैवतक पर्वत... आणि जवळपास ३००० पायऱ्यांवर आम्ही मनाला आणि शरीराला दत्त गुरूंच्या कोमल हृदयात स्वतःला घेवून चालो होतो.. शरीर दमल होतं , जरा एकटा पडलो होतो सोबत मी आणि गुरू बास...पायांचे स्नायू ओढले जात होते आता मात्र परीक्षा चालूच झाली की काय असं वाटतं होतं...मन आणि मी फक्त मौनात श्वासाचा आवाज..धाप लागत होती .... थोडं थांबत घोटभर पाणी पीत आणि पायऱ्या मोजत शरीराची खोळ काय असते याचा अनुभव प्रत्यक्ष घेत होतो.... मानेवरच डोकं पण जड वाटत होतं, दमलोच होतो खूपच ..... पण दम घ्यायला दम नव्हता ..छाती उडत होती ...दमछाक म्हणजे काय तर हेच .. दमाला जरा दमात घेतलं... पायांना समजावलं म्हटलं अजून ७००० पायऱ्या फक्त.... तेव्हा समजलं पायांना पण बोलता येतं पायांना पण मन असतं...ते माझ्या कडे पाहून म्हणत असतील कुठे घेवून चाललाय हा सोडवा महाराज कसले हे अत्याचार आमच्यावर ...हा हा हा.....हसूच फुटलं...पण दमून काय होणार महाराज अजून तर जन्म जायचा आहे हो... झोकांड्या टाकत असताना अचानक मन जड झालं , गळा आवळला गेला आणि डोळ्याचं डबकं झालं...गालावर उष्ण धारा काय झालं अचानक असं का होतंय ,पण एक शक्ती मला पुढे लोटत असल्याची जाणीव झाली ..कोण? कोण आहे? मी भानावर नव्हतोच ...कोणत्यातरी शक्तीच्या परिघा मध्ये शिरल्या सारखं वाटू लागलं ....शंकर महाराज शंकर महाराज ओठावर नाव असाच पन्नास पायऱ्या वर आलो , घामाने ओला तोल जात होता डोळ्यात पाणी नाकात पाणी गळा जड झालेला त्यामुळे अजून चालणं कठीण झालं डावीकडे एक छोटं कुटी सारखं मंदिर होतं..कसा बसा मंदिरात आलो आणि चटई वर थीबकलोच... समोर दत्त गुरूंची मूर्ती , डावीकडे मच्छींद्रानाथ, आणि खाली एक धुनी... धुनित भस्म मध्यात त्रिशूळ उभा... धुनीच्या बाजूला एक भगवे वस्त्र घालून साधू बसले होते पांढरे केस दाढी भारी छातीपर्यंत मिश्या जाड पिळदार ..शरीर पिळदार पण पोट मोठे..डोळ्यात भेदक पणा चेहऱ्यावर स्मित..माझी अवस्था पाहून स्मित हास्यात रूपांतरित झालं...चटई वर त्यांच्या समोर थीबाकलेला मी हसत हसत डोळ्यात पाणी ...त्यांच्या कडे पाहून म्हणालो थक गया हू बाबा ...बहोत थक गया हु!!! हुश्श्श!!! त्यांनी धुनी मधील भास्माच बोट माझ्या आद्या चक्रात रोवलाच... हातात दोन खजूर ठेवल्या .. बोलणं काही नाही ...मी खजुर तोंड टाकली आणि खात खात लक्ष माझ्या उजवीकडे असलेल्या शंकर महाराजांच्या फोटो कडे गेलं चमकलोच .... वा बाबा वा..तो ये अपका स्थान है.... बाप आपला...सर्वस्व ...महाराजांची ती जागा ... बळ आलं..मन धनकवडीतच्या गाभाऱ्यात डोकावून आलं...नाक पुसल...हसलो चष्मा साफ केला ... पाणी पिलं .. दोनच खजूर पण थकवा गायब.... साधू बोले जाव बेटा वो लेके जायेंगे मंजिल तक...जाव... उठो... मोठा श्वास घेऊन आनंदात उठलो .. बाबा ही हैं सबकुच... सोबत रहा .. नवा दम घेवून कुटितून खाली उतरलो ...दोन खजूर फक्त... आणि सकाळी मनीषा ने दिलेली एक लिमलेट ची गोळी ...७ वाजले असावेत सूर्य देवांनी पण आम्हाला आशीर्वाद दिला...

# प्रवासवर्णन : एक सफर गिरनारीच्या हृदयाची

कोवळे कोवळे धुक्यातले ऊन अंधुक धूसर वाट आणि प्रवास पुन्हा चालू झाला ....आता पायांना गती येत होती .... जय शंकर जय शंकर जय शंकर नामात नागमोडी जिना चढण चालू होतं...सोबत असलेल्या अश्विनी चे शब्द कानावर पडले आता येईल रे अंबा माता....ती नेते रे बाबा ती नेते.... एका अंबेने स्त्री शक्ती ची आठवण करून दिली ... चालत होतो थांबत होतो... बारा वर्षात शरीरात झालेला बदल अनुभवत होतो ....पर्वाता वरून ओघळणाऱ्या झाऱ्यांचे थंड पाणी ओंजळ भरून पीत होतो चेहऱ्यावर गार पाण्याचे हबके मारत अंबा माता शिखरा पर्यंत पोहोचलो मंदिर बंद होतं... ४८०० पायऱ्यांवर असलेला अंबा माता एक अत्यंत जागृत देवस्थान... तिथे आम्हाला आमचा पहिला ग्रुप जो ४ वाजताच निघाला होता तो भेटला चहा पाणी चालू होता...पावसाची एक सर येवून गेली..बसलो चहा घेतला तीन गुडे ची बिस्कीट चहात बुडवून खाल्ली..पाणी संपले होते बॉटल घेतली.. आणि निघालो आता पर्वताचा उतार चालू होता पायऱ्या पटापट उतरू लागलो जरा निवांत पाना आला होता , आठ वाजले असावेत जय गिरनारी जय गिरनारी नावात हरवत होतो , येणारी जाणारी मध्येच जय गिरनारी अशी आरोळी ठोकायचे... अरोळीला अरोळीची साद जय गिरनारी!!!तीच शक्ती खेचून नेत होती अगदी चुंबक असल्याची जाणीव खेचला जात होतो ... मन गुरू शिखरावर श्री दत्त गुरूंच्या ओढीने दाटलेले मन ...मानसी टाकिलें मागे अशी अवस्था व्हावी ...गुरू गुरू गुरू गुरू झांज चालू बास एकच ध्यास जीवाला गुरू भेटीचा ...गुरू भेटणार माझे गुरू ...कुठे आहात जीव कासावीस झाला होता ...पुन्हा मोठी अवघड चढण लागली ...हजार एक पायऱ्या चढलो असेल , हुश्श्श!! पाय आता जणू जाम झालेत मांड्या आणि पोटरीना अखडल्याची जाणीव पाय उचलत नव्हते एक एक पायरी जड वाटत होती ...पाठी वरची बॅग काढून टाकावी .. इथा नकोसं होतं आत्मा पुढे चालतो आहे पण शरीर मेलं उचलत नाही..चांगलीच रग लागत होती ... दमलो दमलो आता नाही जावू शकत पुढे... बास..बास पुन्हा डोळ्यात पाणी ..किती अवघड आहे दत्त गुरूंच्या हृदया पर्यंत पोहोचणं पुन्हा एका शक्तीची जाणीव पुन्हा एका शक्तीच्या परिघात जात असल्याची जाणीव झाली गळा भरला डोळ्याचं डबकं झालं...कोण आहे ? कोण? कोण? शंभर एक पायऱ्या वर आलो कसा बसा डुलत डुलत एकटाच होतो सोबत फक्त माझा आत्मा आणि गुरू.... डावीकडे गोरक्षनाथ शिखर चा बोर्ड 6000 पायऱ्या फक्त...... मंदिरात गेलो श्री गोरक्षनाथ महाराजांचे पवित्र जागृत स्थान ...नाथांच्या भेटीने भरलेला गळा आणखीनच मोकळा झाला...अवस्था अवघड झाली होती ..फक्त आनंद अश्रु बास... त्यांच्या शक्तीचा प्रभाव आई जगदंबेवर पडत होता... नागिनीचे पिल्लू फणा काढून उभे राहिले...पूर्ण शक्तिनिशी जोरात आरोळी ठोकली अलख निरंजन... सोबत आणलेले थोडं नर्मदा जल नाथांच्या कमंडलू मध्ये ओतलं ....तिथे असलेल्या साधूने भास्माची पुडी हातावर ठेवली.. शांत पने दर्शन घेतलं गर्दी नव्हतीच बाहेर आलो.... येथे नाथांच्या पादुका आहेत .... श्री दत्त गुरूंच्या हृदयाच्या काठावर उभा होतो ... श्री गोरक्षनाथ शिखरावरून गुरू शिखर नजरेत येत होता स्पष्ट ...आता फक्त 4000 पायऱ्या फक्त .... लगव जोर तोड दो सारी जंजिरे..... भेदो पार्थ अपने लक्ष को भेदो.... एका जबरदस्त ताकदीने पाय उचलला...माझी कसली हो ताकद स्वामीच सगळं करून घेत होते बोट धरून अगदी तेच पेरत होते सगळं माझ्यात आणि मी मात्र त्यांच्यात... एकदा तीन वर्षा पूर्वी स्वामींच्या कडे गेलो असताना त्यांना मी विचारलं होतं " स्वामी गिरनारला जावू का हो ? " त्यांनी पण हसुन प्रश्न केला, " एकटाच जाणार ना? " मी पण घुम्या सारखा हो म्हणालो होतो.... पण आता प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं ...की तू एकटा

# प्रवासवर्णन : एक सफर गिरनारीच्या हृदयाची

नाहीस गुरू कृपा सोबत असते .... तीच सगळं करून घेते ..आपण काहीच नसतो रे.. आनंदात गोरक्षनाथ शिखर उतरायला सुरवात केली जय गिरनारी जय गिरनारी जय गिरनारी... नामस्मरणात मन नसलं की शरीराची जाणीव होते ....पण स्वामी इथे खरंच सगळं मागे सुटतं... आता गुरू शिखराच्या ओढीने आणि दत्त गुरूंच्या प्रभावाने शरीरा पेक्षा अंतकरण जड झालेलं होतं.....आता मात्र एकेका पायरीवर काहीतरी सुटत चालय याची जाणीव होते आपण आपल्या आत्म्या सोबत पुढे चालत राहतो ... अंताची वाट पाहतो .. अंत होवून अनंत व्हावे..कधी संपणार ही वाट कधी संपणार ...आता कुठेच लक्ष नव्हत ना शरीर ना श्वास ना मन ना घर ना गाव ... ना प्रतिष्ठा ना मी पण ना कोणती वासना ना बुध्दी ना भूक ना शब्द ना अहंकार राहते ती फक्त ओढ एक अनामिक तत्वाची ओढ ...जणू अनंत काळा पासून वाट पाहत आहे मी या भेटीची कित्ती जन्मांचा काळ मागे पडला असेल ... एक वेगळीच अनुभूती घेत होतो ... जसं जसं गुरू शिखर जवळ येत होतं तसं जणू डायमेंनशन बदलत आहे.... न - मन .. एक अती खोल शांती ची नशा .... भनंग... आत्म्याची काजळी निघून जात आहे आणि तो अधिक नव्याने गुरूंच्या भेटीसाठी प्रकाशित होत आहे स्वच्छ होत आहे ...जणू सपा सारखी कात टाकून स्वच्छ सुंदर लकाकणारी कांती तयार होत आहे ही सगळी जाणीव साक्षात अनुभव रोकडा अनुभव...गुरू शिखराच्या अंतिम 20 पायऱ्या होत्या ...आता मात्र एका क्षणाचाही विलंब नको..दीर्घ आतुरता आणि प्रतीक्षा ...पळतच धावतच निघालो ...गिरनार चढायला मदत करणाऱ्या चपला काढल्या ... हातातली काठी ठेवली आणि वर गाभाऱ्याच्या दरवाजा कडे पाहिलं आणि संपलो रे संपलो ..दत्त शिखरावर वर विराजमान असलेल्या दत्त गुरूनसमोर आलो नजरेला नजर भिडली आणि ढसा ढसा अगदी लहान मुला सारखा भोकाड पसरून मोकळा झालो रे मोकळा झालो ... गुरूंनी मिठीत घेतलं अगदी प्रेमाने... प्रेमचं तर हवं होतं ना... प्रेमचं.. .प्रेमचं..स्वामी म्हणायचे प्रेम सालं वेडा असतं.. तुमच्या कुशीतलं मिठीतलं अलगद मायेनी भरलेलं प्रेम विश्वास याच मिठीत कायमचं हरवून जावं ,मुक्त व्हावं परत कधीही न येण्यासाठी ...हृदयाच हृदयाशी असलेलं प्रेम , जिवाचं शिवाशी असलेलं प्रेम, भेट झाली बाकी काय राहिलं ते शून्य ... आसवांनी भरलेले अंतकरण गुरूंना अर्पण केलं दुसरं काय आहे माझ्या कडे ..काही नकोय फक्त आपलं म्हणा ...हमसून हमसून हसत होतो की रडत होतो ... कृष्ण सुदामा ची भेट अशीच असेल का... कृष्णाच्या प्रेमाची श्रीमंती पाहून सुदामाची अवस्था काही अशीच झाली असेल का? अजून काय सांगू हो एवढेच शब्द आहेत माझ्याकडे

... निमित्तमात्र मी बाकी सगळी गुरू कृपा..

हे प्रेम आणि ही ओढ अशीच अनंत राहू द्या...

सर्वांनीच मला सभाळून घेतलं.. सर्वांचा कृतज्ञ..

जय गिरनारी

जय शंकर

जय अवधूतानंद

निमित्तमात्र

**- संकेत मुळे, ग्रंथालय परिचर.**

# *Events Conducted by the Departments in July 2023*

# *Department of Physics*

## NEP 2020 WEEK CELEBRATION

(Engaging activities Galore from 24th to 29th July, 2023 Across Maharashtra)

Under the activity **NEP 2020 WEEK CELEBRATION (Engaging activities Galore from 24th to 29th July, 2023 Across Maharashtra)** presentation of documentary on NEP was shown in Department of Physics on 29th July, 2023. It was prepared by IGNOU and was presented by Dr. Sudip Jha, SOS IGNOU. The documentary gave information and guidance for NEP 2020. The documentary as followed by a questionnaire. Around 35 students and staff members attended the event and submitted the questionnaire.



# *Department of Electronic Science*

## Department of Electronic Science

## Guest Lecture

**Topic: Interview Techniques**

**24/06/2023**

**– Mr. Dinesh Acharya ( AVP- HR operations – Credit Suisse, Pune)**

Department of Electronic Science organised a guest lecture on 24th June 2023 , on topic "Interview Techniques" for M.Sc. students. After completing M.Sc. course, students appear for interviews. Considering feedback from students , we realized that a session on interview technique should be arranged.

Our alumni Mr. Dinesh Acharya (2001 Batch B.Sc.( Electronic Science)) in a phone call shown interest in delivering lecture on interview techniques for M.Sc. and T.Y.B.Sc. students. So we arranged session on Saturday, 24th June 2023 at 2:00 pm. Ten students were present for this session.

On Saturday, Dr.A.D.Shaligram (CEO, Research Park Foundation and Emeritus Professor of DOES , SPPU) visited our department. Dr. Shaligram interacted with staff and M.Sc. students. Mr. Apurva Kulkarni who got job opportunity in Symbiosis Institute, Lavale as Jr. research associate. Mr. Apurva shared his experience of interview.

Program started with facilitation of Dr. A.D.Shaligram and Mr. Dinesh Acharya. Then Dr. A.D.Shaligram gave overview of scope of our subject and what are the expectations of industry from students. He discussed about students should know where the concepts he/she studied are used.

In interaction, Mr. Dinesh took overview of a corporate structure. He explained general procedure for recruitment of an engineer. In the process of selection there are two interviews – technical interview and HR interview. Technical interview is on courses you studied and projects you studied in graduate and post graduate level.

In HR interview, communication is very important. He share his experience of interviews he faced during getting job or while changing job.

He emphasized on always update knowledge from time to time. In this session Prof. D.B.Gaikwad introduced Mr. Dinesh Acharya and Dr. P.S. Varade gave brief introduction of Dr. A.D. Shaligram. Mr. G.M.Tarate expressed vote of thanks. Overall program was useful to students and staff members. Prof. T.B.Sonawane, Prof. T.R.Kumbhar, Prof. R.V.Vidap, Prof.A.V.Kamble, Prof. V.A.Chaudhari were present for the program.

Such sessions will help our students to bridge the gap between industry and academia.

**Prof. D.B.Gaikwad**
**Head, Dept. of Electronic Sc.**

# *Department of Electronic Science*



Felicitation of Dr A. D. Shaligram



Felicitation of Mr.Dinesh Acharya




Interaction of Dr. A. D. Shaligram with Students




ADShaligram Addressing-Students and Staff




Mr.Dinesh explaining interview Techniques_1




Mr.Dinesh explaining interview Techniques_2

# *Workshops attended by Faculty Members in July 2023*

# Dr. Prabhakar Varade, Assistant Professor, Department of Electronic Science



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ

आयोजित

जी-२०, जनभागीदारी, पंचप्रण- युवा संवाद अभियान

रासेयो व विविमं विभाग व जिल्हा समन्वयक नियोजन कार्यशाळा

दिनांक : १ जुलै, २०२३, स्थळ : वाणिज्य विभाग सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

सहभाग प्रमाणपत्र

प्रा./डॉ./श्री. प्रभाकर शिवदास वराडे, मॉडर्न

महाविद्यालय शिवाजीनगर पुणे.

यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ आयोजित दि. १ जुलै, २०२३ रोजी वाणिज्य विभाग सभागृह येथे जी-२०, जनभागीदारी, पंचप्रण- युवा संवाद अभियान 'रासेयो व विविमं विभाग आणि जिल्हा समन्वयक नियोजन कार्यशाळेत' उपस्थित राहिल्याबद्दल सदर सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ


डॉ. सदानंद भोसले
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

# *Modern Achievements*

# *Congratulations Dr. Pooja Paratane, Department of Mathematics*

I am happy to share that my research paper entitled 'SENSITIVITY ANALYSIS IN MULTIOBJECTIVE SOLID TRANSPORTATION PROBLEM' is published in the SCOPUS listed journal 'The Journal of Indian Mathematical Society'.

-Dr. Pooja M. Paratane
Assistant Prodessor,
Department of Mathematics











# *Congratulations to Rutuja Jagtap*



Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

Gold Medal Award

This is to certify that

Shri. / Smt. **Jagtap Rutuja Dilip**

has secured highest number of marks and

stood first at **B.Sc. (Statistics)** Examination held

in **April / May 2021** of this University.

He / She has been awarded Gold Medal.

"Late Prof. A.R. Kamat Gold Medal"

Director

Board of Examinations & Evaluation

Vice-Chancellor

Date : 1st July 2023








# *Congratulations to Shubham Todkar*











# *Modern Alumni Achievement*

Hearty congratulations to our ex-student ***Paras Patil.***



## संकेत सलगर, पारस पाटील यांना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

शासनाच्यावतीने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये २०२१-२२ साठी सांगली जिल्ह्यातून वेटलिफ्टिंगमध्ये संकेत महादेव सलगर, तर आर्चरी प्रकारात मयूर सुधीर रोकडे यांना जाहीर झाला आहे. तसेच सांगलीचे सुपुत्र पारस सुनील पाटील याला ॲथलेटिक्स प्रकारातून पुरस्कार जाहीर झाला आहे. संकेत याने २०२२ मध्ये इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे झालेल्या कॉमनवेल्थ स्पर्धेत भारताला पहिले रौप्यपदक मिळवून दिले होते.

पारस पाटील याला २०१९-२० साठीचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे. पारस पाटील हा मूळचा सांगलीचा असून त्याने राज्यस्तरीय, शालेयस्तरीय स्पर्धेत अनेक सुवर्णपदके मिळवली. २०१० मध्ये त्याने भोपाळ येथे झालेल्या राष्ट्रीय ज्युनिअर स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केले. २०१४ पर्यंत अनेक राष्ट्रीय शालेय मैदानी स्पर्धेत अनेक पदके जिंकली. २०१६ मध्ये ज्युनिअर राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत ११० मी. अडथळा शर्यतीत सुवर्णपदकाची कमाई केली. २०१८ मध्ये त्याने अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. २०१७ ते २०१९ पर्यंत त्याने वरिष्ठ राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व केले. २०१९ मध्ये त्याने भारतीय सीमाशुल्क विभागात मुंबई येथे ११० मी. अडथळा व लांबउडी प्रकारात सुवर्णपदक मिळविले.

**पारस पाटील** **संकेत सलगर**








# *Modern Alumni Achievement*

मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगरची खो खो खेळाची राष्ट्रीय खेळाडू ***प्रणाली बेनके*** हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग PSI परीक्षेत उत्तीर्ण झाल्या बद्दल हार्दिक अभिनंदन.



## खेळातून मिळवले पदक, आता गुन्हेगारांवर वचक!

### प्रणाली बेनकेचे पोलिस उपनिरीक्षक परीक्षेत यश

▸ नवनाथ भेके : सकाळ वृत्तसेवा

निरगुडसर, ता. ५ : आंबेगाव तालुक्यातील वळती गावातील शेतकरी कुटुंबातील राष्ट्रीय खो-खो खेळाडू प्रणाली बेनके हिने जिद्द, चिकाटी व अभ्यासाच्या जोरावर पोलिस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न साकार केले आहे. त्यामुळे सर्व परिसरातून तिचे कौतुक होत आहे.

प्रणाली हिला वर्दीची लहानापासूनच आवड आहे. त्यामुळे देशसेवेसाठी एक पोलिस अधिकारी होण्याचं स्वप्न तिने मनाशी बाळगलं होतं. ती एक राष्ट्रीय खो-खो खेळाडू असून, तिने आतापर्यंत १७ राष्ट्रीय खो-खो स्पर्धा खेळून १४ सुवर्णपदक मिळवले आहे. तसेच, तीन वेळा महाराष्ट्र राज्य संघाचे कर्णधारपद भूषविले असून, तिन्ही वेळी राज्याला सुवर्णपदक मिळवून देण्यात तिने सिंहाचा वाटा उचलला आहे. तिने रांजणी येथील नरसिंह विद्यालयात

"पोलिस अधिकारी होण्याचे स्वप्न लहानपणापासूनच उराशी बाळगले होते आणि खेळाडू असल्याने वर्दीची आवड होतीच. त्यासाठी अहोरात्र अभ्यास करून उराशी बाळगलेले स्वप्न सत्यात उतरल्याने मला खूप आनंद होत आहे. या यशात खो-खो प्रशिक्षक संदीप चव्हाण आणि माझे कुटुंबीय व मित्र परिवाराचे योगदान आहे.
— प्रणाली बेनके

शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर पदवीचे शिक्षण पुण्यातील मॉडर्न विद्यालयात घेतले. २०२० मध्ये पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एमपीएससीच्या अभ्यासाला सुरवात केली. कोरोना काळातील वेळ अभ्यासासाठी दिला. त्यातून या परीक्षेत तिला २५३ गुण मिळाले असून, मैदानात १०० पैकी १०० गुण मिळाले आणि महाराष्ट्रातून १७०० जणांची निवड मुलाखतीसाठी झाली. त्यामध्ये राज्यात सर्वाधिक ३२ गुण प्रणालीला खेळाडू कोट्यातून मिळाले आहेत. तिने खेळाडू कोट्यातून अर्ज भरला होता, परंतु खुल्या वर्गामधून उत्तीर्ण झाली.



## प्रणाली बेनके पोलिस उपनिरीक्षकपदी

पारगाव : वळती (ता. आंबेगाव) येथील शेतकरी कुटुंबातील प्रणाली बारकू बेनके हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून थेट पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झाली आहे. शेतकरी गरीब कुटुंबातून ती महाराष्ट्र आयोग परीक्षा उत्तीर्ण झाल्याने पंचक्रोशीतून प्रणालीचे कौतुक होत आहे. प्रणालीचे शिक्षण रांजणी (ता. आंबेगाव) येथील नरसिंह विद्यालयात झाले. शालेय शिक्षणाबरोबरच नरसिंह विद्यालयातील खो-खो संघातून तिने खेळण्यास सुरुवात केली. नरसिंह क्रीडा मंडळातून खो-खो खेळताना तिने चमकदार कामगिरी करत महाराष्ट्र राज्य महिला खो-खो संघाचे कर्णधारपद तीनदा भूषवले. तब्बल १४ सुवर्णपदके तिने मिळवली. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी पुण्यातील मॉडर्न कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. शिक्षणाबरोबरच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. जिद्द व चिकाटीच्या जोरावर तिने यश गाठले. खेळाडूंच्या राखीव कोट्यातून तिची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झाली. या यशाबद्दल प्रणालीचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, नरसिंह क्रीडा मंडळाचे प्रशिक्षक संदीप चव्हाण व वळती ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

My Gramin Edition
Jul 6, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in








# *Modern Alumni Achievement*

Hearty congratulations to our Ex-student ***Monali Natu and Aishwarya Bodke***. All the best



संमिश्र

बुधवार, २६ जुलै २०२३ | ९

Daily महाराष्ट्र स्पोर्ट्स

maharashtra.sports22@gmail.com

# भारतीय महिला सॉफ्टबॉल संघात महाराष्ट्राच्या पाच खेळाडूंची निवड

## आशियाई क्रीडा स्पर्धा

**नवी दिल्ली :** आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय महिला सॉफ्टबॉल संघ जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील पाच महिला खेळाडूंची निवड भारतीय संघात प्रथमच झाली आहे. ही एक ऐतिहासिक घटना असून महाराष्ट्राचे खेळाडू या स्पर्धेत आपला ठसा उमटवतील असा विश्वास सचिव डॉ. प्रदीप तळवेलकर यांनी व्यक्त केला.

चीन येथील हांगझोऊ येथे सप्टेंबर महिन्यात आशियाई क्रीडा स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी जून-जुलैमध्ये दिल्ली येथे दोन आठवड्यांचे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. या शिबिरातून अंतिम १६ खेळाडूंचा संघ जाहीर करण्यात आला.

सॉफ्टबॉल असोसिएशन ऑफ इंडिया या संघटनेने तीन राखीव खेळाडूंसह १६ खेळाडूंचा संघाची घोषणा केली. यात महाराष्ट्रातील ऐश्वर्या रमेश पुरी, सई अनिल जोशी, ऐश्वर्या सुनील बोडके, स्वप्नाली सी. वायदंडे व मोनाली मानसिंग नातू या महिला खेळाडूंचा समावेश आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला संघाचा सामना ऑलिम्पिक चॅम्पियन जपान, जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेला चायनीज तैपई या संघांविरुद्ध होणार आहे. या स्पर्धेत भारतीय महिला सॉफ्टबॉल संघाला वाइल्ड कार्ड प्रवेश देण्यात आला आहे. २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिक स्पर्धेत सॉफ्टबॉल हा खेळ असणार आहे.

सई जोशी | ऐश्वर्या पुरी | ऐश्वर्या बोडके | मोनाली नातू | स्वप्नाली वायदंडे

- भारतीय महिला सॉफ्टबॉल संघ : ऐश्वर्या पुरी (महाराष्ट्र), सई अनिल जोशी (महाराष्ट्र), ऐश्वर्या बोडके (महाराष्ट्र), मोनाली मानसिंग नातू (महाराष्ट्र), स्वप्नाली वायदंडे (महाराष्ट्र), अंजली पल्लीकारा (केरळ), स्टेफी साजी (केरळ), रिंटा चेरियन (केरळ), ममता गुगुलोथ (तेलंगणा), गंगा सोना (छत्तीसगड), ममता मिन्हास (पंजाब), संदीप कौर (पंजाब), मनीषा (हिमाचल प्रदेश), ईशा (दिल्ली), स्वेतासिनी सबर (ओडिशा), नित्य माळवी (मध्य प्रदेश).
- राखीव खेळाडू : प्रियांका बघेल (दिल्ली), मनीषा कुमारी (पंजाब), प्रीती वर्मा (छत्तीसगड) व चित्रा (राजस्थान).








# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING JULY 2023*

| Author | Title |
|---|---|
| KULKARNI SUHAS | KHAREKHURE IDOLS-BHAG-2 |
| TENDULKAR SACHIN | SACHIN TENDULKAR-PLAYING IT MY WAY |
| ACHARYA RAJESHKUMAR | MAHATMA GANDHI TO MODI |
| KHANDGE MANDA.DIXIT LILA | STREE SAHITYACHA MAGOVA KHAND-3 |
| KHANDGE MANDA.DIXIT LILA | STREE SAHITYACHA MAGOVA KHAND-2 |
| KHANDGE MANDA.DIXIT LILA | STREE SAHITYACHA MAGOVA KHAND-1 |
| OAKLEY BARBARA | LEARNING HOW TO LEARN |
| IYER PRAKASH | THE HABIT OF WINNING |
| JAMES PETER | DEAD LETTER DROP |
| SWAROOPNANDA | LIFE MANAGEMENT TECHNIQUES |
| SPEER ALBERT | INSIDE THE THIRD REICH : MEMOIRS |
| MURPHY JOSEPH | The Power of your subconscious mind |
| ADAIR JOHN | HOW TO LEAD OTHERS |
| FOER JOSHUA | Moonwalking with Einstein |
| MURPHY JOSEPH | HEALTH & VITALITY |
| HARARI YUVAL NOAH | HOMO DEUS: A BRIEF HISTORY OF TOMORROW |
| CARNEGIE DALE | EMBRACE CHANGE FOR SUCCESS |
| SHRIMAN LILA | 42 RULES FOR GROWING ENTERPRISE REVENUE |
| YOUSAFZAI MALALA | I AM MALALA |
| BHATTACHARYA P. | ORGANIC FARMING |
| NAHAR SANJAY | BONDING WITH KASHMIR |
| SWAROOPNANDA | SWAROOPNANDA-STORM TO PERFORM |
| KIYOSAKI ROBERT T. | SECOND CHANCE-FOR YOUR MONEY,YOUR LIFE & YOUR WORLD |
| MATRUBHUMI | YEAR BOOK-PLUS 2019 |
| TAGORE RABINDRANATH | GITANJALI |
| PREMCHAND | GODAN |
| PREMCHAND | GABAN |
| KALAM ABDUL A.P.J. | AGNIPANKH |
| KALAM ABDUL A.P.J. | MISSION INDIA |
| BHOSALE SHIVAJIRAO | SWAMI VIVEKANAND: CHARITRA CHINTAN |
| JADHAV NAMDEVRAO | SHIVAJI THE MANAGEMENT GURU |
| CHIKODE RANJIT | CHALISI NANTARCHYA 40 GOSHTI |
| DESHPANDE P.L. | PURVARANG |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING JULY 2023*

| Author | Title |
| --- | --- |
| GRISHAM JOHN | A TIME TO KILL |
| GAVASKAR RENU | SWAPNANCHE SHILEDAR |
| AVCHAT ANIL | KUTUHALAPOTI |
| MADGULKAR VIDYA | AAKASHASHI JADALE NAATE |
| GODBOLE MANGLA | ASHI GHAR ASHI MANAS |
| BAPAT RAVI | WARD NO.5-K.E.M. |
| PADHEY PRABHAKAR | ASEHI VIDWAN |
| KATHOLE PRALHAD | GOSHT GURUJI GHADNYACHI |
| JAGTAP VIJAY | PROF.RAMKRISHNA MORE: PARAMARSH EKA SHILPAKARACHA |
| MALKAR YAMAJI | AAHE UTTAR AAHE |
| THAKKAR HARIBHAI | THEORY OF KARMA |
| PATIL SAMBHAJI | VAIDIK GANIT |
| BHOSALE SAMBHAJI | SAFAR AITIHASIK PUNYACHI |
| KOTWAL GAUTAM | REAL ACHIEVERS |
| AVCHAT ANIL | KARYARAT |
| PATIL SHANKAR | SHRI GANESHA |
| HARY DAWOOD | DUBHASHYA (Marathi Translation of The Translator) |
| PAWAR JAYSINGRAO | SHIVCHARITRA PASUN AAMHI KAY SHIKLO |
| KHANDEKAR V.S. | SAHA BHASHNE |
| SHIRWADKAR V.V. | APPOINTMENT |
| MURTHY SUDHA | AAYUSHCHYACHE DHADE GIRAVTANA |
| SANE GURUJI | HIMALAYACHI SHIKHARE |
| Chattopadhyay, Sarat Chandra | 21 SHRESHTH KATHA |
| DESAI RANJIT | SHEKARA |
| DESAI RANJIT | RADHEY |
| GOULD SHANE | FIT FOR 50+ FOR WOMEN |
| GODBOLE MANGLA | SUNITABAI |
| JADHAV-BHOSALE VAIJA-YANIMALA | ARUN KOLHATKARANCHI KAVITA |
| KHANDEKAR V.S. | PANDHARE DHAG |
| PATHARE RANGNATH | TAMRPAT |
| MIRAJDAR D.M. | NAVETIL TEEN PRAVASI |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING JULY 2023*

| Author | Title |
|---|---|
| MIRAJDAR D.M. | GUDGULYA |
| CHASE JAMES | Mrugjal (Well Now My Preety) |
| KHATMODE RAMCHANDRA | SARJA- EKA BAILACHI KAHANI |
| THITE ABHIJIT | MUKTI |
| BHAT RAVINDRA | BHEDILE SURYAMANDLA |
| LAKSHYA FOUNDATION | SALAM MRUTYUNJAYANA-KARGIL YUDDHATIL 12 BAHADURANCHYA GAURAVGATHA |
| WAD VIJAYA | GOSHTINCHE GHAR |
| BAGE ASHA | Bhoomika Ani Utsav |
| SINHA ARUNIMA | FIRUNI NAVI JANMALE MEE |
| JOSHI VAIBHAV | MEE VAGAIRE |
| CHOPRA DIPAK | SUKHACHI GUPITE |
| BOKIL MILIND | SHALA |
| NALGE CHANDRAKUMAR | LOKRANG |
| ATRE PRALHAD KESHAV | AATREY VANI |
| BRAMHNALKAR AJAY | SWARTHATUN SARVARTHAKADE |
| VISHWAS NANGARE PATIL | MANN ME HAI VISHWAS |
| KISHOR PANKAJ | BHARAT KANYA KALPANA CHAWLA |
| KALAM ABDUL A.P.J. | AGNIPANKH |
| BHAVE SUBODH | GHEI CHHAND |
| KHARE SANDIP | MEE AN MAZHA AAWAJ |
| ASHOKAN M.S. | METROMAN SHRIDHARAN |
| RAJAN RAGHURAM G | I DO WHAT I DO |
| BAJAJ DEEPAK | NETWORK MARKETING MILLIONAIRE VHA |
| KEER DHANANJAY | RAJARSHI SHAHU CHHATRAPATI |
| KARANDIKAR V.R. | EKA JANARDANI- SANT EKNATH |
| MORE SADANAND | THORANCHE ADNYAT PAILU |
| BHAYYU MAHARAJ | MERA ATMABODH |
| KANE SUNITI | Vajpayeenche Adnyat Pailu |
| KANE SUNITI | Vajpayeenche Adnyat Pailu |
| DULAT A.S. | Kashmir : Vajpayee Parv |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING JULY 2023*

| Author | Title |
|---|---|
| AMBEKAR VINAYAK | NARENDRA MODI -EKA KARMYOGYACHI SANGHARSHGATHA |
| NAG KINGSHUK | KAHANI NAMOCHI EKA RAJKIY PRAVASACHI |
| JOSHI DILIP | Yugpurush Balasaheb Thackeray |
| DESHPANDE S.H. | SAVARKAR TE BJP HINDUTVA-VICHARANCHA CHIKITSAK AAL-EKH |
| Irwin, Terri | Steve Ani Mee |
| KALAM ABDUL A.P.J. | MAZA BHARAT UJJAWAL BHARAT |
| KALAM ABDUL A.P.J. | TUM HO ADVITIYA |
| KALAM ABDUL A.P.J. | VIDNYANACHYA UJJAWAL WATA |
| KALAM ABDUL A.P.J. | AGNIPANKH |
| JOG VISHNUBUVA | SAARTH SHRI AMRUTANUBHAV AANI SAARTH CHANGDEV PASASHTHI |
| VINOD D.G. | Sadhana Sutre :EK MAHAJAGAR |
| KALAM ABDUL A.P.J. | BEYOND 2020 VISION UDYACHYA BHARTASATHI |
| KASBE, RAOSAHEB | HINDU RASHTRAVAD-SWA.SAVARKARANCHA AANI RASHTRIYA SWAYAM SEVAK SANGHACHA |
| Thackeray, Prabodhankar | MAZI JIVANGATHA |
| PHARANDE, SHYAM | Krushnatir: Kai.Yashwantrao Chavan yanchya jeevanavaril kadambari |
| Hussain, Zakir | Maza Talamay Jeevan |
| VENKATESAN CHANDRA-MOULI | GET BETTER AT GETTING BETTER |
| SADGURU | Inner engineering : a Yogi's guide to joy |
| KALAM ABDUL A.P.J. | MY INDIA IDEAS FOR THE FUTURE |
| SINGH TAVLEEN | Messiah Modi : a tale of great expectations |
| GANGULY ANIRBAN | AMIT SHAH AND THE MARCH OF BJP |
| GRACIA HECTOR | IKIGAI-THE JAPANESE SECRET TO A LONG AND HAPPY LIFE |
| HARARI YUVAL NOAH | SAPIENS A BRIEF HISTORY OF HUMANKIND |
| GHAYOTE M.M. | Maṇḍalabrāhmaṇopaniṣad and Nādabindūpaniṣad |
| BHAGAT CHETAN | INDIA POSITIVE |
| JAYKAR PAPUL | Krishnamurti : a biography |
| Amish | SITA Warrior of Mithila |

# *News Paper Clippings : July 2023*




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***



# News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

सकाळ

## शिक्षणक्षेत्रासाठी आता अनोखा 'उद्योग'!

### 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस'साठी पोर्टल; सहा हजारांहून अधिक तज्ज्ञांची नोंदणी

मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ६ : एकीकडे विद्यार्थ्यांना शिक्षण मिळते; पण नोकरीची शाश्वती नाही!! तर दुसरीकडे नोकरीसाठी जागा उपलब्ध आहेत; परंतु कुशल मनुष्यबळ नाही, असे उद्योग क्षेत्राचे म्हणणे असते. अशात विद्यार्थ्यांना शिकताना प्रत्यक्ष व्यावसायिक जगतातील अनुभव मिळावा, यासाठी त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून धडे मिळणं महत्त्वाचे असते. म्हणूनच आता 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस'ची संकल्पना प्रत्यक्षात येत असून, याद्वारे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी देशभरातील जवळपास सहा हजार २९० तज्ज्ञांनी नोंदणी केली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने उद्योग आणि विविध व्यावसायिक क्षेत्रातील तज्ज्ञांना शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करून घेण्यासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' हे नवीन पद तयार केले. आता राज्य सरकारनेही जानेवारीच्या सुरुवातीला या पदाला मान्यता दिली आहे. समाजातील प्रतिष्ठित मान्यवर 'तज्ज्ञ' म्हणून शिकविण्याच्या प्रक्रियेत सहभागी झाल्यास त्यांच्या अनुभवातून व्यावसायिक जगातील वास्तविक शिक्षण विद्यार्थ्यांना मिळेल, या हेतूने हे पद नव्याने तयार केले आहे. या पदासाठी इच्छुक असणाऱ्या व्यावसायिक, तज्ज्ञांच्या नोंदणीसाठी आयोगाने जूनमध्ये स्वतंत्र पोर्टल कार्यान्वित केले. या पोर्टलवर संबंधित तज्ज्ञ, व्यावसायिकांना नोंदणीची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. यासाठी आतापर्यंत देशातील १४९ शिक्षण संस्थांनी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' अंतर्गत नियुक्तीसाठी सकारात्मकता दर्शविली आहे.

**हे साध्य होणे अपेक्षित**

- उद्योग-समाजाच्या गरजा ओळखून शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करणे
- विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित तज्ज्ञ, व्यावसायिकांना शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करणे
- त्या-त्या क्षेत्रातील अनुभवावर आधारित शिक्षण देणे

"विद्यार्थ्यांना आता अनुभवावर आणि कौशल्यावर आधारित शिक्षण देणे उपयुक्त ठरणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही अशाच शिक्षणालाच महत्व आहे. त्यामुळे उच्च शिक्षणात 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस'मधून नियुक्त प्राध्यापकांना विशेष स्थान असणार आहे. या प्राध्यापकांद्वारे विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी असो वा वाणिज्य, विज्ञान अशा कोणत्याही शाखेतील व्यावसायिक, कौशल्यपूर्ण आणि अनुभवावर आधारित शिक्षणाचा मार्ग उपलब्ध होईल.

**- डॉ. गजानन एकबोटे,**
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

"विद्यापीठ अनुदान आयोगाने 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' अंतर्गत उपलब्ध करून दिलेले स्वतंत्र पोर्टल हे शिक्षण संस्था आणि तज्ज्ञ, अनुभवी व्यावसायिक यांच्यातील दुवा आहे. विविध क्षेत्रांतील व्यावसायिकांना विद्यार्थ्यांना शिकविण्याची इच्छा असल्यास त्यांना शिक्षण संस्थांपर्यंत पोचविण्याच्या दृष्टीने आयोगाने पोर्टलच्या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. औद्योगिक तज्ज्ञांची गरज असणाऱ्या शिक्षण संस्थांनाही तज्ज्ञ उपलब्ध करून दिले जातील.

**- डॉ. मनीष जोशी,**
सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग

Pune, Main
07/07/2023 Page No. 1

प्रभात

## विद्यापीठाचा आर्थिक डोलारा कोसळणार

### 'क्लस्टर'चा परिणाम; महाविद्यालयांची संलग्नता येणार संपुष्टात

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ९ -** एखाद्या संस्थेची चार-पाच महाविद्यालये एकत्र करुन त्यांचे स्वतःचे समूह विद्यापीठ (क्लस्टर) स्थापन करण्यास राज्य सरकारने हिरवा कंदील दिला आहे. यामुळे परीक्षा शुल्क व महाविद्यालय संलग्नता शुल्कातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला मिळणाऱ्या १५० कोटी रुपयांचे उत्पन्नाचे स्रोत कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. क्लस्टर विद्यापीठांमुळे विद्यापीठाचा भार कमी होणार असला तरी आर्थिक डोलारा ढासळण्याची चिन्हे आहेत.



उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 'क्लस्टर' विद्यापीठाचा मसुदा तयार केला असून, तो अंतिम टप्प्यात आहे. सध्याच्या स्थितीत सर्व महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न आहेत. शैक्षणिक संस्थांना 'क्लस्टर' विद्यापीठांची मान्यता मिळाल्यास त्यात किमान दोन आणि कमाल पाच महाविद्यालये असतील. त्यामुळे त्यांची विद्यापीठाशी असणारी संलग्नता संपुष्टात येणार आहे.

परीक्षा शुल्कापोटी महाविद्यालयांकडून विद्यापीठाला दरवर्षी सुमारे १२५ कोटी, तर संलग्नता शुल्कापोटी सुमारे १५ कोटी रुपये मिळतात. त्यातच या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शुल्कापोटी सुमारे पाच कोटी रुपये मिळतात. 'क्लस्टर' विद्यापीठांमुळे हे शुल्क विद्यापीठाला मिळणार नाही.

दरम्यान, विद्यापीठाला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवण्यासाठी आपल्याकडे मॉडेल आणि उपाययोजना तयार असल्याचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी म्हटले आहे.

"क्लस्टर विद्यापीठातील महाविद्यालयांना शासनाकडून अनुदान, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार का, याविषयी कोणतीच स्पष्टता नाही. क्लस्टर विद्यापीठासाठी महाविद्यालयांची संख्या वाढवावी. त्यासाठी २५ किलोमीटरऐवजी ५० किलोमीटरचा परिघ ग्राह्य धरावा. याबाबतच्या सूचना राज्य शासनाकडे मांडल्या आहेत. त्यादृष्टीने विचार झाला, तरच क्लस्टर विद्यापीठासाठी शैक्षणिक संस्था पुढे येतील.

**–डॉ. गजानन एकबोटे,**
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

PuneCity, 10 July 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

PROGRESSIVE EDUCATION SOCIETY

## Engineering to business, PES seeks autonomy for 3 of its colleges

DEVANSHI SRIVASTAVA
PUNE, JULY 11

THE PROGRESSIVE Education Society (PES) has applied for autonomy for three colleges under its management, Modern College of Engineering, Modern Institute of Business Studies and Modern Institute of Business Management, according to Gajanan R Ekbote, chairperson of Business Council of PES.

The Society is also planning to set up a cluster university with colleges under it, once the norms governing such institutions are clear, he said. "We have applied for autonomy for three of our colleges. Our board of management directors visited Delhi and submitted the application. There will be a meeting of the UGC Working Group on autonomy on July 14 where the application will be scrutinised, and the College of Engineering can expect to get autonomy by July 20," Ekbote said.

Autonomous colleges, while still affiliated to a university, enjoy higher academic independence in terms of designing courses, assessing students and taking admissions.

"In three to four months, we will forward the proposals for autonomy of another three colleges," Ekbote said.

PES runs 56 educational institutions of all levels in the state



Gajanan R Ekbote

out of which two are autonomous colleges at present – Modern College of Arts, Science and Commerce in Shivajinagar and Ganeshkhind. Both will be implementing the National Education Policy 2020 from this academic session, Ekbote said.

"Progressive Education Society is also trying to have a cluster university in the future. One of the main features of the National Education Policy 2020 is multi-disciplinary education, and cluster universities can ensure that they can have colleges from across disciplines," he said.

The state government had drafted a policy for cluster universities, aligned with the NEP 2020, enabling two to five colleges within a 25-km radius to come together and form a cluster. The government had sought suggestions on the draft until June 30.

COLLEGE WATCH

Ekbote emphasised the advantage of sharing infrastructure and more vibrant interactions between students and faculty of different fields of study in cluster universities but expressed some reservations.

"The main problem with the cluster university draft is that the maximum number of colleges is limited to only five whereas we want to include all 13 colleges of Progressive Education Society," said Ekbote. "If the government comes up with a better formula, we will have a cluster university."

The Indian Express 12.7.2023

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा तीन महाविद्यालयांच्या स्वायत्ततेसाठी प्रस्ताव

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मॉडर्न इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट आणि मॉडर्न इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस स्टडीज या तीन महाविद्यालयांच्या स्वायत्ततेचा प्रस्ताव सादर केला आहे. तसेच समूह विद्यापीठासाठीची नियमावली निश्चित झाल्यावर संस्थेचा येत्या काळात समूह विद्यापीठ स्थापनेचाही विचार आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी ही माहिती दिली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळा ते महाविद्यालय मिळून एकूण ५६ संस्था आहेत. त्यापैकी शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालय आणि गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाला स्वायत्तता प्राप्त झाली आहे. त्यानंतर आता आणखी तीन महाविद्यालयांना स्वायत्तता मिळण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावांबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) बैठकीत स्वायत्ततेबाबत निर्णय घेतला जाईल.

सध्या तीनही महाविद्यालये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न आहेत. मात्र स्वायत्तता प्राप्त झाल्यावर या महाविद्यालयांना नवे अभ्यासक्रम, परीक्षा या बाबत स्वतंत्रपणे निर्णय घेता येईल. याशिवाय आणखी दोन महाविद्यालयांचे स्वायत्त दर्जासाठीचे प्रस्ताव सादर केले जाणार आहेत, असे डॉ. एकबोटे यांनी सांगितले.

राज्य सरकारने काही दिवसांपूर्वीच समूह विद्यापीठ स्थापनेबाबतच्या नियमावलीचा मसुदा प्रसिद्ध केला. त्यावर ३० जूनपर्यंत हरकती सूचना मागवण्यात आल्या होत्या. मात्र या नियमावलीत २५ किलोमीटरच्या परिघातील दोन ते पाच महाविद्यालयांच्या समूह विद्यापीठ स्थापनेची अट अडचणीची आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या तेरा महाविद्यालयांचे मिळून समूह विद्यापीठ स्थापन करण्याची कल्पना आहे. समूह विद्यापीठ झाल्यास पायाभूत सुविधा, अन्य स्रोतांचा सामायिक वापर करणे शक्य होईल. चांगल्या रितीने शैक्षणिक देवाणघेवाण होऊ शकेल. मात्र सरकारने नियमावलीतील अडचणी दूर करणे आवश्यक आहे. या अडचणी दूर झाल्यास समूह विद्यापीठ स्थापनेचाही प्रयत्न असल्याचे डॉ. एकबोटे यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Thu, 13 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72927309

## News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

# सरकारी विद्यापीठांवर 'एनपीई'चे परिणाम

प्रा. डॉ. गजानन एकबोटे

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील काही बदलांनुसार येत्या काळात सरकारी विद्यापीठांचे आर्थिक स्रोत घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे या विद्यापीठाने नवे आर्थिक स्रोत निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे. नव्या आर्थिक स्रोतांमुळे ही विद्यापीठे आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यास चांगले परिणाम पाहायला मिळतील.**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे (एनईपी) देशातील उच्च शिक्षणामध्ये अनेक बदल होत आहेत. या धोरणाच्या मसुद्यानुसार, उच्च शिक्षणातील विद्याशाखांच्या भिंती नष्ट होणार आहेत. विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे शिक्षण मुक्तपणे घेता येणार आहे. सन २०३२पर्यंत भारतातील सर्व महाविद्यालये 'स्वायत्त' होणार असून, त्यांना पदवी प्रदानाचे पूर्ण अधिकार मिळणार आहेत. एका विद्याशाखेची महाविद्यालये उदा. शिक्षणशास्त्र महाविद्यालये, विधी महाविद्यालये यापुढे अस्तित्वात राहणार नाहीत. शासकीय विद्यापीठांचे रूपांतर लहान विद्यापीठांमध्ये होणार आहे. शक्यतो या सरकारी विद्यापीठांना कोणतेही महाविद्यालय संलग्न राहणार नाही. एकाच संस्थेची अनेक महाविद्यालये एकत्र येऊन त्यांचे रूपांतर समूह विद्यापीठांमध्ये (क्लस्टर युनिव्हर्सिटी) होणार आहे. त्याचप्रमाणे दोन संस्थांनाही एकत्र येऊन आपले समूह विद्यापीठ स्थापन करता येईल.

खासगी विद्यापीठांच्या स्थापनेलाही मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे संशोधनाला प्राधान्य देण्यात आले असून, त्यासाठी 'नॅशनल रिसर्च फाउंडेशन'ची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थांद्वारा सरकारी विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठे, संशोधन संस्था, महाविद्यालये यांना संशोधनासाठी भरपूर निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात सुमारे ५० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अनेक केंद्रीय नियामक संस्थांचे एकीकरण होऊन एकच केंद्रीय नियामक संस्था स्थापन होणार आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या बाबतीत संस्थाचालकांना, प्राचार्यांना होणारा त्रास कमी होईल. व्यावसायिक शिक्षण (प्रोफेशनल एज्युकेशन) स्थानिक भाषांमध्ये देण्यात येणार आहे. उदा. महाराष्ट्रातील अभियांत्रिकी विद्याशाखेच्या महाविद्यालयात मराठीत भाषेत शिक्षण देण्याचे धोरण अखिल भारतीय विद्यापरिषदेने जाहीर केले आहे. असे अनेक बदल राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये स्पष्ट केलेले आहेत.

यातील काही बदलांमुळे सरकारी विद्यापीठांची आर्थिक स्थिती कमकुवत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सरकारी अनुदान, विद्यार्थ्यांकडून आकारलेले परीक्षा शुल्क, महाविद्यालयांकडून आकारलेले संलग्नता शुल्क, शैक्षणिक पात्रता शुल्क, सल्ला शुल्क, विद्यापीठामध्ये चालू असलेल्या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांकडून मिळणारे शैक्षणिक शुल्क आदी सरकारी विद्यापीठांचे (स्टेट युनिव्हर्सिटी) उत्पन्नाचे खालील स्रोत आहेत. यातील संलग्नता शुल्क, शैक्षणिक पात्रता शुल्क, परीक्षा शुल्क हे सरकारी शासकीय विद्यापीठांच्या उत्पन्नाचे प्रमुख स्रोत आहेत. उदा. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला या शुल्कांद्वारे सुमारे १५० कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न प्राप्त होते. हा आर्थिक स्रोत भविष्यकाळामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदींमुळे कमी होत जाणार आहे, याची नोंद सरकारी विद्यापीठांच्या पदाधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठ निधीमधून रिक्त पदांवर नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च फार मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचाही आर्थिक भार विद्यापीठांवर पडणार आहे. अशा सर्व गोष्टींचा विचार करता दर वर्षी सुमारे २०० कोटी रुपये



विद्यापीठाच्या अर्थसंकल्पाच्या जमेतून कमी होणार आहेत. ही रक्कम फार मोठी असून, विद्यापीठाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून विद्यापीठांच्या विकासावर त्याचा परिणाम होणार आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारी विद्यापीठांना नवीन आर्थिक स्रोतांचा विचार गांभीर्याने करावा लागेल. त्यातील काही उपाय पुढीलप्रमाणे - माजी विद्यार्थी संघटना आणि त्यांच्याकडून त्या माध्यमातून मिळणारा निधी. पाश्चिमात्य देशांमध्ये उदा. हार्वर्ड युनिव्हर्सिटी, केंब्रिज युनिव्हर्सिटी आदी प्रमुख विद्यापीठांना माजी विद्यार्थ्यांकडून भरपूर प्रमाणात निधी प्राप्त होत असतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या ही विद्यापीठे सक्षम झालेली आहेत. भारतीय विद्यापीठांमध्येही प्रत्येक विद्यापीठानुसार माजी विद्यार्थी संघटना कार्यक्षम करून, त्याद्वारे भरपूर निधी मिळविता येईल. हा उत्पन्नाचा स्रोत अतिशय महत्त्वाचा आहे.

विद्यापीठांमध्ये नवीन अभ्यासक्रम आणि नवीन महाविद्यालये सुरू करता येतील. उदा. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये ४११ एकर जागेमध्ये औषध निर्माणशास्त्र विद्याशाखेचे महाविद्यालय सुरू करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अभियांत्रिकी विद्याशाखेचे महाविद्यालय सुरू करता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यानुसार ही महाविद्यालये सुरू करताना यांना केंद्रीय संस्थांची मान्यता घेणे जरुरीचे नसते. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या उपकेंद्रांमध्येदेखील अशी महाविद्यालये आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करता येतील. त्यामुळे भरपूर निधी विद्यापीठांना प्राप्त होऊ शकेल.

पाच वर्षांचे 'इंटिग्रेटेड' अभ्यासक्रम विद्यापीठांना चालू करता येतील. त्यामुळेदेखील विद्यापीठांना भरपूर निधी प्राप्त होईल. संशोधन आणि सल्ला (कन्सल्टन्सी) याद्वारेदेखील विद्यापीठाच्या विभागांना भरपूर निधी प्राप्त होऊ शकतो. याबाबतीत अनेक उद्योग संस्थांबरोबर चर्चा करून, त्यांच्या सहकार्याने संशोधनाचे निरनिराळे प्रकल्प विद्यापीठांमध्ये सुरू करता येतील. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून त्याद्वारे दुरस्थ शिक्षण (डिस्टन्स लर्निंग) सुरू करता येईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अभिप्रेत असलेले अनेक आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम विद्यापीठ विभागांमध्ये नव्याने सुरू करता येतील. त्या वेळीही विद्यापीठांना चांगल्या प्रकारे शैक्षणिक शुल्क मिळेल. त्याचप्रमाणे व्यावसायिकांसाठी अनेक प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालू करता येतील.

विद्यापीठांमधील पायाभूत सुविधांचा वापर करण्यास इतर शैक्षणिक संस्थांना परवानगी दिल्यास त्यातूनही मोठ्या प्रमाणावर नवीन आर्थिक स्रोत निर्माण होईल. उदा. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सायंकाळी पाचनंतर प्रयोगशाळा, वर्गखोल्या, क्रीडांगणे या ठिकाणी विद्यापीठाचे कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम राबविले जात नाहीत. या ठिकाणी चांगल्या शैक्षणिक संस्थांना या पायाभूत सुविधा वापरण्यास परवानगी दिल्यास विद्यापीठास मोठ्या प्रमाणावर निधी मिळू शकेल.

दर वर्षी सुमारे पाच टक्के एवढ्या रकमेचे शुल्क वाढविण्यासंबंधी तरतूद विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात केली पाहिजे. ज्याप्रमाणे कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढवून देण्याची तरतूद सरकारकडून केली जाते. त्याचप्रमाणे विद्यापीठावर दर वर्षी वाढीव आर्थिक भार पडत असतो. त्यासाठी ही तरतूद करणे अतिशय आवश्यक आहे. या शुल्कामध्ये संलग्नता शुल्क, परीक्षा शुल्क, शैक्षणिक पात्रता शुल्क इत्यादी शुल्कांचा समावेश करावा लागेल.

अशा अनेक उपाययोजनांचा बारकाईने अभ्यास करून विद्यापीठांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण या विद्यापीठांतून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देता येते. ही सरकारी विद्यापीठे आर्थिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम नसतील, तर अध्यापन करण्याचे त्यांचे कार्य मंदावेल आणि त्याचा परिणाम समाजावर व देशावर होईल, याची नोंद सर्वांनी घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विद्यापीठांना आपल्या धोरणामध्ये बदल करावे लागतील.

**(लेखक 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे'चे कार्याध्यक्ष आहेत.)**

Maharashtra Times 16.7.2023

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# SPPU messes up again with results

## PG exam papers of Law and Management not checked due to non-availability of professors; students in a fix

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com

TWEET @YashPune_Mirror

Semester exam results of BA LLB and MBA have been pending for the last several months due to the non-availability of associate professors for answer sheet-checking. The Savitribai Phule Pune University (SPPU) examination department officials explained the reason behind the delay, but around 15 lakh answer sheets have still not been checked.

A student, on the condition of anonymity, told Mirror, "I am a BA LLB student. We took the semester exam in January. Later, we completed backlog papers. The SPPU examination department has declared the results of backlogs but the semester exam results are still pending. After some student organisations protested, vice-chancellor Suresh Gosavi assured that all results would be out before July 31."

Another student of MBA said, "We are waiting for the semester exam results. The results are supposed to be declared within 45 days after the exam. But even after months, our results are pending. Students have panicked. Most of them are preparing for higher education abroad. But due to non-availability of mark sheets, they are not able to apply."

Gajanan Ekbote, working president, Progressive Education Society (PES), told Mirror, "It is a serious matter. I will enquire with officials concerned and get back. The results should be declared as per the annual academic calendar."



FILE PHOTO

An official of the SPPU examination department, requesting anonymity, said, "We are facing a staff crunch. We have been sent a list of professors for answer sheet-checking, but even after several follow-ups, the list has not been approved. There are no full-time deans for all departments. Hence, the lists are still pending. Over 15 lakh answer sheets have not been checked yet. We are working hard to meet the July 31 deadline to declare the results."

Vice-chancellor Suresh Gosavi and board of examination and evaluation director Mahesh Kakade were not available for comment.


Pune Mirror 18.7.2023

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

# स्वागत परदेशी विद्यापीठांचे

भाष्य



डॉ. गजानन एकबोटे

**आर्थिक उदारीकरण स्वीकारल्यानंतर लगेचच शिक्षण क्षेत्रातही व्यापक सुधारणा घडवायला हव्या होत्या. हे क्षेत्र त्याचवेळी खुले, स्वायत्त, स्पर्धात्मक, पारदर्शक केले असते तर आज तीन दशकांनंतर शिक्षणविषयक चित्र वेगळे दिसले असते. निदान आता तरी हे व्हायला हवे. परदेशी विद्यापीठांना येथे येण्यास विरोध करणे चुकीचे ठरेल.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने परदेशी विद्यापीठांना भारतात येण्यास प्रवेशद्वार खुले केल्यानंतर आता उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. वस्तुतः हे १९९१मध्येच व्हायला हवे होते. त्यावेळी अर्थ, व्यापार, उद्योग क्षेत्रात 'उदारीकरण- खासगीकरण-जागतिकीकरणाचे' नवे पर्व भारतात सुरू झाले, ज्याचे श्रेय तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि तेव्हाचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांना जाते. त्याच सुमारास शिक्षण क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेप, परवानाराज, लाल फीत आणि नोकरशाही हटवून ते खुले, स्वायत्त, स्पर्धात्मक, पारदर्शक केले असते तर आज तीन दशकांनंतर शिक्षणविषयक चित्र नक्कीच वेगळे दिसले असते.

'शांघाय रँकिंग्स २०२२'नुसार जगातील उत्कृष्ट पहिल्या ५०० विद्यापीठांच्या क्रमवारीत अमेरिकेची १२७, चीनची ८३ तर भारताचे फक्त एकच विद्यापीठ आहे. हे कशाचे लक्षण आहे? 'कम्युनिस्ट' चीनला जे जमले ते भारताला का जमू नये? चीनची उच्च शिक्षणातील ही मुसंडी गेल्या काही वर्षातील आहे. राजकीय, सांस्कृतिक, भाषिक अडथळे पार करून अत्यंत कठीण निकष ओलांडून चीनने हे यश संपादन केले आहे. ते वाखाणण्यासारखे आहे. प्रतिवर्षी आठ लाख भारतीय विद्यार्थी पाच अब्ज डॉलर इतके परकी चलन खर्च करून प्रगत देशात उच्च शिक्षणासाठी जातात आणि तेथेच स्थिरावतात. त्यामुळे 'ब्रेन ड्रेन' होतो. याचा 'रिव्हर्स फ्लो' म्हणजे 'ब्रेन गेन' होण्यासाठी भारतीय विद्यापीठे जागतिक दर्जाची होणे आवश्यक आहे. याउलट आपल्या देशात विकसनशील देशाचेच विद्यार्थी येतात. उदा. श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश, थायलंड, इंडोनेशिया इ. आपल्या देशातील विद्यार्थ्यांनादेखील भारतीय उच्च शिक्षणसंस्थांचे आकर्षण वाटत नसल्यामुळे हे घडत आहे.

भारतात 'आयआयटी', 'एनआयटी', 'आयआयएम', 'आयसर', 'आयआयएससी', 'एम्स' ही शैक्षणिक गुणवत्तेची काही केंद्रे आपण तयार केली आहेत. केंद्रीय विद्यापीठेही गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात. मात्र संशोधनासाठी लागणारा ८५ टक्के निधी या केंद्रीय शिक्षण संस्थांना आणि विद्यापीठांना मिळतो. राज्यशासित विद्यापीठे ही राजकीय हस्तक्षेप, परवानाराज, नोकरशाही यांनी ग्रासली आहेत. तसेच ती शेकडोच्या घरातील संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था आणि प्रचंड विद्यार्थिसंख्या, त्याचप्रमाणे रिक्त जागा भरून न देण्याचे शासनाचे धोरण यांच्या भारामुळे वाकली आहेत. ही विद्यापीठे असंवेदनशील झाली आहेत. संख्या प्रमाणाबाहेर वाढली की गुणवत्ता खालावते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बाबतीत हे घडत आहे. या अग्रेसर विद्यापीठात नियमित कुलगुरू प्राप्त झाले नव्हते. तसेच ५० टक्के प्राध्यापकपदे रिक्त आहेत. तुटपुंजा संशोधन निधी आणि संसाधने असताना संशोधनाबद्दल टीका करून उपयोग नाही.

राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या शिफारशींनुसार जिल्हानिहाय एक विद्यापीठ आणि एका विद्यापीठाला जास्तीत जास्त १०० संलग्न महाविद्यालये असे प्रमाण हवे. याची राज्य सरकारला जाणीव आहे. व्यावसायिक महाविद्यालये राज्य सरकारच्या आदेशानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्कमाफी देतात. ही रक्कम राज्य स्तरावर हजारो कोटी रुपयांच्या घरात जाते. परंतु प्रतिवर्षी राज्य सरकारच समाजकल्याण खात्यातर्फे त्याची प्रतिपूर्ती संबंधित महाविद्यालयांना वेळेवर होत नसल्यामुळे त्यांची प्रचंड आर्थिक कोंडी होते. त्याचा परिणाम शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगारावर होतो. शासनाला ही विनाअनुदानित वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, संगणक उपयोजन, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन महाविद्यालये बंद करायची आहेत काय? अशा विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयांना अनेक नियामकांचा सामना करावा लागतो. प्राचार्यांचा बहुतांश वेळ प्रशासनात जातो. अध्यापन, संशोधन त्यामुळे दुय्यम बाब ठरते. हे चित्र बदलायला हवे.



## बहुविद्याशाखीय विद्यापीठे

जगभरातील उत्कृष्ट विद्यापीठे हार्वर्ड, स्टॅनफर्ड, कोलंबिया, ऑक्सफर्ड, केम्ब्रिज ही बहुविद्याशाखीय आहेत. ज्यात आंतरविद्याशाखीय अध्यापन आणि संशोधन होते. विद्यापीठाची संकल्पना एखाद्या विशाल वटवृक्षासारखी आहे. आपण मात्र विद्याशाखांची काटछाट करून एकाच विद्याशाखांची विद्यापीठे तयार करत आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रविज्ञान विद्यापीठ, लोणेरे जे अभियांत्रिकी शिक्षणाला वाहिलेले आहे. त्याचप्रमाणे विधी विद्याशाखेचे हे स्वतंत्र विद्यापीठ आहे. अशा प्रकारे आपण जगाच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला चाके फिरवून आपले सदोष धोरण, संकुचित दृष्टी आणि दूरदृष्टीचा अभाव याचे दर्शन घडवत आहोत. त्यामुळे ज्ञानाने परिपूर्ण असा विद्यार्थी घडत नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपण उच्च आणि तंत्रशिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण इंग्रजीव्यतिरिक्त हिंदी आणि प्रादेशिक भाषांमध्ये देणार आहोत. मूळ संशोधन, संदर्भग्रंथ इंग्रजीत शिकविणे आणि शिकणे हा पर्याय अधिक सुलभ आणि व्यवहार्य आहे. आपण न्यूनगंड न बाळगता इंग्रजी या जागतिक भाषेला आणि ज्ञानभाषेला मोकळ्या मनाने आणि खुल्या दिलाने सामोरे गेल्यास विद्यार्थ्यांचा फायदा होईल आणि त्यांचा भविष्यकाळ उज्वल होईल. हे खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे युग आहे. चीन, फ्रान्स, जर्मनी, जपान या देशांनीही आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि मूलभूत संशोधनासाठी इंग्रजीचा स्वीकार केला आहे, याचीही नोंद घेणे आवश्यक आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण प्रादेशिक भाषांमध्ये देणे योग्य आहे. परदेशी विद्यापीठांना प्रोत्साहन देताना देशातील विद्यापीठांसाठी प्रोत्साहनपर वातावरण उपलब्ध करून दिल्यास ती या स्पर्धेला आत्मविश्वासाने सामोरी जाऊ शकतील. ज्ञानाच्या आदानप्रदानातून भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारेल. परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या भारतीय विद्यार्थांना आपल्या देशातच चांगला पर्याय कमी खर्चात उपलब्ध होणे निश्चितच फायद्याचे ठरेल. शिक्षण हा केंद्र आणि राज्य सरकारच्या सामायिक सूचीतील विषय असल्याने केंद्र आणि राज्य सरकारच्या उच्च आणि तंत्रशिक्षण खात्यात सहकार्य, समन्वय, एकवाक्यता, संवाद असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकारने राज्यातील खासगी विद्यापीठांचे शुल्कनियंत्रण करण्यासाठी विधेयक तयार केले होते. हा निर्णय चुकीचा ठरेल, याची जाणीव राज्यकर्त्यांना झाली. जेथे शासनाची भांडवली गुंतवणूक नाही, आर्थिक, प्रशासकीय सहभाग नाही, शासनाचे अनुदान नाही अशा स्वयंअर्थसाहाय्यित खासगी विद्यापीठांच्या शुल्कावर बंधन आणणे अन्यायकारक आहे.

शासकीय विद्यापीठांमध्ये आधुनिक पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ, विद्यार्थिकेंद्रित प्रशासन पुरविण्याकडे लक्ष दिले पाहिजे. त्याचप्रमाणे विद्यापीठांचे सर्व कार्य जलदगतीने व्हावे, कार्यक्षम व्हावे यादृष्टीने राज्य सरकारे व विश्व विद्यालय अनुदान आयोगाने लक्ष द्यावे. अमेरिका व चीनप्रमाणे भारताला महासत्ता व्हायचे असेल तर त्याचा मार्ग ज्ञानसत्तेतून जातो हे लक्षात घ्यावे. 'जीडीपी'च्या सहा टक्के खर्च शिक्षणावर झाला पाहिजे. शालेय शिक्षण व उच्च शिक्षण यांना योग्य स्थान दिले पाहिजे. संशोधनासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हायला हवा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० योग्य प्रकारे राबविले, तर भारताला शिक्षणाच्या बाबतीत पूर्वीचे स्थान प्राप्त होईल. 'नॅशनल रिसर्च फाउंडेशन'साठी ५० हजार कोटींची तरतूद केंद्र सरकारने केली आहे. याचा योग्य वाटा राज्यातील विद्यापीठांना मिळाला पाहिजे. लहानलहान विद्यापीठे तयार झाल्यास विद्यार्थ्यांपर्यंत आंतरविद्याशाखीय आधुनिक ज्ञान पोहोचविणे सोपे जाईल. विद्याशाखांच्या भिंती तोडून शिक्षण देणे आज काळाची गरज आहे. तसे धोरण शिक्षणसंस्थांनी राबविले पाहिजे.

शासकीय विद्यापीठे सक्षम बनणे, ही काळाची गरज आहे. गरीब, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याचे कार्य ही विद्यापीठे करतात. त्यांच्या पायाभूत सुविधा, मनुष्यबळ, संशोधनासाठी मिळणारा निधी याकडे केंद्र व राज्य सरकारने लक्ष द्यायला हवे. तसे न केल्यास देशाचे आणि समाजाचे नुकसान होईल. राज्यकर्त्यांनी याची जाणीव ठेवायला हवी.

**(लेखक पुण्याच्या 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'चे कार्याध्यक्ष आहेत.)**

Pune, Main
27/07/2023 Page No. 6

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*




***राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार 'क्लस्टर युनिव्हर्सिटी' म्हणजे 'समूह विद्यापीठ' ही संकल्पना मांडण्यात आली आहे. ती चांगली असली, तरी त्यात काही बाबतींत स्पष्टता येणं आवश्यक आहे. जसं कॉलेजांची संख्या, दोन कॉलेजांमधील अंतर, विद्यार्थ्यांची संख्या अशा काही प्रमुख नियमांमध्ये शिथिलता आणणं गरजेचं आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणं, कुलगुरू व कुलसचिव यांच्या नियुक्त्या, नियामक मंडळ यांविषयी काही मार्गदर्शक तत्त्वं देण्यात आली तर ही संकल्पना चांगली आहे, असं मत तज्ज्ञांनी मांडलं आहे.***

## संकल्पना उत्तम

क्लस्टर युनिव्हर्सिटी म्हणजे समूह विद्यापीठ. एकाच संस्थेच्या कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त पाच महाविद्यालयांनी एकत्र येऊन विद्यापीठ स्थापन करणे याला 'समूह विद्यापीठ' असं म्हणतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात लहान-लहान विद्यापीठं असावी, असा संकल्प केंद्र सरकारने केला आहे. पारंपरिक विद्यापीठांमध्ये निर्णयप्रक्रिया खूप मोठी आणि क्लिष्ट असते; पण लहान-लहान विद्यापीठांत ही प्रक्रिया सोपी असते. म्हणून 'क्लस्टर विद्यापीठ' होणं जरुरी आहे. दुसरं म्हणजे, आपली जी विद्यापीठं आहेत, त्यांच्यावर ७०० ते ८०० महाविद्यालयांचा भार आहे. तो कमी करण्यासाठी समूह विद्यापीठं फायदेशीर ठरतील. लहान विद्यापीठ झालं तर विद्यापीठांच्या परीक्षा सुरळीत पार पडतील. वेळेवर अभ्यासक्रम सुरू होतील. अर्थात, या संकल्पनेतील त्रुटींबाबत बोलायचं, तर राज्य सरकारने ज्या गाइडलाइन्स प्रसिद्ध केल्या आहेत, त्यानुसार ग्रँण्टेबल युनिव्हर्सिटी क्लस्टरमध्ये आल्या, तर अनुदान सुरू राहील का? कुलगुरू असतील का? कुलगुरू निवडीची प्रक्रिया कशी असेल? या बाबतीत स्पष्टता नाही. सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला संलग्न असलेल्या महाविद्यालयांना शिष्यवृत्ती मिळते; खासगी विद्यापीठांत मिळत नाही. मग 'क्लस्टर'मध्ये ती अनुदानं मिळतील की नाही? आमच्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की, ही शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे. ती मिळणार नसेल, तर त्याचा फायदा एससी, एनटी, ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणार नाही. ही मोठी उणीव आहे. त्यावर सरकारने लवकर स्पष्टता दिली पाहिजे. पुन्हा महाविद्यालयं चालवायची, तर आर्थिकदृष्ट्या परवडणार आहे का? हा एक मुद्दा आहे. म्हणून महाविद्यालयांची संख्या क्लस्टरमध्ये वाढविली पाहिजे, असं शासनाला आम्ही सुचवलं आहे. दुसरं म्हणजे, महाविद्यालयातील अंतराला २५ किलोमीटरची मर्यादा आहे. आमचं म्हणणं असं आहे, जिल्हा हे युनिट ठेवा, जिल्ह्यात असलेली महाविद्यालयं समूह विद्यापीठात घ्या. मोठ्या शिक्षण संस्था आहेत, त्याचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घेता येईल. ग्रामीण भागात दोन-तीन मॅनेजमेंट एकत्र येऊन ही संकल्पना राबवली, तर त्यांचं होणारं आर्थिक नुकसान शासनाने भरून काढावं. ही संकल्पना स्वागत करण्यासारखी आहे. महाराष्ट्राने ती स्वीकारली आहे. मुंबईमध्ये तीन महाविद्यालयांनी क्लस्टर सुरू केलं आहे. रयत शिक्षण संस्थेने क्लस्टर सुरू केलं आहे. त्यामुळे महाराष्ट्रात ही संकल्पना शंभर टक्के राबवली जाईल. पुढच्या वर्षीपासून क्लस्टर विद्यापीठं मोठ्या प्रमाणात झालेली दिसतील; पण त्यामध्ये स्पष्टता आली, तर फायदेशीर ठरेल.




*(लेखक प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणेचे कार्याध्यक्ष आहेत.)*

शब्दांकन मेधा पालकर
palkarmedha@gmail.com

## अजून स्पष्टता हवी

श्रीनगरची क्लस्टर युनिव्हर्सिटी पहिली, तर 'डॉ. होमी भाभा' दुसरी आहे. जे सरकारी विद्यापीठ होतं, तेच एकत्र आलं आहे. म्हणजे डॉ. होमी भाभा विद्यापीठ पाहिलं, तर तिथे संशोधन आहे, सायन्स आहे, हे सरकारी अनुदानित कॉलेज आहे. त्यामुळे तिथे 'क्लस्टर' संकल्पना राबवण्याचा प्रश्न आलाच नाही. हे मॉडेल पुढे नेण्याबाबत विचार करून काही मार्गदर्शक तत्त्वं तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे क्लस्टर विद्यापीठाची संकल्पना खरंच चांगली आहे. मात्र, त्यात अपेक्षा अशी आहे की, एक सायन्स कॉलेज आहे, एक मॅनेजमेंट कॉलेज आहे, इंजिनीअरिंग, फार्मसी असू शकेल, टेक्निकल असेल, अशी 'मल्टी डिस्पेन्सरी'ची संकल्पना घेऊन पुढे जायचं म्हटलं तर ते शक्य होईल. अर्थात, प्रशासकीय बाबतीत अजून स्पष्टता असायला हवी. यात 'महाराष्ट्र पब्लिक ॲक्ट' तंतोतंत लागू होईल. त्यामुळे कुलगुरू, प्र-कुलगुरू, बाकीची पदं ही विद्यापीठ कायद्याप्रमाणे असतील. बाकीच्या विद्यापीठांत हा विचार करावा लागणार नाही. रँकिंगबाबत विचार करावा लागेल. ब्रॅण्डिंगचा प्रश्न येणार नाही. ज्यांचं मुळात नाव चांगलं आहे, ऑटोनॉमस आहे, विद्यार्थ्यांचा जिथे ओघ आहे, तिथे काही प्रश्न येईल असं वाटत नाही. मुलांना चार वर्षांनंतर संशोधन त्याच संस्थेत करता आलं पाहिजे. पुढील पाच वर्षांत सेल्फ सस्टेण्ड व्हायचं असेल, तर विचार करावा लागेल. माझं पुढचं मॉडेल तयार आहे. त्यामुळे मला त्याची भीती नाही; पण मी यालाही सपोर्ट करेन. अनुदानित-विनाअनुदानित एकत्र आले पाहिजेत, त्याचा फायदा होईल, असं वाटतं.




*(लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आहेत.)*

Scanned with CamScanner

Samana 27.7.2023

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# अकरावी प्रवेशासाठी पात्रता गुणांचा टक्का चढाच

## दुसऱ्या फेरीत वीस हजार ६७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीतही प्रवेशासाठीचे पात्रता गुणांचा (कटऑफ) टक्का चढाच असल्याचे स्पष्ट झाले आहे. नामांकित महाविद्यालयांत कलाशाखेसाठी ३०० ते ४६२, वाणिज्य शाखेसाठी ३३३ ते ४६७, विज्ञान शाखेसाठी ४२० ते ४७० गुण आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले. प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत एकूण २० हजार ६७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला असून, ८ हजार १०९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीची गुणवत्तायादी बुधवारी जाहीर करण्यात आली. पहिल्या फेरीत ४२ हजार २३९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला होता. त्यातील २३ हजार ३५१ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय जाहीर झाले होते. पहिल्या फेरीच्या प्रवेशाची मुदत संपल्यानंतर विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष दुसऱ्या फेरीकडे लागले होते. त्यानुसार नियमित दुसऱ्या फेरीची यादी जाहीर करण्यात आली. या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना ५ जुलैपर्यंत महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करता येणार आहे.

शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार नामांकित महाविद्यालयातील प्रवेशासाठी खुल्या गटाचे पात्रता गुणांचा टक्का दुसऱ्या फेरीतही चढाच राहिला आहे. पहिल्या फेरीत कला शाखेसाठी २८९ ते ४६८, वाणिज्य शाखेसाठी ३७३ ते ४६६, विज्ञान शाखेसाठी ४२४ ते ४७३ पात्रता गुण आवश्यक होते. पहिल्या आणि दुसऱ्या फेरीची तुलना करता कला शाखा आणि विज्ञान शाखेच्या गुणांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. सिम्बायोसिस महाविद्यालयात कला शाखेसाठी ४६२ गुण, वाणिज्य शाखेसाठी ४५० गुण, आबासाहे गरवारे महाविद्यालयात कल शाखेसाठी ३०० गुण, तर विज्ञान शाखेसाठी ४६२ गुण, फर्ग्युस महाविद्यालयात कला शाखेसाठ ४५६ गुण आणि विज्ञान शाखेसाठ ४७० गुण आवश्यक आहेत. बृह महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालया (बीएमसीसी) ४६७ गुण शिवाजीनगरच्या मॉड महाविद्यालयात कला शाखेसाठ ३०३ गुण, वाणिज्य शाखेसाठ ४०३, विज्ञान शाखेसाठी ४३ गुण, डॉ. श्यामराव कलमाड हायस्कूलमध्ये कला शाखेसाठ ४४७, वाणिज्य शाखेसाठी ४३५ विज्ञान शाखेसाठी ४५६ गु आवश्यक आहेत.

> "अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत पात्रता गुणांमध्ये फारसा फरक पडलेला नाही. मनासारखे महाविद्यालय मिळण्यासाठी विद्यार्थी थांबून राहत असल्याने पात्रता गुणांवर परिणाम झाल्याचे दिसत नाही.
> -राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

### शाखानिहाय प्रवेश मिळालेले विद्यार्थी

- कला - २ हजार ४६
- वाणिज्य ७ हजार ७६६
- विज्ञान - १० हजार ३१३
- व्यवसाय अभ्यासक्रम - ४८२

लोकसत्ता Tue, 04 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72845630

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# दुसऱ्या फेरीत 20 हजारांवर विद्यार्थ्यांना प्रवेश

## ८ हजार १०९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत २० हजार ६०७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला असून, त्यातील ८ हजार १०९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. आता प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना कागदपत्रांची पडताळणी करून ५ ऑगस्टपर्यंत प्रवेश निश्चित करता येणार असल्याची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक राजेंद्र आहिरे यांनी दिली.**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी सोमवारी जाहीर करण्यात आली. ३२६ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये १ लाख १४ हजार ३५० जागा प्रवेशांसाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ९६ हजार ६३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यातील ७६ हजार १५२ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरून प्रवेश अर्जाचा भाग दोन भरला आहे. दुसऱ्या फेरीत त्यापैकी २० हजार ६०७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ८ हजार १०९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे, ४ हजार ३१६ विद्यार्थ्यांना दुसऱ्या, तर २ हजार ५३८ विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले.

प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना आता कागदपत्रांची पडताळणी करून ५ ऑगस्टपर्यंत प्रवेश निश्चित करता येईल. पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य आहे. पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश न घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील फेरीसाठी प्रतिबंध करण्यात येईल. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावरील त्यांच्या लॉग इनद्वारे 'प्रोसिड फॉर ॲडमिशन' हा पर्याय निवडून प्रवेशाची पुढील प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेशाची तिसरी फेरी ६ ऑगस्टपासून सुरू होण्याची शक्यता आहे.

### प्रवेशात विज्ञान शाखेला डिमांड

अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक प्रवेश विज्ञान शाखेसाठी जाहीर करण्यात आले आहेत. विज्ञान शाखेच्या प्रवेशासाठी तब्बल १० हजार ३१३ विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. त्याखालोखाल वाणिज्य शाखेत ७ हजार ७६६ आणि कला शाखेत २ हजार ४६ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे.




## अकरावीचा ‘कटऑफ’ कमी होईना !

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत नामांकित महाविद्यालयांतील प्रवेशासाठी पात्रता गुण (कट ऑफ) दुसऱ्या फेरीतही कमी झालेले नाहीत. दुसऱ्या फेरीतही नामांकित महाविद्यालयांचे कटऑफ ८५ ते ९० टक्क्यांच्या पुढेच आहेत. त्यामुळे या फेरीतही नामांकित महाविद्यालयांचे प्रवेश अनेक विद्यार्थ्यांना दुरापास्तच असल्याचे स्पष्ट झाले आहे.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी सोमवारी (दि.३) जाहीर करण्यात आली. त्यात बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात ९३.४ टक्के, फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेसाठी ९१.२ टक्के, स. प. महाविद्यालयात विज्ञान शाखेत ८९.६ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ८७.६ टक्के, तर कला शाखेसाठी ७३ टक्के, सिम्बायोसिस महाविद्यालयात कला शाखेसाठी ९२.४ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ९० टक्के, शामराव कलमाडी महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९१.२ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ८७ टक्के, कला शाखेसाठी ८९.४ टक्के, मॉडर्न महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ८६.८ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ८०.६ टक्के, कला शाखेसाठी ६०.६ टक्के आबासाहेब गरवारे महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ८८.४ टक्के, तर कला शाखेसाठी ६० टक्के, हडपसरच्या एस.एम.जोशी महाविद्यालयात वाणिज्य शाखेसाठी ७४ टक्के, विज्ञान शाखेसाठी ८४ टक्के, तर नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये ६६.६ टक्के गुण आवश्यक आहेत. यंदा दहावीची परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमावर झाल्याने गेल्यावर्षीच्या तुलनेत निकाल काही प्रमाणात कमी झाला. त्यामुळे अकरावीच्या प्रवेशाच्या पात्रता गुणांमध्ये काही प्रमाणात घट झाली आहे. मात्र तरीदेखील दुसऱ्या फेरीतही बहुतांशी महाविद्यालयांचा कटऑफ नव्वदीपारच असल्याचे दिसून येत आहे.

> “कटऑफ फारसे कमी होत नाहीत हा नेहमीचा अनुभव आहे. कारण जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी खूप असतात. यंदा देखील ८५ ते ९० टक्के गुण मिळवणारे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कटऑफमध्ये केवळ १ ते २ टक्के गुण कमी झाल्याचे दिसून येत आहे. आमच्या महाविद्यालयात देखील कटऑफ गुणांमध्ये ०.६ टक्के ते २ टक्क्यांपर्यंतचाच फरक आहे.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव,**
> प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

Pune Edition
Jul 4, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

[ UPWARD TURN ]

# Merit list for FYJC 2nd round out, cut-offs rise

## 20,607 students get college in regular admission exercise

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Director of Education (Secondary and Higher Secondary), Pune declared the second merit list for the First Year Junior College (FYJC) online centralised admissions on Monday. However, there is nothing for the students to rejoice as the cut-off percentages in many prominent city colleges have increased as compared to the first merit list, which was declared on June 21.

In the second regular admission round, 66,127 seats are available, for which 44,540 students applied, of which, 20,607 students were allotted a college. Whereas, the remaining students who had applied for admission in this round and couldn't match the cut-off list of colleges with their given college preference and marks will now have to wait for the next round.

In Pune, Brihan Maharashtra College of Commerce (BMCC) which had 466 marks out of 500 as cut-off in the first round, has now increased to 467 for the commerce stream. Similarly, at Fergusson College the cut-off for arts stream has gone up from 429 in the first merit list to 456 in the second merit list, whereas for science stream it has decreased from 473 to 470 in the second round. While, in Modern Junior College and SP College there is not much difference in the cut-off marks in the first and second list.


Rajendra Zunjarrao, principal, Modern College of Arts Science and Commerce said, "There is a good response to Class 11 admission, as the cut-offs are high even in the second round and our college administrations are trying to get good students with higher marks this year. It is expected that in the third round the cut-offs will again increase and students will have a tough fight to get good colleges from their preference list."

Of the 20,607 allotted students, 8,109 students were given the college of their first preference, 4,316 students were given the college of their second preference and 2,538 students were given the college of their third preference.

For this academic year, 96,676 students have registered for Class 11 admissions till now. In the 326 junior colleges across Pune and Pimpri-Chinchwad division, a total of 114,350 seats are available and till now 30,320 students have taken admission through regular and quota rounds. Whereas, still 84,030 seats are vacant and one more regular round of admission will take place after the second round is completed.

Students who have been allotted seats in the second round need to take admission in their respective colleges till July 5 and then the education department will display the vacancy list for next round, said education department officials.






## CET CELL WARNS OF ACTION IN CASE OF IRREGULAR ADMISSION PROCEDURE

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE :** Educational institutions have been asked to conduct the management quota admission process only after three rounds of the 'CAP' from the State Common Entrance Test Cell (CET Cell). They have been warned of strict action in the event they enter vacant posts at the institution level by flouting rules.

The CET Cell has made it clear that rules must be strictly followed while implementing the admission process at the institutes.

As per the information shared by the state CET Cell, all rules are indicated in the information booklet regarding the admission process for institute-level seats. Institutes must accordingly implement the admission process by precisely following the rules. The list of applications made by the students while filling the vacancies and the final merit list is available on the website of the institute on the same day.

"This list should be published and sent through email for the information of CET rooms. The admission process for various degree and post-graduate professional courses is underway. Some seats remain vacant after all rounds of admission are over. Institutions are allowed to fill up the vacancies for admission at their level. However, parents complain that admissions are given by flouting the rules while filling the seats at the institutional level. The institute is expected to call for applications for admission and release the merit list. Accordingly, the admission process is sequential.

In this, the CET Cell has warned that action will be taken against organisations violating the rules," said a senior official of the state CET Cell on condition of anonymity.

Currently, the process of registration for admission underway, wherein application forms and documents are being verified. After completing all these processes, three regular admissions will be drawn and their schedule will be released soon.

Hindustan Times 4.7.2023

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*



MODERN COLLEGE

# Floor attendants, woman personnel to ensure safety on college premises

DEVANSHI SRIVASTAVA
PUNE JULY 5

THE MODERN College of Arts, Science and Commerce (MCASC) in Shivajinagar has recruited new floor attendants and female security personnel as parts of its measures to ensure the safety of women on campus, said principal Dr Rajendra S Zunjarrao.

"Every floor will have a security guard as a floor attendant and all our security bouncers are women," said Zunjarrao. Asked about women grievances redressal cell, the principal said, "All committees are in place."

The measures have been taken in the wake of the recent attack on a 20-year-old college student on a street in Sadashiv Peth. On Wednesday, MCASC was bustling with students, new applicants, parents and staff. The entrance was flanked with kiosks set up by the National Service Scheme (NSS) and National Cadet (NCC) volunteers of the college.

Classes for some courses began on Monday but most BA, BSc and BCom courses will commence on July 10. "As far as Bachelors of Arts is concerned, many are preferring Psychology as their major subject," said Zunjarrao as he spoke about the most sought-after subjects being chosen by students in this academic session.

"Many students are preferring skill-oriented courses in which job prospects are better. B.Sc. in Computer Science, Bachelor of Computer Application (BCA) under the science faculty and B.Sc. Animation and B.A. in Fashion Technology are some of the popular courses," he said.

The college offers 26 courses at the undergraduate level, 23 post-graduate courses and has 13 recognised PhD research centres.

Principal of Modern College Dr Rajendra S Zunjarrao. Express

"The third round of admissions is over and only a few seats are vacant now. We expect them to be filled in the next round," said the principal.

COLLEGE WATCH

MCASC is among the 144 autonomous institutions in Maharashtra, which will implement the National Education Policy (NEP) 2020 starting from this academic session. An early exit option, choice of major and minor subjects, open electives and skill-enhancing courses are some of the several new provisions brought by the policy.

In addition to education, the college is also taking steps towards environmental consciousness. In partnership with the adjoining Modern College of Engineering, MCASC has installed a sewage treatment plant (STP), which treats all the waste water before its release. "In future, we would like to sell this water for construction purposes or gardening," the principal said.

They also have an effluent treatment plant (ETP) which ensures that toxic or heavy metals are removed from the chemical waste generated in the science laboratories of the college. "We hope to expand the scope and possibly offer these as services to researchers or industry players," he said. On-campus waste management, rainwater harvesting and solar panels are other such steps taken.

PUNE

CS Scanned with CamScanner

The Indian Express 6.7.2023

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

### हुशार विद्यार्थ्यांचीही पसंती : नवनव्या व्यावसायिक संधीचा परिणाम

# कला शाखेकडे वाढता कल!

▸ मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ७ : अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढलेली स्पर्धा; परिणामी विद्यार्थी-पालकांचा वाढणारा ताण यांसह कला शाखेतून नवनव्या क्षेत्रांमध्ये उपलब्ध होणाऱ्या संधी, स्पर्धा परीक्षांची तयारी असणारा राजमार्ग, नव्याने खुल्या होणाऱ्या व्यावसायिक वाटा यामुळे हुशार विद्यार्थी कला शाखेला पसंती देत आहेत. म्हणूनच आता इयत्ता अकरावी असो वा प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम असो यात कला शाखेतील प्रवेशासाठी हुशार विद्यार्थ्यांमध्ये चुरस रंगल्याचे चित्र दिसते.

हुशार विद्यार्थी म्हणजेच यापूर्वी साधारणतः दहावी-बारावीत ८० ते ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण असणारे विद्यार्थी. विद्यार्थ्यांना साधारणतः ७० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाल्यास विज्ञान शाखेत प्रवेश हे समीकरण ठरलेलेच असते. परंतु आता परीक्षेत ९० टक्के, ९५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले तरीही हजारो विद्यार्थी विज्ञान शाखेला बाजूला सारून सरळ कला शाखेत प्रवेश घेत आहेत. विशेषतः कला शाखेचा इंग्रजी माध्यमातून अभ्यास करण्याला अनेक विद्यार्थी प्राधान्य देत आहेत. त्याशिवाय कला शाखेतून मानसशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र तसेच परदेशी भाषा यात करिअरच्या नानाविध संधी खुल्या होत आहेत. यातून चांगले व्यावसायिक पर्याय उपलब्ध होत असल्याने आता अनेक हुशार विद्यार्थी कला शाखेतून अभ्यास करण्याला विशेष महत्त्व देत आहेत.

#### इयत्ता अकरावीचा कट-ऑफ

| महाविद्यालय | पहिली फेरी | दुसरी फेरी |
|---|---|---|
| फर्ग्युसन महाविद्यालय | ९६.४ टक्के | ९६ टक्के |
| सिंबायोसिस महाविद्यालय | ९३.६० टक्के | ९२.४० टक्के |
| स.प. महाविद्यालय | ९२.२० टक्के | ९१.८० टक्के |
| मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर | ८८.८० टक्के | ८८.४० टक्के |
| नौरोसजी वाडिया महाविद्यालय | ८६.४ टक्के | ८६ टक्के |



#### कल वाढण्याची कारणे

- नवनव्या क्षेत्रांमध्ये खुल्या होणाऱ्या संधी
- कला शाखेत मानव्यशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्राच्या क्षेत्राला आलेले महत्त्व
- तत्वज्ञान, राज्यशास्त्र, भूगोल, परदेशी भाषा विषयांतील वाढत्या संधी
- स्पर्धा परीक्षामध्ये यशस्वी होण्यासाठी
- व्यावसायिक अभ्यासक्रमात वाढलेली चुरस
- विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय अभ्यासक्रमातील वाढत्या स्पर्धेमुळे विद्यार्थी-पालकांचा वाढणारा ताण

"कला शाखा निवडल्यास विद्यार्थ्यांना नवनव्या संधी उपलब्ध होत आहेत. फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेतील सर्व विषय आहेत. त्याशिवाय फ्रेंच, जर्मन यांसारख्या परदेशी भाषा शंभरहून अधिक वर्षांपासून शिकविल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा कला शाखेकडे ओढा असतो. चांगले गुण असूनही अनेक विद्यार्थी केवळ स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करायच्या दृष्टिकोनातून कला शाखेतून शिक्षण घेतात. त्याशिवाय मानसशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्राला विशेष महत्त्व आले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आता ६० टक्के हे केवळ शैक्षणिक अभ्यासक्रम आणि ४० टक्के हे व्यक्तिगत विकासावर भर असेल. त्यामुळेही अनेक विद्यार्थी कला शाखेतील काही विषयांची अभ्यासक्रमासाठी निवडतील, असे चित्र आहे.

**- डॉ. नितीन कुलकर्णी,**
प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय

"इंग्रजीमधून कला शाखेचे शिक्षण घेण्यासाठी फार कमी संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे इंग्रजी माध्यमातून कला शाखेला हुशार विद्यार्थ्यांचा ओढा अधिक आहे. त्यामुळे अकरावी असो वा प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम या दोन्ही प्रवेशप्रक्रियेत कला शाखेचा कट-ऑफचा आलेख चढता आहे. कला शाखेत योग्य विषय निवडल्यास आंतरराष्ट्रीय संबंध, सार्वजनिक धोरणे, विविध विश्लेषण अशा क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. त्यामुळे अभियांत्रिकी-वैद्यकीय अभ्यासक्रमातील फोलपणा लक्षात आलेले विद्यार्थी-पालक अभ्यासासाठी कला शाखेला प्राधान्य देत आहेत.

**- डॉ. ऋषीकेश सोमण,**
प्राचार्य, सिंबायोसिस कला आणि वाणिज्य महाविद्यालय

Pune, Main
08/07/2023 Page No. 3

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

नवभारत

# विद्यार्थियों की कला शिक्षा के प्रति बढ़ी दिलचस्पी



■ **पुणे,** ब्यूरो. इंजीनियरिंग और मेडिकल पाठ्यक्रमों में प्रवेश में बढ़ती प्रतिस्पर्धा, छात्रों और अभिभावकों में बढ़ते तनाव, कला विभाग से नए क्षेत्रों में उपलब्ध अवसर, प्रतियोगी परीक्षाओं की तैयारी, नए खुले व्यावसायिक अवसरों के कारण प्रतिभाशाली छात्र कला विभाग को प्राथमिकता दे रहे हैं. इसलिए, चाहे वह कक्षा 11वीं हो या स्नातक प्रथम वर्ष का पाठ्यक्रम, कला विभाग में प्रवेश के लिए प्रतिभाशाली छात्रों के बीच एक समान अवसर की तस्वीर सामने आ रही है.

स्मार्ट स्टूडेंट्स का मतलब है 10वीं-12वीं में 80 से 90 फीसदी से ज्यादा अंक पाने वाले छात्र होते है. यदि छात्र 70 प्रतिशत या उससे अधिक अंक प्राप्त करते हैं तो विज्ञान स्ट्रीम में प्रवेश लगभग निश्चित है. लेकिन अब, परीक्षा में 90 प्रतिशत, 95 प्रतिशत या उससे अधिक अंक लाने के बावजूद, हजारों छात्र विज्ञान को दरकिनार कर सीधे कला में प्रवेश ले रहे हैं. खासकर, कई छात्र अंग्रेजी माध्यम से कला की पढ़ाई करना पसंद कर रहे हैं. इसके अलावा, कला विभाग से मनोविज्ञान, राजनीति विज्ञान, अर्थशास्त्र और विदेशी भाषाओं में करियर के विभिन्न अवसर खुल रहे हैं. चूंकि यह बेहतर करियर विकल्प प्रदान करता है, इसलिए कई प्रतिभाशाली छात्र अब कला में अध्ययन को विशेष महत्व दे रहे हैं.

### कला शाखा में नये अवसर

विज्ञान, इंजीनियरिंग, मेडिकल पाठ्यक्रमों में बढ़ती प्रतिस्पर्धा के कारण छात्रों और अभिभावकों का तनाव बढ़ रहा है. कला शाखा चुनने पर विद्यार्थियों को नये अवसर उपलब्ध होते हैं. फर्ग्यूसन कॉलेज में कला के सभी विषय हैं, इसके अलावा फ्रेंच, जर्मन जैसी विदेशी भाषाएं सौ वर्षों से अधिक समय से पढ़ाई जा रही है. इसलिए विद्यार्थी कला की ओर आकर्षित होते हैं. अच्छे अंक आने के बावजूद, कई छात्र केवल प्रतियोगी परीक्षाओं की तैयारी के उद्देश्य से कला संकाय में दाखिला लेते हैं. इसके अलावा मनोविज्ञान, अर्थशास्त्र, राजनीति विज्ञान को विशेष महत्व प्राप्त हुआ है.

### 11वीं कक्षा की कट-ऑफ लिस्ट

| कॉलेज | पहला राउंड | दूसरा राउंड |
|---|---|---|
| फर्ग्युसन कॉलेज | 96.4 प्रतिशत | 96 प्रतिशत |
| सिम्बायोसिस कॉलेज | 93.60 प्रतिशत | 92.40 प्रतिशत |
| एस.पी. कॉलेज | 92.20 प्रतिशत | 91.80 प्रतिशत |
| मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर | 88.80 प्रतिशत | 88.40 प्रतिशत |
| नौरोसजी वाडिया कॉलेज | 86.4 प्रतिशत | 86 प्रतिशत |

*राष्ट्रीय शिक्षा नीति के अनुसार, अब 60 प्रतिशत केवल शैक्षणिक पाठ्यक्रम होंगे और 40 प्रतिशत व्यक्तिगत विकास पर केंद्रित होंगे, इसलिए कई छात्र कला में कुछ विषयों का चयन करेंगे.*

*- डॉ. नितिन कुलकर्णी, प्रिंसिपल, फर्ग्युसन कॉलेज*

Pune Edition
09-july-2023 Page No. 2
epaper.enavabharat.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

लोकमत

पुणे, गुरुवार, दि. १३ जुलै २०२३ ७

एज्यु कनेक्ट

epaper.lokmat.com



वनस्पतिशास्त्र (Botany) हे जीवशास्त्र (Biology) या विषयाची एक शाखा आहे. यामध्ये विविध प्रकारच्या वनस्पतींचा सखोल अभ्यास केला जातो. वनस्पतिशास्त्र हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय असून, पदवी आणि पदव्युत्तर पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना भारतासह परदेशात शैक्षणिक, संशोधन आणि शासकीय, खासगी क्षेत्रात, तसेच व्यावसायाच्या अनेक उत्तम संधी उपलब्ध होत आहेत.

# वनस्पतिशास्त्र अभ्यासातून परदेशातही करिअरच्या संधी

वनस्पतिशास्त्रातील ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्यांचा उपयोग तुम्ही विज्ञानाच्या प्रगतीसाठी, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी, तसेच भोवतालच्या शाश्वत विकासासाठी नक्कीच उपयोग करता येईल. वनस्पतिशास्त्र आणि विविध उपशाखा प्लँट फिजिओलॉजी (Plant Physiology) नावाच्या उपशाखेमध्ये वनस्पतींमध्ये होणाऱ्या विविध प्रक्रिया जसे- प्रकाश संश्लेषण, श्वसन, वाढ, पोषण, पुनरुत्पादन या आणि अशा अनेक गुंतागुंतीच्या प्रक्रियांचा सर्वांगीण अभ्यास केला जातो. त्याचा फायदा वनस्पतींचे आरोग्य आणि उत्पादकता वाढविण्यासाठी करता येतो. कवकशास्त्र (Mycology) नावाच्या उपशाखेमध्ये वेगवेगळ्या कवकांचा अभ्यास औषधनिर्माण, अन्न उत्पादन आणि निसर्गातील विविध परिसंस्थांच्या नैसर्गिक पुनर्निर्माण करण्यासाठी केला जातो. अनुवंशशास्त्र (Genetics) अभ्यासाचा फायदा वनस्पतींच्या प्रजनन व वनस्पती संकर शास्त्रामध्ये उपयोग करून पिकांच्या नवीन जाती तयार केल्या जातात. वनस्पतींच्या मोलेक्युलर टॅक्सॉनॉमीमध्ये (Molecular Taxonomy) वनस्पतीच्या जनुकीय रचनेचा अभ्यास करून त्यांची अचूक ओळख मिळविता येते. वनस्पतीय जैवतंत्रज्ञान शाखा (Plant Biotechnology) तुम्हाला प्रगत तंत्रज्ञान शिकविते. ज्याच्या उपयोगामुळे जनुकीय अभियांत्रिकीद्वारे (Genetic Engineering) वनस्पतींचा जनुकीय संरचनेमध्ये तुम्हाला अपेक्षित बदल घडवून नवीन प्रजाती तयार करता येतात.



### बीजशास्त्रात मिळवा प्रावीण्य

बीजशास्त्र, उतिसंवर्धनातून व्यावसायिक भरभराट बीजशास्त्रात (Seed Technology) प्रावीण्य मिळविल्यास महिको (Mahyco), महाबीज (Mahabeej) यांसारख्या बी-बियाण्यांच्या कंपन्यांमध्ये नोकरी करता येईल. तसेच स्वत: उत्कृष्ट बीजनिर्मिती करणे, गुणवत्ता तपासून ती वृद्धिंगत करता येईल यासह वनस्पती उतिसंवर्धन (Plant Tissue Culture) शिकून वनस्पतींच्या अतिशय छोट्या भागापासून हजारो रोपे तयार करण्याचे कौशल्य तुम्ही आत्मसात केले तर अनेक कंपन्यांत संधी उपलब्ध होईल. एवढेच नव्हे, तर स्वत:ची कंपनी स्थापन करून वनस्पती उतिसंवर्धनाद्वारे तयार केलेली रोपे तुम्ही भारतीय, तसेच परदेशी शेतकऱ्यांना विक्री करू शकता.

### आरोग्य क्षेत्रातही मिळेल वाव

- वनस्पतिशास्त्र आणि औषधी यांची सांगड घालू इच्छित असाल तर औषधी विज्ञान (Pharmcognosy) आणि औषधी वनस्पतिशास्त्र (Medicobotany) तुमच्यासाठी योग्य पर्याय आहे.
- औषधी विज्ञान वनस्पतींमधील औषधीमूल्य असणाऱ्या घटकांचा (active principles) अभ्यास करते. तर औषधी वनस्पतिशास्त्र विज्ञान प्रामुख्याने वनस्पतींच्या पारंपरिक औषधी उपयोगासंबंधी काम करते. त्यामुळे वनस्पतींच्या पारंपरिक औषधी उपयोगाचे ज्ञान आणि आधुनिक औषधी यामधील दरी कमी करण्यासाठीचे तुमचे प्रयत्न आरोग्यसेवा क्षेत्रामध्ये तुम्हाला संधी प्राप्त करून देतात.

### बायोइन्फॉर्मेटिक्समध्ये संशोधन

तुम्हाला बायोइन्फॉर्मेटिक्समध्ये संशोधन करता येईल बायोइन्फॉर्मेटिक्स (Bioinformatics) शाखेमध्ये वनस्पतिशास्त्रातील तुमचे ज्ञान आणि संगणकशास्त्रातील कौशल्ये वापरून तुम्ही जिनोमिक्स (Genomics), प्रोटेओमिक्स (Proteomics) आणि उत्क्रांतिजीवशास्त्र (Evolutionary Biology) या विषयांत संधी असून, संशोधनासही भरपूर वाव आहे.

### संस्था, कंपन्यांमध्ये संधी

- क्लिनिकल रिसर्च इन्स्टिट्यूटस्, फार्मास्युटिकल आणि बायोटेक कंपन्या, वनस्पतींचे संग्रहालय, सायन्स सेंटर्स आणि सायन्स पार्क्स, बोटॅनिकल गार्डन्ससाठी प्रशिक्षित वनस्पतीतज्ज्ञांची आवश्यकता असते.
- पॉलिहाऊसेस, प्लांट नर्सरी, शासन अनुदानित संशोधन संस्था, मशरूम लागवड करणारे लघू व मोठे उद्योग, जैविक खतांच्या कंपन्या, आयुर्वेदिक औषधोत्पादन कंपन्यांत तुम्हाला उत्पादन विभाग, संशोधन व विकास विभाग, गुणवत्ता नियंत्रण विभाग यामध्ये काम करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.



डॉ. प्रा. राजकुमार बारमुख
वनस्पतिशास्त्र विभाग मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर, पुणे

### एमपीएससी, यूपीएससीत उपयुक्त

- स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त विषय वनस्पतिशास्त्र हा ऐच्छिक विषय घेऊन तुम्ही एमपीएससी, यूपीएससी परीक्षा देता येते. तसेच भारतीय वनसेवा विभागाच्या (Foerst Research Institute) स्वतंत्र परीक्षेद्वारे रेंज फॉरेस्ट ऑफिसर होता येते.
- स्वयंरोजगाराचे असंख्य पर्याय प्लांट नर्सरी, लँडस्केप गार्डनिंग, सेंद्रिय शेती, कृषी पर्यटन, मशरूम/अळिंबी लागवड, औषधी वनस्पतींची लागवड, फुलशेतीसाठी पॉलिहाऊसेस, आयुर्वेदिक औषधनिर्माण कंपन्यांसाठी कच्चा माल पुरविणे, फळ व भाजीपाला प्रक्रिया उद्योग, जैविक कीटकनाशके व जैविक खतेनिर्मिती उद्योग, आदी लघू आणि मध्यम उद्योग उभारणी करता येईल.

### कोठे घेता येईल शिक्षण?

आयसर, नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्स, बंगळुरू, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वनस्पतिशास्त्रासह विविध उपशाखांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमानंतर 'नेट' किंवा 'सेट' परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालये किंवा विद्यापीठामध्ये सहायक प्राध्यापक म्हणून नोकरी करता येते.

Hello Pune
Page No. 7 Jul 13, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

प्रभात

# इयत्ता अकरावीत १४,७०८ विद्यार्थ्यांना प्रवेश

### तिसऱ्या नियमित फेरीची प्रक्रिया सुरू

प्रभात वृत्तसेवा




पुणे, दि. १२ - पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेत तिसऱ्या नियमित फेरीद्वारे १४ हजार ७०८ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. या फेरीतही सर्वाधिक ७ हजार ६७९ विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेण्याला पसंती दिली आहे.

पुणे विभागात अकरावी प्रवेशासाठी ३२५ कनिष्ठ महाविद्यालयात १ लाख १४ हजार ५५० प्रवेशाच्या जागा आहेत. यासाठी ९८ हजार ४४४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. यातील ८७ हजार ९११ विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन लॉक केले आहेत. ८७ हजार ५९९ अर्जांची पडताळणी पूर्ण झालेली आहे. ७९ हजार ८६९ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-२ भरुन कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविले आहेत. दोन नियमित प्रवेश फेऱ्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. यात ३८ हजार ३२५ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.

तिसऱ्या फेरीसाठी ५७ हजार ५९८ प्रवेशाच्या जागा उपलब्ध होत्या. यासाठी ४१ हजार २२५ विद्यार्थी होते. या फेरीत कला शाखेसाठी १ हजार ४१०, वाणिज्य शाखेसाठी ५ हजार ४०४, विज्ञान शाखेसाठी ७ हजार ६७० याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झालेला आहे.

### कनिष्ठ महाविद्यालयनिहाय कट ऑफचे गुण

**डॉ. श्यामराव कलमाडी कनिष्ठ महाविद्यालय**- कला (४५०), वाणिज्य (४४०), विज्ञान (४६६), **मॉडर्न महाविद्यालय**, शिवाजीनगर- कला (३५०), वाणिज्य (४०६), विज्ञान(४३५), **आबासाहेब गरवारे महाविद्यालय** - कला (३७४), विज्ञान (४४८), **बृहन महाराष्ट्र महाविद्यालय** - वाणिज्य (४६९), **सिम्बॉयोसिस महाविद्यालय**- कला (४७५), वाणिज्य (५६३), **फर्गसन महाविद्यालय** - कला (४७६), विज्ञान (४७७), **नेस वाडिया महाविद्यालय**- वाणिज्य(३४५), **सर परशुरामभाऊ महाविद्यालय**- कला (४१९), वाणिज्य(४४५), विज्ञान (४५०), **एस.एम.जोशी. महाविद्यालय**- वाणिज्य (४०३), विज्ञान (४३३).

PuneCity, 13 July 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीतही पात्रता गुण चढेच

### १४ हजार ७०८ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शिक्षण विभागाने अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या नियमित फेरीची निवड यादी प्रसिध्द केली. या फेरीमध्ये पुण्यात १४ हजार ७०८ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला. त्यातील ५ हजार ७५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. दुसऱ्या फेरीच्या तुलनेत तिसऱ्या फेरीत पात्रता गुणांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

पुण्यात तिसऱ्या फेरीसाठी ५७ हजार ६१५ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी ४१ हजार २२५ विद्यार्थी पात्र ठरले होते. या विद्यार्थ्यांपैकी १४ हजार ७०८ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. आता या विद्यार्थ्यांना १४ जुलैपर्यंत संबंधित महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करावा लागेल. या कालावधीत ऑनलाइन प्रवेश निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे तसेच प्रवेश नाकारणे या प्रक्रिया सुरू राहतील. महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात प्रवेश घेणे अनिवार्य आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यास त्यांना पुढील नियमित फेरीसाठी प्रतिबंधित केले जाईल, प्रवेश रद्द केलेले विद्यार्थीही पुढील फेरीसाठी प्रतिबंधित केले जातील. तिसऱ्या फेरीत जाहीर झालेल्या प्रवेशांसह कोटा आणि द्विलक्षी जागांवरही प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे.

**शाखानिहाय प्रवेश मिळालेले विद्यार्थी**

- कला – १ हजार ४१०
- वाणिज्य – ५ हजार ४०३
- विज्ञान – ७ हजार ६७०
- व्यवसाय अभ्यासक्रम–२२५

दुसऱ्या फेरीत नामांकित महाविद्यालयात कलाशाखेसाठी ३०० ते ४६२, वाणिज्य शाखेसाठी ३३३ ते ४६७, विज्ञान शाखेसाठी ४२० ते ४७० गुण आवश्यक होते. मात्र तिसऱ्या फेरीत आघाडीच्या नऊ महाविद्यालयांपैकी बहुतांश ठिकाणी पात्रता गुण वाढल्याचे दिसून येते. त्यात डॉ. शामराव कलमाडी हायस्कूलमध्ये कला शाखेसाठी ४५०, वाणिज्य शाखेसाठी ४४०, विज्ञान शाखेसाठी ४६६ गुण, शिवाजीनगरच्या मॉडर्न महाविद्यालयात कला शाखेसाठी ३५० गुण, वाणिज्य शाखेसाठी ४०६, विज्ञान शाखेसाठी ४३५ गुण, आबासाहेब गरवारे महाविद्यालयात कला शाखेसाठी ३७४ गुण, तर विज्ञान शाखेसाठी ४४८ गुण, बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात (बीएमसीसी) ४६९ गुण, सिम्बायोसिस महाविद्यालयात कला शाखेसाठी ४७५ गुण, वाणिज्य शाखेसाठी ४६३ गुण, फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेसाठी ४७६ गुण आणि विज्ञान शाखेसाठी ४७७ गुण आवश्यक आहेत. नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयात ३४५ गुण, सर परशुरामभाऊ महाविद्यालयात कला शाखेसाठी ४१९, वाणिज्य शाखेसाठी ४४५, विज्ञान शाखेसाठी ४५० गुण, हडपसरच्या एस. एम. जोशी महाविद्यालयात वाणिज्य शाखेसाठी ४०३ गुण, विज्ञान शाखेसाठी ४३३ गुण आवश्यक आहेत.

लोकसत्ता Thu, 13 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72925784

---

पुढारी

# तिसऱ्या फेरीत वाढले कटऑफ

## नामांकित महाविद्यालयांमधील प्रवेश अजूनही दुरापास्तच

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत नामांकित महाविद्यालयांतील पात्रता गुण (कटऑफ) तिसऱ्या फेरीत कमी होण्याऐवजी दुसऱ्या फेरीपेक्षा जास्त वाढल्याचे दिसून आले आहे. तिसऱ्या फेरीतही नामांकित महाविद्यालयांमधील कटऑफ ८५ ते ९० टक्क्यांच्या पुढेच आहेत. त्यामुळे नामांकित महाविद्यालयांचे विशेष करून विज्ञान शाखेचे प्रवेश विद्यार्थ्यांना दुरापास्तच असल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील तिसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी बुधवारी जाहीर करण्यात आली.




**काही प्रमुख महाविद्यालयांचे कट ऑफ (टक्के)**

- **बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय :** ९३.८
- **फर्ग्युसन महाविद्यालय :** कला शाखा ९५.२, विज्ञान ९५.४.
- **स. प. महाविद्यालय :** विज्ञान ९०, वाणिज्य ८९, कला ८३.८.
- **सिम्बायोसिस :** कला ९५, वाणिज्य ९२.६.
- **शामराव कलमाडी कॉलेज :** विज्ञान ९३.२, वाणिज्य ८८, कला ९०.
- **मॉडर्न :** विज्ञान ८७, वाणिज्य ८१.२, कला ७०.
- **आबासाहेब गरवारे कॉलेज :** विज्ञान ८९.६, कला ७४.८,
- **एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर :** वाणिज्य ८०.६, विज्ञान ८६.६
- **नेस वाडीया कॉलेज ऑफ कॉमर्स :** ६९.

" आपल्याला हवे तेच कॉलेज मिळावे यासाठी अनेक विद्यार्थी अडून राहिले होते. त्याचा परिणाम म्हणजे दुसऱ्या फेरीत कटऑफ कमी झाले. मात्र तिसऱ्या फेरीत विद्यार्थ्यांनी विविध कॉलेजांना प्राधान्य दिले. त्यामुळे कट ऑफ दुसऱ्या फेरीपेक्षा तिसऱ्या फेरीत दीड ते दोन टक्क्यांनी अधिक असल्याचे चित्र आहे. - **डॉ. राजेंद्र झुंजारराव,** प्राचार्य, मॉडर्न कॉलेज

My Pune Edition
Jul 13, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

[ UPWARD TURN ]

# Merit list for FYJC 2nd round out, cut-offs rise

### 20,607 students get college in regular admission exercise

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Director of Education (Secondary and Higher Secondary), Pune declared the second merit list for the First Year Junior College (FYJC) online centralised admissions on Monday. However, there is nothing for the students to rejoice as the cut-off percentages in many prominent city colleges have increased as compared to the first merit list, which was declared on June 21.

In the second regular admission round, 66,127 seats are available, for which 44,540 students applied, of which, 20,607 students were allotted a college. Whereas, the remaining students who had applied for admission in this round and couldn't match the cut-off list of colleges with their given college preference and marks will now have to wait for the next round.

In Pune, Brihan Maharashtra College of Commerce (BMCC) which had 466 marks out of 500 as cut-off in the first round, has now increased to 467 for the commerce stream. Similarly, at Fergusson College the cut-off for arts stream has gone up from 429 in the first merit list to 456 in the second merit list, whereas for science stream it has decreased from 473 to 470 in the second round. While, in Modern Junior College and SP College there is not much difference in the cut-off marks in the first and second list.

Rajendra Zunjarrao, principal, Modern College of Arts Science and Commerce,said, "There is a good response to Class 11 admission, as the cut-offs are high even in the second round and our college administrations are trying to get good students with higher marks this year. It is expected that in the third round the cut-offs will again increase and students will have a tough fight to get good colleges from their preference list."

Of the 20,607 allotted students, 8,109 students were given the college of their first preference, 4,316 students were given the college of their second preference and 2,538 students were given the college of their third preference.

For this academic year, 96,676 students have registered for Class 11 admissions till now. In the 326 junior colleges across Pune and Pimpri-Chinchwad division, a total of 114,350 seats are available and till now 30,320 students have taken admission through regular and quota rounds. Whereas, still 84,030 seats are vacant and one more regular round of admission will take place after the second round is completed.

Students who have been allotted seats in the second round need to take admission in their respective colleges till July 5 and then the education department will display the vacancy list for next round, said education department officials.



**Cut-off for top 9 colleges**

(marks out of 500, Gen)

| COLLEGE NAME | ARTS | COMMERCE | SCIENCE |
|---|---|---|---|
| Symbiosis | 462 | 450 | — |
| Abasaheb Garware College | 300 | — | 442 |
| Fergusson College | 456 | — | 470 |
| Brihan Maharashtra College of Commerce (BMCC) PUNE | — | 467 | — |
| Modern Jr College | 303 | 403 | 434 |
| Dr Kalmadi Shamrao High School and Junior College | 447 | 435 | 456 |
| Sir Parashurambhau Jr College | 365 | 439 | 448 |
| SM Joshi College | — | 370 | 420 |
| Ness Wadia College of Commerce | — | 333 | — |

Source: Education department

### CET CELL WARNS OF ACTION IN CASE OF IRREGULAR ADMISSION PROCEDURE

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE :** Educational institutions have been asked to conduct the management quota admission process only after three rounds of the 'CAP' from the State Common Entrance Test Cell (CET Cell). They have been warned of strict action in the event they enter vacant posts at the institution level by flouting rules.

The CET Cell has made it clear that rules must be strictly followed while implementing the admission process at the institutes.

As per the information shared by the state CET Cell, all rules are indicated in the information booklet regarding the admission process for institute-level seats. Institutes must accordingly implement the admission process by precisely following the rules. The list of applications made by the students while filling the vacancies and the final merit list is available on the website of the institute on the same day.

"This list should be published and sent through email for the information of CET rooms. The admission process for various degree and post-graduate professional courses is underway. Some seats remain vacant after all rounds of admission are over. Institutions are allowed to fill up the vacancies for admission at their level. However, parents complain that admissions are given by flouting the rules while filling the seats at the institutional level. The institute is expected to call for applications for admission and release the merit list. Accordingly, the admission process is sequential.

In this, the CET Cell has warned that action will be taken against organisations violating the rules," said a senior official of the state CET Cell on condition of anonymity.

Currently, the process of registration for admission underway, wherein application forms and documents are being verified. After completing all these processes, three regular admissions will be drawn and their schedule will be released soon.

Hindustan Times 13.7.2023

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

लोकमत

लोकमत एज्यु कनेक्ट

पुणे, गुरुवार, दि. २० जुलै २०२३ ७

epaper.lokmat.com

## मानवी मनाचा वेध घेणारे मानसशास्त्र देतंय नोकरीच्या संधी



जीवघेणी स्पर्धा आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक कौटुंबिक वातावरणात जलद गतीने बदल होत आहेत. या बदलांशी जुळवून घेताना अनेक समस्या निर्माण होत आहेत. प्रत्येक कुटुंबाचा एक फॅमिली डॉक्टर असतो तसा एक समुपदेशकही असावा, असे विचार व्यक्त होऊ लागले आहेत. प्रत्येक शाळा, महाविद्यालयामध्ये समुपदेशक नेमले पाहिजेत, अशा मार्गदर्शक सूचना सरकारने याआधीच केल्या आहेत. मानसशास्त्रात यशस्वी करिअर करण्यासाठी असंख्य विकल्प उपलब्ध आहेत. मानसशास्त्रात कारकिर्दीसाठी केवळ पदवीपर्यंतचे शिक्षण पुरेसे नाही त्यासाठी किमान पदव्युत्तर पदवी घेणे गरजेचे आहे. यानंतरच मानसशास्त्राच्या विविध उपशाखांमध्ये करिअरची कवाडे खुली होतात.

**काय आहेत नोकरी-व्यवसायच्या संधी?**

### समुपदेशन मानसशास्त्रज्ञ

- समुपदेशन मानसशास्त्र आणखी एक वेगाने विकसित होणारे क्षेत्र आहे. क्लिनिकल सायकॉलॉजी अभ्यासल्यानंतर समुपदेशन करता येते, असा एक गैरसमज आहे. समुपदेशन मानसशास्त्रज्ञाची कार्यपद्धती आणि भूमिका ही क्लिनिकल सायकॉलॉजिस्टपेक्षा खूपच वेगळी असते.
- माणसांच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांची उकल अतिशय कुशलतेने, नैतिकतेचे नियम पाळून करण्याचे कौशल्य या अभ्यासक्रमात शिकविले जाते. व्यक्तिमत्त्व विकास, नातेसंबंधातील गुंता सोडवणे, योग्य निर्णय घेण्यास मदत करणे हे समुपदेशकांचे काम असते.
- समुपदेशन करताना प्ले थेरपी, डान्स मूव्हमेंट थेरपी, आर्ट थेरपी यासारखे पूरक प्रमाणपत्र, पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले असल्यास फायद्याचे ठरते. करिअर समुपदेशक, लग्न आणि कौटुंबिक समुपदेशक, क्रीडा समुपदेशक अशी कार्यक्षेत्रे निवडता येतात.
- शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, कुटुंब न्यायालये, पोलिस विभागात विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी आहेत. यांसह थोडा अनुभव घेतल्यानंतर स्वतःचे समुपदेशन केंद्रदेखील सुरू करता येऊ शकते. टेलिफोनिक समुपदेशनही करता येते.

मानसशास्त्र हे माणसाचे मन आणि वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये, नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी, खेळ आणि करमणुकीच्या ठिकाणी, छंद जोपासताना आणि कुटुंबात वावरताना व्यक्तीच्या वागणुकीचे विविध पैलू दिसून येतात. व्यक्तीचे वय, लिंग, अनुभव, आर्थिक, सामाजिक शिक्षण अशा विविधतेमुळे व्यक्तिभिन्नताही दिसून येते. अशा व्यक्तिभिन्नतेचे निरीक्षण करणे, त्यावर संशोधन करणे, व्यक्तींना येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना सुचविणे, मानसोपचार करणे हे मानसशास्त्राचे उद्दिष्ट असते. मानसशास्त्रीय ज्ञानाची व्यापकता पाहता या विषयासाठी नोकरी-व्यवसायाच्या असंख्य संधी निर्माण होत आहेत.



### सायकोमेट्रिशियन

मानसशास्त्रातील या रुळलेल्या वाटांबरोबरच काही नवीन उदयाला येणारी क्षितिजे तरुणांना आकर्षित करीत आहेत. सायकोमेट्रिशियन : व्यक्तीच्या विविध क्षमतांचे, स्वभावाचे, दोषांचे मापन करण्यासाठी मानसशास्त्रीय चाचण्या तयार करण्याचे, तसेच त्याबद्दलचे ॲप बनविणे हा व्यवसाय स्टार्ट अप ( start up) म्हणून सुरू केला जात आहे.

### क्लिनिकल सायकॉलॉजी

मानसशास्त्राच्या अनेक उपशाखांपैकी सर्वात लोकप्रिय शाखा म्हणजे क्लिनिकल सायकॉलॉजी ही आहे. मानसिक आजारांचे निदान आणि त्यावरील उपचार करण्याचे काम प्रामुख्याने या क्षेत्रात केले जाते. या शाखेत काम करण्यासाठी Rehabilitation council of India (RCI) या संस्थेकडून परवाना मिळविणे गरजेचे असते. या संस्थेची मान्यता असणारे एम.फील.चे कोर्सेस देशातील अनेक शहरांमध्ये चालविले जातात. याबाबतची अधिक माहिती आरसीआय ( RCI) च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विविध हॉस्पिटल, तुरुंग, व्यसनमुक्ती केंद्र येथे नोकरी मिळू शकते. किंवा स्वतःचे खासगी क्लिनिकदेखील सुरू करता येऊ शकते. क्लिनिकल सायकॉलॉजीच्या पदवीबरोबर आणखी काही डिप्लोमा कोर्सेस करून फॉरेन्सिक सायकॉलॉजी, हेल्थ सायकॉलॉजी, यूरोसायकॉलॉजी, रिहॅबिलिटेशन सायकॉलॉजी या शाखांमध्ये काम करता येते.

### अध्यापनाच्या क्षेत्रात करा नोकरी

मानसशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर प्राध्यापक होण्यासाठी नेट/ सेट पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. यासह पीएच.डी. पदवीला प्रवेश मिळविण्यासाठी पेट ही पात्रता परीक्षा द्यावी लागते. यासह बीएड स्पेशल एज्युकेशन हे क्षेत्रही निवडता येते. ही पदवी असणाऱ्यांना आरसीआय (RCI) रजिस्ट्रेशन मिळते ही आणखी एक जमेची बाजू आहे. स्पेशल एज्युकेशनमधील बीएड केल्यानंतर शारीरिकदृष्ट्या अपंग, अध्ययन अक्षमता, स्वमग्नता असलेल्या बालकांसाठी काम करता येते.

### औद्योगिक, संघटनात्मक मानसशास्त्र

औद्योगिक आणि संघटनात्मक मानसशास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये व्यक्तीच्या कामाच्या ठिकाणच्या वागण्याचा अभ्यास केला जातो. कर्मचाऱ्यांची निवड, प्रशिक्षण, टीमवर्क, त्यांची उपादन क्षमता यावर संशोधन केले जाते. असे शिक्षण घेतलेली व्यक्ती सरकारी किंवा खासगी संस्थांमधील HR Departments मध्ये नोकरी करू शकते किंवा प्रायव्हेट कन्सलटंट म्हणूनही काम करता येते. मिलेटरी सायकॉलॉजीचे प्रशिक्षण घेतल्यास डीआरडीओ (DRDO) सारख्या संरक्षण संस्थेत नोकरीची संधी मिळते.



### कोठे घेता येईल शिक्षण?

दहावीनंतर कला शाखा घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीपासून मानसशास्त्र हा विषय घेता येतो. त्यानंतर अनेक कॉलेजमध्ये तसेच विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेता येते.

### लेखक म्हणूनही कारकीर्द

ब्लॉग रायटर, स्क्रिप्ट रायटर, वर्तमानपत्रातील लेखमाला लिहिणे, घडलेल्या घटनेचे मानसशास्त्रीय विश्लेषण करून त्यावर भाष्य लिहिणे यात काही मानसशास्त्राचे विद्यार्थी रस घेत आहेत.



**डॉ. अमृता ओक,**
उपप्राचार्य, विभागप्रमुख, मानसशास्त्र, मॉडर्न कॉलेज, पुणे.

Hello Pune
Page No. 7 Jul 20, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

**प्रभात**

पुणे


प्रभात पुणे, मंगळवार, दि. २५ जुलै २०२३ || ३

# दहा महाविद्यालयांना प्राध्यापक भरतीस मंजुरी

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २४** - प्राध्यापक भरतीसाठी ९४ महाविद्यालयांनी उच्च शिक्षण विभागाकडे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मागणी प्रस्ताव सादर केला नाही. त्यामुळे या महाविद्यालयातील मंजूर पदे स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयांना देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार राज्यातील ६६ स्वायत्त महाविद्यालयांना ४५१ पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. यात पुण्यातील दहा स्वायत्त महाविद्यालयांना एकूण ५५ प्राध्यापकांची पदे भरता येणार आहे.

राज्य शासनाने यापूर्वीच २ हजार ८८ पदांच्या प्राध्यापक पदभरतीस मान्यता दिली होती. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांना 'एनओसी' प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी व काही महाविद्यालयांना संधी देऊनही काही महाविद्यालयांनी पदभरतीस उदासिनता दाखविली होती. त्या पार्श्वभूमीवर ही सर्व पदे ज्या महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्राप्त आहे, त्यांना भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.



### पंचावन्न पदे भरण्यास मान्यता

त्यानुसार प्रत्येक स्वायत्त महाविद्यालयास ८१.२० टक्के पदे भरता येतील. राज्यात अनुदानित महाविद्यालयात स्वायत्त दर्जा प्राप्त असणारी एकूण ८४ महाविद्यालये आहेत. त्यापैकी १८ महाविद्यालयांमध्ये ७१.२० टक्के पदे भरलेली आहेत.

उर्वरित ६६ महाविद्यालयांना २०८८ पैकी शिल्लक असलेली एकूण ४५१ पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. त्याबाबतचा शासन निर्णय उच्च शिक्षण विभागाने आज प्रसिद्ध केला आहे.

### महाविद्यालये व मंजूर प्राध्यापक पदाची संख्या

नौरोसजी वाडिया कॉलेज-१२ मंजूर पदे, फर्गसन कॉलेज :५, एस.पी. कॉलेज - ५, आबासाहेब गरवारे कॉलेज -९, गरवारे वाणिज्य कॉलेज-५, मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर - ३, बीएमसीसी -१, सिम्बायोसिस कॉलेज-९, प्रो. रामकृष्ण मोरे कॉलेज, आकुर्डी -१, तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती-५.

### पदभरतीस महाविद्यालये अनुत्सूक

एकूण ९४ महाविद्यालयांनी प्राध्यापक पदभरतीस 'एनओसी' प्रस्ताव सादर केला नाही. त्यामुळे त्यांना प्राध्यापक भरती करता येणार नाही. संस्थेची अनुसूची अद्ययावत नसणे, व्यवस्थापनांतर्गत वाद, महाविद्यालयातील न्यायालयीन प्रकरण आणि रोस्टर प्रमाणित नसणे, या कारणांमुळे प्राध्यापक पदभरतीसाठी संस्थांनी प्रस्ताव सादर केला नाही, अशी माहिती उच्च शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

PuneCity, 25 July 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

**पुढारी**

# विशेष फेरीतही कटऑफ ८० टक्क्यांच्या पुढे

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत नामांकित महाविद्यालयांतील पात्रता गुण (कटऑफ) विशेष फेरीतही ८० ते ८५ टक्क्यांच्या पुढेच आहेत. त्यामुळे नामांकित महाविद्यालयांचे विशेष करून विज्ञान शाखेचे प्रवेश विद्यार्थ्यांना दुरापास्तच असल्याचे स्पष्ट झाले आहे.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरीची गुणवत्ता यादी सोमवारी जाहीर करण्यात आली. त्यात बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात प्रवेशासाठी ६८.२ टक्के, फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेसाठी ९३.६ टक्के, विज्ञान शाखेसाठी ९२.८ टक्के, स. प. महाविद्यालयात विज्ञान शाखेत ८४.८ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ८७ टक्के, सिम्बायोसिस महाविद्यालयात कला शाखेसाठी ८८.४ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ८९.४ टक्के, शामराव कलमाडी महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९०.४ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ८७ टक्के, कला शाखेसाठी ८७ टक्के, मॉडर्न महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ८०.८ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ७७.६ टक्के, कला शाखेसाठी ८१ टक्के, आबासाहेब गरवारे महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ८५.६ टक्के, तर कला शाखेसाठी ६७.६ टक्के, हडपसरच्या एस.एम.जोशी महाविद्यालयात वाणिज्य शाखेसाठी ७६.४ टक्के, विज्ञान शाखेसाठी ८३.४ टक्के, तर नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये ६५.६ टक्के गुण आवश्यक आहेत. त्यामुळे कला शाखेचे कटऑफ काही प्रमाणात कमी असले, तरी वाणिज्य आणि विज्ञान शाखेचे कटऑफ कमी झाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

Pune Edition
Jul 25, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# 25k students allotted seats in special round for FYJC

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune**: The centralized admission process (CAP) committee announced the merit list for the special round for admissions to the first year of junior college in the city on Monday in which 25,973 students were allotted colleges against a vacancy of 60,387 seats in Pune and Pimpri Chinchwad areas. Of this, 19,682 students were able to get their first preference of college.

Rajendra Zunjarrao, principal of Modern College of Arts, Science and Commerce, said that the junior colleges, especially located in far-off areas have a lot of seats vacant despite the CAP committee conducting the four rounds.

Colleges which are in the heart of the city are still getting students, he added. In his college, on an average 65% to 70% of the seats are filled. But some courses have higher vacancies than others.

"Especially courses such as Arts (Marathi) have a lot of vacant seats compared to other courses. A good chunk of students who want to take up Arts (Marathi) belong to poor families. If they do not get good colleges, they prefer to stay at home and study instead of travelling to far-off colleges because that would cost extra money. They fill up form number 17 and appear for the HSC exam externally and when the results are out, you cannot make out whether the student is a regular or an external student," Zunjarrao said.

Students can confirm their admissions by July 27.

### VACANCY LIST ON JULY 27

➤ The colleges will be uploading online the vacant seat list at the end of the special round at 8pm on July 27

➤ Meanwhile, new students who have not filled up the online forms yet can do so by visiting the admission portal

| CATEGORY | | | |
|---|---|---|---|
| General | 17,854 | 23,054 | 20,938 |
| SC | 6,783 | 3,165 | 2,600 |
| ST | 5,873 | 71 | 71 |
| VJA | 1,887 | 329 | 285 |
| NTB | 1,559 | 385 | 310 |
| NTC | 2,254 | 389 | 329 |
| NTD | 1,613 | 102 | 93 |
| OBC | 12,499 | 1,135 | 1,028 |
| SBC | 1,536 | 142 | 132 |
| EWS | 8,407 | 190 | 187 |
| TOTAL | 60,265 | 28,962 | 25,973 |

VACANCY CANDIDATES ALLOTTED

The Times of India 25.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# प्र-कुलगुरूसाठी मुहूर्त केव्हा?

## विद्यापीठाच्या कुलगुरू आणि मॅनेजमेंट कौन्सिलला निवडीचा विसर

मटा विशेष

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesgroup.com

### 'चर्चा जास्त झाली की निवड होत नाही'

प्र-कुलगुरुपदाच्या शर्यतीत कुलगुरूपदी निवड होऊ न शकणाऱ्या शैक्षणिक संकुलातील प्राध्यापकांची, अधिष्ठातांची आणि काही प्राचार्यांची नावे चर्चेत आहेत. ही सर्व मंडळी एक ते दोन दिवसांआड कुलगुरू डॉ. गोसावी यांना विविध शैक्षणिक कामानिमित्त भेटतात. यातूनच एका व्यक्तीची वर्णी प्र-कुलगुरू म्हणून लागण्याची शक्यता आहे. या सर्वांना प्र-कुलगुरुपदाबाबत विचारल्यावर, 'चर्चा नको. चर्चा जास्त झाली, की निवड होत नाही. त्यामुळे शांत राहिलेले बरे,' असे मिश्कील उत्तर त्यांनी दिले.



### राजकीय आशीर्वाद मिळाल्यावर निवड का?

मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. रवींद्र कुलकर्णी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. सुरेश गोसावी यांची एकाच दिवशी निवड जाहीर झाली. त्यानंतर पुढील काही दिवसांतच मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू म्हणून डॉ. अजय भामरे यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू निवडण्यासाठी अजूनही एकमत होत नसल्याचे चित्र आहे. 'कुलगुरू आणि सदस्य एकाच ठिकाणी असल्यानेही निवड होत नाही. त्यामुळे राजकीय आशीर्वाद घेऊन येणाऱ्या व्यक्तीची प्र-कुलगुरुपदी निवड होईल का,' अशीही जोरदार चर्चा सुरू आहे.

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागला. या पार्श्वभूमीवर प्र-कुलगुरू निवडण्यासाठी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि मॅनेजमेंट कौन्सिलमधील (अधिकार मंडळातील) सदस्य किती कालावधी घेणार, याकडे शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**■ मुंबईत निवड; पुण्यात प्रतीक्षाच**

प्र-कुलगुरू निवडीचे अधिकार कुलगुरू आणि अधिकार मंडळाकडे आल्यानंतर, मुंबई विद्यापीठाने आठ दिवसांत प्र-कुलगुरूंची निवड करून, आपण शैक्षणिक कामकाजात तरबेज असल्याचे दाखवून दिले. मात्र, शैक्षणिक गुणवत्तेत राज्यात पहिल्या क्रमांकावर असल्याचा डंका पिटणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गोसावी आणि अधिकार मंडळाला प्र-कुलगुरू निवडीचा विसर पडल्याचे चित्र आहे.

माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर निवृत्त झाल्यानंतर साधारण सव्वा वर्षाने विद्यापीठाला डॉ. सुरेश गोसावी यांच्या रूपात नवे कुलगुरू मिळाले. डॉ. गोसावी यांनी कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर साधारण १५ दिवसांत प्र-कुलगुरूंची निवड होईल, असे वाटत होते. मात्र, विद्यापीठाकडे 'जी २०'च्या बैठकीची जबाबदारी असल्याने त्यांना आणि अधिकार मंडळाच्या सदस्यांना वेळ मिळाला नाही.

**■ महत्त्वाची प्रक्रिया अपूर्ण**

'जी-२०'ची बैठक झाल्यानंतर डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाला शैक्षणिक गुणवत्तेत अग्रक्रमावर नेण्यासाठी विशेष योजना आणि प्रारूप आखण्याची सुरुवात केली आहे. मात्र, या सर्व कामांच्या व्यापात विद्यापीठाच्या शैक्षणिक निर्णयांच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या; तसेच ते नसताना त्यांच्याऐवजी विद्यापीठाचा गाडा चालवण्याची जबाबदारी असणाऱ्या प्र-कुलगुरूंची निवड करण्याचा विसर पडल्याचे चित्र आहे.

**■ निवडीचा अधिकार मॅनेजमेंटकडे**

राज्यपालांकडून प्र-कुलगुरूंची निवड होत होती. मात्र, सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील नव्या तरतुदीनुसार प्र-कुलगुरू निवडीसाठी पात्र असणारी नावे मॅनेजमेंट कौन्सिलच्या बैठकीत मांडायची आहेत. या बैठकीचे अध्यक्ष कुलगुरू असतात. त्यामुळे संबंधित नावांवर चर्चा आणि विचारविनिमय करून त्यातील एक नाव सर्वानुमते मान्य करायचे आहे. त्यानंतर त्याची अधिकृत घोषणा करायची आहे. एकप्रकारे प्र-कुलगुरू निवडीचे अधिकार विद्यापीठाला असून, कुलगुरू आणि मॅनेजमेंट कौन्सिलचे सदस्य विविध शैक्षणिक कामानिमित्त एकमेकांना सातत्याने भेटतात.

Maharashtra Times 1.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# नव्यानव्या पदव्या, अधिकाधिक पैसा- कुणासाठी ?

**'शैक्षणिक विभागणी** मोडीत काढणाऱ्या नव्या पदव्या कोणत्या?' हे 'लोकसत्ता विश्लेषण' (२९ जून) वाचले. 'एकाच अभ्यासक्रमासाठी विविध पदव्यांमुळे संभ्रम निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे'- हे त्यातील निष्कर्षवजा वाक्य पुरेपूर पटले. कारण नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अशा असंख्य तरतुदी आहेत की ज्यामुळे हे धोरण प्रत्यक्ष राबवताना केवळ गोंधळ आणि संभ्रमच निर्माण होणार आहे. सर्वसामान्य लोकांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे योजनाबद्ध कारस्थान म्हणजे हे नवीन शैक्षणिक धोरण आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

कारण मुळात आपल्या देशात पालकांना आपला पाल्य पास झाला की नापास, किती टक्के पडले, यातच स्वारस्य असते. पण गेल्या पाच/सहा वर्षांपासून 'सी.जी.पी.ए.'/ 'एस. जी. पी. ए.' अशा पद्धतीने भरलेले मार्क स्टेटमेंट विद्यार्थ्यांच्या माथी मारण्यात येत आहे. पालकांना कळेना ही काय भानगड आहे. प्राध्यापकांना हे सर्व समजून घेणे आणि विद्यार्थ्यांना/ पालकांना समजावणे हे नवीनच काम मागे लागले. सर्वात महत्त्वाचा विरोधाभास असा की, आता पाचवी आणि आठवी उत्तीर्ण होणे आवश्यक, पण तीन किंवा चार वर्षांच्या पदवी अभसक्रमाला प्रवेश घेतल्यानंतर ए.टी.के.टी. मात्र कायम ठेवली आहे.

महाविद्यालय जर स्वायत्त असेल तर विद्यार्थ्यांची मजाच आणि काही वेळा सजासुद्धा. खानदेशातील एका नामवंत स्वायत्त महाविद्यालयाने त्यांच्या बी.सी.ए. परीक्षेचा निकाल २६ टक्के लावला. विद्यार्थ्यांनी लगेच विरोध सुरू केला. नव्या शैक्षणिक धोरणानुसार या स्वायत्त महाविद्यालयात अभ्यासक्रम त्यांचा स्वतःचाच, त्यांचे स्वतःचे पेपर सेटर्स, त्यांचेच परीक्षक परीक्षा नियंत्रण व परीक्षा मंडळ. तरीही २६ टक्के निकाल. त्यामुळे आता गुणवत्ता राखायची की विद्यार्थ्यांना त्यांच्या म्हणण्यानुसार उत्तीर्ण करून डिग्रीचा पोकळ कागद हातात द्यायचा, असा प्रश्न त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पडला. हा प्रश्न सोडवताना त्यांनी जाहीर केले की 'योग्य फी भरून पुनर्मूल्यांकन करून घ्या' ! याचा निराळा अर्थ असा की, विद्यार्थ्यांच्या आर्थिक शोषणाचे अनेक मार्ग या नवीन शैक्षणिक धोरणातील तरतुदींमुळे निर्माण झाले आहेत, होऊ शकतात.

■ **प्रा. भालचंद्र पंढरीनाथ सावखेडकर**, जळगाव

लोकसत्ता Sat, 01 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72821751

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# ३५० महाविद्यालयांची संलग्नता धोक्यात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

### काय आहेत त्रुटी ?

- पूर्ण वेळ प्राचार्य नसणे
- प्राचार्यांचे पद रिक्त असणे
- प्राध्यापकांची आणि कर्मचाऱ्यांची अपेक्षित संख्या नसणे
- प्रयोगशाळा, कॉम्प्युटर लॅब, ग्रंथालयाची सुविधा नसणे
- शैक्षणिक सुविधा नसणे

महाविद्यालयांमधील त्रुटींची पूर्तता करण्याचे दरवर्षी बंधपत्राद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सांगणाऱ्या; मात्र कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करणाऱ्या साधारण ३५० महाविद्यालयांची संलग्नता धोक्यात आली आहे. या महाविद्यालयांची संलग्नता काढण्यासाठी पुणे विद्यापीठाकडून तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे.

पुणे विद्यापीठाच्या ॲकॅडेमिक कौन्सिलची बैठक शुक्रवारी झाली. या बैठकीत महाविद्यालयांना संलग्नता देण्याच्या प्रक्रियेबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर या सर्व विषयांवर अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे.

**संलग्नता काढण्यासाठी विद्यापीठाकडून तज्ज्ञांची समिती**

येत्या आठवड्यात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी समितीची घोषणा करण्याची शक्यता आहे.

पुणे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे पुणे, नगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांत आहेत. शैक्षणिक वर्षाची सुरुवात होण्यापूर्वी पुणे जिल्ह्यातील साधारण ३५० महाविद्यालये ही दरवर्षी संलग्नता घेतात. ही संलग्नता घेण्यासाठी त्यांना ५०० रुपयांच्या बंधपत्रावर महाविद्यालयांमध्ये प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांची पदे भरण्यासोबतच शैक्षणिक आणि पायाभूत सुविधा सहा महिन्यांत पुरविण्याचे लिहून देण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे या महाविद्यालयांबाबत विद्यापीठाने कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. गरज भासल्यास या महाविद्यालयांची संलग्नता काढून टाकण्यात येईल. या संपूर्ण महाविद्यालयांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे, अशी माहिती ॲकॅडेमिक कौन्सिलच्या सदस्यांनी दिली.

My Pune Edition
Jul 2, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# ३५० महाविद्यालयांची संलग्नता धोक्यात?

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून कारवाईसाठी तज्ज्ञ समिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : त्रुटींची पूर्तता करण्याचे बंधपत्र दर वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला देऊन प्रत्यक्षात काहीच कार्यवाही न करणाऱ्या सुमारे ३५० महाविद्यालयांची संलग्नता धोक्यात आली आहे. या महाविद्यालयांची संलग्नता रद्द करण्याबाबत विद्यापीठाकडून तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात पुणे, नगर आणि नाशिक हे तीन जिल्हे येतात. शैक्षणिक वर्षाची सुरुवात होण्यापूर्वी पुणे जिल्ह्यातील साधारण ३५० महाविद्यालये ही दर वर्षी संलग्नता घेतात. संलग्नतेसाठी पाचशे रुपयांच्या बंधपत्रावर महाविद्यालयांत प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांची पदे भरण्यासोबतच शैक्षणिक आणि पायाभूत सुविधा सहा महिन्यांत पुरवण्याचे लिहून दिले जाते. मात्र, प्रत्यक्षात याबाबत कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे या महाविद्यालयांवर कारवाई करण्याची भूमिका विद्यापीठाने घेतली आहे. गरज भासल्यास या कॉलेजांची संलग्नता रद्द करण्यात येईल. या महाविद्यालयांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या विद्या परिषद सदस्यांनी दिली.

**महाविद्यालयांतील त्रुटी**

- पूर्णवेळ प्राचार्य नसणे
- प्राचार्यांचे पद रिक्त असणे
- प्राध्यापक, कर्मचाऱ्यांची अपेक्षित संख्या नसणे
- प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय आदी सुविधा नसणे
- शैक्षणिक सुविधा नसणे

लोकसत्ता Sun, 02 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72829154

लोकमत

# 'एनईपी'मुळे देश होईल बळकट

## राज्यपाल : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पदवी प्रदान समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणात रोजगार निर्मितीसह राष्ट्राला समृद्ध बनविण्याची ताकद असते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या आधारे भारताला महाशक्ती बनविण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२२व्या पदवी प्रदान समारंभात राज्यपाल बैस बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. राजेश गोखले, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे. ज्ञान, कौशल्य विकास, परंपरेचा अभिमान या बाबींवर नवीन शैक्षणिक धोरणात भर देण्यात आला आहे. पदवीप्रदान समारंभात एक लाख २१ हजार २८१ विद्यार्थ्यांना पदवी, पदविका प्रमाणपत्रे, एम. फिल, पीएच.डी. आणि सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.



राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी (डावीकडून) डॉ. राजेश गोखले, चंद्रकांत पाटील, बैस, सुरेश गोसावी, प्रफुल्ल पवार.

### गरजांनुसार अभ्यासक्रमात बदल आवश्यक



राज्यपाल बैस म्हणाले, पुणे हे माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोबाइल उद्योगाचे केंद्र आहे. याचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी कसा करता येईल? यासाठी विद्यापीठाने सातत्याने प्रकल्प राबविले पाहिजे. चारित्र्य, नैतिकता, घटनात्मक मूल्ये, बौद्धिक जिज्ञासा, वैज्ञानिकता, रचनात्मकता आणि सेवाभावनेच्या आधारे विज्ञान, समाजशास्त्र, कला, भाषा, तंत्रज्ञान यांसह अन्य क्षेत्रांतही संधी शोधण्याची क्षमता निर्माण करावी लागेल. आपल्या अभ्यासक्रमाला बदलते औद्योगिक तंत्रज्ञान, रोबोटिक्स, नॅनो कॉम्प्युटर यांच्याशी सुसंगत राहावे लागेल. समकालीन गरजांनुसार अभ्यासक्रमात गतिमान बदल करून विद्यापीठाने विद्यार्थी घडविले पाहिजेत.

समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पदवीधरांनी ज्ञानाचा उपयोग करावा. जैवतंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे विकासाचे नवे सूत्र आहे. या क्षेत्रात आपल्या ज्ञान आणि कौशल्याचा उपयोग करून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न विद्यार्थ्यांनी पूर्ण करावे. बुद्धिमत्ता, कठोर परिश्रम, बदलाला सामोरे जाण्याची क्षमता जीवनात यशस्वी होण्यासाठी उपयोगी ठरणार आहे.

**- डॉ. राजेश गोखले**

Hello Pune
Page No. 3 Jul 02, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

सकाळ

# सरकारवर शिक्षणाची जबाबदारी घेण्याची वेळ

## राज्यपाल रमेश बैस यांचे विधान; विद्यापीठाचा पदवी प्रदान समारंभ



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : अदिती कालीदास भोईटे हिला राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले. (डावीकडून) डॉ. राजेश गोखले, चंद्रकांत पाटील, राज्यपाल रमेश बैस, डॉ. सुरेश गोसावी आणि डॉ. प्रफुल्ल पवार.**

**पुणे, ता. १ :** नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर राज्य आणि केंद्र सरकारला शिक्षणाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेण्याची वेळ आली आहे, असे विधान राज्यपाल रमेश बैस यांनी शनिवारी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२२ व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते.

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील प्राध्यापकांची रिक्त पदे, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी वर्षभर पुढे ढकलण्याची नामुष्की आणि शैक्षणिक क्षेत्राचा दिवसेंदिवस ढासळणारा आलेख या पार्श्वभूमीवर राज्यपालांच्या विधानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांच्या समग्र विकासासाठी पूर्वप्राथमिक स्तरापासून विद्यापीठांपर्यंत सर्वसमावेशक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, देशाच्या जैवतंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. राजेश गोखले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पाटील म्हणाले, "नवीन शैक्षणिक धोरणात ज्ञान, कौशल्य विकास, परंपरेचा अभिमान या बाबींवर भर दिला आहे. या तीन पैलूंच्या आधारे, शिक्षणातून मिळणाऱ्या संस्काराच्या आधारे विद्यार्थ्यांनी प्रगती करावी."

डॉ. गोखले म्हणाले, "जैवतंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धीमत्ता हे विकासाचे नवे सूत्र आहे. या क्षेत्रात आपल्या ज्ञान आणि कौशल्याचा उपयोग करून 'आत्मनिर्भर भारता'चे स्वप्न स्नातकांनी पूर्ण करावे. बुद्धिमत्ता, कठोर परिश्रम, बदलाला सामोरे जाण्याची क्षमता जीवनात यशस्वी करेल. परिश्रमाशिवाय यश नाही हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी पुढील वाटचाल करावी."

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखाधिकारी चारुशीला गायके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात आकुर्डी येथील प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी आदिती कालिदास भोईटे हिला "राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्णपदक" प्रदान करण्यात आले.

> पदवी किंवा सुवर्णपदक मिळविणे हा अंतिम उद्देश नसावा, तर येणाऱ्या युगासाठी आपण सज्ज असायला हवे. शिक्षणाबरोबरच औद्यागिक केंद्र असलेल्या पुण्याचा विद्यार्थ्यांसाठी उपयोग व्हायला हवा. उद्योगांमधील आधुनिक तंत्रज्ञानाशी अवगत करणाऱ्या गतिशील अभ्यासक्रमांची रचना विद्यापीठाने विकसित करावी.
>
> **- रमेश बैस**, राज्यपाल तसेच कुलपती

### पदवी प्रदान आकड्यांत

- एकूण पदव्यांची संख्या : १ लाख २१ हजार २८१
- पदवीचे विद्यार्थी : ९३ हजार ९८३
- पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी : २६ हजार ४५४
- पीएच.डी.चे विद्यार्थी : ४३८
- एम.फिल.चे विद्यार्थी : ११

### सुवर्णपदक विजेते

- विद्यार्थी : ३०
- विद्यार्थिनी : ४०
- एकूण विद्यार्थी : ७०
- सुवर्णपदकांची संख्या : १०७

Pune, Main
02/07/2023 Page No. 3

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी




विद्यार्थिनीला पदवी प्रमाणपत्र देताना राज्यपाल रमेश बैस. या वेळी उपस्थित मान्यवर.

# महाशक्ती करण्याची जबाबदारी विद्यापीठांची

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीप्रदानप्रसंगी राज्यपाल रमेश बैस यांचे मत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नव्या शिक्षण धोरणाच्या आधारे भारताला महाशक्ती करण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे, असे मत राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२२ व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ.राजेश गोखले, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार आदी उपस्थित होते.

बैस म्हणाले, 'पदवी प्राप्त करणे हे अंतिम उद्दिष्ट नसून, शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. परीक्षेचे बदलते स्वरूप आणि नवे तंत्रज्ञानाचे युग लक्षात घेऊन त्यादृष्टीने आपली तयारी करावी लागेल. रोबोटीक्स, नॅनो कॉम्प्युटरसारख्या विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यासोबत अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करावा लागेल. अभ्यासक्रमात वेगाने परिवर्तन करीत विद्यार्थ्यांची क्षमता बांधणी करणे गरजेचे आहे. समकालीन गरजांनुसार अभ्यासक्रमात गतिमान बदल करून विद्यापीठाने आपले विद्यार्थी तयार केले पाहिजेत.'

पाटील म्हणाले, 'नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणातून मिळालेले श्रेयांक (क्रेडिट) आपल्या क्रेडिट बँकेत जमा व्हावेत आणि नंतरच्या शिक्षणासाठी ते उपयोगी ठरावेत अशी अपेक्षा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शिक्षणावर न थांबता विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी विविध क्षेत्रांत प्रावीण्य दाखवावे.' डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाच्या कामगिरीचा आढावा घेतला. सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांना यावेळी प्रमाणपत्रे आणि पदक देऊन गौरविण्यात आले.

Pune Edition
Jul 2, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी

# नियमबाह्य प्रवेश प्रक्रिया राबविल्यास कारवाई

## सीईटी सेलचा महाविद्यालयांना इशारा; तिसऱ्या फेरीनंतरच व्यवस्थापन कोट्याचे प्रवेश करण्याची सूचना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) 'कॅप'च्या तीन फेऱ्या झाल्यानंतरच शैक्षणिक संस्थांनी व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश प्रक्रिया राबवावी. संस्थास्तरावर रिक्त राहणाऱ्या जागांवर नियम डावलून प्रवेश करणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे सीईटी सेलने स्पष्ट केले आहे. संस्थांवरील प्रवेश प्रक्रिया राबविताना नियमानुसार आणि गुणवत्तेनुसार प्रवेश होणे आवश्यक आहे, असे सीईटी सेलने स्पष्ट केले आहे.**



संग्रहित छायाचित्र

### पालकांच्या तक्रारींची दखल

प्रवेशाच्या सर्व फेऱ्या संपल्यानंतर काही जागा रिक्त राहतात. प्रवेशासाठीची रिक्त जागा संस्थांना त्यांच्या स्तरावर भरण्याची मुभा आहे. मात्र, संस्थास्तरावरील जागा भरताना नियम डावलून प्रवेश दिले जातात, अशी सर्वसामान्य पालकांची तक्रार असते. संस्थेने प्रवेशासाठी अर्ज मागविणे आणि गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे अपेक्षित आहे. त्यानुसार प्रवेशाची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. यामध्ये नियमांची पायमल्ली करणाऱ्या संस्थांवर कारवाईचा बडगा उगारण्याचा इशारा सीईटी सेलने दिला आहे.

संस्थास्तरावरील जागांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भातच्या माहिती पुस्तिकेमध्ये सर्व नियम सूचित करण्यात आले आहेत. त्यानुसार तंतोतन पालन करून संस्थेने प्रवेश प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. रिक्त जागा भरताना विद्यार्थ्यांनी केलेल्या अर्जाची यादी व त्यांची अंतिम गुणवत्ता यादी संस्थेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात यावी आणि सीईटी कक्षाच्या माहितीकरिता ही यादी ई-मेलद्वारे पाठवावी, असेही राज्य सीईटी सेलने सांगितले आहे.

राज्य सीईटी सेलच्या अंतर्गत असलेल्या तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविले जात आहेत.

सध्या प्रवेशासाठी नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यात अर्जनिश्चिती आणि कागदपत्रांची पडताळणी होत आहे. ही सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर तीन नियमित प्रवेश फेऱ्या होतील. त्याचे वेळापत्रकही लवकरच प्रसिद्ध केले जाणार आहे.

My Pune Edition
Jul 2, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

सकाळ

# 'बिंदुनामावली'नंतरच शिक्षक भरती

## मागासवर्गीय आयोगाला शुक्रवारपर्यंत माहिती सादर करण्याचे निर्देश

**सोलापूर, ता. १ :** राज्यात शिक्षकांची ३२ हजार पदे भरली जाणार, अशा अनेकदा घोषणा झाल्या. पण, शिक्षकभरतीला अनेक अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत आहे. विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण नसल्याने संचमान्यता रखडली आहे. दुसरीकडे बिंदुनामावली अपूर्ण असल्यानेही प्रक्रिया लांबणार आहे. आता ७ जुलैपर्यंत बिंदुनामावलीची कार्यवाही पूर्ण करून माहिती मागासवर्गीय कक्षाला सादर करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्तांनी सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत.

यंदा पहिल्यांदाच संचमान्यतेसाठी विद्यार्थ्यांच्या 'आधार'ची अट बंधनकारक केली आहे. जेवढ्या विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले, स्टुडंट पोर्टलवर जेवढ्या मुलांची माहिती भरली आहे, तेवढेच विद्यार्थी गृहित धरून संचमान्यता होणार आहे. दरम्यान, एप्रिलपासून सुरू झालेली आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया जून संपला, तरीदेखील १०० टक्के पूर्ण झालेली नाही. ज्या जिल्ह्यांचे ९० टक्के आधार प्रमाणीकरण झाले, त्यांची संचमान्यता शिक्षण विभागाकडून केली जाणार आहे.

संचमान्यतेनंतर रिक्तपदांची वस्तुस्थिती समोर येणार आहे. त्यानंतर अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे पहिल्यांदा समायोजन होईल. शेवटी, खासगी व जिल्हा परिषद शाळांमध्ये 'पवित्र' पोर्टलद्वारे पारदर्शकपणे शिक्षक भरती केली जाणार आहे.

समाजशास्त्र व विज्ञान विषयाच्या शिक्षकांना आता पदावनत (उपशिक्षक) केल्यानंतर त्या विषय शिक्षकांची पदे प्राधान्याने भरावी लागतील. समाजशास्त्र शिक्षकांना नियुक्ती देताना निकष काटेकोर पाळले गेले नाहीत.

दुसरीकडे बारावी विज्ञान शाखेच्या शिक्षकांना विज्ञान विषयाच्या शिक्षकपदी नेमणुका दिल्या, पण आता पुन्हा त्यांना उपशिक्षक म्हणून काम करावे लागणार आहे. एकूणच या आदेशांमुळे शिक्षकांच्या भरतीला विलंब होतो असल्याची स्थिती आहे.

### न्यायालयाच्या निर्णयाकडे लक्ष

■ उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शिक्षकभरतीला स्थगिती दिली. विज्ञान शिक्षकपदी नेमणुका देताना निकष डावलल्याची याचिका न्यायालयात दाखल झाली होती. आता शालेय शिक्षण विभागाने त्या नेमणुका रद्द करून नवे आदेश काढून त्याचा अहवाल न्यायालयात सादर केला आहे. त्यावर आता सोमवारी निर्णायक सुनावणी होणार असून त्यानंतर शिक्षकभरतीचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> संचमान्यता अंतिम झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये नेमकी किती पदे रिक्त आहेत, हे स्पष्ट होईल. तत्पूर्वी, ७ जुलैपर्यंत सर्व पदांची बिंदुनामावली पूर्ण करून त्याची माहिती मागासवर्गीय कक्षाला सादर करायची आहे.
>
> **- संजय जावीर,** प्राथमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर

Pune, Main
02/07/2023 Page No. 6

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

सकाळ

# प्राध्यापक भरती तातडीने करा

## 'यूजीसी'चे निर्देश; राज्यांना लिहिले पत्र

पुणे, ता.१ : विद्यापीठे आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांचा रिक्त पदांबद्दल खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नाराजी व्यक्त केली आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ही रिक्त पदे तातडीने भरा, असे निर्देश यूजीसीने दिले आहे. यासंबंधीचे पत्रही यूजीसीने राज्यपालांसह मंत्र्यांना पाठविले आहे.

राज्यातील ६० टक्क्यांहून अधिक प्राध्यापकांची पदे रिक्त असून, तब्बल बारा वर्षांपासून भरती प्रक्रिया रखडली आहे. वेळोवेळी समाजघटकातील सर्वांनीच प्राध्यापक भरतीकडे लक्ष वेधले होते. मात्र, राज्यस्तरावर कोणतीच हालचाल न झाल्याने, थेट यूजीसीनेच पुढाकार घेत प्राध्यापक भरतीसाठी राज्यांवर दबाव आणला आहे. यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदीश कुमार यांनी यासंदर्भात अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, शिक्षण सचिव आणि राज्यपालांचे सचिव यांना पत्र लिहिले आहे. प्रा. जगदीश कुमार म्हणाले, "उच्च शैक्षणिक संस्थांमधील प्राध्यापकांच्या रिक्त पदांचा परिणाम थेट अध्ययन-अध्यापनावर होतो. त्यामुळे तातडीने पात्र आणि सक्षम उमेदवारांची पदे भरली जाणे आवश्यक आहे. राज्याच्या अखत्यारीतील विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांची पदे तातडीने भरावी, यासाठी मी राज्य सरकारकडे आग्रह धरला आहे."

**प्राध्यापक भरतीची सद्यःस्थिती...**

- राज्यातील सुमारे ६० टक्के प्राध्यापकांची पदे रिक्त
- मागील बारा वर्षांपासून भरती प्रक्रिया रखडली
- अत्यंत अल्प प्रमाणात निवडक ठिकाणी भरती
- महाविद्यालयांवर 'सीएसबी' प्राध्यापकांचा भार
- उच्च व तंत्र शिक्षण विभागाची कमालीची अनास्था

"नवीन शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी मनुष्यबळच अपुरे आहे. त्याची दखल घेत 'यूजीसी'ने वारंवार राज्य सरकारला ताकीद दिली आहे; मात्र अजूनही राज्य सरकार काही प्रतिसाद देत नाही. सरकारने याचा बोध घेत तातडीने प्राध्यापक भरती पूर्ण करावी, अन्यथा संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल.
- डॉ. संदीप पाथ्रीकर, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटना

**आकडे बोलतात...**

| | |
|---|---|
| १७ हजार | राज्यातील एकूण रिक्त पदे |
| २ हजार ८८ | भरती प्रक्रियेस परवानगी मिळालेली पदे |
| ५९२ | भरती प्रक्रियेतील रिक्त पदांची संख्या |

Pune, Main
02/07/2023 Page No. 3

# विद्यापीठाची वाटचाल कॅम्पस युनिव्हर्सिटीकडे

## आर्थिक उत्पन्नाचे नवे मार्ग शोधावे लागणार

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesgroup.com

**नामवंत कॉलेजांवरील हक्क सोडण्याची वेळ**

शहरातील काही नामवंत शैक्षणिक संस्थांकडून खासगी आणि 'क्लस्टर' अशा दोन्ही विद्यापीठांचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. या प्रस्तावांना मान्यता मिळाल्यास, पुढील दोन वर्षांत १० विद्यापीठे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात निर्माण होणार आहेत. त्यामुळे या विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा कोणताही हक्क राहणार नाही, असे चित्र निर्माण होणार आहे. यात नामांकित कॉलेजही असतील. त्यामुळे ही कॉलेजही विद्यापीठापासून दूर जाणार आहेत.



मटा विशेष

**पुणे** : राज्यासह पुण्यात क्लस्टर आणि खासगी विद्यापीठांची संख्या वाढणार असल्याने, येत्या काही वर्षांत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उत्पन्नाचे स्रोत कमी होण्याची शक्यता आहे.

विविध शैक्षणिक प्रक्रियांमुळे दर वर्षी विद्यापीठाला सुमारे १५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. मात्र, संलग्न कॉलेजांचे रूपांतर विद्यापीठांमध्ये झाल्यास या उत्पन्नात घट होण्याची शक्यता आहे. त्यातच राज्य सरकारकडून आर्थिक अनुदान वेळेत मिळत नाही. त्यामुळे आगामी काळात विद्यापीठ 'कॅम्पस' विद्यापीठाप्रमाणे काम करणार असून, आर्थिक स्थैर्यासाठी नवे मार्ग शोधण्याची वेळ येणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 'क्लस्टर' विद्यापीठाचा मसुदा नुकताच प्रसिद्ध केला. या मसुद्याला अंतिम मान्यता मिळाल्यानंतर, राज्यातील अनेक शैक्षणिक संस्थांच्या कॉलेजचे रूपांतर 'क्लस्टर' विद्यापीठात होईल. त्यामध्ये अनुदानित आणि विनाअनुदानित अशा दोन्ही प्रकारची विद्यापीठे तयार करता येणार आहेत. शैक्षणिक संस्थांना 'क्लस्टर' विद्यापीठांची मान्यता मिळाल्यानंतर, त्यामध्ये किमान दोन आणि कमाल पाच महाविद्यालयांचा समावेश असेल. त्यामुळे या महाविद्यालयांची विद्यापीठाशी असणारी संलग्नता संपुष्टात येणार आहे.

सद्यस्थितीत महाविद्यालयांचे परीक्षा शुल्क म्हणून विद्यापीठाला दर वर्षी सुमारे १२५ कोटी रुपये मिळतात. संलग्नता शुल्क म्हणून सुमारे १५ कोटी रुपये मिळतात. त्यातच या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शुल्कापोटी सुमारे पाच कोटी रुपये मिळतात. ही महाविद्यालये 'क्लस्टर' विद्यापीठांमध्ये गेल्यानंतर, त्यांची संलग्नता रद्द होईल आणि कोणतेही शुल्क विद्यापीठाला मिळणार नाही. त्यामुळे विद्यापीठाला आर्थिक स्थैर्यासाठी उत्पनांचे स्रोत नव्याने शोधावे लागणार आहेत. दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवण्यासाठी आपल्याकडे 'मॉडेल' आणि उपाययोजना तयार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी नुकतीच दिली होती.

**शैक्षणिक संकुलापुरतेच**

पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यांमध्ये खासगी आणि 'क्लस्टर' विद्यापीठांचे जाळे तयार झाल्यानंतर, विद्यापीठाशी संलग्न कॉलेजांची संख्या कमी होणार आहे. साधारण चार वर्षांपूर्वी विद्यापीठाला संलग्न कॉलेज आणि रिसर्च सेंटरची संख्या हजारांपर्यंत पोहोचली होती. सध्या ही संख्या ८७६च्या आसपास आहे. त्याचप्रमाणे वारंवार सूचना देऊनही 'नॅक' न करणाऱ्या कॉलेजांवरही बंदीच कारवाई होणार आहे. त्यामुळे विद्यापीठ शैक्षणिक संकुलापुरते मर्यादित होणार आहे.

**अनुदानापासून वंचितच**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे सरकारी विद्यापीठ असले, तरी विद्यापीठाला राज्य सरकारकडून विकासकामांसाठी आणि शैक्षणिक सुविधांसाठी आर्थिक मदत मिळत नसल्याचे चित्र आहे. विद्यापीठाला राज्य सरकारकडून कोट्यवधी रुपयांचे वेतनेतर अनुदान मिळणे बाकी असून, ते कधी मिळणार याची माहिती नाही. त्यामुळे शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांसाठी पुणे विद्यापीठाला नामांकित कंपन्यांचे 'सीएसआर' आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा) मदत मिळते. त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून मदत मिळते. मात्र, आगामी काळात ही मदत मिळणेही कठीण होणार आहे, असे चित्र आहे.

Maharashtra Times 3.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

प्रभात

# साडेतीनशे महाविद्यालयांची संलग्नता धोक्यात

## त्रुटींची पूर्तता न केल्याने पुणे विद्यापीठाचा निर्णय

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित असलेल्या ३५० महाविद्यालयांची संलग्नता अडचणीत आली आहे. त्रुटींची पूर्तता न केल्याने या महाविद्यालयांची संलग्नता रद्द करण्यासाठी पुणे विद्यापीठाकडून तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

विद्यापीठाच्या विद्या परिषदेची बैठक नुकतीच पार पडली. यात महाविद्यालयांच्या संलग्नतेबाबत चर्चा झाली. त्यानंतर या सर्व विषयांवर अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. येत्या आठवड्यात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी समितीची घोषणा करणार आहेत.

पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यात विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. यात पुणे जिल्ह्यातील सुमारे ३५० महाविद्यालये आहेत. ही महाविद्यालये दरवर्षी विद्यापीठाकडून संलग्नता घेतात. ही संलग्नता घेण्यासाठी त्यांना ५०० रुपयांच्या बंधपत्रावर महाविद्यालयांत प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांची पदे भरण्यासोबतच शैक्षणिक आणि पायाभूत सुविधा सहा महिन्यांत पुरविण्याचे लिहून देण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे या महाविद्यालयांबाबत विद्यापीठाने कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. गरज भासल्यास या महाविद्यालयांची संलग्नता काढून टाकण्यात येईल. या महाविद्यालयांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्या परिषदेच्या सदस्यांनी दिली.



**संलग्नता रद्द केल्यास...**

- महाविद्यालयाचा विद्यापीठाशी असलेला संबंध तुटणार
- महाविद्यालयाची अधिकृतता संपुष्टात येणार
- विद्यार्थी विद्यापीठाच्या प्रमाणपत्राला मुकणार
- परिणामी विद्यार्थ्यांबरोबरच संस्थेचेही शैक्षणिक नुकसान होणार
- विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणही अडचणीत येणार

PuneCity, 03 July 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

सकाळ

# ३५० महाविद्यालयांची संलग्नता धोक्यात

## बंधपत्रातील अटींच्या पूर्ततेस टाळाटाळ; तज्ज्ञांची समिती स्थापन करणार



**पुणे, ता. २ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न तब्बल ३५० महाविद्यालयांची संलग्नता धोक्यात आली आहे. महाविद्यालयांतील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी दरवर्षी महाविद्यालये विद्यापीठाकडे बंधपत्र सादर करतात. मात्र, अजून कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करणाऱ्या अशा महाविद्यालयांवर आता कार्यवाही करण्यात आली आहे. यासंबंधीचा निर्णय घेण्यासाठी विद्यापीठाकडून तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे.

पुणे, नगर आणि नाशिक हे तीनही जिल्हे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येत असून, अनेक महाविद्यालयांमध्ये धोरणात्मक त्रुटी आढळत आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. त्यासाठीच संलग्नतेच्या अटींची पूर्तता तपासण्यात येत आहे. नुकतेच विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत या संबंधी चर्चा झाली. त्यानंतर या सर्व विषयांवर अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. येत्या आठवड्यात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी समितीची घोषणा करण्याची शक्यता आहे.

**काय असते बंधपत्र**

शैक्षणिक वर्षाची सुरवात होण्यापूर्वी साधारण ३५० महाविद्यालये ही दरवर्षी संलग्नता घेतात. ही संलग्नता घेण्यासाठी त्यांना ५०० रुपयांच्या बंधपत्रावर महाविद्यालयांमध्ये प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांची पदे भरण्यासोबतच शैक्षणिक आणि पायाभूत सुविधा सहा महिन्यात पुरविण्याचे लिहून देण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे या महाविद्यालयांबाबत विद्यापीठाने कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. गरज भासल्यास या महाविद्यालयांची संलग्नता काढून टाकण्यात येईल. या संपूर्ण महाविद्यालयांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापरिषदेच्या सदस्यांनी दिली.

**आवश्यकता का?**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबरोबरच समूह विद्यापीठांच्या स्थापनेचा विचार करण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात सर्व शैक्षणिक सुविधा आणि प्राध्यापकांची पुरेशी संख्या आवश्यक आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांची पूर्तता करण्यात येत आहे.

**काय आहेत कारणे?**

- शैक्षणिक सुविधांचा अभाव
- प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची अपेक्षित संख्या नसणे
- महाविद्यालयाला पूर्ण वेळ प्राचार्य नसणे
- प्राचार्यांचे पद रिक्त असणे
- प्रयोगशाळा, संगणक कक्ष, ग्रंथालयाची सुविधा नसणे

Pune, Main
03/07/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

सकाळ

# दुसरी गुणवत्ता यादी आज जाहीर होणार

## अकरावी प्रवेश

**पुणे, ता. २ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या नियमित फेरीची गुणवत्ता यादी सोमवारी (ता. ३) सकाळी दहा वाजता जाहीर होणार आहे. जवळपास ३२६ कनिष्ठ महाविद्यालयातील ६५ हजार ९७९ जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया होत आहे.

राज्यात पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नागपूर, अमरावती, नाशिक महापालिका क्षेत्रातील इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेतील दुसरी नियमित फेरी सुरू असून या फेरीतील गुणवत्ता, निवड यादी सोमवारी जाहीर होणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील ३२६ कनिष्ठ महाविद्यालयातील एक लाख १४ हजार ३५० जागांमधील आतापर्यंत केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया (कॅप) आणि कोट्यांतर्गत २७ हजार २५५ जागांवर प्रवेश निश्चित करण्यात आला आहे.

**दुसऱ्या फेरीत निवडीनंतर प्रवेश घ्यायचा असेल तर काय करावे?**

विद्यार्थ्यांना मिळालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल, तर लॉगिनमध्ये 'प्रोसिड फॉर ॲडमिशन'वर क्लिक करावे. त्यानंतर खुल्या होणाऱ्या पानावर प्रवेशासाठी कागदपत्रे अपलोड करावीत आणि मिळालेल्या महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करावा.

**निवड झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा नसल्यास?**

एखाद्या विद्यार्थ्याला प्रवेशासाठी निवड झालेल्या (अलॉट) महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा नसेल, तर संबंधित विद्यार्थी पुढील फेऱ्यांसाठी थांबू शकतो. परंतु विद्यार्थ्यांना प्रथम पसंतीचे विद्यालय अलॉट झालेले आहे. त्यांनी तेथेच प्रवेश घेणे अनिवार्य राहणार आहे. परंतु प्रथम पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश घेतला नाही, तर संबंधित विद्यार्थ्यांना पुढील एका नियमित फेरीसाठी प्रतिबंधित केले जाईल आणि त्या फेरीनंतरच प्रवेशासाठी त्यांचा विचार केला जाईल.

**निश्चित केलेला प्रवेश रद्द कसा करायचा?**

एखाद्या विद्यार्थ्याला त्याचा/तिचा निश्चित केलेला प्रवेश रद्द करायचा असेल, तर त्यासाठी संबंधित महाविद्यालयास विनंती करून आपला प्रवेश रद्द करून घेता येईल. असे प्रवेश रद्द केलेले विद्यार्थीही पुढील एका नियमित फेरीसाठी प्रतिबंधित होतील.

## प्रक्रियेतील आकडेवारी

- प्रवेश क्षमता : ८९,३९४
- आतापर्यंतचे प्रवेश : २३,४१५
- रिक्त जागा : ६५,९७९
- महाविद्यालयांची संख्या : ३२६

Pune, Main
03/07/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी

# यंदा नवीन धोरणानुसारच प्रवेश

## पदवी, पदव्युत्तर पदवीच्या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयांमध्ये कार्यशाळा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये यंदा पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे प्रवेश नवीन शैक्षणिक धोरणानुसारच होणार आहेत. त्यासाठी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या अध्यापकांची दोनदिवसीय कार्यशाळा संबंधित महाविद्यालयांमध्ये घेण्याचे निर्देश विद्यापीठ प्रशासनाने दिले आहेत. त्यासाठी विद्यापीठाकडून अनुदान देण्यात येणार आहे.**

विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू होणार आहे. त्यानुसार श्रेयांक आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे.

शासनाच्या निर्देशाप्रमाणे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या संलग्न महाविद्यालयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे वर्ग १ ऑगस्ट २०२३ पासून सुरू करायचे असल्याने त्यापूर्वी संबंधित अभ्यास मंडळांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने पदव्युत्तर पदवी वर्गाच्या प्रथम वर्षाचे अभ्यासक्रम तयार करून संबंधित अधिकार मंडळाच्या मान्यतेने जाहीर करण्यात येणार आहे.

नुकत्याच विद्या परिषद सभेत झालेल्या चर्चेनुसार अभ्यासक्रम तयार करण्यापूर्वी संबंधित अभ्यासक्रम शिकविणा-या अध्यापकांची कार्यशाळा त्यांच्या महाविद्यालयात, विद्यापीठ विभागात घेण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील संबंधित अध्यापकांची कार्यशाळा त्या-त्या अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या व कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील तदर्थ अभ्यास मंडळावर कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले अध्यक्ष ज्या विद्यापीठ विभाग आणि संलग्न महाविद्यालयात कार्यरत आहेत तेथे दोनदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्याची परवानगी दिलेली आहे.

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदव्युत्तर विभाग अभ्यासक्रम राबविणा-या महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी त्यांच्या महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी वर्गास अध्यापन करणा-या संबंधित अध्यापकांना कार्यशाळेस उपस्थित राहण्यासाठी प्राधान्याने कार्यमुक्त करावे, असे विद्यापीठ प्रशासनाने कळविले आहे.

### ...अभ्यासक्रम ठरविण्याची मुभा

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ज्या महाविद्यालयांना स्वायत्त महाविद्यालयांचा दर्जा दिला आहे त्या महाविद्यालयांना त्यांचा वेगळा अभ्यासक्रम तयार करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यासाठी विद्यापीठाकडून वेगळी मान्यता घेण्याची आवश्यकता नसल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, स्वायत्तता दर्जा प्राप्त महाविद्यालयांचे, परिसंस्थांचे अभ्यास मंडळ, विद्यापरिषद, नियामक मंडळाने पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम तयार करताना ते विद्यापीठ अनुदान आयोग आणि महाराष्ट्र राज्याने जाहीर केलेल्या तरतुदी, अध्यापनाचे तास, अभ्यासक्रमाचा आशय-विषय आणि गुणवत्ता इत्यादी तसेच महाराष्ट्र शासनाने पारीत केलेल्या तरतुदी, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सादर केलेले अभ्यासक्रम हे सर्व नियमांची पूर्तता करून तयार केले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. अशा अभ्यासक्रमांना विद्यापीठाकडून वेगळी मान्यता दिली जाणार नाही. स्वायत्तता दर्जा प्राप्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था नव्याने पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करू इच्छित असतील तर त्यांची माहिती विद्यापीठास मुदतीत सादर करावी. पदवी व पदव्युत्तर पदवी प्रस्थापित करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही पूर्ण करून पदवी, पदव्युत्तर पदवी प्रस्थापित झाल्यानंतर संबंधित स्वायत्तता दर्जा प्राप्त महाविद्यालयास, परिसंस्थेस विद्यापीठाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Jul 3, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# सक्तीची परीक्षा रद्द करा

■ डॉ. भालचंद्र मुणगेकर

राज्य सरकारने १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना मूलभूत अधिकार म्हणून मोफत व सक्तीचे शिक्षण देणाऱ्या शिक्षण हक्क कायद्यात बदल करून, पूर्वी कायद्यात तरतूद नसलेली, पाचवी व आठवीची परीक्षा सक्तीची केली आहे. पहिल्या परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या वेळी परीक्षेची संधी दिली जाईल; आणि त्यातही नापास झाल्यावर त्यांना त्याच वर्गात ठेवण्यात येईल. हा निर्णय सरकारने विचारपूर्वक घेतलेला दिसत नाही. वरकरणी तो योग्य वाटत असला, तरी त्यामुळे काही साध्य होणार नाही; उलट त्याचे सामाजिक व शैक्षणिक दूरगामी प्रतिकूल परिणाम होतील.

**■ शिक्षण हक्क कायदा : पार्श्वभूमी**

'शिक्षण हक्काची' तरतूद 'मूलभूत अधिकारांमध्ये' न करता ती घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये करून घटना समितीने मोठी चूक केली. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर पहिल्या साठ वर्षांत प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. त्याचा प्रतिकूल परिणाम सर्व समाजावर झाला असला, तरी जातीव्यवस्था व स्त्री-पुरुष विषमतेमुळे पारंपरिक भारतीय समाजात तथाकथित खालच्या जाती, स्त्रिया, आदिवासी व एकूणच ग्रामीण समाजावर तो अधिक झाला. मुस्लिमांसारखा धार्मिक अल्पसंख्याक समाजही त्याला अपवाद नाही.

प्राथमिक शिक्षणात सर्वांत मोठी समस्या विद्यार्थ्यांच्या गळतीची होती. उदा. २००४-०५ मध्ये पहिली ते आठवीपर्यंत देशाच्या पातळीवर मुलगे, मुली व एकूण गळतीचे प्रमाण अनुक्रमे ५०, ५१ व ५२ टक्के होते; तर अनुसूचित जातीं व जमातींमध्ये ते अनुक्रमे ५५, ६० व ५७ टक्के ; आणि ते ६५, ६७ आणि ६६ टक्के होते. म्हणजे स्वातंत्र्यानंतरच्या ५५ वर्षांत प्राथमिक शिक्षणाची दारूण परिस्थिती होती. तसेच आठवी पास होऊन पुढील वर्गात जाणाऱ्या मुलांमधील गळतीचे प्रमाण साधारण १५ टक्के होते. याचा अर्थ पहिली ते दहावीपर्यंतचे गळतीचे प्रमाण सुमारे ७५ टक्के होते. उरलेल्या २५ टक्के मुलांपैकी फक्त १२ टक्केच मुले (ग्रॉस एन्रोलमेंट रेशो) बारावीनंतर म्हणजे उच्च शिक्षण क्षेत्रात प्रवेश करीत होती. (२००४-०५ चीनमध्ये हे प्रमाण ३० टक्के होते. )

पालकांचे दारिद्र्य, शाळांमध्ये (विशेषतः ग्रामीण भागात) मुलींसाठी वेगळी शौचालये, आरोग्य सुविधा व प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव, शिकविण्याची कंटाळवाणी व कालबाह्य पद्धत, घर ते शाळांमधील अधिक अंतर, आणि प्रामुख्याने स्वतःच शिक्षित नसल्यामुळे पालकांचे मुलांच्या अभ्यासाकडील दुर्लक्ष, ही गळतीची महत्त्वाची कारण होती. अकराव्या योजनेच्या काळात (२००७-१२) 'वेगाने आणि सर्वसमावेशक विकास' हे आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. (माझ्या दृष्टीने आनंदाची बाब म्हणजे योजना आयोगात मी शिक्षण क्षेत्राचा प्रमुख होतो.)

प्राथमिक शिक्षणातीलील हे भयावह गळतीचे प्रमाण जलद कमी करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी प्रथम अकराव्या योजनेत 'सर्व शिक्षा अभियान' ही महत्वाकांक्षी योजना सुरू झाली. वर उल्लेखलेल्या सर्व अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक आर्थिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली. आठवीपर्यंतच्या सर्व मुलांना कोट्यवधी रुपये खर्च करून माध्यान्ह भोजन योजना सुरू केली; आणि त्याचाच पुढील भाग म्हणजे २०१०-११ पासून शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. त्यामुळे गळतीचे प्रमाण अति जलद गतीने कमी करणे शक्य झाले. उदा. २०२१-२२ देशात पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी व नववी ते दहावीमध्ये गळतीचे प्रमाण अनुक्रमे १.५, ३.० व १२.६ टक्के इतके झपाट्याने खाली आले.




**शिक्षण हक्काच्या कायद्याला बगल देऊन राज्य सरकारने पाचवी आठवीच्या परीक्षा घेण्याचा घेतलेला निर्णय विचारपूर्वक घेतलेला दिसत नाही. त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण, दलित वर्गातील मुले व मुलींना बसेल. हे अर्थहीन उपद्व्याप थांबवून शिक्षण व्यवस्थेत सुधारणांसाठी योग्य पावले उचलली पाहिजेत.**

**■ परीक्षा कशासाठी ?**

गळतीचे प्रमाण गळती कमी करण्यामध्ये पाचवी व आठवीची वर्षाच्या शेवटी एकच परीक्षा घेण्याचे धोरण रद्द करण्याचा फार मोठा वाटा आहे. दुसरे म्हणजे, वार्षिक परीक्षा रद्द केली तरी वर्षभर त्या मुलांच्या प्रगतीचा आढावा वर्षभर घेण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. आता परीक्षा का नको ते पाहू. पाचवी व आठवीत वार्षिक परीक्षा घेतल्याने गुणवत्ता सुधारेल, असे मानायला काही आधार नाही. कारण परीक्षा रद्द केल्यामुळे दहावी आणि बारावीमध्ये पास होणाऱ्या मुलांचे प्रमाण कमी झाले नाही, किंवा त्यांना मिळणाऱ्या गुणांवरही प्रतिकूल परिणाम झाला नाही. उलट अकरावी व कॉलेजच्या पहिल्या वर्षी प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या 'कट ऑफ' गुणांमध्ये वाढच होत आहे. पाचवी व आठवीमधील परीक्षेत नापास झाल्यावर मुलांचे मनोबल खचते व त्यांच्या न्यूनगंडाची भावना तयार होते. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला हे मारक असून, ती शिक्षणव्यवस्थेतून बाहेर फेकली जातील. आज महाराष्ट्रात अनुदानित शाळांपैकी सुमारे ७० टक्के शाळा खासगी संस्था चालवतात; परंतु परीक्षा सक्तीची केल्यास त्याही शाळांतील काही गरीब मुलांना गळतीची झळ बसेल. ही गळणारी मुले प्रामुख्याने गरीब, मागासवर्गीय, आदिवासी, गरीब मुस्लिम समाज घटकांपैकी असतील. प्रामुख्याने मुलींमध्ये, त्यातही ग्रामीण भागातील मुलींमध्ये पुन्हा गळतीचे प्रमाण वाढेल. उदा. आठवीमध्ये जेव्हा मुली वयात येतात, तेव्हा त्या नापास झाल्या, तर अगोदरच कुटुंबात दुर्लक्षित असल्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर शिक्षणाला मुकावे लागेल व सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या ते खूप हानीकारक ठरेल. मग परीक्षा रद्द करायच्या असतील, तर दीर्घकालीन उपाय काय?

**■ काही उपाय**

सध्याची वर्षभर सुरू असलेली मूल्यमापन पद्धती अधिक सकस, सघन करण्यात यावी. ज्यांची प्रगती समाधानकारक नसेल, त्यांच्याकडे शिक्षकांनी अधिक लक्ष पुरवावे. अधिकाधिक प्रशिक्षित शिक्षक नेमावेत. मुलांमधील कमतरतांसाठी शाळांचे व्यवस्थापन व शिक्षकांनाही काही प्रमाणात जबाबदार धरण्यात यावे. शिकवण्याची कंटाळवाणी पद्धत बदलून ती अधिक मनोरंजक करण्याचा प्रयत्न करावा. आजच्या व्यवस्थेत मुलांचे अंगभूत गुण, कल, आवड इ. ना काही महत्त्व नाही. त्यांना महत्त्व देणारे अभ्यासक्रम असावेत. किमान आठवीपासून क्रमिक अभ्यासाबरोबर मुलांमध्ये, त्यांच्या आवडीचे, त्यांना गती असलेले एखादे कौशल्य अभ्यासक्रमात असावे. त्याचा परिणाम मुलांमध्ये उद्योजक मानसिकता निर्माण होऊन त्यांचा स्वयं-रोजगाराकडे कल वाढेल.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा, शिक्षणावरील खर्च. १९६६ मध्ये कोठारी आयोगाने शिक्षणावर दर वर्षी राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान सहा टक्के खर्च करावा, अशी शिफारस केली होती. २००४-०५ पर्यंत केंद्र व सर्व राज्य सरकारे मिळून हा खर्च जेमतेम ३.५ टक्के होता. २०१४-२१ पर्यंत म्हणजे गेल्या नऊ वर्षांतील चार वर्षांत २.८ टक्के, दोन वर्षांत तो ३.१ टक्के व उरलेल्या दोन वर्षांत ३.३ व ३.५ टक्के होता. बाकीचे अर्थहीन उपद्व्याप थांबवून आता तरी केंद्र व राज्य सरकारे मिळून तो किमान सहा टक्के करावा, अशी अपेक्षा गैर नाही.

**(लेखक शिक्षणतज्ज्ञ व माजी खासदार आहेत.)**

Maharashtra Times 3.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# प्राध्यापक भरतीसाठी थेट यूजीसीचा हस्तक्षेप

## तातडीने भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील अध्यापक टंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्राध्यापक भरती प्रक्रियेत हस्तक्षेप केला आहे. अध्यापक टंचाईमुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर विपरीत परिणाम होत असल्याचे नमूद करून तातडीने प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

देशात नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून असलेलल्या अध्यापक टंचाईचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. दोन वर्षांपूर्वी यूजीसीने प्राध्यापक भरती प्रक्रिया तातडीने राबवण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र राज्यात त्याबाबत काहीच कार्यवाही झालेली नाही. सद्यःस्थितीत राज्यात जवळपास १२ हजार पदे रिक्त आहेत. त्यातील केवळ २ हजार ८८ पदांवर भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीचे सचिव डॉ. मनीष जोशी यांनी प्राध्यापक भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत देशभरातील राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे अतिरिक्त मुख्य मुख्य सचिव, प्रधान सचिव, राज्यपालांचे सचिव यांना पत्र लिहिले आहे.

### 'यूजीसी'ने पाठविलेल्या पत्रातील मुद्दे...

विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी पूरक वातावरण निर्मिती करण्यासह विषयनिहाय अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. तसेच समाजातील जबाबदार घटक म्हणून विद्यार्थ्यांना घडवणे गरजेचे आहे. त्यासाठी उच्च शिक्षणात गुणवत्तापूर्ण प्राध्यापक हा महत्त्वाचा स्तंभ आहे. मात्र उच्च शिक्षणातील प्राध्यापकांच्या रिक्त पदांमुळे अध्ययन अध्यापन परिसंस्थेवर विपरीत परिणाम होते. त्यामुळे पात्र आणि सक्षम उमदेवारांची तातडीने निवड करून रिक्त जागा भरण्यासाठी शक्य तितक्या लवकर पावले टाकावीत. प्राध्यापक पात्रतेबाबतची नियमावली यूजीसीने प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे राज्य विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील प्राध्यापक भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वैयक्तिकरीत्या लक्ष घालावे, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 04 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72845592

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी

# प्राध्यापक भरती तातडीने करा !

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील अध्यापक भरतीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) या भरती प्रक्रियेत हस्तक्षेप केला आहे. अध्यापकांच्या जागा रिक्त असल्याने अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर विपरित परिणाम होत असल्याचे नमूद करून तातडीने भरती प्रक्रिया राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी थेट यूजीसीचा हस्तक्षेप**

देशात नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून असलेला अध्यापकांचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. दोन वर्षांपूर्वी यूजीसीने प्राध्यापक भरती प्रक्रिया तातडीने राबवण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, राज्यात त्याबाबत काहीच कार्यवाही झालेली नाही. सद्य:स्थितीत राज्यात जवळपास १२ हजार पदे रिक्त आहेत. त्यातील केवळ २ हजार ८८ पदांवर भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीचे सचिव डॉ. मनीष जोशी यांनी प्राध्यापक भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत देशभरातील राज्याचे आणि केंद्र शासित प्रदेशांचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, राज्यपालांचे सचिव यांना पत्र लिहिले आहे.

प्राध्यापकांच्या रिक्त पदांमुळे अध्ययन अध्यापन परिसंस्थेवर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे पात्र आणि सक्षम उमदेवारांची तातडीने निवड करून रिक्त जागा भरण्यासाठी शक्य तितक्या लवकर पावले टाकावीत. प्राध्यापक पात्रतेबाबतची नियमावली यूजीसीने प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे राज्य विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील प्राध्यापक भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वैयक्तिकरीत्या लक्ष घालावे, असे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Jul 4, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

पुढारी



पुनर्निर्माण सोशल फाउंडेशन व विद्याप्रबोधिनीतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवर.

# शिक्षकांची भूमिका महत्त्वाची: चंद्रकांत पाटील

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये 'शिक्षक' या पदाला खूप महत्त्व आहे. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी व्यक्त केले.

पुनर्निर्माण सोशल फाउंडेशन व विद्याप्रबोधिनीतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात पाटील बोलत होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, संचेती रुग्णालयाचे सर्वेसर्वा डॉ. के. एच. संचेती, सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, समाजसेवक गिरीश प्रभुणे, लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर (निवृत्त), एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त), डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्यासह अनेक गुरुतुल्य व्यक्तींचा सन्मान पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

डॉ. माशेलकर व डॉ. मुजुमदार यांनी सन्मान केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अनिरुद्ध एडके यांनी सूत्रसंचालन केले, तर भालचंद्र कुलकर्णी यांनी आभार मानले.

### डॉ. जे. पी. नाईक यांच्या नावाने पुरस्कार

दिवंगत शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक यांच्या नावाने येत्या शैक्षणिक वर्षापासून प्राध्यापकांसाठी स्वतंत्र पुरस्कार सुरू करण्यात येईल, अशी घोषणा चंद्रकांत पाटील यांनी कार्यक्रमात केली. विविध क्षेत्रांत उत्तम विद्यार्थी घडवणाऱ्या प्राध्यापकांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी हा पुरस्कार दिला जाईल, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

My Pune Edition
Jul 4, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# विद्यापीठाकडून पेपर तपासणीत घोळ

### 'सेट' परीक्षेत मिळाले कमी गुण

पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) - 'सेट' परीक्षा पास होऊन प्राध्यापक बनण्याची स्वप्ने पाहणाऱ्या तरुण उमेदवारांना पुणे विद्यापीठाच्या पेपर तपासणीत मोठा फटका बसला आहे. २७ जूनला 'सेट' परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत मुंबईतील काही उमेदवारांना अपात्र ठरविण्यात आले आहे. मात्र, या विद्यार्थ्यांनी परीक्षेत विद्यापीठाकडून कमी गुण दिल्याची शंका व्यक्त केली आहे. 'सेट' परीक्षेसाठी पुनर्तपासणीचा पर्याय नसल्याने विद्यार्थी पेपर तपासणीबाबत तक्रार करण्यासाठी विद्यापीठाशी संपर्क साधत आहेत. मात्र, त्यांना अद्यापि कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

पुणे विद्यापीठाकडून २६ मार्च रोजी घेण्यात आलेली 'सेट' परीक्षा राज्यभरातील विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने दिली. या परीक्षेचा निकाल २७ जून रोजी जाहीर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेची कार्बन कॉपी आणि आन्सर की तपासली असता, काही विद्यार्थ्यांना त्यांचे गुण वाढत असल्याचे लक्षात आले. मुंबईतील एका विद्यार्थिनीला या परीक्षेत अपात्र ठरविण्यात आले आहे. या विद्यार्थिनीने 'मॅथेमॅटिकल सायन्स' हा विषय घेऊन 'सेट' परीक्षा दिली होती. परीक्षेत तब्बल आठ गुण वाढत असल्याचा दावा या विद्यार्थिनीने केला आहे. अजूनही काही विद्यार्थ्यांच्या गुणात वाढ होत असून, यांपैकी काही विद्यार्थ्यांनी निकालानंतर लगेचच पुणे विद्यापीठाशी मेल आणि दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, विद्यापीठाकडून त्यांना अद्यापि प्रतिसाद मिळालेला नाही.

### ५ जुलैला पात्र विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळणार

'सेट' परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना ५ जुलैला प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. त्याआधी विद्यापीठाने अपात्र उमेदवारांच्या निकालाचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी या विद्यार्थ्यांनी केली आहे. 'सेट' परीक्षेत आम्हाला मिळालेल्या गुणांपेक्षा जास्त गुण आहेत. विद्यापीठाने आमच्या तक्रारींची दखल घेतल्यास आम्ही या परीक्षेत पात्र ठरून आमचे वर्ष वाया जाण्यापासून वाचेल, असे या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

Samana 4.7.2023

# गुणवत्ता यादी जाहीर

## अकरावी प्रवेशासाठी दुसऱ्या फेरीत २० हजार ६०७ विद्यार्थ्यांना प्रवेश

मिशन ॲडमिशन

**म. टा. प्रतिनिधी,** पुणे

'पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी राबविण्यात येणाऱ्या अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत २० हजार ६०७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला असून, त्यातील आठ हजार १०९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे.

प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना कागदपत्रांची पडताळणी करून पाच ऑगस्टपर्यंत प्रवेश निश्चित करावा लागणार आहे,' अशी माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक राजेंद्र अहिरे यांनी दिली आहे. दरम्यान, नामवंत कॉलेजांचा अकरावी प्रवेशाचा कटऑफ अजूनही नव्वदीपार असल्याचे दिसून आले. अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी सोमवारी जाहीर करण्यात आली. या प्रवेश प्रक्रियेत पहिल्या फेरीत ३२६ ज्युनिअर कॉलेजांमध्ये एक लाख १४ हजार ३५० जागा प्रवेशांसाठी उपलब्ध होत्या. या फेरीतून एकूण २७ हजार २५५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. दुसऱ्या फेरीसाठी ६५ हजार ९७९ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी ४४ हजार ५४० विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते.



### सर्वाधिक प्रवेश विज्ञान शाखेत

अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक प्रवेश हे विज्ञान शाखेत जाहीर करण्यात आले आहेत. त्यानुसार विज्ञान शाखेच्या प्रवेशासाठी १० हजार ३१३ विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. त्यानंतर वाणिज्य शाखेत सात हजार ७६६ आणि कला शाखेत दोन हजार ४६ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला असल्याचे सांगण्यात आले आहे. नामांकित कॉलेजांमध्ये आर्ट्स (इंग्रजी) आणि विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यासाठी दुसऱ्या फेरीसाठी कटऑफ गुण ९० टक्क्यांच्या पार आहे. त्याचप्रमाणे कॉमर्सच्या प्रवेशाचे कटऑप गुण हे ८५ ते ९० टक्क्यांच्या दरम्यान आहेत.

### ...तर प्रवेश घेणे अनिवार्य

प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांपैकी आठ हजार १०९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे, चार हजार ३१६ विद्यार्थ्यांना दुसऱ्या आणि दोन हजार ५३८ विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंती क्रमाचे कॉलेज प्रवेशासाठी मिळाले. प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना आता कागदपत्रांची पडताळणी करून पाच ऑगस्टपर्यंत प्रवेश निश्चित करता येईल. पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यास, त्यांना पुढील फेरीत सहभागी होता येणार नाही.

### 'प्रोसीड फॉर ॲडमिशन'

प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी वेबसाइटवरील त्यांच्या लॉगइनद्वारे 'प्रोसीड फॉर ॲडमिशन' हा पर्याय निवडून प्रवेशाची पुढील प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. दरम्यान, प्रवेशाची तिसरी फेरी येत्या सहा ऑगस्टपासून सुरू होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेच्या माहितीसाठी अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या वेबसाइटला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Maharashtra Times 4.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना आवडीनुसार २५ टक्के अभ्यासक्रम निवडण्याची संधी

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम आराखडा जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी यंदापासून करण्यात येणार आहे. त्यासाठी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा आराखडा, श्रेयांक रचना करण्यात आली आहे. त्यानुसार अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना सुमारे २५ टक्के अभ्यासक्रम त्यांच्या आवडीनुसार निवडता येणार असून, ४० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करता येणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. सध्या अभियांत्रिकी अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. नव्या धोरणानुसार अभ्यासक्रम चार वर्षांचाच राहणार आहे. विद्यार्थ्यांनी किमान १६० तर, कमाल १८० श्रेयांक मिळवल्यानंतर अभियांत्रिकीची पदवी मिळणार आहे. १६० श्रेयांक पूर्ण केल्यानंतर बहुविद्याशाखीय उपविषय (बीई मल्टिडिसिप्लिनरी मायनर) पदवी मिळणार आहे.

तर १८०-१९४ श्रेयांक पूर्ण केल्यावर ऑनर्स आणि बहुविद्याशाखीय उपविषय (बीई ऑनर्स अँड मल्टिडिसिप्लिनरी मायनर), संशोधन आणि बहुविद्याशाखीय (बीई रीसर्च अँड मल्टिडिसिप्लिनरी मायनर) आणि अभियांत्रिकी मुख्य विषय आणि दुहेरी उपविषय (मेजर इंजिनीअरिंग डिसिप्लिन विथ डबल मायनर्स), तर १८० ते १९४ श्रेयांक मिळवल्यावर बहुविद्याशाखीय पदवी मिळणार आहे. अभियांत्रिकी-तंत्रज्ञानाच्या मुख्य विषयांसह सक्तीच्या बहुविद्याशाखीय उपविषयांसाठी १४ श्रेयांक, सर्वसाधारण पर्यायी अभ्यासक्रमासाठी ८ श्रेयांक, व्यावसायिक आणि कौशल्य शिक्षणासाठी चार श्रेयांक, क्षमतावृद्धी, भारतीय ज्ञान प्रणाली, मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी दहा श्रेयांक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना एका सत्रात किमान २०, तर कमाल २२ श्रेयांक मिळवता येतील. पहिल्या वर्षानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र (४० ते ४४ क्रेडिटस्), तर दोन वर्षांचे शिक्षण (८० ते ८८ क्रेडिटस्) घेतल्यानंतर डिप्लोमा मिळणार आहे. त्याचप्रमाणे पहिल्या तीन वर्षांच्या शिक्षणानंतर (१२० ते १३२ क्रेडिट्स) व्यावसायिक शिक्षण पदवी (बी.व्होक.) किंवा अभियांत्रिकी विज्ञान (बीएस्सी इन इंजिनीअरिंग) पदवी मिळणार आहे. नव्या आराखड्यानुसार पहिल्यांदा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्रे, मानव्यशास्त्रांतील विषयही निवडता येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना बहुविद्याशाखीय शिक्षण मिळेल.

एकूण अभ्यासक्रमातील जवळपास २५ टक्क्यांपर्यंत अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार निवडता येणार आहे.



### अभियांत्रिकी अभ्यासक्रम आराखड्याची वैशिष्ट्ये

- विद्यार्थ्यांना एका शाखेतून इतर शाखेत प्रवेश घेण्याची मुभा.
- सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांना आवडीच्या विषयांचे शिक्षण घेता येईल.
- प्रत्येक वर्षानंतर मल्टिपल एण्ट्री आणि एक्झिटची संधी
- आंतरविद्याशाखीय शिक्षण घेण्यासाठी दुसऱ्या कॉलेज किंवा विद्यापीठात शिक्षणाची संधी.
- काम करतानाच अनुभवाची संधी, कार्यप्रशिक्षण
- प्रत्यक्ष शिक्षणासह ऑनलाइन, मुक्त शिक्षण, मिश्र (ऑनलाइन-प्रत्यक्ष) शिक्षणाची संधी

> “ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये अभियांत्रिकी-तंत्रज्ञान अभ्यासक्रमाच्या आराखड्याची यंदापासून अंमलबजावणी सुरू करण्यात येईल. स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये त्यासाठीची पूर्वतयारी चांगल्या रीतीने झाली आहे. नव्या रचनेनुसार विद्यार्थ्यांना जवळपास २५ टक्के अभ्यासक्रम त्यांच्या आवडीनुसार निवडता येणार आहे. पहिल्यांदाच अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मानव्यशास्त्र, सामाजिकशास्त्रांचे विषय निवडता येतील. त्यामुळे अभियांत्रिकी शिक्षण कोरडे असल्याबाबत जे म्हटले जाते, तशी स्थिती राहणार नाही. मात्र विषय निवडणे आव्हानात्मक असल्याने महाविद्यालये विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात अभ्यासक्रम उपलब्ध करून देतील अशी अपेक्षा आहे.
>
> - डॉ. नितीन करमळकर, अध्यक्ष, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सुकाणू समिती

लोकसत्ता Wed, 05 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72854422

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

सकाळ

# अभियांत्रिकीसाठी श्रेयांक पद्धत जाहीर

## स्वायत्त महाविद्यालयांत यंदापासून होणार अंमलबजावणी

**पुणे, ता. ४ :** एकीकडे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू असताना दुसरीकडे राज्य सरकारने या अभ्यासक्रमाच्या श्रेयांक आराखड्यासाठी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) स्वायत्त संस्थांमधील अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी ही श्रेयांक पद्धती लागू होणार आहे. सर्व अकृषी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमासाठी या धोरणाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२४-२५) करण्यात येणार आहे.

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आता अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रम आराखडा, श्रेयांक आराखडा याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. राज्यात या आराखड्याची अंमलबजावणी दोन टप्प्यांत होईल. पुढील शैक्षणिक वर्षात यानुसार अभ्यासक्रम आणि श्रेयांक पद्धती राबविण्यात येईल. या श्रेयांक आराखड्यानुसार विद्यार्थ्यांना मल्टिपल एंट्री आणि मल्टिपल एक्झिटचा पर्याय असणार आहे. चार वर्षांच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रमात प्रत्येक सत्रात (सेमिस्टर) विद्यार्थ्यांना कमीत कमी २० आणि जास्तीत जास्त २२ श्रेयांक अनिवार्य असणार आहेत.

**असे असतील श्रेयांक**

| वर्ष | कमीत कमी श्रेयांक | जास्तीत जास्त श्रेयांक |
|---|---|---|
| पहिले वर्ष (प्रमाणपत्र अभ्यासक्रम) | ४० | ४४ |
| दुसरे वर्ष (पदविका अभ्यासक्रम) | ८० | ८८ |
| तिसरे वर्ष (पदवी अभ्यासक्रम- बी.व्होक/ बी.एस्सी) | १२० | १३२ |
| चौथे वर्ष (मल्टिडिसिप्लिनरी मायनर) | १६० | १७६ |

(चौथ्या वर्षी मल्टिडिसिप्लिनरी मायनर, स्पेशलायझेशन मायनर, रिसर्च आणि मल्टिडिसिप्लिनरी मायनर अशात वेगवेगळे श्रेयांक असणार आहेत.

**अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची ही आहेत वैशिष्ट्ये**

- एका सत्रात इंटर्नशिप किंवा नोकरीचे प्रशिक्षण अनिवार्य
- मल्टिपल एंट्री आणि मल्टिपल एक्झिटचा असेल पर्याय
- वेगवेगळ्या स्तरावर कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम, इंटर्नशिप शक्य

"तंत्रशिक्षण विभागाने वेळोवेळी कार्यशाळा, चर्चासत्र घेऊन याबाबत पूर्वकल्पना दिली होती. त्याशिवाय २३ जूनला उच्च व तंत्र शिक्षण संचालनाल्यातर्फे स्वायत्त महाविद्यालयांच्या प्रतिनिधींची कार्यशाळादेखील घेतली होती. त्यात याबाबत सांगण्यात आले होते. त्यामुळे स्वायत्त महाविद्यालये याप्रमाणे अंमलबजावणीसाठी तयार आहेत.

**- डॉ. गोविंद कुलकर्णी,** संचालक, पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग

Pune, Main
05/07/2023 Page No. 5

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

**लोकमत**

'अभियांत्रिकी'चा श्रेयांक आराखडा जाहीर

### विद्यार्थ्यांना मल्टिपल एंट्री-एक्झिटचा पर्याय

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम आराखडा, श्रेयांक आराखडा याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या आराखड्याची अंमलबजावणी राज्यात दोन टप्प्यांत होणार असून, पहिल्या टप्प्यात चालू शैक्षणिक वर्षापासून स्वायत्त महाविद्यालयांमध्ये हा निर्णय लागू केला जाणार आहे. श्रेयांक आराखड्यानुसार विद्यार्थ्यांना मल्टिपल एंट्री आणि मल्टिपल एक्झिटचा पर्याय असेल.

राज्यातील २३१ संस्थांनी ही नवी रचना स्वीकारली असून, आता तेथील विद्यार्थ्यांना यंदापासून मल्टिपल एंट्री आणि मल्टिपल एक्झिटचा पर्याय उपलब्ध असणार आहे. याशिवाय राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांनी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमासाठी या धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून करण्यात येणार आहे.

४ वर्षे अभियांत्रिकी अभ्यासक्रमात मुख्य विषयात कमीत कमी ५० टक्के क्रेडिट्स मिळविणे आवश्यक राहणार आहे. याशिवाय विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना मुख्य विषय आणि इतर छोटे अभ्यासक्रम यांची निवड करण्यासाठी अभ्यासक्रमांची यादी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

#### कशासाठी, किती क्रेडिट्स?

- चार वर्षांच्या अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या एका वर्षाच्या प्रमाणपत्रासाठी कमीत कमी ४० व जास्तीत जास्त ४४ श्रेयांक आहेत.
- दोन वर्षांच्या पदविका अभ्यासक्रमासाठी अनुक्रमे ८० व ८८ आणि तीन वर्षांच्या बी. व्होक. किंवा बी. एस्सी. पदवीसाठी १२० व १३२ श्रेयांक मिळवावे लागणार आहेत.
- चार वर्षांच्या पदवीसाठी (मल्टीडिसिप्लिनरी मायनर) किमान १४० ते कमाल १७६ आणि ऑनर्स व मल्टीडिसिप्लिनरी मायनरसाठी १८० व १९४ श्रेयांक आवश्यक असतील. प्रत्येक सत्रासाठी किमान २० आणि कमाल २२ श्रेयांक आवश्यक असणार आहेत.

Pune Main
Page No. 5 Jul 05, 2023
Powered by: erelego.com

**प्रभात**

### शुल्क, कागदपत्रे परत करा अन्यथा कारवाई

प्रभात वृत्तसेवा

#### उच्च शिक्षण संस्थांना विद्यापीठ अनुदान आयोगाचा इशारा

**पुणे, दि. ४ -** प्रवेश रद्द केल्यानंतर विद्यार्थ्यांना शुल्क व मूळ कागदपत्रे परत न केल्यास कारवाई करण्याचा इशारा विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) उच्च शिक्षण संस्थांना दिला आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्याने ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास संपूर्ण शुल्क, तर ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास प्रक्रिया शुल्क म्हणून कमाल एक हजार रुपये वजा करून अन्य संपूर्ण शुल्काचा परतावा उच्च शिक्षण संस्थेने करणे बंधनकारक असल्याचे 'युजीसी'ने स्पष्ट केले आहे.

युजीसीकडे विद्यार्थी-पालकांकडून शुल्क परताव्यासंदर्भात तक्रारी केल्या जातात. या अनुषंगाने युजीसीच्या २७ जून रोजी झालेल्या बैठकीत चर्चा करून शुल्क परताव्याचे धोरण निश्चित करण्यात आले. युजीसीच्या परिपत्रकानुसार प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या पंधरा दिवस किंवा त्यापूर्वी आधी प्रवेश रद्द केल्यास शंभर टक्के शुल्क परत करावे लागेल. पंधरा दिवसांपेक्षा कमी कालावधी असताना प्रवेश रद्द केल्यास ९० टक्के शुल्क परत करण्यात येईल. प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर पंधरा दिवसांनी प्रवेश रद्द केल्यास ८० टक्के, प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर पंधरा ते तीस दिवसांत प्रवेश रद्द केल्यास ५० टक्के शुल्क परतावा केला जाईल. तर प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर तीस दिवसांनी प्रवेश रद्द केल्यास शुल्क परतावा केला जाणार नाही, असे युजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केली आहे.

PuneCity, 05 July 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# 'कॉलेजांनी पूर्ण शुल्क परत करावे'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

> यूजीसीचा 'फी रीफंड पॉलिसी'चा निर्णय सरकारी विद्यापीठांसोबतच खासगी, अभिमत विद्यापीठे, उच्च शैक्षणिक संस्थांना लागू राहणार आहे. या निर्णयाची अंमलबाजवणी न करणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या विरोधात विद्यार्थ्यांना तक्रार करायची असल्यास, त्यांनी यूजीसीच्या ई-समाधान पोर्टलवर तक्रार करावी.
>
> – प्रा. मनीष जोशी, सचिव, यूजीसी

विद्यापीठे आणि महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास, त्यांना पूर्ण शुल्काची रक्कम परत द्यावी लागेल. ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास प्रक्रिया शुल्क म्हणून कमाल एक हजार रुपयांपर्यंतची रक्कम वजा करून अन्य संपूर्ण शुल्क विद्यार्थ्याला परत करावे लागणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करणे खासगी, अभिमत, सरकारी विद्यापीठांना करणे अनिवार्य आहे.

यूजीसीकडे विद्यार्थी-पालकांकडून शुल्क परताव्यासंदर्भात तक्रारी केल्या जातात. या अनुषंगाने यूजीसीच्या २७ जून रोजी झालेल्या बैठकीत चर्चा करून शुल्क परताव्याचे धोरण निश्चित करण्यात आले. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठीचे शुल्क परतावा (फी रीफंड पॉलिसी) धोरण जाहीर केले आहे. यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक यूजीसीच्या वेबसाइटवर प्रसिद्ध केले.

यूजीसीच्या परिपत्रकानुसार प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या पंधरा दिवस किंवा त्यापूर्वी आधी प्रवेश रद्द केल्यास शंभर टक्के शुल्क परत करावे लागेल. प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर १५ दिवसांनी प्रवेश रद्द केल्यास ८० टक्के, तर प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर ३० दिवसांत प्रवेश रद्द केल्यास निम्मे म्हणजे ५० टक्के शुल्क परतावा केला जाणार आहे. प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर ३० दिवसांनी प्रवेश रद्द केल्यास शुल्क परतावा केला जाणार नाही, असे प्रा. जोशी यांनी स्पष्ट केले.

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

Maharashtra Times 5.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# प्रवेश ३० सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास संपूर्ण शुल्क परतावा

## यूजीसीकडून धोरण जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शैक्षणिक वर्ष २०२३-२४साठीचे शुल्क परतावा धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्याने ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास संपूर्ण शुल्क, तर ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास प्रक्रिया शुल्क म्हणून कमाल एक हजार रुपये वजा करून अन्य संपूर्ण शुल्काचा परतावा उच्च शिक्षण संस्थेने करणे बंधनकारक आहे. उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना शुल्क आणि मूळ कागदपत्रे परत न केल्यास कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. यूजीसीकडे विद्यार्थी-पालकांकडून शुल्क परताव्यासंदर्भात तक्रारी केल्या जातात. या अनुषंगाने यूजीसीच्या २७ जून रोजी झालेल्या बैठकीत चर्चा करून शुल्क परताव्याचे धोरण निश्चित करण्यात आले. यूजीसीच्या परिपत्रकानुसार प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या पंधरा दिवस किंवा त्यापूर्वी आधी प्रवेश रद्द केल्यास शंभर टक्के शुल्क परत करावे लागेल. पंधरा दिवसांपेक्षा कमी कालावधी असताना प्रवेश रद्द केल्यास ९० टक्के शुल्क परत करण्यात येईल.

प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर पंधरा दिवसांनी प्रवेश रद्द केल्यास ८० टक्के, प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर पंधरा ते तीस दिवसांत प्रवेश रद्द केल्यास ५० टक्के शुल्क परतावा केला जाईल. तर प्रवेश घेण्याच्या अंतिम दिनांकानंतर तीस दिवसांनी प्रवेश रद्द केल्यास शुल्क परतावा केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

लोकसत्ता Thu, 06 July 2023 https://epaper.loksatta.com/c

# सहायक प्राध्यापक नियुक्तीसाठी पीएच.डी.ची अट संपुष्टात

## यूजीसीकडून सुधारित नियम जारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. अनिवार्यतेची अट आता संपुष्टात आली आहे. या पदासाठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), राज्य पात्रता परीक्षा (सेट) उत्तीर्ण एवढीच किमान पात्रता निश्चित करण्यात आली असून, नवे नियम १ जुलै २०२३ पासून लागू असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) स्पष्ट केले आहे.

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक पदासाठी नेट, सेटसह पीएच.डी. अनिवार्य होती. मात्र यूजीसीने विद्यापीठे आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भातील २०१८ च्या नियमावलीमध्ये सुधारणा करून किमान पात्रतेच्या अटी शिथिल केल्या आहेत. तसे राजपत्र यूजीसीकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे.

> यूजीसीचा निर्णय स्वागतार्ह आहे. यामुळे सर्व नेट-सेटधारकांना महाविद्यालये, विद्यापीठांतील रिक्त जागांवर संधी मिळू शकेल. मात्र विद्यापीठांतील पदव्युत्तर विभाग ही संशोधन केंद्रे असतात. त्या ठिकाणी पीएच.डी. नसलेले प्राध्यापक नेमणे कितपत योग्य आहे?
>
> **- प्रा. सुरेश देवढे-पाटील,** नेट-सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समिती

नव्या नियमांनुसार सहायक प्राध्यापकपदासाठी पीएच.डी. ऐच्छिक करण्यात आली आहे. त्यामुळे पीएच.डी. नसलेल्या नेट-सेटधारक इच्छुकांना या निर्णयामुळे मोठा दिलासा दिला आहे. यूजीसीने नियमांमध्ये शिथिलता आणल्यानंतर आता राज्य सरकार रिक्त जागा लवकरात लवकर भराव्या, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

लोकसत्ता Thu, 06 July 2023 https://epaper.loksatta.com/c/72

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# सहायक प्राध्यापक नियुक्तीसाठी पीएच.डी.ची अट संपुष्टात

## यूजीसीकडून सुधारित नियम जारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

> यूजीसीचा निर्णय स्वागतार्ह आहे. यामुळे सर्व नेट-सेटधारकांना महाविद्यालये, विद्यापीठांतील रिक्त जागांवर संधी मिळू शकेल. मात्र विद्यापीठांतील पदव्युत्तर विभाग ही संशोधन केंद्रे असतात. त्या ठिकाणी पीएच.डी. नसलेले प्राध्यापक नेमणे कितपत योग्य आहे?
>
> - प्रा. सुरेश देवढे-पाटील, नेट-सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समिती

**पुणे :** सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. अनिवार्यतेची अट आता संपुष्टात आली आहे. या पदासाठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), राज्य पात्रता परीक्षा (सेट) उत्तीर्ण एवढीच किमान पात्रता निश्चित करण्यात आली असून, नवे नियम १ जुलै २०२३ पासून लागू असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) स्पष्ट केले आहे.

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक पदासाठी नेट, सेटसह पीएच.डी. अनिवार्य होती. मात्र यूजीसीने विद्यापीठे आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भातील २०१८ च्या नियमावलीमध्ये सुधारणा करून किमान पात्रतेच्या अटी शिथिल केल्या आहेत. तसे राजपत्र यूजीसीकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. नव्या नियमांनुसार सहायक प्राध्यापकपदासाठी पीएच.डी. ऐच्छिक करण्यात आली आहे. त्यामुळे पीएच.डी. नसलेल्या नेट-सेटधारक इच्छुकांना या निर्णयामुळे मोठा दिलासा दिला आहे. यूजीसीने नियमांमध्ये शिथिलता आणल्यानंतर आता राज्य सरकार रिक्त जागा लवकरात लवकर भराव्या, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

लोकसत्ता Thu, 06 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72862556

**प्रभात**

# पीएच.डी. अनिवार्यचा निर्णय 'यूजीसी'कडून रद्द

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ५ -** विद्यापीठ अनुदान आयागाने (यूजीसी) सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी पीएच. डी. अनिवार्य करण्याचा निर्णय मागे घेतला आहे. नेट, सेट किंवा एसएलईटी यांसारख्या परीक्षा या पदावर थेट भरतीसाठी किमान निकष असतील, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या नियमांत महत्वपूर्ण बदल केले आहेत. सहाय्यक प्राध्यापक म्हणून नियुक्तीसाठी पीएच. डी. ही आता पर्यायी पात्रता असणार आहे. नवीन नियम

### सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीबाबत स्पष्टीकरण

१ जुलै २०२३ पासून लागू करण्यात आले आहेत. याबाबत यूजीसीचे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी अधिसूचना जारी केली आहे. यूजीसीकडून सहाय्यक प्राध्यापक पदासाठी केवळ किमान पात्रता सेट, नेट केली असून, इतर नियमांत बदल केलेला नाही.

यूजीसीने २०१८ मध्ये पीएच. डी.ची अट विद्यापीठांमध्ये सहाय्यक प्राध्यापक पदासाठी बंधनकारक केली होती. त्यामुळे सेट, नेट उमेदवारांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. विभागांमध्ये सेट, नेटसह पीएच.डी.ही आवश्यक होती. सेट, नेट उत्तीर्ण उमेदवारांना संधी मिळत नव्हती. त्यामुळे यूजीसीने केलेल्या नवीन सुधारणेमुळे या उमेदवारांना संधी मिळणार आहे.

उमेदवारांना पीएच. डी. पूर्ण करण्यासाठी तीन वर्षांची मुदत देण्यात आली होती. सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांना २०२१-२२ शैक्षणिक सत्रापासून भरतीचे निकष लागू करण्यास सांगितले. मात्र सन २०२१ मध्ये यूजीसीने पीएच. डी.च्या अर्जाची तारीख किमान म्हणून वाढवली. जुलै २०२१ ते जुलै २०२३ या कालावधीत विद्यापीठांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांच्या भरतीसाठी पात्रता निकष ठरवण्यात आले होते.

PuneCity, 06 July 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

लोकमत

### सहायक प्राध्यापकपदासाठी पीएच. डी.ची अट रद्द

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशातील उच्चशिक्षण संस्थांमध्ये सहायक प्राध्यापकांची नियुक्ती करण्यासाठी नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. सहायक प्राध्यापक पदासाठी आता किमान पात्रता ही नेट, सेट करण्यात आली असून, पीएच.डी ऐच्छिक करण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उच्चशिक्षण संस्थांमध्ये सहायक प्राध्यापक पदासाठी सेट, नेट परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांनाही संधी मिळणार आहे. या संदर्भात यूजीसीचे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी ट्विट करून माहिती दिली आहे.

यूजीसीकडून सहायक प्राध्यापक पदांवर थेट भरतीसाठी किमान पात्रता सेट, नेट केली असून, इतर कोणत्याही नियमांत बदल केलेला नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने या संदर्भात ३० जून रोजी अधिसूचना जारी केली आहे. सहायक प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या नियमातील नवीन बदल १ जुलैपासून लागू करण्यात आले आहेत.

यूजीसीने यापूर्वी २०१८ मध्ये सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी पदवी बंधनकारक केली होती.

Pune Main
Page No. 2 Jul 06, 2023
Powered by: erelego.com

पुढारी

### सहायक प्राध्यापक नियुक्तीसाठी पीएच.डी.ची अट शिथिल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सहायक प्राध्यापकासाठी पीएच.डी. अनिवार्यतेची अट आता शिथिल आली आहे. या पदासाठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), राज्य पात्रता परीक्षा (सेट) उत्तीर्ण एवढीच किमान पात्रता निश्चित करण्यात आली असून, नवे नियम १ जुलै २०२३पासून लागू असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक पदासाठी नेट, सेटसह पीएच.डी. पदवी अनिवार्य होती. मात्र, यूजीसीने विद्यापीठे आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भातील २०१८च्या नियमावलीमध्ये सुधारणा करून किमान पात्रतेच्या अटी शिथिल केल्या आहेत. त्याबाबतचे राजपत्र यूजीसीकडून प्रसिद्ध करण्यात आले.

**यूजीसीकडून सुधारित नियमांचे राजपत्र प्रसिद्ध**

नव्या नियमांनुसार सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. आता ऐच्छिक करण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सहायक प्राध्यापक पदासाठी इच्छुक असलेल्या, पीएच.डी. नसलेल्या नेट-सेटधारक उमेदवारांना दिलासा मिळणार असून, महाविद्यालये, तसेच विद्यापीठांना आवश्यक प्राध्यापक मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

Pune Edition
Jul 6, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

सकाळ

# पीएच. डी. नको; हवी सेट-नेट!

## सहायक प्राध्यापक पदासाठी नवी नियमावली

पुणे, ता. ५ : विद्यापीठांसह महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. बंधनकारक करण्यात आली होती. आता या निर्णयात बदल करत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) पीएच.डी.चे बंधन काढून टाकण्यात आले आहे. त्यामुळे राज्य पात्रता परीक्षा (सेट) किंवा राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) उत्तीर्ण उमेदवारांना विद्यापीठांसह महाविद्यालयांमध्ये संधी मिळणार आहे.

### काय आहेत बदल?

- 'यूजीसी'ने सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहायक प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या नियमांत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत.
- किमान पात्रता ही 'सेट' आणि 'नेट' करण्यात आली आहे.
- 'यूजीसी'चे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी यासंदर्भात ट्विट करून माहिती दिली आहे.
- 'यूजीसी'कडून सहायक प्राध्यापक पदासाठी केवळ किमान पात्रता सेट, नेट केली असून इतर कोणत्याही नियमांत बदल केलेला नाही.
- या संदर्भात ३० जून रोजी अधिसूचना जारी करण्यात आली आहे.
- सहायक प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या नियमातील नवीन बदल एक जुलैपासून लागू करण्यात आला आहे.

"देशभरामधील सहायक प्राध्यापकांच्या नेमणुकीसाठी पीएच.डी.ची अट सयुक्तिक नव्हती. विशेष करून ग्रामीण भागातील मुलांना संशोधनासाठी योग्य संधी मिळत नाही. पर्यायाने त्यांची संधी नाकारली जाण्याची शक्यता आहे. सहायक प्राध्यापक पदासाठी विषयज्ञान तपासले जाते. त्यामुळे हा निर्णय योग्य आहे. पदोन्नतीसाठी मात्र पीएच.डी. आवश्यक आहे.

- डॉ. एन. एस. उमराणी, माजी प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### पूर्वी काय होता नियम?

- विद्यापीठांसह महाविद्यालयांमध्येही सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. पदवी बंधनकारक होती.
- 'यूजीसी'ने २०१८ मध्ये पीएच.डी.ची अट विद्यापीठांमध्ये प्राध्यापक पदासाठी बंधनकारक केली होती.
- त्यामुळे सेट, नेट उमेदवारांमध्ये नाराजी निर्माण झाली होती.
- विभागांमध्ये सेट, नेटसह पीएच.डी.ही आवश्यक होती.
- सेट, नेट उत्तीर्ण उमेदवारांना संधी मिळत नव्हती.
- त्यामुळे यूजीसीने केलेल्या नवीन सुधारणेमुळे या उमेदवारांना संधी मिळणार आहे.



Pune, Main
06/07/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# पीएचडीची अट शिथिल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सहायक प्राध्यापक होण्यासाठी पीएचडीच्या अनिवार्यतेची अट शिथिल केली असून, प्राध्यापक होण्यासाठी आता राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), राज्य पात्रता परीक्षा (सेट) उत्तीर्ण एवढीच किमान पात्रता निश्चित करण्यात आली. त्यामुळे देशभरातील अनेक पात्रताधारक उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. या नव्या निर्णयाची अंमलबजावणी १ जुलैपासून करण्याच्या सूचनाही विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी)दिल्या आहेत.

देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक पदासाठी नेट, सेट परीक्षा उत्तीर्ण असण्यासह पीएचडी पदवी अनिवार्य होती. मात्र, यूजीसीने विद्यापीठे आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भातील २०१८च्या नियमावलीमध्ये सुधारणा करून किमान पात्रतेच्या अटी शिथिल केल्या आहेत. त्याबाबतचे राजपत्र यूजीसीकडून नुकतेच प्रसिद्ध करण्यात आले. नव्या नियमांनुसार सहायक प्राध्यापक पदासाठी पीएचडी करणे आता ऐच्छिक करण्यात आल्याचेही स्पष्ट केले आहे. या निर्णयानंतर सर्व उमेदवारांचे लक्ष आता प्राध्यापक भरतीकडे लागले आहे. भरती प्रक्रिया तातडीने सुरू झाल्यास, अनेक पात्र उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे.

**सहायक प्राध्यापक पदासाठी निर्णय**

### प्रवेशासाठी अडचणी

सहायक प्राध्यापक पदासाठी नेट, सेटसह पीएचडी पदवी अनिवार्य होती. अनेक उमेदवार हे सेट किंवा नेट परीक्षा उत्तीर्ण असतात. मात्र, त्यांच्याकडे पीएचडी पदवी नसल्यामुळे, ते सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरत नाहीत. त्यातच सरकारी विद्यापीठांमध्ये पीएचडी अभ्यासक्रमाच्या जागा फारच कमी असतात. त्यामुळे प्रत्येकाला तेथे प्रवेश मिळत नाही.

> यूजीसी सहायक प्राध्यापक पदासाठीची पात्रता सातत्याने बदलत आहे. त्यामुळे उमेदवारांच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे. अनेक उमदेवारांनी पीएचडीला प्रवेश घेतला आहे. अशावेळी या उमेदवारांनी भविष्यात काय करावे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.
>
> - डॉ. संदीप पाथ्रीकर, अध्यक्ष, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटना

Maharashtra Times 6.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# सहाय्यक प्राध्यापकपदासाठी पीएच.डी.ची आवश्यकता नाही

## यूजीसीचे नवे नियम

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

पुणे : विद्यापीठांसह महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापकपदासाठी पीएच.डी. बंधनकारक करण्यात आली होती. या निर्णयात बदल करत विद्यापीठ अनुदान मंडळाने (युजीसी) पीएच.डी.चे बंधन काढून टाकण्यात आले आहे. त्यामुळे राज्य पात्रता परीक्षा (सेट) आणि राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) उत्तीर्ण उमेदवारांना विद्यापीठांसह महाविद्यालयांमध्ये संधी मिळणार आहे.

यूजीसीने सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या नियमांत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. ज्यामध्ये किमान पात्रता ही सेट आणि नेट ही करण्यात आले आहे. यूजीसीचे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी यासंदर्भात ट्विट करून माहिती दिली आहे.

यूजीसीकडून सहायक प्राध्यापक पदासाठी केवळ किमान पात्रता सेट, नेट केली असून, इतर कोणत्याही नियमांत बदल केलेला नाही. या संदर्भात ३० जून रोजी अधिसूचना जारी करण्यात आली आहे. सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या नियमातील नवीन बदल १ जुलै पासून लागू करण्यात आला आहे. ' यापूर्वी विद्यापीठांसह महाविद्यालयांमध्येही सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. पदवी बंधनकारक होती. नवीन बदलानुसार ही अट काढून टाकण्यात आली आहे.

यूजीसीने २०१८ मध्ये पीएच.डी.ची अट विद्यापीठांमध्ये प्राध्यापक पदासाठी बंधनकारक केली होती. त्यामुळे सेट, नेट उमेदवारांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. विभागांमध्ये सेट, नेटसह पीएच.डी.ही आवश्यक होती. सेट, नेट उत्तीर्ण उमेदवारांना संधी मिळत नव्हती. नव्या नियमांनुसार सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. आता ऐच्छिक करण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यामुळे सहायक प्राध्यापक पदासाठी इच्छुक असलेल्या, पीएच.डी. नसलेल्या नेट-सेटधारक उमेदवारांना दिलासा मिळाला आहे.

Kesari 6.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

लोकमत

# ४७१ पैकी १६१ महाविद्यालये बंद होणार ?

## 'नॅक' मूल्यांकनाकडे फिरवली पाठ : विद्यापीठ प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष

सुपर एक्स्क्लुजिव

राम शिनगारे

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न ४७१ महाविद्यालयांपैकी १६१ महाविद्यालयांची संलग्नता संपुष्टात येणार आहे. राज्य शासनाने अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांना 'नॅक' मूल्यांकन करणे बंधनकारक केले होते. त्यासाठी ३१ मार्चपर्यंत 'नॅक'कडे किमान नोंदणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तोपर्यंत नोंदणी न करणाऱ्या महाविद्यालयांची संलग्नता न थांबविण्याचे आदेश उच्च शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यानुसार १६१ महाविद्यालयांनी 'नॅक'ची कोणतीही प्रक्रिया सुरू केलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या महाविद्यालयांवर केव्हा हातोडा चालविण्यात येणार, त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### महाविद्यालयांची 'नॅक' संदर्भातील सद्य:स्थिती

| 'नॅक'चे विविध टप्पे | संख्या |
|---|---|
| 'नॅक' मूल्यांकन झालेले | ७१ |
| मूल्यांकन प्रक्रिया सुरू | १५९ |
| नॅकमधून सूट मिळालेले | ८० |
| कोणतीही प्रक्रिया न करणारे | १६१ |
| एकूण महाविद्यालये | ४७१ |

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन करण्यासाठी मागील दोन वर्षांपासून प्रयत्न केले आहेत. त्यासाठी प्राचार्यांच्या बैठकाही घेण्यात आल्या. काही महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन केले, काहींनी केलेले नाही. ३० जूनपर्यंतची वस्तुस्थिती शासनाला कळविलेली आहे. शासनाच्या आदेशानुसार महाविद्यालयांवर पुढील कारवाई करण्यात येईल.

**- डॉ. प्रमोद येवले,** कुलगुरू

राज्याच्या उच्चशिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी मागील महिन्यात एक पत्र काढून संलग्न महाविद्यालयांतील 'नॅक'ची प्रक्रिया सुरू न करणाऱ्या महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्याची कारवाई करण्याविषयी विद्यापीठाच्या कुलसचिवांना पत्र पाठवले. तसेच महाविद्यालयांवर केलेल्या कारवाईचा अहवालही उच्च शिक्षण विभागाला सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने 'नॅक' मूल्यांकन केलेले, मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू केलेल्या आणि न केलेल्या महाविद्यालयांची यादी तयार केली आहे. त्यात कोणतीही प्रक्रिया न करणाऱ्या महाविद्यालयांची संख्या १६१ आहे.

**काय होती 'नॅक'ची अट ?**

उच्चशिक्षण विभागाने 'नॅक' मूल्यांकनासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार केला. ३१ मार्च २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकनासाठी किमान नोंदणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर अनेक महाविद्यालयांनी नॅकची नोंदणीही केली नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाने २०२३-२४ या वर्षातील प्रवेश सुरू होईपर्यंत ज्या महाविद्यालयांनी नोंदणी केलेली नसेल, त्यांच्यावर संलग्नता रद्द करण्याची कारवाई करण्याचे पत्र २३ मे रोजी विद्यापीठांना पाठवले. विद्यापीठ प्रशासनाने १९ जून रोजी महाविद्यालयांवर कारवाई करण्यासंदर्भात परिपत्रक काढले आहे.

Pune Main
Page No. 3 Jul 06, 2023
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

# PhD no more must for recruitment as assistant professor

TIMES NEWS NETWORK

New Delhi: The University Grants Commission has reversed its decision to make obtaining PhD mandatory for hiring assistant professors, saying exams like NET and SET/SLET will be the minimum criteria for direct recruitment to the post. UGC notified the amended rules which came into effect from July 1.

"PhD qualification for appointment as an assistant professor would continue to be optional. The National Eligibility Test (NET), State Eligibility Test (SET) and State Level Eligibility Test (SLET) will be the minimum criteria for direct recruitment to the post of assistant professor for all higher education institutions," UGC chairperson M Jagadesh Kumar tweeted.

The Commission had set the PhD criteria in 2018 for recruitment for entry-level teaching post in universities and colleges.

PTI



NET and SET/SLET minimum criteria for recruitment

It gave a three-year window to candidates to complete their PhD and asked all universities and colleges to start applying the criteria for recruitment from the 2021-22 academic session.

After prolonged closure of educational institutions during Covid when research work of PhD scholars got disrupted, UGC extended the date of applicability of PhD as minimum qualification for recruitmentfrom July 2021 to July 2023. Education minister Dharmendra Pradhan had said in 2021 that making PhD degree mandatory is "not favourable".

Times of India 6.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

{ ENTRY-LEVEL POSITIONS } NO DOCTORATE NEEDED

# UGC drops rule making PhD mandatory to qualify for assistant prof jobs in universities

Fareeha Iftikhar

fareeha.iftikhar@htdigital.in

**NEW DELHI:** The University Grants Commission (UGC) has reversed its decision of making a PhD mandatory for assistant professors in higher education institutions; the National Eligibility Test (NET), State Eligibility Test (SET) and State Level Eligibility Test (SLET) will continue to remain the basis for recruitments to the entry-level positions.

The commission , in 2018 set the criteria for recruitment for entry-level posts at universities and colleges. At the time, it asked all universities to start applying the PhD criterion for recruitment from July 2021. The move was criticized by faculty from different universities who said that many candidates could not complete their PhDs amid the Covid-19 pandemic and appealed to the central government to relax the eligibility. In October 2021, the commission announced that it was deferring implementation of the criterion for another two years, i.e July 2023. But it has now been scrapped altogether.

IT HAD, IN 2018 SET THE CRITERIA FOR ENTRY-LEVEL RECRUITMENT AT UNIVERSITIES AND COLLEGES

According to a notification dated June 30 and released in public domain on Wednesday, the commission has amended the UGC (Minimum Qualifications for Appointment of Teachers and other Academic Staff in Universities and Colleges and other Measures for the Maintenance of Standards in Higher Education) Regulations, 2018, and deleted the PhD requirement clause.

This has been substituted with another clause stating, that "NET/SET/SLET shall be the minimum criteria for the direct recruitment to the post

continued on →9

Hindustan Times 6.7.2023

**UGC DROPS RULE...**

of Assistant Professor for all Higher Education Institutions."

UGC chairperson M Jagadesh Kumar said that the move will provide relief to aspiring candidates who wish to join academics.

"If they clear NET/SET/SLET, they will become eligible to apply for the post of Assistant Professor in all higher education institutions 9HEIs).

However, depending on the number of applications in higher education institutions received in a given discipline, the shortlisting criteria can be fixed above the minimum standards set by University Grants Commission (UGC) to invite a manageable number of candidates for the interview."

Kumar clarified that a PhD will still be needed for promotion to associate professor level.

Kumar clarified that a PhD will still be needed for promotion to associate professor level.

"Therefore, even if someone joins as an assistant professor without a PhD, the faculty member, while teaching in the HEI, has to do good quality research and obtain a PhD to be eligible for promotion to the next level leading to improved research outcomes in HEIs,"

Abha Dev Habib, an associate professor at Delhi University's Miranda House College welcomed the amendment. "Making PhD a mandatory requirement for entry level recruitments would have put candidates coming from marginalized sections in a disadvantaged position.

It would have also increased the entry age of the profession. Besides,universities would not have been able to fill the vacancies."

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# संशोधनातून रोजगार

## 'एनईपी'नुसार विद्यापीठांत 'आर अँड डी'ची स्थापना आवश्यक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) आगामी काळात राज्यातील विद्यापीठे आणि कॉलेजांमध्ये संशोधन आणि विकास केंद्रे (आर अँड डी सेल) स्थापन करावी लागणार आहे. त्यासोबतच 'इंडस्ट्री-अॅकॅडमी' सेलची निर्मिती करावी लागणार आहे.

विद्यापीठे आणि कॉलेजांमध्ये संशोधन; तसेच इंडस्ट्री-अॅकॅडमीची एकत्रित इकोसिस्टीम तयार करण्याच्या उद्देशाने ही पावले उचलण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनासोबतच रोजगाराच्याही नावीन्यपूर्ण संधी उपलब्ध होणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी राज्यात सुरू झाली असून, या अंतर्गत संशोधनाला आणि रोजगाराला महत्त्व देण्यात आले आहे. यालाच अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) कॉलेजांमध्ये संशोधन आणि विकास केंद्रे स्थापन करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली होती. त्याअंतर्गत आता शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्याच्या 'सुकाणू समिती'ने या तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यापीठे आणि कॉलेजांना येत्या शैक्षणिक वर्षापासून केंद्र स्थापन करण्यासाठी पावले उचलावी लागणार आहेत. या केंद्राचे नेतृत्व कुलगुरू किंवा प्राचार्यांनी करायचे आहे. त्यासोबतच संपूर्ण प्रशासकीय आणि शैक्षणिक जबाबदारी संचालकांची राहणार असून, त्यांची स्वतंत्र नेमणूक करावी लागणार आहे. त्यानंतर पाच विविध प्रकारच्या समित्या स्थापन करायच्या आहेत. या समित्या प्रामुख्याने अर्थ व पायाभूत सुविधा, संशोधन प्रकल्प आणि धोरणाचा विकास, इंडस्ट्री आणि समूहांसोबत काम, पेटंट आणि विधी अशा पाच विविध घटकांवर तयार करायच्या आहेत. त्याचप्रमाणे प्राध्यापक आणि तज्ज्ञांची नेमणूक करायची आहे. या केंद्राला केंद्र सरकारच्या 'इनोव्हेशन सेल'च्या संपर्कात राहून काम करावे लागणार आहे, असे सांगण्यात आले आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधन केंद्र आणि इंडस्ट्रीला काम करण्यासाठी सुविधा उपलब्ध होण्यासाठी रीसर्च इन्फर्मेशन मॅनेजमेंट सिस्टीमची (आरआयएमएस) निर्मिती करावी लागणार आहे.



" 'यूजीसी'च्या निर्णयाप्रमाणे यंदापासून विद्यापीठांत संशोधन आणि विकास केंद्रांची स्थापना होणार आहे. त्यासाठीची आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे 'यूजीसी'कडून जाहीर करण्यात झाली आहेत. याबाबतची सविस्तर माहिती 'यूजीसी'च्या व्यासपीठाहून सांगण्यात येईल.

– डॉ. नितीन करमळकर, अध्यक्ष, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी, सुकाणू समिती

### विकास केंद्रे कशासाठी?

- विद्यापीठे-कॉलेजांमधील संशोधनासाठी इकोसिस्टीमची निर्मिती करणे.
- संशोधनाद्वारे सरकार, उद्योग, खासगी क्षेत्र यांच्याशी स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंध निर्माण करणे.
- शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांसोबतच निधीचा वापर नावीन्यपूर्ण संशोधनासाठी करणे.
- समाजाभिमुख संशोधन प्रकल्प किंवा स्टार्टअपची निर्मिती करणे.

Maharashtra Times 6.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

पुढारी

# शिक्षणसंस्था होणार संशोधन केंद्रे

## विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मार्गदर्शक तत्त्वे

पुढारी ANCHOR

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) आगामी काळात राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये संशोधन आणि विकास केंद्रे (आर अँड डी सेल) स्थापन करावी लागणार आहे. त्यासोबतच 'इंडस्ट्री-अॅकॅडेमी' सेलची निर्मिती करावी लागणार आहे. विद्यापीठे आणि कॉलेजांमध्ये संशोधन; तसेच इंडस्ट्री-अॅकॅडेमीची एकत्रित इको सिस्टीम तयार करण्याच्या उद्देशाने ही पावले उचलण्यात आली आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी राज्यात सुरू झाली असून, या अंतर्गत संशोधनाला आणि रोजगाराला महत्त्व देण्यात आले आहे. यालाच अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयांमध्ये संशोधन आणि विकास केंद्रे स्थापन करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. त्याअंतर्गत आता शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन केलेल्या राज्याच्या सुकाणू समितीने या तत्त्वाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यापीठे आणि महाविद्यालयांना येत्या शैक्षणिक वर्षापासून संबंधित केंद्र स्थापन करावी लागणार आहेत.

या केंद्राचे नेतृत्व हे कुलगुरू किंवा प्राचार्यांनी करायचे आहे. त्यासोबतच संपूर्ण प्रशासकीय आणि शैक्षणिक जबाबदारीसाठी संचालकांची नेमणूक करावी लागणार आहे. त्यानंतर पाच विविध प्रकारच्या समित्या स्थापन करायच्या आहेत. या समित्या प्रामुख्याने अर्थ व पायाभूत सुविधा, संसोधन प्रकल्प आणि धोरणाचा विकास, इंडस्ट्री आणि समुहांसोबत काम, पेटंट आणि विधी अशा पाच विविध घटकांवर तयार करायच्या आहेत. या केंद्राला केंद्र सरकारच्या इनोव्हेशन सेलच्या संपर्कात राहून काम करावे लागणार आहे, असे सांगण्यात आले आहे.

### विद्यापीठे-महाविद्यालयांकडे ही जबाबदारी...

- विद्यापीठे-महाविद्यालयांमधील संशोधनासाठी इको सिस्टिमची निर्मिती करणे.
- संशोधनाद्वारे सरकार, उद्योग, खासगी क्षेत्र यांच्याशी स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंध निर्माण करणे.
- शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांसोबतच निधीचा वापर नावीन्यपूर्ण संशोधनासाठी करणे.
- समाजाभिमुख संशोधन प्रकल्प किंवा स्टार्टअपची निर्मिती करणे.

My Pune Edition
Jul 6, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# महाविद्यालयांमध्ये आता संशोधन, विकास कक्षाची स्थापना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) आता राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये संशोधन आणि विकास कक्षाची (आर अँड डी सेल), उद्योग आणि शिक्षण कक्षाची (इंडस्ट्री-अॅकॅडमी सेल) स्थापना करावी लागणार आहे. उद्योग आणि शिक्षण क्षेत्राची परिसंस्था विकसित करण्यासाठी या कक्षाची संकल्पना मांडण्यात आली आहे.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात संशोधनावर भर देण्यात आला आहे. तसेच संशोधनाद्वारे सरकार, उद्योग, खासगी क्षेत्र यांच्याशी स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंध निर्माण करणे, विद्यापीठे-महाविद्यालयांमध्ये संशोधनासाठी परिसंस्था विकसित करणे, समाजाभिमुख संशोधन प्रकल्प किंवा स्टार्टअपची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) महाविद्यालयांत संशोधन आणि विकास केंद्र स्थापन करण्याबाबतचे मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली होती. शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सुकाणू समितीने या मार्गदर्शक तत्त्वांची राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्राचे नेतृत्व हे कुलगुरू किंवा प्राचार्यांनी करायचे आहे. त्यासोबतच संपूर्ण प्रशासकीय आणि शैक्षणिक जबाबदारी निभावण्यासाठी संचालकांची नेमणूक करावी लागणार आहे. त्याशिवाय अर्थ व पायाभूत सुविधा, संशोधन प्रकल्प आणि धोरणाचा विकास, इंडस्ट्री आणि समूहांसोबत काम, पेटंट आणि विधी अशा पाच विविध घटकांवर काम करण्यासाठी स्वतंत्र समित्यांची नियुक्ती करावी लागेल. त्याचप्रमाणे प्राध्यापक आणि तज्ज्ञांची नेमणूक करायची आहे. या केंद्राला केंद्र सरकारच्या इनोव्हेशन सेलच्या संपर्कात राहून काम करावे लागेल. विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधन केंद्र आणि उद्योगांचे काम करण्यासाठी सुविधा उपलब्ध होण्यासाठी संशोधन माहिती व्यवस्थापन प्रणालीची (रीसर्च इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सिस्टीम) निर्मिती करावी लागणार आहे.

> यूजीसीच्या निर्णयाप्रमाणे यंदापासून विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये संशोधन आणि विकास केंद्रांची स्थापना करावी लागणार आहे. त्यासाठीची आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे यूजीसीकडून जाहीर करण्यात आली आहेत.
> - डॉ. नितीन करमळकर, अध्यक्ष, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सुकाणू समिती

लोकसत्ता Thu, 06 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72863672

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठात एकात्मिक अभ्यासक्रमावर भर!

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शैक्षणिक संकुलात पाच वर्षांचे एकात्मिक अभ्यासक्रम (पदवी आणि पदव्युत्तर एकत्रित) सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी बुधवारी दिली.

पुणे विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. गोसावी बोलत होते. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, बागेश्री मंठाळकर, डॉ. मनोहर चासकर, डॉ. विजय खरे, सिनेट सदस्य प्रसेनजित फडणवीस आदी उपस्थित होते.

डॉ. गोसावी म्हणाले, की शैक्षणिक संकुलातील विविध शैक्षणिक विभागांमध्ये दोन वर्षांचे पदव्युत्तर (मास्टर्स) अभ्यासक्रम सुरू आहेत. मात्र, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम एक वर्षाचा होणार आहे. या पार्श्वभूमीवर एका वर्षाचे अभ्यासक्रम उत्तम शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्तेने चालविण्यासाठी नवे उपाय शोधण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने पाच वर्षांचे एकात्मिक अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या काही दिवसांत याबाबत सविस्तर माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मात्र, हे करताना सामान्य तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सध्याचे पदव्युत्तर अभ्यासक्रमही सुरू ठेवण्यात येतील, असेही डॉ. गोसावी यांनी सांगितले.

**कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांची माहिती**

### दर शनिवारी एका विभागाला भेट

पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे कामकाज सुरळीत आणि पारदर्शकपणे सुरू राहण्यासाठी दर शनिवारी एका विभागाला भेट देण्यात येईल. या भेटीत विभागाचा शैक्षणिक आढावा घेण्यासोबतच विभागाच्या आवश्यक गरजा लक्षात घेऊन, त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे, असेही डॉ. गोसावी यांनी सांगितले.

My Pune Edition
Jul 6, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि न्यायालये

■ ॲड. विलास पाटणे

'कोर्टाची पायरी चढू नये' असे म्हटले जाते. परंतु आता अमेरिकेतील तंत्रज्ञान खूप पल्याड गेले आहे. जगात 'चॅटजीपीटी'ची चर्चा सुरू असताना आता अमेरिकेतील कोर्टात थेट रोबो बाजू मांडणार आहे. मायक्रोसॉफ्टचे सत्य नाडेला म्हणतात, 'जग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स-एआय) सुवर्णयुगात प्रवेश करीत आहे.' जगातील हा पहिला रोबो वकील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे अमेरिकेतील कोर्टात 'ओव्हरस्पीडिंग' कायद्यासंबंधी भक्कम बाजू मांडणार आहे. एआय रोबो वकील बनविणारी कंपनी डूनॉटपोचे संस्थापक जोशुआ ब्रॉडनर म्हणतात, कायद्याचे कोड आणि भाषा जवळपास सारखी आहे. त्यामुळे त्यात कृत्रिम बुद्धीचा वापर होऊ शकतो. हा रोबो स्मार्टफोनवर चालतो. कोर्टास बाजू मांडताना तो दंड भरण्यापासून सुटका कशी होईल, हे सांगणार आहे. शिकागोस्थित लॉ फर्मने एक खटला दाखल केला असून तेथे रोबो वकील कायद्याच्या पदवीशिवाय काम करीत आहेत.

सन १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी 'कृत्रिम बुद्धी' या शब्दाचा शोध लावला. हा एक विज्ञान आणि अभियांत्रिकी तंत्राचा वापर करून बुद्धिमान मशिन बनविण्याचा एक प्रोग्राम आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक तंत्र आहे. यात कोणतेही यंत्र माणसासारखे काम करते. आपण रोजच्या आयुष्यात एआय तंत्रज्ञान वापरत आहोत, हे आपल्याला ठाऊक नसते. गुगल आपल्याला त्याच गोष्टीचे अचूक परिणाम दर्शविते, ज्याचा आपण शोध घेत असतो. 'गुगल असिस्टंट', 'सिरी' आणि 'ॲलेक्सा' ही कृत्रिम बुद्धीच्या प्रोग्रामची उदाहरणे. कार्यक्षेत्रात लक्ष्याचा शोध, भाषाप्रक्रिया, तज्ज्ञप्रणाली आणि रोबोटिक्सचा समावेश होतो. या प्रक्रियेतून अनुभवातून शिकण्याची क्षमता, परिस्थितीशी जुळवून घेणे, समस्यांचे आकलन आणि त्या सोडविण्यासाठी ज्ञानाचा योग्य वापर याला कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणता येईल.

सन २०१८ मध्ये अमेरिकेत एका महिलेचा अपघाती मृत्यू झाला. तिला धडकणारी उबर कंपनीची 'सेल्फ ड्रायव्हिंग कार' होती. काही तांत्रिक बिघाड झाल्याने तिचा अपघात झाला. सरकार त्या अपघातांसंबंधी गुन्हा दाखल करू शकत नव्हती. कारण निर्जीव वस्तूंवर खटला दाखल करता येत नाही. आयबीएमने विकसित केलेले रॉस अमेरिकेने दत्तक घेतले आहे. अमेरिकेत सर्वोच्च न्यायालयात 'स्कॉटस्' ७०.२ टक्के अचूकतेसह न्यायाधीशांना खटल्याच्या निकालाचा अंदाज करतात.

न्यायव्यवस्थेत प्रत्येक पाऊल प्रगतीच्या दिशेने पडले आहे. संगणकापासून लायब्ररीपर्यंत तसेच केस लॉ शोधण्यासाठी इंटरनेट पोर्टल वापरण्यापर्यंत कृत्रिम बुद्धीचा वापर वाढला आहे. भारतात कायदेशीर सेवा बाजार जगातील सर्वांत मोठा असला तरी, त्यांचा दृष्टिकोन बऱ्याच अंशी पारंपरिक आहे आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबाबत संकोच केला जातो. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणतात, 'यामुळे न्यायव्यवस्थेत कार्यक्षमता, पारदर्शकता आणि वस्तुनिष्ठता वाढेल. कृत्रिम बुद्धिमत्तेतून न्यायाधीशांना मूल्यांकनासाठी सोयिस्कर साधन उपलब्ध होईल.'



**जगात अनेक ठिकाणी आता न्यायव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्तेचे सहकार्य घेतले जात आहे. अमेरिकेत तर थेट यंत्रमानवच खटला लढणार आहे. भारतासारख्या तीन कोटींहून अधिक खटले प्रलंबित असणाऱ्या देशाने अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आता वेगाने अवलंब करायला हवा...**

आपल्याला व्यापक न्यायव्यवस्था आणि जगातील सर्वात मोठी राज्यघटनेचा वारसा लाभल्याने बदलत्या काळानुसार प्रगतीचा वेग गाठण्यासाठी 'एआय'चा वापर महत्त्वाचा ठरेल. एआय आधारित सॉफ्टवेअर वकिलांची जागा घेणार नाही. परंतु संशोधन-विश्लेषणाची सत्यता आणि अचूकता सुधारत आहे. मुंबईतील अमरचंद मंगलदास फर्मने एआयच्या क्षमता ओळखून त्याचा अवलंब केला आहे. कॅनडातील' किरा सिस्टीम'ने विकसित केलेल्या मशिन लर्निंग प्रोग्रामला परवाना देणारा पहिला भारतीय कायदा तयार करून इतिहास निर्माण केला. त्यामुळे, बराच वेळ आणि मेहनत वाचते. किरा तंत्र ज्ञानाचा वापर कायद्याच्या कागदपत्रांचे विश्लेषण, संभाव्य धोकादायक क्षेत्रे शोधण्यासाठी केला जातो. वकिलांना कृत्रिम बुद्धी वापरून काही सेकंदांतच नवीन माहिती मिळू शकते. तांत्रिक बदल व पक्षकारांच्या गरजा समजून घेणे व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या बदलाकडे डोळेझाक करणारे काही वर्षांत कालबाह्य होतील.

माजी सरन्यायाधीश न्या. एस. ए. बोबडे म्हणतात, 'आमच्याकडे न्यायालयीन व्यवस्थेसाठी कृत्रिम बुद्धी विकसित करण्याची गरज आहे. यातून न्यायाला होणारा विलंब टाळता येईल.' त्यांनी पुढे असे स्पष्ट केले की, एआय मानवी विवेकबुद्धी किंवा न्यायाधीशांची जागा घेऊ शकत नाही. 'हार्वर्ड लॉ स्कूल'चे शशांक आणि गुगलचे माधव भगत यांनी एआयचे 'स्टार्टअप' स्थापन करून कागदपत्रांची तपासणी केली. 'कॅसिओ लर्निंग सॉफ्टवेअर' कायद्यांचे संशोधन, भाषांचे विश्लेषण, पर्यायी युक्तिवाद सुचवून संबंधित निर्णय घेण्यासाठी काम करते. निवृत्त न्यायाधीश ए. के. सिकरी म्हणतात, 'दिल्ली उच्च न्यायालयाने ई-रूम्सची स्थापना करीत एक पाऊल पुढे टाकले आहे. जे पूर्णपणे पेपरलेस कोर्ट आहे. तंत्रज्ञान हा एक मित्र आहे, जो दीर्घकाळ सोबत राहणार आहे.'

'न्यायव्यवस्था, डेटा सुरक्षा, गोपनीयता यामध्ये कृत्रिम बुद्धीचा वापर करणार,' असे अलीकडेच केंद्रीय कायदामंत्र्यांनी म्हटले आहे. न्यायवितरण प्रणालीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी मशीन लर्निंग आणि एआय अत्याधुनिक तंत्राचा अवलंब करावा लागेल. सर्वोच्च न्यायालयाने न्यायिक क्षेत्रात एआयचा वापर शोधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता समितीची स्थापना केली आहे. समितीने भाषांतर, संशोधन सदस्य आणि प्रक्रिया स्वयंचलन यात एआयचा वापर सुरू केला आहे. 'सुप्रीम कोर्ट लीगल ट्रान्सलेशन सॉफ्टवेअर' ही एआय प्रणाली आहे. त्याद्वारे प्रादेशिक भाषांमध्ये निकालांचे भाषांतर करून न्याय मिळवून देण्याचा ऐतिहासिक प्रयत्न होणार आहे.

अमेरिकेत पर्यायी मंजुरीसाठी 'कंपास ॲप', इंग्लंडमध्ये हानी मूल्यांकन मापनासाठी 'हार्ट', तर चीन, रशियात लहान प्रकरणांचा न्यायनिवाडा करण्यासाठी रोबो न्यायाधीश, ऑस्ट्रेलियात अत्याधुनिक दस्तऐवज व्यवस्थापन, अर्जेंटिनामध्ये 'प्रोमेटिया ॲप' काही मिनिटांत तातडीचे प्रकरणे ओळखतो. तर सिंगापूरमध्ये न्यायालयीन सुनावणीचे 'रिअल टाइम' लिप्यंतरण होते. तंत्रज्ञानातील अशा प्रगतीमुळे कायदाविश्वाचा दृष्टिकोन बदलला आहे. न्यायालयीन विलंबामुळे देशातील न्यायव्यवस्थेवर सध्या तीन कोटीहून अधिक थकित खटल्यांचा बोजा आहे. सुटी कमी करून आता न्यायालयांची क्षमता आणि निकालांचा वेग सुधारला पाहिजे. एआयमुळे याबाबत आवश्यक ते संशोधन जलद होईल. न्यायाधीशांना भविष्यसूचक तंत्रज्ञानासह निर्णयप्रक्रिया सोपी होणार आहे. न्यायव्यवस्थेत योग्य परिश्रम, डेटा संकलन व इतर कामासाठी एआय उपयुक्त आहे. अर्थात, एआयमध्ये धोरणात्मक विचारांचा अभाव आहे. तसेच, ते माणसाप्रमाणे ते सर्जनशील नाही. रोबोट्समध्ये भावनिक बुद्धी आणि सहानुभूती नसते. अर्थात, असंख्य फायदे असले तरी ते प्रत्यक्ष वकिलांची जागा घेऊ शकत नाही. शेवटी व्यवस्थेच्या नवीन बदलात निर्माण झालेले प्रश्न हळूहळू प्रवाहाच्या मार्गांत सुटत जातील.

**(लेखक वकील आहेत.)**

Maharashtra Times 6.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानचे स्वागतच, पण...

### वैज्ञानिक संशोधनासाठी ७० टक्के निधी खासगी क्षेत्राकडून येणार असलेल्या या संस्थेने आधी निधीपुरवठ्याचे मार्ग शोधावेत...

**पार्थ पी. मजुमदार**

'**नॅशनल रिसर्च** फाउंडेशन' (एनआरएफ) अर्थात राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान स्थापण्यासाठी संसदेच्या येत्या अधिवेशनात विधेयक मांडण्याच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी नुकतीच (२८ जून) मिळाली. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'च्या शिफारशींच्या अनुषंगाने, भारतातील वैज्ञानिक संशोधनाला उच्चस्तरीय धोरणात्मक दिशा देण्यासाठी 'एनआरएफ' हीच सर्वोच्च संस्था असेल- याचा अर्थ असा की, २००८ पासून आजतागायत याच हेतूसाठी जे 'विज्ञान आणि अभियांत्रिकी संशोधन मंडळ' (एसईआरबी) कार्यरत होते, त्याचे अस्तित्व संपेल. प्रस्तावित विधेयक 'एनआरएफ'च्या रचनेबद्दल बरीच माहिती देणारे आहे.

'एनआरएफ'चे संचालन पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील शास्तामंडळातर्फे (गव्हर्निंग बोर्डातर्फे) केले जाणार आहे, त्याची दोन्ही उपाध्यक्षपदे अनुक्रमे केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री आणि शिक्षणमंत्री यांच्याकडे असतील. विविध विषयांचे प्रतिनिधित्व करणारे नामवंत शास्त्रज्ञ हे या शास्तामंडळाचे सदस्य असतील. 'एनआरएफ'च्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी 'कार्यकारी परिषद' असेल आणि भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार हेच या कार्यकारी परिषदेचे पदसिद्ध प्रमुख असतील. हे प्रतिष्ठान केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान खात्याच्या प्रशासकीय अखत्यारीत काम करील.

'शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील संस्था, उद्योग आणि सरकारी विभाग यांच्यातील सहकार्य वाढवणे' हे 'एनआरएफ'च्या स्थापनेमागचे मुख्य कारण मानले गेले आहे. सहकार्य वाढवण्यासाठी 'एनआरएफ' धोरण- आराखडा आणि नियामक प्रक्रिया तयार करेल. त्यामुळे, उद्योगांद्वारे संशोधन व विकासावर वाढीव खर्चाला प्रोत्साहन मिळेल. सध्याच्या कायद्यांनुसार एखाद्या खासगी संस्थेचा निधी सरकारी संस्थेला मिळू शकण्याची प्रक्रिया जटिल आहे. पण 'एनआरएफ'ला हा निधी सहज मिळावा, अशा तरतुदी प्रस्तावित विधेयकात केल्या जाणार असल्याचे सांगितले जाते.

**समन्वयासाठी आवश्यकच**

'एनआरएफ' विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था आणि प्रयोगशाळांमध्ये संशोधन, नवकल्पना आणि विकासाला बीजन, संगोपन आणि प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान अथवा उद्योग मंत्रालयांव्यतिरिक्त, राज्य सरकारे व उद्योगदेखील सहभागी होऊ शकतील, असे एक व्यासपीठ 'एनआरएफ'मुळे उपलब्ध होईल. यासंदर्भात विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी व्यक्त केलेले मत महत्त्वाचे आहे. ते म्हणतात "...आमच्याकडे आयआयटी व भारतीय विज्ञान संस्था-बंगळूरुसारख्या नामांकित संस्था आहेत, त्यांना मोठ्या प्रमाणात संशोधन निधी मिळतो परंतु राज्य विद्यापीठांना या निधीपैकी फारतर १० टक्के मिळतात. ही स्थिती 'एनआरएफ' मुळे पालटेल... आयआयटींना एनआरएफवर अवलंबून राहण्याची गरज नाही, पण खेडेगावात एखाद्या प्रयोगशील व्यक्तीला, स्टार्ट-अप स्थापन करायचे असेल त्याला पैशांची गरज असते. 'एनआरएफ' संशोधन निधीला प्राधान्य देईल. अशा कोणत्या क्षेत्रांना समर्थनाची आवश्यकता आहे यावर कार्यकारी परिषद निर्णय घेईल." 'एनआरएफ'ची एकंदर आर्थिक तरतूद ही २०२३ ते २०२८ या काळासाठी सुमारे ५० हजार कोटी रुपये असेल. सुमारे ७० टक्के रक्कम खासगी क्षेत्राकडून 'संशोधन गुंतवणूक' म्हणून प्राप्त केली जाईल; उर्वरित ३० टक्के रक्कम सरकारकडून येईल (राज्य सरकारे वाटा देणार का, हे स्पष्ट नाही.)

'एनआरएफ'च्या निर्मितीची चर्चा मुळात पंतप्रधानांच्या विज्ञान तंत्रज्ञान आणि नवोपक्रम सल्लागार परिषदेने (पीएम-एसटीआयएसी) सुरू केली. या परिषदेनेच अलीकडच्या अहवालात असे नमूद केले होते की, वैज्ञानिक संशोधनात 'एकात्मिक नियोजनाचा व समन्वयाचा अभाव' हा प्रमुख अडथळा आहे. केवळ विज्ञान निधीत वाढ केल्याने संशोधन परिणामकारक होण्याची शक्यता नाही; संरचनात्मक बदल आवश्यक आहेत... असे मत मांडणाऱ्या त्या अहवालातच 'एनआरएफ' च्या निर्मितीची शिफारस होती.

**निधीची रड**

'एनआरएफ'ची उद्दिष्टे प्रशंसनीय आहेत, म्हणून मी या प्रतिष्ठानाच्या स्थापनेचे स्वागतच करेन. जर शासन आणि प्रशासनाने चांगले काम केले तर येत्या पाच ते दहा वर्षांत देशाच्या विज्ञान क्षेत्रावर मोठा सकारात्मक प्रभाव पडेल. तथापि, 'गोम तपशिलांमध्ये असते' हेही खरे. त्यामुळेच अशा अपेक्षा आतापासून स्पष्टपणे मांडाव्या लागताहेत की, बियाणे, संगोपन आणि संशोधनाला चालना देण्याच्या पद्धती कमी अनुदानित संस्थांना निधी उपलब्ध करून देणे आणि परिणामांवर देखरेख करणे हे पारदर्शक असावे. शास्त्रज्ञांना भेडसावणारी एक महत्त्वाची समस्या म्हणजे प्रस्तावित वैज्ञानिक प्रकल्पांचे पुनरावलोकन करून मगच त्यांना मंजुरी दिली जाते, तरीसुद्धा निधी प्रत्यक्ष हातात येण्याचे प्रमाण अनेकदा तुटपुंजे असते. ही रड गेल्या अनेक वर्षांतही कायमच आहे. निधी अव्याहत मिळण्याचे दिवस कधीही दिसलेले नाहीत. यामागची मूळ कारणे तपासली पाहिजेत आणि सुधारात्मक पावले टाकली पाहिजेत. अन्यथा, प्रकल्प प्रस्तावात दिलेली आश्वासने बहुतेक वेळा पूर्ण केली जात नाहीत. हे असेच होत राहिले तर, 'एनआरएफ'च्या स्थापनेनंतरही देशाच्या विज्ञान क्षेत्रावर खास परिणाम दिसणारच नाही.

भारत आपल्या जीडीपीच्या ०.७ टक्के खर्च 'संशोधन-विकास' क्षेत्रावर (रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट) करतो. 'ब्रिक्स' देशांशी याची तुलना केल्यास चीन त्यांच्या जीडीपीच्या दोन टक्क्यांहून अधिक; ब्राझील आणि रशिया एक टक्क्याहून अधिक; तर दक्षिण आफ्रिकासुद्धा त्यांच्या जीडीपीच्या तुलनेत ०.८ टक्के खर्च करतात. अमेरिकेत (यूएसए) हे प्रमाण जीडीपीच्या सुमारे २.८ टक्के इतके; तर जागतिक सरासरी सुमारे १.८ टक्के आहे. 'एनआरएफ'च्या निर्मितीमुळे या आपल्या खर्चात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. काही वर्षांत भारताचा संशोधन आणि विकास खर्च जागतिक सरासरीपर्यंत तरी पोहोचावा, अशी आशा आहे. 'एनआरएफ'च्या बजेटचा सिंहाचा वाटा (७० टक्क्यांहून अधिक) खासगी उद्योगांनी उचलणे अपेक्षित आहे. या अपेक्षेची पूर्तता करण्यासाठी पुरेशी चर्चा झाली असणारच आणि त्या दृष्टीने काही धोरणेसुद्धा विकसित केली गेली असणारच. तथापि, मला आशा आहे की समजा अशा खासगी उद्योगाकडून निधी वेळेवर आला नाही तर 'प्लॅन-बी'- पर्यायी योजनासुद्धा तयारच करून ठेवावी. अन्यथा, विज्ञानाच्या प्रगतीला फटका बसेल.

'एनआरएफ'कडून विज्ञान निधीच्या लोकशाहीकरणाला प्रोत्साहन देणे आणि आपल्या समाजाला भेडसावणाऱ्या काही मोठ्या समस्यांवर वैज्ञानिक उपाय शोधण्यासाठी निधी मिळणे अपेक्षित आहे, या स्वागतार्ह हालचाली आहेत. तथापि, हे सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे की मूलभूत संशोधन आणि लहान प्रमाणातील संशोधन प्रस्ताव बाजूला सारले जाणार नाहीत.

काही सरकारी विज्ञान संस्थांचे विलीनीकरण करण्याची तयारी सुरू आहे. हे विलीनीकरण पंतप्रधानांच्या विज्ञान तंत्रज्ञान आणि नवोपक्रम सल्लागार परिषदेने (पीएम-एसटीआयएसी) शिफारस केलेल्या 'संरचनात्मक बदलां'च्या अंमलबजावणीसाठी आहे की नाही, हे स्पष्ट नाही. एका छत्राखाली संस्थांचे विलीनीकरण केल्याने महत्त्वपूर्ण आंतरविषय संशोधनाला चालना मिळू शकते हा विचार म्हणून मान्यच. परंतु यापैकी अनेक संस्था मुळात, विज्ञानाच्या विशिष्ट क्षेत्रांवरील संशोधनाला चालना देण्यासाठी स्थापन करण्यात आल्या होत्या. विलीनीकरणामुळे काही क्षेत्रांना मिळणारा पाठिंबा कमी होऊ नये अशी आशा आहेच आणि मिशन-मोड, सुपरकॉम्प्युटिंग आणि क्वांटम कॉम्प्युटिंगसारख्या महाकाय प्रकल्पांसाठी निधी 'एनआरएफ' तरतुदीमधून घेतला जाऊच नये अशीही रास्त अपेक्षा आहे; कारण तसे समजा झाले तर, त्यानंतर इतर संशोधनासाठी कोणताही निधी शिल्लक राहणार नाही.

संसदीय मान्यतेनंतर 'एनआरएफ'ची स्थापना करण्याचा मानस स्वागतार्ह आहे. यामुळे वैज्ञानिक संशोधनाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. उद्योग-क्षेत्र आणि विद्येचे क्षेत्र यांच्यातील विज्ञानविषयक सहकार्याची भरभराट होणे अपेक्षित आहे. तथापि, जोपर्यंत केंद्रीकृत निधीचे व्यवस्थापन करण्यासाठी सुशासनाची यंत्रणा सर्व भागधारकांशी पुरेशी चर्चा करून विकसित केली जात नाही, ती पहिल्या दिवसापासून लागू केली जात नाही आणि मजबूत देखरेखीखाली कार्यान्वित केली जात नाही तोपर्यंत केंद्रीकरणाचे धोके संभवतात. ही एवढी काळजी घेतल्यास विज्ञानाची प्रगती धडाकेबाज होईल. 'एनआरएफ'मुळे परदेशात गेलेल्या तरुण संशोधकांना पीएचडी किंवा पोस्ट-डॉक्टरेट काम करण्यासाठी भारतात परत येण्यासाठी प्रोत्साहन मिळेल... देशाचे बौद्धिक भांडवल वाढेल. उच्च-गुणवत्तेचे विज्ञान पुढे नेण्याच्या संधी वाढतील.

संशोधन निधीचे केंद्रीकरण टाळण्याची पुरेपूर काळजी 'एनआरएफ'ची सुरुवात करण्यापूर्वी घेतली गेल्यास, आपण लवकरच वैज्ञानिक संशोधन आणि विकासाच्या सुवर्णकाळाची अपेक्षा करू शकतो!

*लेखक कोलकाता येथील 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बायोमेडिकल जीनॉमिक्स'चे संस्थापक आणि 'एनआरएफ'मध्ये विलीन होणार असलेल्या 'विज्ञान आणि अभियांत्रिकी संशोधन मंडळा'चे (एसईआरबी) अध्यक्ष आहेत*

लोकसत्ता Thu, 06 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72864143

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

सकाळ

# विद्यापीठ आवारातच इंटिग्रेटेड अभ्यासक्रम

## नवनियुक्त कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांची माहिती

**पुणे, ता. ५ :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम एक वर्षाचा होणार आहे. त्यामुळे भविष्यात पदवी आणि पदव्युत्तर एकत्र करत विद्यापीठ आवारात इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल, तरच विद्यापीठातील विभागांना महत्त्व राहील, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी दिली.

पदभार स्वीकारल्यानंतर गोसावी यांनी प्रथमच पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी विद्यापीठाची सद्यःस्थिती, भविष्यातील मार्गक्रमण आणि आगामी धोरणांविषयी चर्चा झाली. शैक्षणिक वेळापत्रक पूर्ववत करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांसह विद्यार्थ्यांच्या समस्या निराकरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आवश्यक बदलांचे सूतोवाचही त्यांनी केले.



प्रा. गोसावी

भविष्यात एकाच वर्षाचे पदव्युत्तर शिक्षण असल्याने विद्यापीठ आवारात आवश्यकतेनुसार पाच वर्षांचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार एक आणि दोन वर्षांचे, असे दोनही प्रकारातील पदव्युत्तर अभ्यासक्रम असतील, असे प्रा. गोसावी यांनी सांगितले. या वेळी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, डॉ. विजय खरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, बागेश्री मंठाळकर आदी उपस्थित होते.

Pune, Main
06/07/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

लोकमत

# उच्च 'शिक्षण; पण पैशाचेच 'भक्षण'

## 'सहसंचालक'चा कारभार वादात : प्राध्यापक त्रस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजाराम कॉलेज परिसरात असलेल्या विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारीच लाचलुचपतच्या जाळ्यात सापडल्याने या कार्यालयाचा कारभार पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असणाऱ्या या कार्यालयामार्फत महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा वेतन आयोग, नव्या नियुक्त्यांचे, वेतन निश्चिती प्रस्ताव यासह विविध प्रस्तावांना मान्यता दिली जाते. मात्र, प्रत्येक वेळी अर्थपूर्ण घडामोडींशिवाय संबंधित प्रस्तावाची फाईल पुढेच सरकत नाही. त्यामुळे प्राध्यापक व कर्मचारीही नाईलाजास्तव देवघेव करून प्रस्ताव मंजूर करून घेतात. विशेष म्हणजे जे टेबलाखालून द्यायला नकार देतात त्यांचे प्रस्ताव टेबलावरच धूळखात पडून राहण्याचा अनुभव आहे.

### वीस वर्षांपासून कर्मचारी तेथेच, केवळ टेबल बदलले

या कार्यालयातील अनेक कर्मचारी गेल्या २० वर्षांपासून एकाच ठिकाणी मांडून आहेत. 'चहापेक्षा किटली गरम'चा अनुभव देणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे केवळ टेबल बदलले आहेत. त्यांच्या बदल्याच होत नसल्याने तेही अर्थपूर्ण घडमोडीसाठी चांगलेच निर्ढावले आहेत. अनेक वर्षांचा एकाच कार्यालयाचा अनुभव असल्याने कुणाकडे किती मागायचे, कुणाची कोणती प्रकरणे प्रलंबित आहेत, याची खडानखडा माहिती त्यांना आहे. एकादा त्यांची मागणी पूर्ण करायला तयारच नसेल तर वारंवार हेलपाटे मारायला लावून त्याला त्यासाठी तयार करणारी टोळीच या कार्यालयात सक्रिय आहे.

### नोकरीची सुरुवात ते पेन्शन मिळेपर्यंत 'प्रसाद'

- नोकरीला लागण्यापासून ते पेन्शन पदरात पाडून घेण्यापर्यंत प्राध्यापकांना या कार्यालयाचे हात ओले करावे लागतात. सुरुवातीला प्राध्यापक पदाची जाहिरात काढताना या कार्यालयाची एनओसी गरजेची आहे.
- पदासाठीच्या मुलाखत समितीत या कार्यालयाचा एक सदस्य असतो. त्याची 'मर्जी' सांभाळली तरच संधीची शक्यता असते. पुढे नियुक्ती झाल्यानंतर पगारपत्रक अर्ज, अ‍ॅप्रोल मंजुरी यासाठीही अडवणूक केली जाते.
- वेतन पडताळणीचा काळ म्हणजे या कार्यालयासाठी सुगीचेच दिवस. वेतनवाढ, वैद्यकीय बिले मंजूर करताना हात धुवून घेण्याची सवय लागलेल्या या कार्यालयात वैद्यकीय बिलासाठी दहा टक्क्यांचा दर असल्याचे एका प्राध्यापकाने सांगितले. पेन्शन मंजूर करतानापासून ते भविष्य निर्वाह निधीतील रक्कम काढतानाही येथील कर्मचाऱ्यांचा त्याच्यावर 'डोळा' असतो.

### महाविद्यालयांचा लिपिक हाच दूत

ज्या महाविद्यालयातील प्राध्यापक-कर्मचाऱ्यांची प्रकरणे प्रलंबित आहेत, तेथील लिपिकच या कार्यालयाचा दूत म्हणून काम करतो. त्याच्या माध्यमातूनच अर्थपूर्ण व्यवहार ठरवले जातात. एखाद्याचे कोणतेही काम असेल तर त्याला तुम्ही येऊ नका, लिपिकालाच पाठवा, असा खास निरोपच या कार्यालयातून देण्यात येतो.

Kolhapur Main
Page No. 5 Jul 06, 2023
Powered by: erelego.com

सकाळ

# अकरावी प्रवेशाची तिसरी फेरी जाहीर

## कॉलेजचा पसंतीक्रम बदलण्याची संधी

**पुणे, ता. ५ :** इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या तिसऱ्या नियमित फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना गुरुवारपासून (ता. ६) अर्ज भरता येतील. दुसऱ्या फेरीमध्ये प्रतिबंधित असलेल्या विद्यार्थ्यांना या फेरीत पसंतीक्रम अर्ज भाग दोन लॉक करून सहभागी होता येईल.

तिसऱ्या फेरीत विद्यार्थ्यांना पसंतीक्रम बदलता येईल, अन्यथा मागील फेरीचा पसंतीक्रम कायम राहतील. दुसऱ्या फेरीत प्रवेश घेतलेले, प्रवेश फेरी दोनमध्ये प्रथम पसंतीक्रम मिळालेले (प्रवेश न घेतलेले तसेच रद्द केलेले) विद्यार्थी तिसऱ्या फेरीसाठी प्रतिबंधित असतील. या फेरीत अलॉट झालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यायचा नसेल तर असे विद्यार्थी पुढील फेरीची वाट पाहू शकतील. प्रथम पसंतीचे विद्यालय अलॉट झाल्यास तेथेच प्रवेश घेणे अनिवार्य असेल. प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही किंवा प्रवेश नाकारला गेला तर त्या विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेरीसाठी प्रतिबंधित केले जाईल. त्या फेरीनंतरच प्रवेशासाठी त्यांचा विचार केला जाईल. प्रवेश रद्द केलेले विद्यार्थीही पुढील फेरीसाठी प्रतिबंधित केले जातील.

### वेळापत्रक

- **६ ते ९ जुलै :** प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे, नवीन विद्यार्थी ऑनलाइन नोंदणी अर्ज भाग एक भरू शकतात. अर्ज भाग एकमध्ये दुरुस्ती करता येईल, कोटा व द्विलक्षी प्रवेशासाठी ऑनलाइन पसंती नोंदविता येईल
- **१० व ११ जुलै :** पात्र उमेदवारांची यादी करणे तसेच विभागीय कॅंप समित्यांकडून अलॉटमेंटचे पूर्वपरीक्षण
- **१२ जुलै :** निवड यादी प्रसिद्ध करणे.
- **१२ ते १४ जुलै :** कॉलेज लॉगीनमध्ये प्रवेश ऑनलाइन निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे तसेच प्रवेश नाकारणे या प्रक्रिया सुरू राहतील. कॉलेजमध्ये जाऊन प्रवेश निश्चित करणे
- **१४ जुलै :** पुढील फेरीसाठी रिक्त जागा जाहीर करणे

Pune, Main
06/07/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

प्रभात

# सहायक प्राध्यापक होण्यासाठी पीएच.डी.धारकही पात्र

## 'यूजीसी'च्या अधिनियमातील संभ्रम दूर : नेट-सेट धारकही करू शकतील अर्ज

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. ६ -** विद्यापीठ अनुदान आयोगाने फक्त विद्यापीठात सहायक प्राध्यापक पदासाठी 'पीएच.डी.'ची अनिवार्यता काढून टाकली. त्यामुळे आता विद्यापीठात प्राध्यापक पदासाठी आता नेट-सेट हीच पात्रता असेल आणि पीएच.डी. पदवी ग्राह्य नसेल, असा संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र नेट-सेट नसलेले; परंतु पीएच.डी.धारकही सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र राहतील. महाविद्यालयातील प्राध्यापक पदाच्या पात्रतेत कोणताही बदल करण्यात आला नाही, हेही 'यूजीसी'च्या अधिनियमातील दुरुस्तीवरून स्पष्ट होत आहे.

'यूजीसी'ने २०१८ अधिनियमात दुरुस्ती करणारे नोटीस प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार जुलै २०२१ नंतर विद्यापीठात नियुक्तीसाठी अनिवार्य असणारी पीएच.डी. पात्रताऐवजी आता नेट-सेटधारक सुद्धा विद्यापीठात थेट नियुक्तीसाठी अर्ज करू शकतात, हा बदल करण्यात आला होता. त्यावरून सेट आणि नेटही नाही; पण पीएच.डी. आहे, अशा उमेदवारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला होता. वरिष्ठ महाविद्यालयात यापूर्वी सहायक प्राध्यापक पदासाठी सेट-नेट अथवा पीएच.डी. ही पात्रता आहे. महाविद्यालयीन स्तरावर नियुक्तीसाठी होणारे पात्रतेत कोणताच बदल नाही. त्यामुळे पूर्वीचे निकष कायम राहतील. म्हणजेच सेट-नेट नसलेले, पण पीएच.डी. असलेले उमेदवारही प्राध्यापक होण्यासाठी पात्र असतील. नेट-सेट धारकही अर्ज करू शकतील. त्याचप्रमाणे पीएच.डी.धारकही पात्र असतील.

> यूजीसीने नवीन दुरुस्ती अधिनियमात संपूर्ण कलम ३.० रद्द केलेले नाही. तर कलम ३.० चे उपकलम ३.१० हे रद्द केलेले आहे. त्यावरून विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सहायक प्राध्यापक पदासाठी सेट-नेट बरोबरच पीएच.डी.धारकही पात्र राहतील. मात्र, महाविद्यालयातील प्राध्यापक पदाच्या पात्रतेत बदल नाही.
>
> **- प्रा. संतोषकुमार पाटील**
> राज्य समन्वयक, 'बेस्टा' संघटना

> यूजीसीच्या नव्या दुरुस्ती अधिनियमानुसार पीएच.डी.ऐवजी आता विद्यापीठात प्राध्यापक पदासाठी सेट-नेट धारकही अर्ज करू शकतील. त्याचप्रमाणे पीएच.डी. पदवीही पात्र राहतील. यावरून आता सेट-नेटशिवाय पर्याय नाही, हेच अधोरेखित होत आहे.
>
> **डॉ. संजय चाकणे,**
> प्राचार्य, टी. जे. महाविद्यालय, खडकी

PuneCity, 07 July 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*



सकाळ

# शिक्षण संस्थांमध्ये भेदभाव ही गंभीर बाब

## सर्वोच्च न्यायालयाकडून निरीक्षण

**नवी दिल्ली, ता. ६ (पीटीआय) :** उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये अनुसूचित जाती आणि जमातींमधील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास सुयोग्य आणि हेपविरहित वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) कोणती पावले उचलली आहेत किंवा उचलण्याचा निर्णय घेतला आहे, अशी विचारणा आज सर्वोच्च न्यायालयाने केली. अनुसूचित जाती आणि जमातींमधील विद्यार्थ्यांना भेदभावाला सामोरे जावे लागणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

जातिभेदाला सामोरे जावे लागल्यानंतर हैदराबाद विद्यापीठातील पीएच.डी.धारक असलेल्या रोहित वेमुला याने १७ जानेवारी २०१६ मध्ये, तर मुंबईतील टी. एन. टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालयातील आदिवासी समाजातील विद्यार्थिनी पायल तडवी हिने २२ मे २०१९ रोजी आत्महत्या केली होती. यानंतर सप्टेंबर २०१९ मध्ये या दोन्ही विद्यार्थ्यांच्या आयांनी न्यायालयात याचिका दाखल करत देशभरातील विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांमधील जातिभेदाचे वातावरण नष्ट करण्याची मागणी केली होती. या याचिकेवर सुनावणी सुरु आहे. या याचिकेवर 'यूजीसी'ने आतापर्यंत काय पावले उचलली आहेत त्याची माहिती द्या, अशी सूचना न्या. ए. एस. बोपण्णा आणि न्या. एम. एम. सुंदरेश यांनी 'यूजीसी'ला केली आहे.

### चार आठवड्यांत उत्तर द्या

परिस्थितीची 'यूजीसी'ला जाणीव असून यासंदर्भात कुलगुरू आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र लिहिले असल्याचे 'यूजीसी'च्या वकिलांनी खंडपीठाला सांगितले. त्यावर, याबाबत वेगाने कारवाई करावी, जेणेकरून भेदभावामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण अर्धवट राहणार नाही, अशी खंडपीठाने त्यांना सूचना केली. तसेच, याचिकाकर्त्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करता द्वेषमुक्त वातावरणनिर्मितीसाठी काय पावले उचलली आहेत, याची माहिती चार आठवड्यांच्या आत सादर करावी, असे आदेशही खंडपीठाने दिले.

Pune, Main
07/07/2023 Page No. 7

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

सकाळ

# शैक्षणिक धोरण आणि ग्रंथपालांची भूमिका

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० जाहीर झाले. त्यावर विविधांगी चर्चा सुरू झाल्या. शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदलाच्या उद्दिष्टाने तयार केलेले हे धोरण स्वागतार्ह आहे. त्याचा अभ्यास करताना जाणवले की, ग्रंथपालांच्या भूमिकेविषयी थेट कोणतेही भाष्य केलेले नाही. तथापि, ग्रंथपाल कशा प्रकारे योगदान देऊ शकतात, याविषयी.**

**डॉ. चारुदत्त गंधे**

पूर्वप्राथमिक शिक्षण (वय ३-६) : अध्यापनाचा पाया असे संबोधलेल्या बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण या पहिल्या टप्प्यात अक्षरे, भाषा, तारांकित विचार समस्या सोडविणे, सामाजिक शिक्षण संवेदनशीलता, चांगली वर्तणूक, सौजन्य नैतिकता इत्यादींचा विकास अपेक्षित आहे. या वयोगटातील पहिल्या सहा वर्षांपर्यंत मुलांना वाचन अपेक्षित नाही. परंतु त्यांनी ग्रंथालयात आवडीने यावे असे वातावरण असणे, त्यांच्या वयोगटाला साजेसे फर्निचर, सहज हाताळता येतील अशी जाड कव्हरची रंगीबेरंगी चित्रे, मोठ्या अक्षरांची पुस्तके असावीत. या वयोगटापासूनच त्यांना ग्रंथालयात येण्याची, तेथील पुस्तके हाताळण्याची सवय लागणे अपेक्षित आहे. ग्रंथपालाने या वयोगटातील मुलांना मोठ्याने गोष्टी वाचून दाखवाव्यात जेणेकरून त्यांचा भाषा विकास होईल, शब्द संग्रह वाढेल. आपल्या प्राचीन परंपरांची ओळख करून द्यावी. पंचतंत्र, इसापनीती, बोधकथा, संस्कारकथा, ऐतिहासिक महापुरुषांची ओळख असणाऱ्या गोष्टी वाचून दाखवाव्यात. महत्त्वाचे म्हणजे या वयोगटातील मुलांना शक्यतो मातृभाषेतून गोष्टी वाचून दाखवणे आवश्यक आहे. अंगणवाड्यांसाठी ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने स्थायी व फिरती वाचनालये सुरू



केल्यास ग्रामीण स्तरावर वाचन संस्कृती जोपासण्यास मदत होईल. तेथील बालकांचा मानसिक, भावनिक आणि मूल्यात्मक विकास साध्य होईल.

### लागेल वाचनाची गोडी

इयत्ता तिसरी-चौथी (वय ८-११) : शैक्षणिक धोरणात उल्लेखल्याप्रमाणे २०२५ पर्यंत सर्व प्राथमिक शाळांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्या ज्ञान साध्य करणे ही शिक्षण व्यवस्थेची प्राथमिकता असेल. साक्षरता म्हणजे लिहिता आणि वाचता येणे इतपतच मर्यादित नसून जे वाचले त्याचे व्यवस्थित आकलन होणे, ते आचरणात वा उपयोगात आणणे, यादृष्टीने या वयोगटातील मुलांना वाचन ही क्रिया 'शिकविणे' आवश्यक आहे. या टप्प्यात ग्रंथपालाची भूमिका वाचनाची सवय व आवड वाढविण्याची, जोपासण्याची, रुजविण्याची असावी. विद्यार्थ्यांनी छोटी-छोटी पुस्तके स्वत: मोठ्याने वाचणे अभिप्रेत आहे. मोठ्याने वाचल्यामुळे वाचताना लक्ष विचलित होण्याचे प्रमाण कमी होईल. या उपक्रमात नावीन्यता आणण्यासाठी शालेय ग्रंथालयाबरोबरच क्रीडांगणात झाडाखाली, चित्रकला व हस्तकला वर्गात, पोर्चमध्ये, शाळेतील उद्यानात व गच्चीवर मुलांना घेऊन जाता येईल. प्रत्येक मुलाचा स्वतंत्र असा वाचक पोर्टफोलिओ या वयोगटापासूनच तयार करावा. त्यामुळे त्या मुलाच्या वाचन सवयी, वाचन, आकलन क्षमता आणि एकूणच शैक्षणिक जडणघडणीवरील परिणाम तपासता येईल. शैक्षणिक धोरणात सांगितल्याप्रमाणे या वयोगटात मुलांना चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमिहीर, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त अशा भारतीय विद्वानांची त्या वयोगटाला साजेशी, समजणारी पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. त्यामुळे आपल्या समृद्ध ज्ञान परंपरेचे व गौरवशाली वारशांविषयी या वयोगटात कुतूहल निर्माण होईल. रोजचे वर्तमानपत्रे पाहणे, त्यातील विनोद, रंगीत चित्रे, दिनविशेष, सुभाषित, सुविचार याची कात्रणे काढणे, ती चिकटविणे, कात्रण वही बनवणे असे विविध उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा वाढण्यास मदत होईल. मुलांना वाचनाची गोडी लागेल. ही प्रक्रिया सहज, अनौपचारिक आणि आनंददायी असावी.

### रुंदावेल ज्ञानाची कक्षा

इयत्ता सहावी ते आठवी (वय ११-१४) : ग्रंथालयाची, ग्रंथांची, विविध विषयांची ओळख यापूर्वी या विद्यार्थ्यांना झालेलीच असते, आता गरज आहे ती ज्ञानकक्षा रुंदावण्याची. या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथपाल महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. कादंबरी, कथासंग्रह, काव्य, नाट्य, चरित्रे, आत्मचरित्रे यांची सविस्तर ओळख करून द्यावी. या वयोगटात मातृभाषेसह इतर भाषेतील मूळ व अनुवादित साहित्य उपलब्ध करून द्यावे. विविध सामाजिक, वैज्ञानिक विषयांवरील कादंबऱ्या, कथासंग्रह मुद्दामहून वाचण्यास सांगावे, जेणेकरून राष्ट्रीय शैक्षणीक धोरणाच्या अनुषंगाने सामाजिक मूल्यांच्या विकासात नक्कीच मदत होईल. वाचन का करावे, वाचा आणि व्यक्तिमत्त्व विकास, वाचन व मेंदूचे कार्य, वाचन व संवेदना, वाचन व भावना या आणि अशा वाचनाशी निगडित विविध विषयांवर ग्रंथपालाने स्वत: किंवा आपल्या व्यवसायबंधूंची व्याख्याने आयोजित करावीत. लेखकांच्या मुलाखती आयोजित करून विद्यार्थ्यांना उत्तेजन द्यावे. चांगली नियतकालिके, पुस्तक परीक्षणे वाचणे किंवा लिहिणे, ग्रंथालयांचे सभासद होणे, घरी स्वत:चे ग्रंथालय सुरू करणे त्यातून मित्र मैत्रिणींना पुस्तकांचे आदानप्रदान करण्यास उत्तेजन देणे असे उपक्रम ग्रंथपालाने आयोजित करावेत.

### माहिती संकलन, सादरीकरण

इयत्ता नववी ते बारावी (वय १४-१८) : या गटातील विद्यार्थ्याला विविध विषयांवर भाष्य करणारे, सामाजिक प्रश्न, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यास मदत करणारे, संस्कृती, प्राचीन ग्रंथसंपदा याची सखोल ओळख करून द्यावी. माहितीची गरज ओळखणे, योग्य स्रोत निवडणे व माहिती मिळविणे, त्याचे मूल्यमापन करणे, माहितीचे योग्य सादरीकरण आणि उपयोजन करणे ही कौशल्ये व्याख्याने व प्रात्यक्षिकांतून रुजविण्याचे कार्य ग्रंथपालाने करावे. इंटरनेटवरील विविध स्रोत कसे वापरावेत. अधिकृत, विश्वासार्ह, अद्ययावत स्रोत कसे ओळखावेत, त्यातून सुरक्षितपणे माहिती कशी मिळवावी याचाही अंतर्भाव माहितीची साक्षरता कार्यक्रमात असावा. अगदी नकळत्या वयात ग्रंथालयाची, ग्रंथांची, वाचनाची आवड निर्माण करून ते अभिरुचीसंपन्न वाचक आणि त्यातून उच्च मूल्याधारित साक्षर नागरिक घडविण्याच्या कामी शालेय ग्रंथपाल महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. मुळातच ग्रंथतज्ज्ञ आणि वाचन प्रशिक्षक असणाऱ्या शालेय ग्रंथपालांना शाळेच्या इतर ग्रंथालयेतर कामांमध्ये अडकवले जाऊ नये, इतरांनी त्यांच्या कामात हस्तक्षेप करू नये, ही अपेक्षा आहे. शैक्षणिक धोरणात ग्रंथालय आणि ग्रंथपालांबाबत स्पष्टपणे काहीही म्हटले नसले तरी शालेय स्तरावर हे शैक्षणिक धोरण यशस्वी होण्यात शालेय ग्रंथपाल महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात, हे नक्की!

**(लेखक आदर्श बहुव्यापी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालय, पुणे येथे ग्रंथपाल आहेत.)**

Sakal 7.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

सकाळ

### शैक्षणिक गुणवत्ता परिषदेचे उद्घाटन

पुणे, ता. ६ : भारतातील सर्व विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण सुलभ आणि परवडणारे बनविण्यावर सर्वाधिक भर द्यायला हवा. आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन, उद्योजकता आणि नावीन्यपूर्णतेला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. सध्या आपण बदलाच्या उंबरठ्यावर आहोत म्हणूनच सर्वांसाठी शिक्षण सुलभ आणि परवडणारे बनवले पाहिजे, असे आवाहन भारतीय तंत्रज्ञान संस्था मद्रासचे संचालक प्रा. डॉ. व्ही कामकोटी यांनी व्यक्त केले.

जागतिक स्तरावर शैक्षणिक क्षेत्रातील भारताची नियोजनबद्ध वाटचाल या विषयावर आधारित क्यूएस आय-गेजतर्फे आयोजित दुसऱ्या शैक्षणिक गुणवत्ता परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, निम्सचे माजी कुलगुरू डॉ. राजन सक्सेना, संचालक डॉ. अश्विन फर्नांडिस, कार्यकारी अधिकारी रवीन नायर उपस्थित होते. सेजल जोधवानी यांनी सूत्रसंचालन केले.

Pune, Pune-Today
07/07/2023 Page No. 1

सकाळ

### 'पीएच.डी. असल्यास सेट-नेटची गरज नाही'

पुणे, ता. ६ : तुमच्याकडे पीएच.डी. असेल तर सहाय्यक प्राध्यापक पदासाठी तुम्हाला सेट किंवा नेटची आवश्यकता नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने बुधवारी (ता. ५) काढलेल्या नव्या आदेशासंबंधी गुरुवारी पुन्हा स्पष्टीकरण दिले आहे. ज्यात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी एकतर तुम्ही सेट किंवा नेट पात्र असावेत, किंवा किमान पीएच.डी. धारक असणे गरजेचे असल्याचे, युजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदीश कुमार यांनी म्हटले आहे.

सहाय्यक प्राध्यापक पदासाठीच्या राज्य आणि केंद्रीय स्तरावरील पात्रता परीक्षांबरोबरच (सेट, नेट) पीएच.डी. असणे अनिवार्य करण्यात आले होते. आता हे सर्व निकष एकमेकांना पर्यायी गृहीत धरण्यात आले आहे. यासंबंधी युजीसीने ट्वीट करत अधिकचे स्पष्टीकरण दिले आहे. प्रा. जगदीश कुमार म्हणतात, "पीएच.डी. धारक उमेदवाराला नेट किंवा सेटमधून सूट देण्यात आली आहे. ज्यामुळे ते थेट सहाय्यक प्राध्यापक पदाच्या भरतीसाठी पात्र ठरतील. सहाय्यक प्राध्यापक म्हणून नियुक्तीसाठी 'पीएचडी'ची पात्रता वैकल्पिक राहील. तसेच राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), राज्य पात्रता परीक्षा (सेट) आणि राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (स्लेट) उत्तीर्ण उमेदवारांना भरती प्रक्रियेत सहभागी होता येईल."

**'यूजीसी' म्हणतो...**

ज्यांच्याकडे पीएच.डी. पदवी नाही त्यांच्यासाठी सहाय्यक प्राध्यापकाच्या थेट भरतीसाठी नेट किंवा एसएलईटी किंवा सेट ही किमान अट आहे. परंतु यूजीसी नियमांनुसार प्रदान केलेल्या पीएच.डी.धारकांना यामधून सूट देण्यात आली असून, ते सहाय्यक प्राध्यापक पदाच्या भरतीसाठी पात्र आहे, असे 'युजीसी'ने म्हटले आहे.

Pune, Main
07/07/2023 Page No. 3

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

पुढारी

### शैक्षणिक संस्थांतील जातीय भेदभाव संपवण्यासाठी कोणती पावले उचलली?

**सर्वोच्च न्यायालयाचा विद्यापीठ अनुदान आयोगाला सवाल**

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक संस्थांमधील जातीय भेदभाव गंभीर असून, अशाप्रकारचा भेदभाव संपवण्यासाठी कोणती पावले उचलली ते सांगा, असे सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाला विचारले आहे. रोहित वेमुला व डॉ. पायल तडवी यांच्या मातांनी केलेल्या याचिकेच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हा सवाल केला.

१७ जानेवारी २०१६ रोजी रोहित वेमुलाने, तर २२ मे २०१९ रोजी आदिवासी विद्यार्थिनी असलेल्या डॉ. पायल तडवी हिने आत्महत्या केली होती. रोहित आणि पायलच्या आई याबाबत आवाज उठवत असून, त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

सुप्रीम कोर्टात न्यायमूर्ती ए. एस. बोपण्णा आणि एम. एम. सुंदरेश यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी या याचिकेची सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वकील इंदिरा जयसिंग म्हणाल्या की, शैक्षणिक संस्थांमध्ये जातीय भेदभावाच्या तक्रारी दूर करण्यासाठी २०१२ मध्ये यूजीसीने तयार केलेले नियम पुरेसे नाहीत. अँटी-रॅगिंग नियमांशी तुलना करता यूजीसीचे नियम कठोर नाहीत, असे दिसून येते. केंद्र सरकारला याबाबत २०१९ मध्ये नोटीस जारी करण्यात आली होती, ही बाबदेखील त्यांनी खंडपीठासमोर लक्षात आणून दिली. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने हा अतिशय गंभीर मुद्दा असून, काही चिंता व्यक्त केल्या जात आहेत. तुम्ही त्यास कसे सामोरे जाणार आहात आणि या जातीय भेदभावांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलली आहेत? असा प्रश्न यूजीसीला विचारला. या प्रकरणाची सुनावणी आता चार आठवड्यानंतर होणार आहे.

Pune Edition
Jul 7, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

### शैक्षणिक भेदभाव रोखण्यास काय केले?

**वेमुलाप्रकरणी 'यूजीसी'ला कोर्टाची विचारणा**

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

'शैक्षणिक संस्थांमधील भेदभाव ही अत्यंत गंभीर बाब आहे. तो रोखण्यासाठी केलेल्या अथवा प्रस्तावित उपाययोजनांचे तपशील सादर करा,' असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाला (यूजीसी) गुरुवारी दिला. रोहित वेमुला आणि पायल तडवी यांच्या आत्महत्यांसदर्भात याचिकांवरील सुनावणीवेळी हा आदेश देण्यात आला.

"सन २०१२मध्ये आखून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे बंधनकारक नाहीत. लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (पॉश) किंवा रॅगिंगविरोधी कायदा याप्रमाणेच जातीय भेदाभेदासाठीही शिक्षेची तरतूद असणारा कठोर कायदा करणे आवश्यक आहे.
– अ‍ॅड. इंदिरा जयसिंह, वेमुला व तडवी कुटुंबीयांच्या वकील

जातीय भेदभाव झाल्यास काही विद्यार्थी शिक्षण सोडून देण्याचीही भीती आहे. त्यामुळे या समस्येविषयी काही चाकोरीबाहेरचा तोडगा काढणे आवश्यक आहे.
– न्या. एम. एम. सुंदरेश, न्यायमूर्ती, सर्वोच्च न्यायालय

न्या. ए. ए. बोपण्णा आणि न्या. एम. एम. सुंदरेश यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

'याचिकेत उपस्थित करण्यात आलेल्या चिंतांचे निराकरण करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय केलेत किंवा कोणते उपाय प्रस्तावित केले आहेत? भविष्यात अशा घटनांना पायबंद बसेल, अशा उपाययोजना करा,' असे खंडपीठाने 'यूजीसी'ला सांगितले.

Maharashtra Times 7.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# करिअर वृत्तान्त

१० WWW.LOKSATTA.COM
शुक्रवार, ७ जुलै २०२३

# परदेशी विद्यापीठांसोबत अभ्यासक्रम

ओळख शिक्षण धोरणाची

प्रा. रवींद्र कुलकर्णी

**नव्या राष्ट्रीय** शैक्षणिक धोरणासंबंधीची चर्चा आता अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन ठेपली होती. परदेशी उच्च शिक्षण संस्था किंवा विद्यापीठांसमवेत समवेत भारतीय उच्च शिक्षण संस्था किंवा विद्यापीठे ही त्यांचा संयुक्त किंवा दुहेरी पदवी कार्यक्रम कसा आखणार यावर आज प्रा. रमेश सर सांगणार होते. प्रा. सुनील, प्रा. सुशील, प्रा. महेश यांच्याबरोबर आज सुनीता, वेदिका, मेघन, हंसिका, मिलिंद, तन्मय, जावेद असे विविध महाविद्यालयांतून नुकतेच पदवीधर झालेले विद्यार्थी-विद्यार्थिनीही आज चर्चेत सहभागी झाले होते. सर्वांनाच आता यासंबंधी उत्सुकता निर्माण झालेली होती. प्रा. महेश सरांनी रमेश सरांना विचारलं, "सर, दुहेरी किंवा संयुक्त पदवी अभ्यासक्रम कसा तयार केला जाईल?" तन्मय नुकताच परदेशी विद्यापीठांतून एक पदवी मिळवून परतला होता. त्यानं विचारलं, "सर, भारतीय आणि परदेशी उच्च शिक्षण संस्था आपापला अभ्यासक्रम स्वतंत्रपणे आखतील किंवा कसं?"

प्रा. रमेश सर म्हणाले, "सांगतो, सांगतो. घाई करू नका. भारतीय किंवा परदेशी उच्च शिक्षण संस्था या दुहेरी पदवी कार्यक्रमाच्या तयारीसाठी एकाच विषयात किंवा विषय क्षेत्रात आणि समान स्तरावर एकत्र येतील आणि अभ्यासक्रम संयुक्तपणे तयार करतील. अशा कार्यक्रमांसाठीच्या पदव्या भारतीय आणि परदेशी उच्च शिक्षण संस्थांद्वारे स्वतंत्रपणे आणि एकाच वेळी दोन्ही संस्थांच्या पदवी मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या अटींची पूर्तता पूर्ण केल्यावर प्रदान केल्या जातील. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांनुसार, हे कोणत्याही प्रकारे वेगळ्या विषयातील किंवा विषय क्षेत्रांमध्ये आणि/किंवा एकाच वेळी पाठपुरावा केल्या जाणाऱ्या स्तरांवरील स्वतंत्र असे दोन पदवी कार्यक्रम असे मानले जाऊ शकत नाही. या कार्यक्रमांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी भारतीय उच्च शिक्षण संस्थेकडून एकूण श्रेयांकांपैकी किमान ३० टक्के श्रेयांक मिळवणे आवश्यक आहे. परदेशी संस्थांमधून भारतीय विद्यार्थ्यांनी मिळवलेले श्रेयांक आणि भारतीय संस्थांमधून परदेशी विद्यार्थ्यांनी मिळवलेले श्रेयांक हे पारंपरिक पद्धतीने दिले जातील.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांनुसार, संयुक्त पदवी कार्यक्रम अभ्यासक्रमाची रचना भारतीय आणि परदेशी उच्च शिक्षण संस्थेद्वारे संयुक्तपणे केली जाईल. विद्यार्थ्यांनी संयुक्त पदवी कार्यक्रम पूर्ण केल्यावर त्यांना प्रदान केली जाणारी पदवी ही भारतीय उच्च शिक्षण संस्था आणि सहयोगी परदेशी उच्च शिक्षण संस्थेद्वारे एकाच प्रमाणपत्र देऊन प्रदान केली जाईल. यात सहभागी झालेली प्रत्येक उच्च शिक्षण संस्था ही त्यांच्या संबंधित अभ्यासक्रमांसाठी एक Transcript जाहीर करेल आणि त्याद्वारे संबंधित विद्यार्थ्यांनी आपापल्या अभ्यासक्रमातील कोणकोणते घटक पूर्ण केले आहेत त्याविषयी माहिती देईल."

वेदिकाने रमेश सरांना मध्येच थांबवून विचारलं, "सर, एखाद्या विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थिनीला काही कारणास्तव संयुक्त किंवा दुहेरी पदवी अभ्यासक्रम पूर्ण करता आला नाही तर त्यांनी पूर्ण केलेल्या अभ्यास घटकांशी संबंधित श्रेयांक त्यांना भविष्यात वापरता येतील का?" रमेश सर त्वरित म्हणाले, "होय, अशा प्रकारची तरतूद या संयुक्त वा दुहेरी पदवी अभ्यासक्रमांत सहभागी झालेल्या भारतीय वा परदेशी उच्च शिक्षण संस्थांनी तयार करून ठेवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर दुहेरी आणि संयुक्त पदवी कार्यक्रमांशी संबंधित इतर सर्व तरतुदींसदर्भात सहभागी संस्थांनी त्यांच्या संबंधित संस्था आणि देशाच्या संबंधित नियम, नियम आणि कायद्यांचे पालन करून परस्पर निर्णय घ्यावा अशी अपेक्षा आहे."



प्रा. महेश सरांना एक नवाच प्रश्न पडला. त्यांनी रमेश सरांना विचारलं, "सर, Twinning पदवी अभ्यासक्रम व्यवस्थेशी संबंधित अभ्यासक्रम आणि श्रेयांकांची मान्यता यांच्याबद्दल काय?" प्रा. रमेश सर म्हणाले, "Twinning पदवी अभ्यासक्रम ही एक सहयोगी व्यवस्था असेल. या व्यवस्थेद्वारे भारतीय उच्च शिक्षण संस्थेमध्ये नोंदणी केलेले विद्यार्थी त्यांचा अभ्यासाचा कार्यक्रम अंशतः भारतात, संबंधित UGC नियमांचे पालन करून आणि अंशतः परदेशी उच्च शिक्षण संस्थेमध्ये पूर्ण करू शकतील. भारतीय आणि परदेशी विद्यापीठांनी अशा प्रकारे Twinning अभ्यासक्रमांची रचना एकत्रितपणे करायला हवी. तथापि, Twinning पदवी अभ्यासक्रम व्यवस्थेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिली जाणारी पदवी ही केवळ महाराष्ट्रातील राज्य सार्वजनिक विद्यापीठांसह भारतीय उच्च शिक्षण संस्थेद्वारे दिली जाईल, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या संदर्भात Twinning या संयुक्त पदवी अभ्यासक्रमांत सहयोगी असलेली प्रत्येक उच्च शिक्षण संस्था ही आपापल्या अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांनी निवडलेल्या घटकांविषयी टिप्पणी देणारा Transcript जारी करेल. दुहेरी, Twinning या संयुक्त पदवी अभ्यासक्रमांमागील एक महत्त्वाची कल्पना म्हणजे सांस्कृतिक देवाणघेवाण आणि सामाजिक समन्वयाच्या मदतीने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास!" रमेश सर सांगत होते, "दुहेरी, Twinning या संयुक्त अभ्यासक्रमांमुळे भारतीय विद्यार्थ्यांना एक प्रकारची गतिशीलता लाभेल; या गतिशीलतेमुळे आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी संस्था/विद्यापीठांमध्ये असलेल्या विविध प्रकारच्या सर्वोत्तम पद्धती, दृष्टिकोन आणि शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धती समजून येतील आणि त्यांनी आपला विद्यार्थी काळाची नवनवी आव्हानं स्वीकारण्यासाठी सुसज्ज होईल; आपल्या भारतीय उच्च शिक्षण संस्थांच्या क्षमता यामुळे वाढवण्यात मदत होईल आणि आमच्या विद्यार्थ्यांना आपल्या आवडीची करिअर निवडण्यामध्ये मदत होईल. संयुक्त अभ्यासक्रमाची आखणी करताना विद्यार्थ्यांच्या गरजेचा विचार करून मग, मूल्यांकनाच्या आधारे आणि संबंधित सत्राच्या अभ्यासक्रमाच्या संरचनेला पूरक अशी संयुक्त अभ्यासक्रमाची रचना तयार केली जाऊ शकते."

सुशील सरांनी प्रश्न केला, "सर, या दुहेरी, Twinning किंवा संयुक्त पदवी अभ्यासक्रमांच्या श्रेयांकांचं हस्तांतरण कसं केलं जाणार आहे?" प्रा. रमेश सरांनी उत्तर दिलं, "विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६ च्या कलम २२(३) च्या तरतुदींच्या अनुषंगाने श्रेयांकांचं मानांकन आणि हस्तांतरण व्यवस्था तयार केली जाईल. या टप्प्यावर आपण एक गोष्ट समजून घेऊ या ती म्हणजे, श्रेयांक मान्यता आणि हस्तांतरण म्हणजे काय? याचं उत्तर आहे, परदेशी उच्च शिक्षण संस्थेद्वारे एखाद्या अभ्यासक्रमासाठी दिले जाणारे श्रेयांक व त्यांना मान्यता देणे, त्यांचे परिमाण ठरवणे आणि अभ्यासक्रमात त्यांना समाविष्ट करणे। परदेशी उच्च शिक्षण संस्थेनं विद्यार्थ्यांना, त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, द्यावयाचे जे श्रेयांक आहेत त्यांना मान्यता देण्यासाठी, त्यांचे हस्तांतरण होण्यासाठी राज्य सार्वजनिक विद्यापीठांबरोबर किंवा उच्च शिक्षण संस्थांसमवेत एक अन्योन्य व्यवस्था निर्माण करणे, त्यासाठी आवश्यक ते करार त्यांनी परस्परांत करून घेणे आवश्यक ठरेल. असे असले तरी, इथं एक अट आहे, ती म्हणजे विद्यार्थ्यांनी परदेशी उच्च शिक्षण संस्थेच्या अभ्यासक्रमांमधून मिळवलेले श्रेयांक हे एकूण श्रेयांक व्यवस्थेच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक असू नयेत. एखाद्या विद्यार्थ्याला वा विद्यार्थिनीला जर दुहेरी वा संयुक्त पदवी अभ्यासक्रम पूर्ण न करता मध्येच सोडावा लागला तर, त्यांना तो अभ्यासक्रम सोडण्यासाठी म्हणजे त्यातून निर्गमन करण्यासाठी व तोवर मिळवलेले श्रेयांक भविष्यात पुन्हा वापरता येण्यासाठी, योग्य ती तरतूद संबंधित दोन्ही- भारतीय व परदेशी उच्च शिक्षण संस्थांनी करून ठेवणे आवश्यक असेल." रमेश सर थांबले व म्हणाले, "पुढच्या वेळेस आपण या धोरणाचे आणखी काही वेगळे पैलू पाहू या."

**अनुवाद : डॉ. नीतिन आरेकर**

लोकसत्ता Fri, 07 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72873032

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# विद्यापीठ परीक्षांच्या निकालांना विलंब; अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करा

## उच्च शिक्षण संचालकांचे आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे निकाल ३० जूनपर्यंत प्रसिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे निकाल वेळेत जाहीर न होण्याबाबत एका अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून त्याबाबतचा अहवाल तत्काळ उच्च शिक्षण संचालनालयाकडे पाठवण्याचे आदेश उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांना दिले.

गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२२ मध्ये राज्यपालांनी कुलगुरूंची बैठक घेऊन सत्र परीक्षांचे निकाल सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार किमान ३०, तर कमाल ४५ दिवसांत जाहीर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. राज्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त केवळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाच्या सत्र परीक्षांचे निकाल जाहीर झालेले नाहीत. या तीनही विद्यापीठांचे निकाल १५ जुलैपर्यंत जाहीर होणार आहेत. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे निकाल येत्या ३१ जुलैपर्यंत जाहीर होणार नसल्याची माहिती विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिली.

परराज्यात आणि परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सत्र परीक्षांचे निकाल वेळेवर जाहीर होणे गरजेचे असते. निकालास विलंब झाल्याने प्रामुख्याने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) राबवण्यात येणाऱ्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला विलंब होत आहे. एका विद्यापीठाचा निकाल रखडल्यास त्याचा संपूर्ण परिणाम प्रामुख्याने सीईटी सेलच्या संपूर्ण प्रवेश प्रक्रियेवर होतो. याची कल्पना असूनही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल ३० जूनपर्यंत जाहीर न होणे प्रशासकीयदृष्ट्या खेदजनक आहे. त्यामुळे निकाल जाहीर न करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून त्याचा अहवाल सादर करण्याबाबत डॉ. देवळाणकर यांनी नमूद केले आहे.

### एकावर कारवाई करणे कितपत उचित?

गेल्यावर्षी सीईटी सेलतर्फे विविध व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया साधारणपणे नोव्हेंबरपर्यंत सुरू होती. शैक्षणिक वर्षात एका सत्राचा अभ्यासक्रम पूर्ण होण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी देऊन परीक्षा घेण्याचा नियम आहे. परिणामी विद्यापीठाच्या परीक्षांना विलंब झाला. त्यामुळे सीईटी सेलची प्रवेश प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू राहण्यास उच्च व तंत्रशिक्षण विभागही जबाबदार आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निकाल विलंबाने जाहीर झाल्याबाबत एकाच अधिकाऱ्यावर कारवाई करणे कितपत उचित आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

लोकसत्ता Sat, 08 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72879915

---

सकाळ

# गुणपत्रकाअभावी करिअर दावणीला

## रखडलेल्या परीक्षेचा फटका

**पुणे, ता. ७ :** वाणिज्य शाखेत बी.कॉम.च्या शेवटच्या वर्षाला असलेल्या ओंकारने पुढे वकिली करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्याने राज्य सामाईक प्रवेश प्रक्रिया उत्तीर्ण होत एलएल.बी.साठी अर्जही दाखल केला. परंतु, अजूनही बी.कॉम.च्या परीक्षा चालू असल्यामुळे त्याच्याकडे शेवटच्या वर्षाचे गुणपत्रक नाही. पर्यायाने सोमवारपर्यंतची (ता. १०) मुदत संपल्यानंतर, त्याचा एलएल.बी.चा प्रवेश नाकारला जाण्याची शक्यता आहे. केवळ ओंकारच नाही तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थ्यांची हीच अवस्था असून, गुणपत्रक अभावी त्यांचे करिअरच दावणीला बांधले गेले आहे.

केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नाही तर कोरोनानंतर अजूनही अनेक विद्यापीठांचे शैक्षणिक वेळापत्रक पूर्वरत झालेले नाही. त्यामुळे एप्रिल- मे महिन्यात होणाऱ्या परीक्षांना उशीर झाला आहे. अजूनही अनेक विषयांच्या परीक्षा बाकी असल्यामुळे निकालाला उशीर होत आहे. त्यात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वेळेत प्रवेश प्रक्रिया पार पडण्यासाठी विद्यार्थ्यांनी शेवटच्या वर्षाचे गुणपत्रक जमा करणे आवश्यक आहे. अशा दुहेरी अडचणीत विद्यार्थी सापडले असून, परीक्षेचा अभ्यास करावा की प्रवेश प्रक्रियेची पूर्तता करावी यात ते अडकले आहे.

> विद्यार्थी विद्यापीठाकडून घोषित झालेल्या ऑनलाइन निकालाची प्रत अपलोड करू शकतात. मूळ गुणपत्रक नंतर महाविद्यालयांकडे जमा करावे.
>
> **- घनश्याम केदार,** सहायक परीक्षा समन्वयक, सीईटी सेल

**पदव्युत्तर प्रवेशात अडचणी**

महाविद्यालयीन परीक्षा बाकी असल्याने बहुतेक पदवी अभ्यासक्रमांचे निकाल अजून बाकी आहे. त्यामुळे व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्यांसह पदवीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचण येत आहे. त्यामुळे या वर्षीही प्रवेश प्रक्रिया वेळेत पार पडण्याचे आव्हान सीईटी सेलकडे असणार आहे.

### विद्यार्थ्यांसमोरील अडचणी

- पुढील प्रवेशप्रक्रियेसाठी गुणपत्रकच उपलब्ध नाही
- व्यावसायिक प्रवेशप्रक्रियेतून बाद होण्याची शक्यता
- यंदाच्या प्रवेशप्रक्रियेतून बाद होत, वर्ष वाया जाण्याची शक्यता
- पुढील वर्षी पुन्हा प्रवेश परीक्षेचा अभ्यास करावा लागेल
- शेवटच्या वर्षाच्या परीक्षेचा अभ्यास करावा की गुणपत्रकासाठी प्रयत्न करावे

Pune Main
08/07/2023 Page No. 3

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

सकाळ

# पुणे विद्यापीठाला शिक्षण विभागाने फटकारले

## प्रलंबित निकालामुळे रखडली राज्यातील प्रवेशप्रक्रिया

**पुणे, ता. ७ :** राज्यात सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) वेळेत झाल्या, त्याचे निकालही जाहीर झाले, अगदी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (कॅप)सुद्धा घोषित झाली. परंतु संपूर्ण राज्यात केवळ एका विद्यापीठामुळे प्रवेशाची पुढील प्रक्रिया रखडली आहे. हे विद्यापीठ दुसरे, तिसरे कोणतेही नसून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आहे. यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांच्या उपस्थितीत विद्यापीठांच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक आणि कुलसचिव यांची बैठक गुरुवारी मंत्रालयात झाली. यात पुणे विद्यापीठाच्या कामकाजावर ताशेरे ओढण्यात आले आहेत.

विविध पदवी अभ्यासक्रमांचा (तृतीय वर्ष) निकाल लावण्यास पुणे विद्यापीठाला विलंब होत असल्याने एकीकडे पुढील अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया आणि दुसरीकडे रखडलेला निकाल अशा परिस्थितीत हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे.

कोरोना काळात शैक्षणिक वेळापत्रक विस्कळित झाले होते. ते पूर्वपदावर आणून २०२२-२३ हे वर्ष सुरळीतरीत्या कार्यान्वित करण्याचे आदेश शासनस्तरावरून वेळोवेळी देण्यात आले होते. परंतु सीईटी सेलचा निकाल घोषित झाल्यानंतर कॅप अंतर्गत प्रवेशाच्या फेऱ्याही जाहीर झाल्या. प्रवेशास अर्ज करण्यासाठी दिलेल्या मुदतीत वाढ देखील करण्यात आली. तरी सुद्धा पुणे विद्यापीठाने निकाल लावलेला नाही.

### निकालास विलंबाचे परिणाम

- राज्यात किंवा परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर टांगती तलवार
- 'सीईटी सेल'द्वारे होणाऱ्या पदवीनंतरच्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया रखडणार
- पुन्हा शैक्षणिक वर्ष विस्कळित होणार
- थेट परिणाम राज्य सामाईक प्रवेश प्रक्रियेवर होणार

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा उशिरा निकाल लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येत आहे. राज्य सामाईक प्रवेशप्रक्रियेस विलंब होत आहे, ही बाब प्रशासकीयदृष्ट्या खेदजनक आहे. अशाप्रसंगी विद्यापीठाने कायद्यानुसार ३० किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसांत निकाल जाहीर करणे अपेक्षित आहे. परंतु त्यानुसार दिलेल्या कालावधीत निकाल जाहीर न करण्यास, निकालास विलंब होण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी आणि त्याचा अहवाल तत्काळ संचालनालयास सादर करावा, असे पत्र विद्यापीठाच्या कुलसचिवांना पाठविले आहे.
>
> **- डॉ. शैलेंद्र देवळाणकर,** राज्याचे उच्च शिक्षण संचालक

### कुलसचिवांचा नकार

निकालास विलंब झाल्याप्रकरणी जबाबदारी निश्चित करून अहवाल सादर करण्याचे पत्र उच्च शिक्षण संचालनालयाने कुलसचिवांना पाठविले आहे. या संदर्भात विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी माहिती देण्यास नकार दिला.

### कायदा काय सांगतो

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९७ नुसार परीक्षांचे निकाल हे परीक्षेच्या अखेरच्या दिवसापासून ३० दिवसांत जाहीर करणे आणि कोणत्याही परिस्थितीत (कलम ८९ नुसार) उशिरात उशिरा ४५ दिवसांत निकाल जाहीर करणे आवश्यक आहे. विलंब झाल्यास त्याची कारणे नमूद करून सविस्तर अहवाल तयार करावा, अशी तरतूद आहे.

Pune, Main
08/07/2023 Page No. 3

# प्रवेश प्रक्रिया रखडल्या

## उच्च शिक्षण संचालकांकडून विद्यापीठाला कारवाईचा आदेश

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे निकाल ३० जूनपर्यंत प्रसिद्ध झाले नाहीत. त्यामुळे निकाल वेळेत जाहीर न करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई निश्चित करून, त्याचा अहवाल तत्काळ उच्च शिक्षण संचालनालयाकडे पाठवावा, असे आदेश उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांना दिले आहेत.

राज्यातील ९० टक्के विद्यापीठांचे निकाल १५ जुलैपर्यंत जाहीर होणार आहेत. मात्र, पुणे विद्यापीठाचे निकाल राज्यात सर्वांत उशिरा प्रसिद्ध होणार असल्याने, पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया विलंबाने होणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२२मध्ये कुलगुरुंच्या संयुक्त बैठकीत, सत्र परीक्षांचे निकाल सार्वजनिक विद्यापीठ कायद्याच्या अनुसार किमान ३० आणि कमाल ४५ दिवसांमध्ये जाहीर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. राज्यात पुणे विद्यापीठाच्या व्यतिरिक्त केवळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाच्या सत्र परीक्षांचे निकाल जाहीर झालेले नाहीत. या तिन्ही विद्यापीठांचे निकाल येत्या १५ जुलैपर्यंत जाहीर होणार आहेत. मात्र, पुणे विद्यापीठाचे निकाल येत्या ३१ जुलैपर्यंत जाहीर होणार नसल्याची माहिती पुणे विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिली.

परराज्यांत आणि परदेशांत शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सत्र परीक्षांचे निकाल वेळेवर जाहीर होणे गरजेचे असते. प्रामुख्याने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) राबविण्यात येणाऱ्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला विलंब होत आहे. एका विद्यापीठाचा निकाल रखडल्यास, त्याचा संपूर्ण परिणाम प्रामुख्याने सीईटी सेलच्या प्रवेश प्रक्रियेवर होणार आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या परीक्षांचा निकाल वेळेवर जाहीर न करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना डॉ. प्रफुल्ल पवार यांना दिल्याचे डॉ. देवळाणकर यांनी सांगितले.



> **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निकाल उशिराने जाहीर होत असल्याने, त्याचा परिणाम राज्यातील उच्च शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियांवर होणार आहे. त्याचप्रमाणे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता आहे. ही संपूर्ण बाब फार गंभीर स्वरूपाची आहे.**
>
> – डॉ. शैलेंद्र देवळाणकर,
> प्रभारी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय

### एकावर कारवाई करून प्रश्न सुटणार का?

सीईटी सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३मध्ये विविध व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही साधारण नोव्हेंबर महिन्यापर्यंत सुरू होती. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा उशिराने झाल्या. शैक्षणिक वर्षात एका सत्राचा अभ्यासक्रम पूर्ण होण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी देणे हा नियम आहे. त्यानंतर परीक्षा होणे गरजेचे आहे. त्यानुसार विद्यापीठाने परीक्षा घेतल्या असून, निकालाच्या प्रक्रियेत आहे. या पार्श्वभूमीवर प्रवेश प्रक्रिया उशिराने राबविण्यासाठी राज्याचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि राज्याचा सीईटी सेलही तेवढाच जबाबदार आहे. त्यामुळे केवळ पुणे विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून शैक्षणिक वर्ष सुरळीत होणार आहे का, असा प्रश्न अभ्यासकांकडून उपस्थित करण्यात आला आहे.

Maharashtra Times 8.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

City | PuneMirror | Saturday, July 8, 2023 | 3

# 100% fees to be refunded on cancellation of admission: UGC


**Owners of colleges and institutes express displeasure over decision; urge Commission to formulate clear guidelines**

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

Many students and their parents struggle to get a refund of admission fees if they cancel admission for some reason. Now, the University Grant Commission (UGC) has directed all higher educational institutions to refund 100 percent fees to such students by September 30.

UGC chairman Mamidlal Jagadesh Kumar has announced this. It has provided relief for students and parents. However, colleges and institute owners and management expressed displeasure over the UGC decision. They urged the national body to set clear guidelines with the help of college managements.

Many educational institutes do not refund the admission fees in case of cancellation of admission. In this regard, the UGC received representations and complaints from students and parents.



Getting the fees refunded was a big problem for students and parents

Meanwhile, the issue was discussed in the 570th meeting of the UGC held on June 27. Now, instructions have been issued to educational institutions. The UGC has said that the rule will be implemented from the academic year 2023-24.

Sachin Joshi, a parent, said, "I welcome the decision taken by the UGC. Colleges and institutes do not refund the full fees and mentally harass parents. Any student can cancel admission due to genuine reasons, but most college administrations do not cooperate with them. They loot students in the name of processing fees. This decision will provide a big relief to all."

Managing director of a top college, on the condition of anonymity, told Mirror, "I personally disagree with the UGC decision. Because this decision is one-sided, the college managements' views have not been taken into consideration. It is a populist decision. It will create conflict between college managements and parents. Some activists and parents will misuse the rule. Thousands of colleges and education institutes will be adversely affected. The UGC should give a timeline for repayment. The 100 percent repayment decision is wrong."

Sudhakar Jadhvar, president, All Indian Principal Federation, said, "There is already a rule for the repayment of fees after cancellation of admission. The fee is refunded 100 percent after a week, 40 percent after 2 weeks and no refund after a month. But we were shocked when the UGC published a notification that 100 percent fees should be repaid after cancellation of admission."

"Suppose a seat is cancelled after the final deadline for any reason, that seat will remain vacant the whole year. College owners will have to bear that financial and academic loss. We will give suggestions to the UGC to clarify on the guidelines and rules for repayment after discussion with college and education institute owners."

Pune Mirror 8.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# Declare varsity results on priority: Min

**Chandrakant Patil holds urgent meeting with officials of state universities following student complaints**

HT Correspondent
puneletters@hindustantimes.com

**PUNE:** In response to a rising number of student complaints about difficulty in getting admission to post-graduate courses due to the results of most degree courses not having been declared by the Savitribai Phule Pune University (SPPU) and several other non-agricultural universities in Maharashtra, Pune guardian minister and minister of higher and technical education, Chandrakant Patil, held an urgent meeting with senior officials of all state universities wherein he instructed them to declare the results of all degree courses on priority basis.

The meeting regarding the examination results of all non-agricultural universities in the state, chaired by Patil, was held in Mumbai.

During the meeting, Patil instructed senior officials of all non-agricultural universities in Maharashtra to declare the results of degree courses within the prescribed timeframe.

Principal secretary of the higher and technical education department, Vikas Chandra Rastogi; director of higher education, Shailendra Devlankar; deputy secretary of the higher education department, Ajit Baviskar; state common entrance examination hall commissioner, Mahendra Varbhuvan; officials of all non-agricultural universities in the state; and related officials were present at the meeting.

A few days ago, Maharashtra Governor and chancellor of universities, Ramesh Bais, had reprimanded the universities for not declaring the results on time. However, the situation has not changed much ever since. The results of most of the state universities are on hold and the students are not getting their re-evaluation results either.

Admissions to MBA and other post-graduate courses have started after the results of the common entrance test (CET).

Manish Jain, a student, said, "I have appeared for the LLB last year examinations and want to take admission to a post-graduate course now. But as the results have not yet been declared by the SPPU, I cannot take admission."

## Over 76K seats vacant after FYJC second round

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com



Students, along with family members, completing the admission process of Class 11 at Modern College of Arts, Science and Commerce at Shivajinagar, on Friday. KALPESH NUKTE/HT PHOTO

**PUNE:** After completion of the second regular round of Class 11 or first year junior college (FYJC) admissions, 76,698 seats have remained vacant in the Pune and Pimpri-Chinchwad region. In the second regular round, of 98,056 students who registered for the online centralised admission process, only 37,852 students were admitted.

In the second regular round of Class 11 admissions, 66,861 seats were available for which 44,540 students were eligible of which, 20,602 were allotted a college. Of the 20,602 students, 1,883 were given the college of their first preference; 2,851 students got college of their second preference; while 1,885 students were given the college of their third preference.

The schedule of the third regular round of FYJC admissions for Pune region was declared by the director of education (secondary and higher secondary) Pune. Immediately after completion of the second regular round on July 5, the vacancy list was displayed by colleges while the allotment list of third round will be declared on July 12 at 10 pm.

According to the new schedule of the third regular round, new submissions and updating of part 2 forms started from July 6 and even new students can register for the admission process. Till 10 pm on July 9, the application form (part I) edit and choice filling or updating of option form (part 2) for the third round will be available online.

At 11 am on July 12, the junior college allotment list for the third round of admissions will be displayed online. Accordingly, the cut-off list for this round will be displayed and SMS will be sent to the students. "Then from 10 am on July 12 to 6 pm on July 14, students need to confirm their admission in the allotted colleges. Admission confirmation, rejection or cancellation needs to be carried out via student login," said Rajendra Ahire, deputy director, education department, Pune.

"New student registration and new part 1 filling will continue throughout for the next round. For students who have confirmed their admission in any junior college through the centralised admission round or through quota admissions, the admission process will be complete for them. The schedule for further admission rounds will be declared thereafter," Ahire said.

On July 14, colleges will upload status of admitted students on the website as well as display the quota-wise vacancy.

Hindustan Times 8.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

**वाङ्मयचौर्य किंवा साहित्यिक चोरी ही संकल्पना नवीन नसली, तरी जनमानसात याबाबत नक्कीच उत्सुकता आहे. शिक्षण व संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्यांना हे माहीत असेलच; परंतु सर्वसामान्यांना या संकल्पनेचा अर्थ समजावा, यासाठी हा लेखप्रपंच.**

# वाङ्मयातील चौर्यकर्म



**डॉ. शुभदा नगरकर**
mtedit@timesgroup.com

वाङ्मयचौर्याला इंग्रजीमध्ये 'प्लेजिअरिझम' म्हणतात. याचा शब्दशः अर्थ अपहरण करणारा असा होतो. वाङ्मयचौर्य म्हणजे दुसऱ्या व्यक्तीची साहित्यकृती, कल्पना, प्रक्रिया, संशोधनाचे परिणाम आणि शब्द योग्य श्रेय न देता स्वतःचे आहेत असे भासवणे व प्रकाशित करणे. या व्यतिरिक्त डेटा, किंवा प्रतिमांचीदेखील चोरी केली जाते. स्व-वाङ्मयचौर्य हेदेखील अनैतिक आहे. यामध्ये स्वतःच्या शब्दांचा, कल्पनांचा, कलात्मक अभिव्यक्तीचा पुनर्वापर त्यांच्या पूर्वीच्या वापराची पावती न देता करणे, म्हणजेच नवीन काही तरी लिहिले आहे, असे भासवणे.

वाङ्मयचौर्याची अनेक उदाहरणे प्रकाशित साहित्यात सापडतात. त्यावरून लक्षात येते, की ही संकल्पना खूप विस्तृत असून, प्राचीन काळापासून वरचेवर वाङ्मयचौर्यात वाढच झालेली दिसते. लिओनेल कॅसन यांच्या 'लायब्ररीज इन द एन्शंट वर्ल्ड' या पुस्तकात प्राचीन अलेक्झांड्रिया ग्रंथालयातील ग्रंथपाल अरिस्टोफेन्स याने राजा टॉलेमीने भरवलेल्या कविसंमेलनात उघडकीस आणलेली सातपैकी सहा कवींची साहित्यिक चोरी किंवा अलीकडील काळातील 'रिट्रॅक्शन वॉच' या संकेतस्थळावरील प्रथितयश जर्नल्समधील वाङ्मयचौर्यामुळे रद्द केलेले अनेक संशोधन निबंध, हे कृत्य अनैतिक असल्याचे सिद्ध करतात.

पंधराव्या शतकात गुटेनबर्ग यांनी लावलेला छपाईचा शोध आणि विसाव्या शतकातील इंटरनेट तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे वाङ्मयचौर्य अधिक वृद्धिंगत झाले. वाङ्मयचौर्य करण्यामागची अनेक कारणे तज्ज्ञांनी सांगितली आहेत. लिहिण्यासाठी वेळ व कष्टाची तयारी नसणे, आत्मविश्वासाचा अभाव, आळशीपणा, आपली चोरी सापडणार नाही अशी भावना, संकल्पना आपल्या शब्दांत मांडता न येणे, भाषेवर प्रभुत्व नसणे, वाचनाची कमतरता आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे लवकरात लवकर प्रसिद्धी मिळवणे, ही त्यापैकी महत्त्वाची कारणे. त्यातच शैक्षणिक संस्थांमध्ये पदोन्नतीसाठी संशोधन अनिवार्य केले गेल्याने, वाङ्मयचौर्य जगभरात साथीच्या रोगासारखे पसरले.

वाङ्मयचौर्याचे सोपे उदाहरण म्हणजे 'विकीपीडिया'वरून माहिती 'कॉपी आणि पेस्ट' करणे. शाळकरी मुलांच्या प्रकल्पापासून संशोधकांच्या निबंधांमध्ये असे वाङ्मयचौर्य सर्रास केलेले आढळते. यामध्ये अनेक प्रकार आढळतात. उदा. एका संशोधकाने कष्टाने जमविलेला डेटा आणि माहिती त्याच्या नकळत वापरणे, दुसऱ्याने लिहिलेला संशोधन निबंध थोडेफार बदल करून आपल्या नावावर छापणे, मूळ लेखकाला श्रेय न देता त्याच्या लिखाणाचे भाषांतर करणे इ. जगभरातील संशोधकांनी विद्यापीठ स्तरावर केलेल्या सर्वेक्षणात ७० टक्के विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रकल्प; तसेच 'टर्म पेपर' पूर्ण करण्यासाठी वाङ्मयचौर्य केलेले आढळले आहे. विशेष म्हणजे, हे विद्यार्थी याबाबत अजिबात गंभीर नाहीत. भारत याला कसा अपवाद असेल? वाङ्मयचौर्य करणे अनैतिक आहेच; परंतु बरेच वेळा हे नकळत घडताना दिसते. याचे कारण म्हणजे, वाङ्मयचौर्याच्या परिणामांबाबत संशोधक, विद्यार्थी आणि शिक्षक अनभिज्ञ असतात. कॉपीराइट आणि वाङ्मयचौर्य यांतील फरक बऱ्याच जणांना समजत नाही. कॉपीराइट हा कायदा आहे. कॉपीराइटचे उल्लंघन केल्यास आर्थिक दंड होतो; तसेच तुरुंगवासही होऊ शकतो. वाङ्मयचौर्यला कॉपीराइट लागू होत नसला, तरी असे करणाऱ्या व्यक्तीच्या व्यावसायिक प्रतिष्ठेला धक्का पोहोचतो. तो कॉपीराइटपेक्षा जास्त हानिकारक आणि अपमानकारक असतो. विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक, शिक्षक यांच्या संशोधनातील वाङ्मयचौर्य उघडकीस आले, तर त्यांच्या शैक्षणिक प्रतिष्ठेवर गंभीर परिणाम होतात. त्यांना दुसरी सन्माननीय नोकरी मिळणे निश्चितच कठीण जाते. ज्या संशोधक पत्रिकांत असे संशोधन छापून येते, त्या पत्रिकांच्या संपादकीय मंडळाच्या पुनरावलोकनाच्या कामाबाबत शंका व अनेक प्रश्न उपस्थित होतात. वैद्यकीय संशोधनातील वाङ्मयचौर्याचे परिणाम लोकांचे जीव जाण्यात होऊ शकते. उदाहरणार्थ, या विषयातील संशोधक लवकरात लवकर प्रसिद्ध होण्यासाठी वाङ्मयचौर्य केलेले बोगस निबंध बनावट संशोधन पत्रिकांत छापून आणतात. बारकाईने तपासले असता दिसते, की यांत रुग्णालयांमधील वास्तविक परिस्थितीवर आधारित संशोधन केलेले नसते, तर इतर शोधनिबंध जसेच्या तसे चोरून; त्यात रुग्णांचे वय, संशोधन पद्धती व औषधे यांत बदल करतात. असे निबंध नवसंशोधक व समाजाची दिशाभूल करतात.

एक स्वाभाविक प्रश्न मनात येतो, तो म्हणजे वाङ्मयचौर्य किंवा स्व-वाङ्मयचौर्य शोधून कसे काढतात? शिक्षकांना त्यांच्या विद्यार्थ्यांची (पदवी, पदव्युत्तर अथवा पी.एचडी.) लेखनशैली माहीत असते. त्याच्या लेखनातील वाक्यरचना किंवा विषयाची खोली यांत अचानक बदल, अपेक्षेपेक्षा किती तरी अधिक उत्तम लेखन, मधेच अचानक बदललेला अक्षराचा आकार, 'सायटेशन'च्या (माहितीचा मूळ स्रोत) वापरात विसंगती किंवा गहाळ 'सायटेशन' इ. आढळून आले, तर नक्कीच वाङ्मयचौर्य झाल्याचे समजू शकते.

आजकाल बरीचशी माहिती डिजिटल स्वरूपात असल्याने, वाङ्मयचौर्य (मजकूर समानता - 'कॉपी पेस्ट' केलेले) ओळखण्यासाठी संगणक प्रणालीचा वापर करण्यात येतो. 'टर्नइटइन' आणि 'ओरिजिनल' या ज्ञात व्यावसायिक संगणकप्रणाली 'मजकूर समानता' शोधण्यासाठी जगभरात वापरल्या जातात. या संगणकप्रणालीमध्ये डिजिटल स्वरूपातील संशोधन निबंध, लेख, प्रबंध इ. 'अपलोड' केले जातात आणि जगभरातील 'डेटाबेस' आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेले स्रोत तपासले जातात. ज्या स्रोतांशी जितका मजकूर जुळतो, त्याप्रमाणे टक्केवारीत अहवाल मिळतो. ही टक्केवारी प्रत्येक संस्था ठरवते आणि नियमावलीप्रमाणे शिक्षा देते. भारतात वाङ्मयचौर्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीनुसार, संशोधनात १० टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात वाङ्मयचौर्य आढळल्यास, विद्यार्थी पी.एचडी.चा प्रबंध सादर करू शकत नाही. संशोधक आणि त्याच्या मार्गदर्शकाने त्यावर परत काम करणे अपेक्षित आहे. संशोधकांनी केलेले संशोधन, पीएच.डी. प्रबंध व इतर साहित्य इंटरनेटवर सर्वांना सहजगत्या उपलब्ध असल्याने, वाङ्मयचौर्य लगेच उघडकीस येऊ शकते; त्यामुळे प्रत्येकाने योग्य ती काळजी घेणे क्रमप्राप्त आहे.

कोणत्याही लेखनात प्रत्येकाची स्वतःची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आपण कुठून काय उचलले आहे, याचे आपणच साक्षीदार असतो. नैतिकतेने केलेले कामच उत्कृष्ट व अव्वल ठरते. आपले विचार स्वतःच्या शब्दांत मांडणे कधीही उत्तम असते. दुसऱ्याचे साहित्य चोरून, त्यावर आपण कधीच काम करू शकत नाही. वाङ्मयचौर्य आणि त्याचे परिणाम याविषयीची जागरूकता शाळेतील मुले, पालक, विद्यार्थी, संशोधक, लेखक, लेखिका, कलाकार या सर्वांमध्ये करणे अनिवार्य आहे. या इंटरनेट मायाजालात आणि विषेशतः कृत्रिम बुद्धिमत्ता असलेला 'चॅट-जीपीटी'मुळे माहितीचा मूळ स्रोत आणि त्याची नक्कल, खरे-खोटे यांतील फरक ओळखणे कठीण होऊन बसेल. प्रत्येकाने स्वतःच नैतिकतेचे बंधन पाळणे सर्वांत उत्तम!

**(लेखिका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयशास्त्र विभाग आणि सेंटर फॉर पब्लिकेशन एथिक्स येथे कार्यरत आहेत.)**

सं वा द

Maharashtra Times 9.7.2023

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

पुढारी

# लेटलतिफ 'सेट'ला मुहूर्त कधी ?

## २०२२ ची परीक्षा यंदा मार्चमध्ये घेतली ; विद्यार्थ्यांचे डोळे २०२३ च्या प्रक्रियेकडे

पुढारी वॉच

गणेश खळदकर
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सहायक प्राध्यापकपदासाठी अनिवार्य असलेली स्टेट इलिजिबिलिटी टेस्ट (सेट) महाराष्ट्र आणि गोवा राज्यांत घेण्यात येते. संबंधित परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला आहे. मात्र, ही परीक्षा २०२२ ची होती. त्यामुळे २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या 'सेट'ला नेमका मुहूर्त कधी? असा प्रश्न परीक्षा देणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी उपस्थित केला आहे.**

महाराष्ट्र आणि गोवा राज्यात २६ मार्च २०२३ ला सेट घेण्यात आली आणि या परीक्षेचा निकाल २७ जून २०२३ ला जाहीर करण्यात आला. परंतु ही सेट ही २०२२ मध्ये घेण्यात येणारी होती. विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीकडून सेट घेण्यासंदर्भात दिलेली मुदत संपल्यामुळे विद्यापीठाला २०२२ मध्ये सेट घेता आली नव्हती. त्यामुळे २०२२ मध्ये सेट न घेता ती २६ मार्च २०२३ ला घेण्यात आली. आता मात्र पुढील पाच वर्षांसाठी सेट घेण्याची विद्यापीठाला परवानगी मिळाली आहे. त्यामुळे २०२३ या वर्षात घेण्यात येणारी सेट परीक्षा नेमकी कधी होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. विद्यापीठाकडे सेट परीक्षा घेण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे येत्या सहा महिन्यांत पुन्हा एकदा सेट होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. सेट ही मर्ज करण्याची कोणतीही नियमावली नाही. त्यामुळे विद्यापीठाला यावर्षीची सेट घेणे अनिवार्य आहे. २०१३ मध्येदेखील सेट दोनदा घेण्यात आली होती. १७ फेब्रुवारी आणि १ डिसेंबरला वर्षातून दोनदा परीक्षा घेण्यात आली. फेब्रुवारी महिन्यात झालेली परीक्षा २०१२ ची होती. त्यामुळे आता विद्यार्थ्यांचे एमएच सेट २०२३ कडे डोळे लागले आहेत.




### पात्र होणाऱ्यांमध्ये पुरुष अधिक

नुकत्याच निकाल जाहीर झालेल्या सेटसाठी १ लाख १९ हजार ८१३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यामध्ये ५१ हजार ५१२ पुरुष उमेदवार होते. त्यापैकी ४३ हजार ५१७ उमेदवारांनी परीक्षा दिली. तर ३ हजार ५७० उमेदवार सेटमध्ये पात्र झाले. त्यांची टक्केवारी ८.२० होती. तर ६८ हजार २७६ महिला उमेदवार होत्या. त्यापैकी ५७ हजार ७२३ उमेदवारांनी परीक्षा दिली. त्यातील ३ हजार १०४ महिला उमेदवार पात्र ठरल्या. त्यांची टक्केवारी ५.३८ होती. तर १७ तृतीयपंथी उमेदवारांनी परीक्षा दिली त्यातील दोन उमेदवार पात्र ठरले आहेत. सेट परीक्षेत पुरुष उमेदवारांचा दबदबा असल्याचे पहायला मिळाले.

> सेटचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. संबंधित परीक्षा २०२२ची होती. त्याच्या प्रमाणपत्रांची प्रक्रिया सुरू आहे. २०२३ मध्ये जी सेट घेणे अपेक्षित आहे त्या परीक्षेचे नोव्हेंबर महिन्यात आयोजन करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे.
>
> **- डॉ. प्रफुल्ल पवार,**
> कुलसचिव तथा सदस्य सचिव,
> सेट परीक्षा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

My Pune Edition
Jul 9, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

विश्लेषण

चिन्मय पाटणकर

# सहायक प्राध्यापक पात्रतेतील बदलांचे परिणाम काय?

**विद्यापीठे आणि** महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक पदासाठी २०१८ मध्ये निश्चित केलेल्या पात्रतेमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) बदल केला आहे. राज्यातील हजारो उमेदवार प्राध्यापक भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. या पार्श्वभूमीवर यूजीसीने केलेल्या बदलांचा परामर्श घेणे आवश्यक ठरते.

**आतापर्यंत काय नियम होते ?**

विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठे आणि महाविद्यालयातील शिक्षक आणि अन्य शैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठीची किमान पात्रता नियमावली २०१० मध्ये प्रसिद्ध केली. त्यानुसार सहायक प्राध्यापक पदासाठी उमेदवार नेट, सेट पात्रताधारक असणे अनिवार्य होतेच; पण पीएच.डी. असलेल्या उमेदवारांना त्यातून सवलत देण्यात आली होती. म्हणजेच नेट, सेट उत्तीर्ण नसलेल्या पीएच.डी.धारक उमेदवारालाही सहायक प्राध्यापक पदासाठी अर्ज करता येत होता. या नियमात २०१८ मध्ये बदल करून, तसे परिपत्रक यूजीसीने प्रसिद्ध केले. त्यात १ जुलै २०२१ पासून विद्यापीठातील सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. अनिवार्य असल्याचे त्यात नमूद करण्यात आले होते. तसेच विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी या निर्णयाची अंमलबजावणी २०२१ च्या भरती प्रक्रियेपासून करावी असेही निर्देश यूजीसीने दिले होते. मात्र करोना प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या अडचणी लक्षात घेऊन यूजीसीने त्यासाठी जुलै २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे परिपत्रक ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रसिद्ध केले होते.

**यूजीसीने बदल केलेला नियम काय ?**

यूजीसीने विद्यापीठे आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भातील २०१८ च्या नियमावलीत सुधारणा करून किमान पात्रतेच्या अटी शिथिल केल्या आहेत. त्याबाबतचे राजपत्र यूजीसीकडून प्रसिद्ध करण्यात आले. नव्या नियमांनुसार सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी.ची अनिवार्यता रद्द करून ती ऐच्छिक (ऑप्शनल) करण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

मात्र या परिपत्रकावरून काही संभ्रम निर्माण झाले. त्यामुळे यूजीसीने लगेच पुन्हा नव्याने परिपत्रक प्रसिद्ध करून त्या अनुषंगाने स्पष्टीकरण दिले. यूजीसीने सर्वसाधारण निकष क्रमांक ३.१० मध्ये बदल करून १ जुलै २०२३ पासून पीएच.डी. अनिवार्य पात्रतेमध्ये बदल केला आहे. २०१८ च्या नियमावलीतील किमान पात्रतेच्या अन्य अटी कायम ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे सहायक प्राध्यापक भरती प्रक्रियेत पदव्युत्तर पदवीधारकांसाठी नेट-सेट ही किमान पात्रता आहे, तर 'यूजीसीच्या नियमांनुसार पीएच.डी.धारक सहायक प्राध्यापक भरतीसाठी पात्र आहेत, त्यांना नेट-सेटच्या पात्रतेतून सूट देण्यात आली आहे,' असे स्पष्ट करण्यात आले.

**शिक्षणतज्ज्ञ, उमेदवारांचे मत काय ?**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले की, सहायक प्राध्यापकांना पीएच.डी. अनिवार्य करणे चुकीचेच होते. ग्रामीण भारतीय परिप्रेक्ष्याचा विचार करता संशोधन केंद्रे, विज्ञान शाखेतील प्रयोगशाळा नाहीत. त्यामुळे संशोधनाला मर्यादा येतात. यूजीसीने केलेल्या बदलामुळे पीएच.डी. धारक आणि नेट-सेटधारक दोघांचाही फायदा होणार आहे. पदव्युत्तर पदवीधारक आता पीएच.डी. किंवा नेट-सेट या दोन्ही पर्यायांचा विचार करू शकतात.

नेट-सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समितीचे प्रा. सुरेश देवढे पाटील म्हणाले की, यूजीसीने सहायक प्राध्यापक पदासाठीच्या पात्रतेतील पीएच.डी. अनिवार्यता संपुष्टात आणण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे सर्व नेट-सेटधारकांना महाविद्यालये, विद्यापीठांतील रिक्त जागांवर संधी मिळू शकेल. मात्र विद्यापीठांतील पदव्युत्तर विभाग हे संशोधन केंद्र असतात. त्या ठिकाणी पीएच.डी. नसलेले प्राध्यापक असणे कितपत योग्य आहे, हा कळीचा मुद्दा आहे.

यूजीसीने नियमांमध्ये शिथिलता आणली असली, तरी राज्य सरकारकडून सर्व रिक्त जागांवर कधी भरती केली जाणार हा प्रश्नच आहे, असे मत प्रा. देवढे पाटील यांच्यास अनेकांनी व्यक्त केले आहे.

**राज्यात प्राध्यापक भरतीची सद्य:स्थिती काय**

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांम बऱ्याच काळात सहायक प्राध्यापक पदासा भरती प्रक्रिया झालेली नाही. त्यामुळे सहाय प्राध्यापकांच्या १२ हजारांहून अधिक जागा रि आहेत. त्यातील २ हजार ८८ जागा भरण्या निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्या अनुषं बिंदुनामावली, आरक्षण आदी तांत्रिक प्रक्रि पूर्ण करण्यात येत आहे. मात्र ही प्रक्रिया पू करून प्रत्यक्ष भरती कधी पूर्ण होणार याबा स्पष्टता नाही. दरम्यान, प्राध्यापकांच्या रि जागांमुळे अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर विपरि परिणाम होत असल्याचे नमूद करू प्राध्यापकांच्या सर्व रिक्त जागांवर तातडीने भर करण्याचे निर्देश यूजीसीने सर्व राज्यांच्या मुख सचिव, प्रधान सचिवांना पत्राद्वारे दिले आहेत.

chinmay.patankar@expressindia.co

epaper.loksatta.com
लोकसत्ता Mon, 10 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72899158


## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# UGC makes PhD optional for asst professors

c-Aditya.Wadhawan
@timesgroup.com

The UGC has eased the academic pressure on students who intend to get employed as assistant professors at varsities by relaxing the eligibility criteria of having a PhD optional. To provide this relaxation, UGC had to reverse its draft regulations which called for making PhD mandatory for becoming an assistant professor which was scheduled for July 1,



2023. UGC (Minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in universities and colleges and other measures for the maintenance of standards in higher education) Regulations, 2018, have been amended and PhD would now be optional. Prof Manish Ratnakar Joshi, secretary, UGC, says, "We have decided on the PhD as an optional requirement to eliminate the pressure that students face. To be eligible for the appointment as assistant professor, students otherwise tend to complete their PhD in haste which results in compromising on research quality. From now on, students need to clear NET/SET/SLET exam for the position."

Times of India 10.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी

# पदव्युत्तर अभ्यासक्रमांना अल्पप्रतिसाद

## विद्यापीठात यंदा प्रवेशासाठी केवळ १४ हजार ४४२ अर्ज दाखल

पुढारी ANCHOR

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या शैक्षणिक संकुलातील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून नकाराची घंटा मिळत असून, गेल्या दोन वर्षांपासून प्रवेश अर्जांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. यंदा ७८ पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या (मास्टर्स डिग्री) प्रवेशासाठी १४ हजार ४४२ अर्ज आले आहेत. गेल्या वर्षी हीच संख्या १८ हजार २७० होती. यंदा तब्बल २५ पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशक्षमतेच्या तुलनेत कमी अर्ज आल्याचे दिसून येत आहे.



विद्यापीठातील पदविका, पदवी, पदव्युत्तर आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येते. यंदा पदवी आणि एकात्मिक अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा झाली असून, त्यातील गुणांच्या आधारे प्रवेश परीक्षा राबविण्यात येणार आहे. विद्यापीठातील ७८ मास्टर्स डिग्री अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता २ हजार ७९५ आहे. त्यातील २५ पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशासाठीचा प्रतिसाद कमालीचा घटला असून, त्यासाठी ३३४ विद्यार्थ्यांनी अर्ज केला. त्यामध्ये एमटेक इन इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी, एमटेक इन मॉडेलिंग अँड सिम्युलेशन, एमटेक इन मॅकेनिकल अँड मटेरिअल्स टेक्नॉलॉजी, एमटेक इन इन्फॉर्मेशन सिक्युरिटी, एमटेक इन सायंटिफिक इंस्ट्रुमेन्टेशन अँड मेडिकल डिव्हायसेस, एमटेक इन एनर्जी टेक्नॉलॉजी अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे एमए इन डान्स, एमए इन ड्रामा, एमए इन म्युजिक, एमए इन योगा, एम इन बुद्धिस्ट स्टडिज, एक्झिक्युटिव्ह एमबीए, एमएस्सी अर्बन वॉटर अँड सॅनिटायझेशन अशा पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या सर्व अभ्यासक्रमांना कमी अर्ज आल्यामुळे त्यांना थेट प्रवेश देण्यात येणार आहे. दरम्यान, परीक्षेचे निकाल जाहीर व्हायचे आहेत. त्यामुळे यापुढे अर्जांची संख्या वाढणार आहे. त्यासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात येणार आहे.

### एमएस्सी इन केमिस्ट्रीसाठी सर्वाधिक अर्ज

पुणे विद्यापीठातून एमएस्सी इन केमिस्ट्री करण्यासाठी सर्वाधिक २ हजार ६३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. त्याखालोखाल एमएस्सी इन मायक्रोबायलॉजीला प्रवेशासाठी १ हजार १५३, तर एमएस्सी इन कॉम्प्युटर सायन्सला प्रवेशासाठी १ हजार ३९ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. त्याचप्रमाणे एमएस्सी इन स्टॅटिस्टिक्स, फिजिक्स, एमए इन सायकॉलॉजी, पॉलिटिक्स, इकॉनॉमिक्सलाही पसंती दिली आहे. या अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा २२ ते २४ जुलैदरम्यान होणार असल्याचे संकेतस्थळावर म्हटले आहे.

Pune Edition
Jul 11, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी

# महाविद्यालयांमध्ये एनएसएसचे युनिट सुरू करण्याची संधी

**विद्यापीठाकडे १५ जुलैपर्यंत करता येणार अर्ज**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना अर्थात एनएसएसचे नवीन युनिट तयार करण्याची संधी विद्यापीठातर्फे देण्यात आली आहे. त्यासाठी १५ जुलैपर्यंत कागदपत्रांच्या पूर्ततेसह प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना विद्यापीठ प्रशासनाने दिल्या आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयांमार्फत राष्ट्रीय सेवा योजना प्रभावीपणे आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून राबविली जाते. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर दोन वर्षांत त्यांचा सर्वांगीण विकास होऊन विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होण्यास मदत होते. विद्यार्थी भविष्यकाळात यशस्वी नागरिक म्हणून गौरविले जातात. नॅकद्वारे ज्या महाविद्यालयांचे मूल्यांकन झाले आहे, त्यात जवळपास सर्वच निकषांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेने अतिशय महत्त्वाचे योगदान दिले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सामाजिक अभियांत्रिकीमुळे महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन प्रक्रियेला आणि प्रत्यक्ष मूल्यांकनाला एक वेगळी झळाळी आणि गौरव प्राप्त झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांमध्ये सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे नव्याने स्वयंनिर्वाही एकक स्थापन करण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयात पाठवावा, असे विद्यापीठ प्रशासनाने म्हटले आहे.

Pune Edition
Jul 11, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## आवश्यक कागदपत्रे

- महाविद्यालयाच्या संस्थेच्या/विभागाच्या लेटरहेडवर रासेयो स्वयंनिर्वाही एक मागणी पत्र
- स्टँप पेपरवर हमीपत्र
- राष्ट्रीय सेवा योजना एकक मागणी प्रस्ताव
- महाविद्यालयाचे शासन व विद्यापीठ मान्यतापत्र
- प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांचे नेमणूक आणि विद्यापीठ मान्यतापत्र
- राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी नेमणूक आणि विद्यापीठ मान्यतापत्र

Pune Edition
Jul 11, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education



महाराष्ट्र टाइम्स पुणे PLUS

# विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांची पाठ

## कॅम्पसमधील अभ्यासक्रमांच्या प्रवेश अर्जात कमालीची घट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या शैक्षणिक संकुलातील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून नकाराची घंटा मिळत असून, गेल्या दोन वर्षांपासून प्रवेश अर्जांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. यंदा ७८ पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या (मास्टर्स डिग्री) प्रवेशासाठी १४ हजार ४४२ अर्ज आले आहेत. गेल्या वर्षी हीच संख्या १८ हजार २७०च्या जवळपास होती. शैक्षणिक विभागांमधील २५ पदव्युत्तर अभ्यासक्रमांना बोटावर मोजण्याइतके अर्ज आले आहेत. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास, राज्यातील पहिल्या क्रमांकाच्या पुणे विद्यापीठाला जागतिक स्तरावर स्वतःचे अस्तित्व टिकवणे कठीण होईल, अशीच शक्यता उद्‌भवली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदविका, पदवी, पदव्युत्तर आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येते. यंदा पदवी आणि एकात्मिक अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा झाली असून, त्यातील गुणांच्या आधारे प्रवेश परीक्षा राबवण्यात येणार आहे. त्यासाठी १,३९९ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले आहेत. प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रमांनाही अल्प प्रतिसाद मिळत आहे. विद्यापीठातील ७८ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता दोन हजार ७९५ आहे. त्यातील २५ पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशासाठीचा प्रतिसाद कमालीचा घटला असून, त्यासाठी ३३४ विद्यार्थ्यांनी अर्ज केला. त्यात 'एमटेक इन इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी', 'एमटेक इन मॉडेलिंग अँड सिम्युलेशन', 'एमटेक इन मॅकेनिकल अँड मटेरिअल्स टेक्नॉलॉजी', 'एमटेक इन इन्फर्मेशन सिक्युरिटी', 'एमटेक इन सायंटिफिक इंस्ट्रुमेंटेशन अँड मेडिकल डिव्हायसेस', 'एमटेक इन एनर्जी टेक्नॉलॉजी' अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. 'एमए इन डान्स', 'एमए इन ड्रामा', 'एमए इन म्युझिक', 'एमए इन योगा', 'एम इन बुद्धिस्ट स्टडीज', 'एक्झिक्युटिव्ह एमबीए', 'एमएस्सी अर्बन वॉटर अँड सॅनिटायझेशन' अशा अभ्यासक्रमांचाही समावेश आहे. या सर्व अभ्यासक्रमांना कमी अर्ज आल्यामुळे, त्यांना थेट प्रवेश देण्यात येणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२मध्ये अर्जांची संख्या २० हजारांपेक्षा अधिक होती.

| अभ्यासक्रम | अर्ज | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| एमए इंडियन लॉजिक अँड एपिस्टेमॉलॉजी | ० | ३० |
| एमए प्राकृत | ० | ६० |
| एमटेक इन सायंटिफिक इन्स्ट्रुमेन्टेशन अँड मेडिकल डिव्हायसेस | ० | १८ |
| एमए संस्कृत लिंग्विस्टिक्स | १ | ३० |
| एमए ड्रामा | १ | २० |
| एमए इन रशियन | २ | १० |
| एमए डान्स | ३ | २० |
| एमए म्युझिक | ४ | २० |
| एमए पाली | ६ | ३० |
| एमए इन स्पॅनिश | ८ | २० |

### 'एमएस्सी केमिस्ट्री'ला पसंती

पुणे विद्यापीठातून एमएस्सी इन केमिस्ट्री करण्यासाठी सर्वाधिक दोन हजार ६३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. त्याखालोखाल एमएस्सी इन मायक्रोबायॉलॉजीला प्रवेशासाठी एक हजार १५३, तर एमएस्सी इन कम्प्युटर सायन्सला प्रवेशासाठी एक हजार ३९ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. एमएस्सी इन स्टॅटिस्टिक्स, फिजिक्स, एमए इन सायकॉलॉजी, पॉलिटिक्स, इकॉनॉमिक्सलाही पसंती दिली आहे. या अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा २२ ते २४ जुलैदरम्यान होणार आहे, अशी माहिती वेबसाइटवर देण्यात आली आहे.

### कारभाऱ्यांचे प्रवेश प्रक्रियेकडे दुर्लक्ष

पुणे विद्यापीठातील अभ्यासक्रमांचे शुल्क फारच कमी असून, त्यातही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते. प्रवेश घेणाऱ्या बहुतेक सर्वांनाच वसतिगृहाची सुविधा उपलब्ध होते. याचे शुल्क तर नाममात्र आहे; तरीही विद्यापीठाकडून अभ्यासक्रम आणि प्रवेश प्रक्रियेबाबत कोणतीही प्रसिद्धी करण्यात आली नाही. त्यामुळे याबाबत राज्यातील आणि परराज्यांतील अनेक विद्यार्थ्यांना माहितीच मिळाली नसल्याचे चित्र आहे. पुणे विद्यापीठात 'जी-२०'च्या बैठकींचे आयोजन करण्यात आल्याने, विद्यापीठाचा कारभार चालवणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींचे लक्ष बैठकांकडे होते. या पार्श्वभूमीवर कारभाऱ्यांचे प्रवेश प्रक्रियेकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. मात्र, याचा फटका विद्यापीठाला शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या बसत आहे.

"राज्यातील विद्यापीठांच्या पदवी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अर्ज केले नसल्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळावी, यासाठी अर्ज करण्याच्या प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात येणार आहे. त्यानंतर अर्जांची संख्या वाढेल. कमी अर्ज आलेल्या अभ्यासक्रमांबाबतही योग्य निर्णय घेण्यात येईल.

– डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 11.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू नियुक्तीची प्रतीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला महिन्याभरापूर्वी पूर्णवेळ कुलगुरू मिळाले. मात्र त्यानंतर आता प्र-कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी प्रतीक्षा करावी लागत असून, आता विद्यापीठ कायद्यातील बदलांनुसार प्र-कुलगुरूंची निवड आता कुलगुरू आणि व्यवस्थापन परिषदेच्याच स्तरावर होणार असल्याने कोणाला संधी मिळणार याकडे लक्ष लागले आहे.

डॉ. नितीन करमळकर यांच्या कार्यकाळ संपल्यानंतर एक वर्षाहून अधिक काळ डॉ. कारभारी काळे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू होते. तर डॉ. संजीव सोनवणे यांच्याकडे प्रभारी प्रकुलगुरू पदाची सूत्रे देण्यात आली होती. तसेच अधिष्ठात्यांनाही मुदतवाढ देण्यात होती. गेल्या महिन्यात डॉ. संजीव सोनवणे यांची नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती झाल्याने प्रकुलगुरू पद रिक्त झाले. तर डॉ. सुरेश गोसावी यांची विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली. त्यानंतर नव्या प्र-कुलगुरूंची निवड होणे अपेक्षित होते. मात्र अद्याप त्यांची निवड झालेली नाही. विद्यापीठाच्या शैक्षणिक कारभाराची जबाबदारी प्र-कुलगुरू निभावत असल्याने या पदाला महत्त्व आहे. प्रकुलगुरूंशिवाय विद्यापीठातील वाणिज्य आणि व्यवस्थापन, मानव्यता, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आंतरविद्याशाखीय अभ्यास या चार विद्याशाखांचे अधिष्ठाता, नवोपक्रम संचालकांचीही निवड प्रक्रिया करावी लागणार आहे. सरकारने प्रकुलगुरूंच्या निवडीचा अधिकार कुलगुरू आणि व्यवस्थापन परिषद यांच्याकडे दिला आहे. त्यानुसार कुलगुरू प्र-कुलगुरू पदासाठीच्या व्यक्तीचे नामनिर्देशन व्यवस्थापन परिषदेकडे करतील. त्यानंतर अंतिम शिक्कामोर्तब व्यवस्थापन परिषदेकडून केले जाईल. त्यामुळे प्र-कुलगुरूपदी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील कोणाची निवड होणार की संलग्न महाविद्यालयातील व्यक्ती निवडली जाणार याकडे लक्ष लागले आहे.

> प्र-कुलगुरूंची निवड लवकरच करण्यात येईल. अधिष्ठाता, नवोपक्रम संचालक या पदांसाठी जाहिरात देऊन प्रक्रिया राबवली जाणार आहे.
> - डॉ. सुरेश गोसावी,
> कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत प्र-कुलगुरूंची जबाबदारी महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांची निवड लवकर होणे आवश्यक आहे. - डॉ. ए. पी. कुलकर्णी,
> ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

लोकसत्ता Wed, 12 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72916954

# पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश अर्जांमध्ये घट

## अर्जांसाठी १४ जुलैपर्यंत मुदतवाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या प्रवेश अर्जांमध्ये घट झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जवळपास चार हजारांनी अर्ज कमी आले असून, यंदा ७८ पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी १४ हजार ४४२ अर्ज आले आहेत. विद्यार्थ्यांच्या कमी प्रतिसादामुळे विद्यापीठाला अर्जांसाठी १४ जुलैपर्यंत पुन्हा मुदतवाढ द्यावी लागली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदविका, पदवी, पदव्युत्तर आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येते. यंदा पदवी आणि एकात्मिक अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा झाली आहे. त्यातील गुणांच्या आधारे प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येईल. तसेच दहावी आणि बारावीनंतरच्या प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रियाही सुरू आहे. विद्यापीठातील ७८ अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता दोन हजार ७९५ आहे. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत ८ जुलैला संपली. गेल्या वर्षी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी १८ हजार दोनशेहून अधिक अर्ज आले होते. मात्र यंदा अर्जसंख्येत घट झाल्याचे चित्र आहे.

विद्यापीठातील ७८ पदव्युत्तर अभ्यासक्रमांतील २५ पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशासाठीचा प्रतिसाद घटता असल्याचे दिसून येत आहे. त्यासाठी ३३४ विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. काही शैक्षणिक विभागांमधील अभ्यासक्रमांना प्रवेशक्षमतेपेक्षाही कमी अर्ज आले आहेत. रसायनशास्त्र पदव्युत्तर पदवीसाठी दोन हजार ६३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. त्याखालोखाल सूक्ष्मजीवशास्त्र पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी एक हजार १५३, तर संगणकशास्त्र पदव्युत्तर पदवीच्या प्रवेशासाठी एक हजार ३९ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. तसेच संख्याशास्त्र, भौतिकशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र अशा काही अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांची पसंती असल्याचे दिसून येते. दिलेल्या मुदतीत विद्यार्थ्यांच्या कमी प्रतिसादानंतर विद्यापीठाकडून पुन्हा एकदा प्रवेश अर्जांसाठी मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना आता १४ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे. अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा २२ ते २४ जुलैदरम्यान होणार असल्याचे परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले.

लोकसत्ता Wed, 12 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72914428

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

लोकमत

epaper.lokmat.com लोकमत देश-विदेश पुणे, बुधवार, दि. १२ जुलै २०२३ ७

# इयत्ता नववी ते बारावीपर्यंत लागू होणार सेमिस्टर पद्धत

## नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण : १५० पर्यायी विषय, वर्षातून दोनदा होणार परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इयत्ता नववी ते बारावीपर्यंत सेमिस्टर पद्धत लागू करण्याचा निर्णय नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क- एनसीएफद्वारे (राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा) ठरविण्यात आला आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता तिसरी ते बारावी इयत्तेपर्यंत १५० पर्यायी विषयांची पाठ्यपुस्तके तयार केली जाणार आहेत. त्यातून विद्यार्थ्यांना आपले विषय निवडायचे आहेत, तर वर्षातून दोनदा परीक्षा होणार आहे.

नववी, दहावीसाठी आठ स्ट्रीममधील किमान तीन समूहांतील चार विषय विद्यार्थ्यांना निवडता येतील. प्रत्येक विषयाचे चार-चार पेपर असतील. विद्यार्थ्यांना १५० विषयांच्या पर्यायांतून आपले विषय निवडायचे आहेत. आतापर्यंत अकरावी व बारावीच्या स्तरावर विज्ञान, वाणिज्य, कला अशा शाखांतील विषय असत. मात्र, आता वेगळी पद्धती अस्तित्वात येणार आहे. संगीत, खेळ, क्राफ्ट व व्होकेशनल एज्युकेशन या विषयांचा दर्जा गणित, विज्ञान, मानव्य शाखा विषय, भाषा, सामाजिक शास्त्र यांच्याबरोबरीनेच गणला जाणार आहे.

### नवी पाठ्यपुस्तके उपलब्ध होणार

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच्या महिन्यांत इयत्ता तिसरी, सहावी व नववीची नव्या पद्धतीची पाठ्यपुस्तके उपलब्ध होण्याची शक्यता आहे.



**आठ स्ट्रीममधील विषय :** इयत्ता नववी व दहावीमध्ये आठ स्ट्रीम असतील. त्यात मानव्य शाखा विषय, भाषा, गणित, व्होकेशनल एज्युकेशन, शारीरिक शिक्षण, कला, समाजशास्त्र, विज्ञान, आंतरशाखीय विषय अशा आठ गटांतील विषय असतील. त्या प्रत्येक गटातील दोन असे १६ विषय विद्यार्थ्यांना निवडावे लागतील.

### अशी असेल शिक्षणपद्धती

१. इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे शिक्षण सेमिस्टर पद्धतीने दिले जाईल. वर्षभरात बोर्डाची परीक्षा देण्याच्या दोन संधी देण्यात येतील.

२. इयत्ता नववी, दहावी, बारावीमध्ये सुमारे १६-१६ पेपर्स (कोर्स) द्यावे लागतील. याचा अर्थ एका वर्षात कमीत कमी आठ विषयांचे पेपर द्यावे लागतील.

३. इयत्ता नववीचा निकाल हा दहावीच्या अंतिम निकालाशी जोडलेला असेल. तसेच अकरावीमध्ये मिळालेले गुण बारावीच्या निकालाशी जोडून त्यावर आधारित गुणपत्रिका मिळेल.

### फाउंडेशन स्टेजमध्ये कोणतीही परीक्षा नाही

- बालवाडी किंवा प्री-स्कूल स्तरावरील विद्यार्थ्यासाठी जादूचा पेटारा (त्यात ५३ विविध प्रकारांचे खेळ, पोस्टर, खेळणी, बोर्ड, बिल्डिंग ब्लॉक, प्लेइंग कार्ड यांचा समावेश आहे) ही संकल्पना राबविली जाईल. या विद्यार्थ्यांना दप्तराचे ओझे वाहावे लागणार नाही.
- सहा ते आठ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना पहिल्या इयत्तेत प्रवेश मिळेल. या इयत्तेत फक्त भाषा व गणिताची पुस्तके असतील. दुसऱ्या इयत्तेनंतर फाउंडेशन लेव्हल पूर्ण होईल. फाउंडेशन लेव्हलमध्ये कोणतीही परीक्षा होणार नाही.

Pune Main
Page No. 9 Jul 12, 2023
Powered by: erelego.com

सकाळ

# चौदा हजार ७०८ विद्यार्थ्यांना मिळाले महाविद्यालय

**अकरावी प्रवेश प्रक्रिया**

## तिसरी फेरी : निवड यादी प्रसिद्ध; प्रवेशाची मर्यादा १४ जुलैपर्यंत

| फेरी | पात्र विद्यार्थी | निवड झालेले | प्रवेश घेतलेले |
|---|---|---|---|
| पहिली फेरी | ६३,४४२ | ४२,२३२ | २३,२३४ |
| दुसरी फेरी | ४४,५४० | २०,६०२ | ९,२६० |
| तिसरी फेरी | ४१,२२५ | १४,७०८ | -- |

**पुणे, ता. १२ :** इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या नियमित फेरीची निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यात पुणे शहरात १४ हजार ७०८ विद्यार्थ्यांना महाविद्यालये मिळाली आहेत. शिक्षण विभागाने बुधवारी (ता. १२) निवड यादी प्रसिद्ध केली. तिसऱ्या फेरीत सर्वाधिक ५ हजार ७५ विद्यार्थ्यांना प्रथम पसंतीक्रमानुसार महाविद्यालय मिळाले आहे. आता या सर्व विद्यार्थ्यांना १४ जुलैपर्यंत संबंधित महाविद्यालयात प्रवेश निश्चित करावा लागेल.

शहरात अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीसाठी ५७ हजार ६१५ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी ४१ हजार २२५ विद्यार्थी पात्र ठरले होते. या विद्यार्थ्यांपैकी १४ हजार ७०८ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. कॉलेज लॉगिनमध्ये प्रवेश ऑनलाइन निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे तसेच प्रवेश नाकारणे या प्रक्रिया सुरू राहतील. महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्रथम पसंतीचे विद्यालय मिळाले आहे, त्यांनी तेथेच प्रवेश घेणे अनिवार्य आहे. प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही किंवा प्रवेश नाकारला गेला, तर त्यांना पुढील एका नियमित फेरीसाठी प्रतिबंधित केले जाईल आणि त्या फेरीनंतरच प्रवेशासाठी त्यांचा विचार केला जाईल. प्रवेश रद्द केलेले विद्यार्थीही पुढील फेरीसाठी प्रतिबंधित केले जातील.

### विशेष फेरीचे आयोजन

दरम्यान, पहिल्या फेरीत २३ हजार २३४ तर दुसऱ्या फेरीत ९ हजार २६० विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. आता तिसऱ्या फेरीनंतर विशेष फेरीचे आयोजन केले जाणार आहे. कोटा आणि रिक्त जागांवरही प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

Pune, Main
13/07/2023 Page No. 3

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

प्रभात

### पुणे विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी कोणाची वर्णी लागणार?

**पुणे, दि. १२ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू पदासाठी इच्छुकांमध्ये तीव्र स्पर्धा लागली असून या पदावर कोणाची वर्णी लागणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. सुरेश गोसावी यांची नियुक्ती झाली. त्यानंतर आता प्र-कुलगुरुंची नियुक्ती होणे अपेक्षित आहे. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार नवीन कुलगुरू हे प्र-कुलगुरू आणि अधिष्ठात्यांची निवड करतात. पूर्वी राज्यपालांतर्फे प्र-कुलगुरूंची नियुक्ती केली जात होती. मात्र, काही महिन्यांपूर्वी त्यात सुधारणा करण्यात आली आहे. त्यामुळे आता कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली बोलवण्यात येणाऱ्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत प्र-कुलगुरुंची निवड केली जाण्याची शक्यता आहे.

येत्या २२ जुलै रोजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार असून त्यात प्र-कुलगुरू पदाच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता वर्तविण्यात येऊ लागली आहे.

PuneCity, 13 July 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात १३३ प्राध्यापकांची कंत्राटी भरती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. त्यामुळे विद्यापीठाने १३३ जागांवर सहायक प्राध्यापकांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यापीठातील प्राध्यापकांच्या जवळपास ५५ टक्के जागा रिक्त आहेत. शासनाकडून प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवली जात नसल्याने त्याचा परिणाम शैक्षणिक कामकाजावर होतो. तसेच नुकत्याच जाहीर झालेल्या विविध क्रमवारीतील विद्यापीठाच्या स्थानावरही त्याचा परिणाम दिसून आला. गेल्या वर्षीही विद्यापीठाने विद्यापीठ निधीतून कंत्राटी प्राध्यापकांची नियुक्ती केली होती. यंदाही पुन्हा ही प्रक्रिया राबवली जात आहे. कंत्राटी भरतीमुळे विद्यापीठ निधीवर ताण निर्माण होत आहे.

विद्यापीठाने सहायक प्राध्यापकांच्या १३३ जागांवर कंत्राटी नियुक्तीचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विज्ञान आणि तंत्रज्ञान, मानव्यविज्ञान, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील ४० शैक्षणिक विभागांतील जागांसाठी निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. या जागांसाठी अर्ज करण्याची मुदत २० जुलै आहे. या पदांसाठीची पात्रता, नियम व अटी यांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

लोकसत्ता Fri, 14
https:/

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# विद्यापीठात भरती १३३ प्राध्यापकांची

## कंत्राटी पद्धतीने होणार नेमणूक; तिजोरीवर ताण

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरून काढण्यासाठी आणखी १३३ प्राध्यापकांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात येणार आहे. यामुळे विद्यापीठातील रिक्त जागा काही प्रमाणात कमी होणार असून, अनेक विभागांना आता पूर्ण वेळ प्राध्यापक मिळू शकणार आहेत. विद्यापीठाच्या तिजोरीवर मात्र यामुळे आणखी भार पडणार आहे.

विद्यापीठातील प्राध्यापकांच्या जवळपास ५५ टक्के जागा रिक्त आहेत. सरकारकडून प्राध्यापक भरतीप्रक्रिया राबवली जात नसल्याने त्याचा परिणाम शैक्षणिक कामकाजावर होत असून, अनेक विभागांमध्ये प्राध्यापकांची संख्या नगण्य आहे. परिणामी, विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही घटत चालली आहे. यावर उपाययोजना म्हणून आता आणखी १३३ प्राध्यापक घेतले जाणार असून, त्यांच्या निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. गेल्याच वर्षी विद्यापीठाने शंभरहून अधिक प्राध्यापक कंत्राटी तत्त्वावर घेतले होते. आता या वर्षी त्यात आणखी १३३ प्राध्यापकांची भर पडणार आहे.

विद्यापीठाने सहायक प्राध्यापकांच्या भरतीसाठी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार विज्ञान आणि तंत्रज्ञान, मानव्यविज्ञान, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील ४० शैक्षणिक विभागांतील प्राध्यापकांच्या जागांसाठी निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. या जागांसाठी अर्ज करण्याची मुदत २० जुलै आहे. या पदांसाठीची पात्रता, नियम व अटी यांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

### सरकार प्राध्यापक कधी देणार?



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यात आणखी १३ सरकारी विद्यापीठे आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. प्रत्येक विद्यापीठाला आपल्या निधीतून कंत्राटी पद्धतीने प्राध्यापक घ्यावे लागत आहेत. राज्यातील सरकारी विद्यापीठांची ही परिस्थिती असेल, तर नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होईल का, असा प्रश्न शिक्षणतज्ज्ञ उपस्थित करीत आहेत. विद्यापीठाचा निधी शिक्षणासाठीच्या अद्ययावत सुविधा निर्माण करण्यासाठी आहे. तो वेतन, पगारावर खर्च व्हायला लागला, तर त्याचा काय उपयोग, अशीही विचारणा केली जात आहे.

Maharashtra Times 21.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

लोकमत

प्राध्यापक भरती करा : संघटनांची मागणी

# विद्यापीठात राजकीय हस्तक्षेपामुळे गुणवत्तेवर परिणाम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठाची सातत्याने घसरणारी रँकिंग, सर्वच विभागांत प्राध्यापकांची अपुरी संख्या, वसतिगृहाचा अभाव, शैक्षणिक शुल्कात होणारी वाढ यासह राजकीय हस्तक्षेपामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रवेश घेण्याकडे विद्यार्थी पाठ फिरवत आहेत, असा आरोप विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींनी केला. विद्यार्थी संख्या वाढण्यासाठी तत्काळ प्राध्यापक भरती करावी तसेच विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थी हिताचे निर्णय घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' अशी बिरूदावली मिरवणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जात लक्षणीय घट झाल्याचे दिसून येत आहे.

गतवर्षी २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात विविध अभ्यासक्रमांसाठी १८ हजार २७० अर्ज प्राप्त झाले होते. त्यामध्ये यावर्षी सुमारे चार हजार एवढी घट झाली असून, केवळ १४ हजार ४४२ अर्ज आले आहेत. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन माध्यमातून प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी १० मे रोजी सुरुवात झाली होती. त्यानंतर तब्बल दोन महिन्यांचा कालावधी देऊनही विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याकडे पाठ दाखविल्याचे दिसून येत आहे.



### गरीब विद्यार्थ्यांना खर्च परवडेना

ग्रामीण आणि दुर्गम भागातील कोविडपश्चात अद्यापही अनेक कुटुंबांची आर्थिक घडी सुरळीत न झाल्याने असंख्य पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च परवडत नाही. अनेकांना प्रवेश मिळेल; पण वसतिगृह मिळेल, याची शाश्वती वाटत नाही. परीक्षा विभागाच्या गोंधळामुळेही विद्यार्थ्यांमध्ये अविश्वास निर्माण झाला आहे.

**-सोमनाथ निर्मळ, राज्याध्यक्ष, स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया**

### राजकीय हस्तक्षेपाचा गुणवत्तेवर परिणाम

ग्रामीण तसेच आदिवासी भागातून दर्जेदार शिक्षण मिळावे, या हेतूने विद्यार्थी विद्यापीठात येतात. मात्र, अनेकांना वसतिगृह न मिळाल्याने बाहेर राहून शिक्षण घेण्याचा खर्च परवडत नाही. विद्यापीठाच्या सर्व विभागांत प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. यासह सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्यापीठात राजकीय हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढला असून, त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे.

-राहुल ससाणे,
विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती

### रिक्त पदे भरावीत

पुण्यातील शिक्षण महागडे असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी अर्ज करीत नाहीत तसेच आता पालक मुलींच्या सुरक्षिततेबाबतही विचार करू लागले आहेत. विद्यापीठातील अनेक विभागांत पुरेसे प्राध्यापक नसल्याचा प्रचार सर्व विद्यार्थ्यांमध्ये झाला आहे.

- संपदा डेंगळे, सचिव, छात्रभारती, पुणे

### कोर्सची फी महागडी

विद्यापीठात अनेक नवीन कोर्स सुरू झाले आहेत; मात्र त्यांची हजारो रुपयांची फी सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडणारी नाही. वसतिगृह, पारंपरिक अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्कही वाढविले आहेत.

- तुकाराम शिंदे, पीएच.डी. संशोधक

Hello Pune
Page No. 4 Jul 14, 2023
Powered by: erelego.com

---

विश्लेषण

रसिका मुळ्ये

# नव्या वादाची नांदी?

**शासनाचा** ५० टक्के किंवा अधिक निधी घेणाऱ्या देशभरातील अभिमत विद्यापीठांच्या कुलपती आणि कुलगुरू निवडीचा पालक संस्थांचा अधिकार शासनाने काढून घेतला आहे. अभिमत विद्यापीठ कायद्यातील सुधारणांचा मसुदा विद्यापीठ अनुदान आयोगाने काही दिवसांपूर्वीच जाहीर केला. त्यानुसार शासनाकडून कोणत्याही स्वरूपात ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक निधी, अर्थसाहाय्य घेणाऱ्या अभिमत विद्यापीठांचे कुलपती आणि कुलगुरू निवडण्याचे अधिकार यानंतर शासनाचे असतील. केंद्र शासनाचा निधी घेत असल्यामुळे मुंबईतील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या (टीस) कुलगुरूंची निवड केंद्र सरकारकडून केली जाणार आहे. त्यामुळे या विद्यापीठाची पालक संस्था असलेल्या टाटा ट्रस्टचे कुलगुरू निवडीचे अधिकार संपुष्टात येण्याची चिन्हे आहेत. कुलगुरू निवडीच्या अधिकारांचीही दुधारी तलवार यंत्रणांनाही पेलावी लागणार आहे.

**नवा नियम काय?**

देशभरात जवळपास १३० अभिमत विद्यापीठे आहेत. त्यातील शासकीय निधी घेणाऱ्या संस्थांना काही जुन्या त्यांच्या स्थापनेनंतर कालांतराने अभिमत दर्जा देण्यात आला. त्या वेळी पूर्वीपासून असलेले शासकीय अर्थसाहाय्य कायम ठेवण्यात आले. मात्र या विद्यापीठांचे नियमन त्यांच्या पालकसंस्थांकडून करण्यात येत होते. आता मात्र अभिमत विद्यापीठांसाठी करण्यात आलेल्या सुधारित कायद्यानुसार शासनाचा निधी घेणाऱ्या अभिमत विद्यापीठांच्या पालक संस्थांना कुलपती आणि कुलगुरू निवडीचा अधिकार गमवावा लागणार आहे. केंद्र वा राज्य शासनाकडून ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक प्रमाणात अर्थसाहाय्य घेणाऱ्या अभिमत विद्यापीठांच्या कुलपती, या कुलगुरूंची निवड अनुक्रमे केंद्र वा राज्य शासन करेल. इतर अभिमत विद्यापीठांच्या संबंधित निवडीचे अधिकार पालक संस्थांना राहतील.

**परिणाम काय?**

'टीस'च्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष आणि काही सदस्य हे टाटा ट्रस्टचे किंवा त्यांनी नेमलेले असतात. मात्र, संस्थेला केंद्र शासनाकडून निधी मिळत असल्याने येत्या काळात या विद्यापीठाचे कुलगुरू केंद्र शासनाकडून नेमण्यात येतील. याशिवाय केंद्राकडून निधी मिळणाऱ्या देशातील आणखी पाच विद्यापीठांवर या निर्णयाचा परिणाम होईल. राज्यातील काही अभिमत विद्यापीठांना राज्य शासनाकडून निधी मिळतो. या विद्यापीठांचे कुलपती आणि कुलगुरू नेमण्याचे अधिकार येत्या काळात राज्य शासनाला मिळणार आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी होण्यासाठी शासनाला कायद्यात आनुषंगिक बदल करावे लागतील. विद्यापीठांना त्यांच्या परिनियमातही बदल करावे लागतील. देशभरातील काही खासगी परंतु शासकीय अनुदान घेणाऱ्या विद्यापीठांचे कुलपती म्हणून एखादीच व्यक्ती अनेक वर्षे कार्यरत असल्याचे दिसते. यावर या नियमबदलामुळे काहीसा अंकुश येईल. मात्र, त्याच वेळी काही संस्था अगदी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थापनेपूर्वीपासून कार्यरत आहेत. अनेक नामवंतांनी अशा विद्यापीठांची कुलपती आणि कुलगुरूपदे भूषवली आहेत. संस्थांकडून अधिकार काढून घेतल्यानंतर ही शैक्षणिक परंपरा खंडित होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

**विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका?**

अनेक अभिमत विद्यापीठांना निधी शासन देते. मात्र त्यांच्यावर शासनाचे कोणतेच नियंत्रण नाही. आर्थिक पालकत्व निभावणाऱ्या खासगी संस्थेला कुलपती किंवा कुलगुरूंच्या निवडीचे अधिकार मिळतात. मग ५० टक्के निधी देणाऱ्या शासनाकडे कुलपती, कुलगुरू निवडीचे अधिकार असणे रास्त आहे, अशी भूमिका आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून मांडण्यात आली आहे. त्याचबरोबर विद्यापीठांची स्वायत्तता अबाधित राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**नव्या वादाची नांदी का?**

'टीस'सारख्या संस्था अनेक सामाजिक प्रश्नांवर विविध स्तरांवर संशोधन करतात. तेथील विद्यार्थी संघटना, प्राध्यापक अनेक सामाजिक मुद्द्यांवर, शासकीय धोरणांबाबत भूमिका घेतात. सामाजिक चळवळी, आंदोलने यांतील सक्रिय सहभागासाठी तेथील विद्यार्थी संघटनांची ओळख आहे. त्यामुळे मुळातच तेथे अनेकदा विविध वाद उफाळून येत असतात. काही विद्यापीठांवर विशिष्ट विचारधारेशी बांधिलकी असल्याचा शिक्का आहे. या पार्श्वभूमीवर या निर्णयाला राजकीय किनार असल्याची चर्चा होत आहे. बदल योग्य की अयोग्य याबाबत सापेक्ष भूमिका विवि[ध] स्तरांतून उमटत आहेत. यापलीकडे जाऊन विचारधारा, भूमिका यांपलीकडे जाऊन शैक्षणि[क] क्षेत्रात आपले खणखणीत नाणे वाजवणाऱ्या [य] विद्यापीठाच्या नेतृत्व निवडीत शासकीय हस्तक्षे[प] असेल तर संस्थांची स्वायत्तता कशी टिकणा[र] असाही प्रश्न उपस्थित होत आहे. अनेक जु[नी] अभिमत विद्यापीठे ही विशिष्ट विषयांवरी[ल] संशोधन, शिक्षण यांना वाहिलेली आहेत. तेथील शैक्षणिक शुचिता कायम राहावी अशी अपेक्ष[ा] व्यक्त करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या अखत्यारीतील विद्यापीठे असोत किंवा केंद्रीय विद्यापीठे त्यांच्या कुलगुरूंच्या निवडीदरम्यान राजकीय हस्तक्षेप, गटबाजी, दबावतंत्र [हे] गुणवत्तेपेक्षा सरस ठरत असल्याचा आक्षेप जुना[च] आहे. आतापर्यंत आपापला सुभा राखून शांतपणे काम करणाऱ्या अभिमत विद्यापीठांचीही य[ा] वादात भर पडण्याची शक्यता आहे.

rasika.mule@expressindia.com

epaper.loksatta.com

लोकसत्ता Fri, 14 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72934760

*News Paper Clippings During July 2023*

*Section: Education*

प्रभात

# प्राध्यापकांच्या जागा कंत्राटी पद्धतीने नियुक्तीचा निर्णय

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १३ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. त्यामुळे विद्यापीठाने जागांवर सहायक प्राध्यापकांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची प्रक्रिया सुरू केली असून, पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांच्या सुमारे ५५ टक्के जागा रिक्त आहेत. शासनाकडून प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवली जात नसल्याने त्याचा परिणाम शैक्षणिक कामकाजावर होत आहे. तसेच नुकत्याच जाहीर झालेल्या विविध क्रमवारीतील विद्यापीठाच्या स्थानावरही त्याचा परिणाम दिसून आला. गेल्या वर्षीही विद्यापीठाने विद्यापीठ निधीतून कंत्राटी प्राध्यापकांची नियुक्ती केली होती. आता यंदाही पुन्हा ही प्रक्रिया राबवली जात आहे. कंत्राटी भरतीमुळे विद्यापीठ निधीवर ताण निर्माण होत आहे.

आता पुणे विद्यापीठाने सहायक प्राध्यापकांच्या १३३ जागांवर कंत्राटी नियुक्तीचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या जागांसाठी अर्ज करण्याची मुदत २० जुलै आहे.

PuneCity, 14 July 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

सकाळ

# ग्रंथपालाचे विस्तारणारे क्षितिज

**भाष्य**



शुभदा नगरकर

**ग्रंथपाल कोणत्याही संस्थेमध्ये अपरिहार्य ठरतो. बदलत्या काळातील त्याची भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे. गरज आहे ती या ज्ञानशाखेकडे करिअर म्हणून वेगळ्या दृष्टीने पाहण्याची.**



ग्रंथालय म्हणजे एक इमारत, एका रेपेत लावलेली पुस्तके, आणि त्यांची काळजी घेणारा ग्रंथपाल. पुस्तके घेणे, त्यांचे वर्गीकरण, तालिकीकरण करून पुस्तकांची देवाणघेवाण करणे तसेच सतत 'शुक, शांत रहा' असे वारंवार सांगणारी व्यक्ती अशीच काहीशी ग्रंथपालाची प्रतिमा जनमानसात अद्यापही रूढ आहे. त्यातच भर म्हणून चित्रपट, जाहिराती, कथा, कादंबऱ्या इ. माध्यमातून सुद्धा ग्रंथालय एका विशिष्ट पद्धतीनेच दाखवले जाते. उदाहरणार्थ, नायक नायिका भेटण्याचे ठिकाण! प्रत्यक्षात मात्र ग्रंथपाल विविध प्रकारची कामे करीत असतो. अगदी प्राचीन ते मध्ययुगीन, पूर्व आणि उत्तरआधुनिक काळापासून ग्रंथपाल कार्यरत आहे.

नवीन ज्ञानाची निर्मिती माहितीच्या स्वरूपात प्राचीन काळात मातीच्या विटांवर तर आधुनिक काळात इलेक्ट्रॉनिक स्वरूपात गोळा करून तिचे पुढील पिढ्यांसाठी जतन करण्याचे काम ग्रंथपाल अव्याहतपणे करीत आहेत. त्यामुळेच ग्रंथालयाचे महत्त्व चिरकाल अबाधित राहिले आहे. ग्रंथपाल हा माहितीचा योग्य स्रोत सुचविणारा तज्ज्ञ तसेच लेखक व वाचक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे त्याची जनमानसातील प्रतिमा बदलणे गरजेचे आहे. याबाबतचा हा एक छोटासा प्रयत्न.

ग्रंथालय म्हणजे वाचन आणि वाचन हा आपल्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. म्हणतात ना 'वाचाल तर वाचाल'!. परंतु इंटरनेटच्या मायाजालात अडकले एकूणच पुस्तकवाचन कमी झाले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे थेट माहितीच आपल्यापर्यंत प्रचंड प्रमाणात वेगवेगळ्या माध्यमातून येत आहे. या माहितीच्या पुरातून योग्य, विश्वासार्ह माहिती शोधणे अवघड झाले आहे. चुकीचा स्रोत वापरला गेला तर नवीन ज्ञान निर्माण तर होणारच नाही; परंतु संशोधनही चुकीच्या दिशेने केले जाईल. अशा वेळी तज्ज्ञ ग्रंथपाल माहितीचा योग्य स्रोत योग्य वापरकर्त्याला योग्य वेळी देतो आणि योग्य स्रोत निवडण्यासाठीचे मार्गदर्शन करतो. कारण माहितीस्रोतांचे मूल्यांकन करण्याचे सखोल प्रशिक्षण ग्रंथपालाला दिलेले असते.

ग्रंथपाल शाळेत, सार्वजनिक वाचनालये, महाविद्यालय, विश्वविद्यालय, रुग्णालये, कॉर्पोरेट कंपन्या या सर्व ठिकाणी कार्यरत असतात. येथील माहितीचे स्रोत आणि वापरकर्ते वेगळे असले तरीही ग्रंथपाल वापरकर्त्यांच्या गरजेनुसार सेवा देतात. शाळांच्यामधील ग्रंथपाल मुलांना पुस्तके वाचून दाखवतात. पुस्तके हाताळू देतात. मुलांना वाचनाची गोडी लागावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात.

महाविद्यालय व विश्वविद्यालय येथील ग्रंथालये अद्ययावत असतात. येथील ग्रंथपाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील माहितीसाधने, पुस्तके, व इतर साहित्य याआधारित सेवा देतो. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून ईमेल तसेच मोबाईलच्या माध्यमातून माहिती सेवा दिली जाते. जुनी हस्तलिखिते, वर्तमानपत्रे, पुस्तके इ. स्रोतांचे डिजिटल माध्यमात रुपांतर करून वापरकर्त्यांना सहज वापरता येतील, अशा सेवा देतात आणि हे स्रोत प्रभावीपणे वापरण्याचे प्रशिक्षणसुद्धा देतात. ग्रंथपाल हे विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधकांना संशोधन नैतिकदृष्ट्या प्रकाशित करण्याचे प्रशिक्षण देतात. उत्तम प्रतीची रिसर्च जर्नल्स व बनावट रिसर्च जर्नल्स यातील तफावत ओळखण्यास मदत करतात. त्यामुळे ग्रंथालयाशिवाय शैक्षणिक संस्था असूच शकत नाही.

'डॉक्टर रुग्णाला औषधांचे प्रिस्क्रिप्शन देतात त्याप्रमाणे ग्रंथपाल माहितीचे प्रिस्क्रिप्शन देतात. डॉक्टर Rx अशी खूण प्रिस्क्रिप्शनवर करतात, ज्याचा अर्थ आपण घ्या' असा होतो. तर ग्रंथपाल माहितीचा व ग्रंथांचा वापर रुग्णांना उपचार म्हणून सुचविताना InfoRx किंवा Ix या खुणांचा वापर करतात. अमेरिकेतील समाजशास्त्रातील तज्ज्ञ कॅप्लर आणि मेटलर यांच्या मते माहिती थेरपीमध्ये रुग्णांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी माहितीची उपचारात्मक तरतूद केली जाते. ग्रंथालयशास्त्रात याला ग्रंथोपचार (बिब्लिओथेरपी) संबोधतात. जगभरात अनेक ग्रंथपाल 'रुग्ण-शिक्षण ग्रंथपाल' म्हणून काम करतात. विश्वासार्ह माहिती रुग्णांचे ज्ञान आणि त्यांच्या वैयक्तिक आरोग्याच्या काही पैलूंची समज वाढवण्याचे काम करते. अनेक रुग्णालयात ग्रंथपाल चिकित्सक, रुग्ण, कुटुंब आणि कर्मचारी यांच्या मागणीनुसार दर्जेदार पुस्तके, जर्नल्स, व्हिडिओ आणि डेटाबेसेस पुरवतात व त्यांची आरोग्यविषयक माहिती साक्षरता वाढवतात. अशातऱ्हेने ग्रंथपाल हा डॉक्टरइतकाच महत्त्वाचा ठरतो.

## माहितीचे माहात्म्य

विसाव्या दशकाच्या सुरवातीस 'कॉर्पोरेट ग्रंथालये' उद्योगजगतात वेगाने बदलणाऱ्या व्यावसायिक वातावरणाला प्रतिसाद म्हणून उदयास आली. यामध्ये सॉफ्टवेअर, औषधनिर्मिती, कृषि, धातुउत्पादन, रासायनिक उद्योग, वाणिज्य व वित्तीय सेवा, इ. अनेक प्रकारच्या कंपन्यांमध्ये ग्रंथालये असतात. या व्यवसायांमध्ये माहितीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. येथील ग्रंथपाल ग्रंथ साहित्याबरोबरच माहितीचे आयोजन आणि वर्गीकरण करतात. कंपनीची इंट्रानेट प्रणाली विकसित करून तिचे व्यवस्थापन करणे, परस्परसंवाद, ग्राहक सेवा, ज्ञान व्यवस्थापन, टीमवर्क, ही सर्व कौशल्ये ग्रंथपालाकडे असतात. कंपनीचे यश हे अद्ययावत माहितीवरच अवलंबून असते.

कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या ग्रंथपालाला वेगवेगळी नावे असतात. ज्ञान व माहितीविश्लेषक, ज्ञानव्यवस्थापन ग्रंथपाल, नॉलेज नेटवर्क स्पेशालिस्ट, माहितीसेवा व्यवस्थापक, वस्तुसंग्रहालय आर्किव्हिस्ट, हस्तलिखितांचे क्युरेटर, डिजिटल अर्काइव्हिस्ट, डिजिटल माहितीसेवा ग्रंथपाल, दूरस्थ शिक्षण ग्रंथपाल, इ. इ. अशा ग्रंथपालांचे वार्षिक वेतन हे इतर व्यावसायिक व सॉफ्टवेअर प्रोग्रामरइतकेच असते किंवा अधिकसुद्धा असते. नवे तंत्रज्ञान अभ्यासणे व त्याचा उपयोग माहितीच्या सेवा देण्यास करण्याचे आव्हान हे ग्रंथपाल पेलत असतात आणि यात वर्षानुवर्षे सखोल संशोधनही करीत असतात. अनेक ग्रंथपालांनी या विषयात डॉक्टरेट मिळवलेली आहे. जगभरातील अग्रगण्य विद्यापीठे ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देऊन उत्तम ग्रंथपाल तयार करीत आहेत. परंतु ही संख्या मात्र कमी आहे.

थोडक्यात सांगायचे तर ग्रंथालय ही नुसती इमारत नसून त्यामध्ये जतन केलेली पुस्तके, वृत्तपत्रे आणि नियतकालिके, इलेक्ट्रॉनिक माहितीस्रोत, डेटाबेस यांचा नेमका उपयोग करण्यास मदत करणारी ही सुविधा आहे. हे स्रोत लेखक, राजकारणी, वैज्ञानिक, तत्त्वज्ञ आणि संत यांच्या प्रयत्नांचे, कर्तृत्वाचे आणि गौरवाचे प्रतिनिधित्व करतात. यांनी निर्माण केलेले ज्ञान वापरून त्यातून नवीन ज्ञानाची निर्मिती होणे आवश्यक आहे. अनेक दिग्गज त्यांच्या यशाचे श्रेय हे त्यांनी वाचलेले साहित्य, ग्रंथ आणि त्यांना मदत केलेल्या ग्रंथपालांना देतात. कारण त्यांनी ग्रंथ नुसते वाचलेले नसतात, ते त्यांचे उत्तम वापरकर्ते असतात आणि त्यातूनच नवीन ज्ञानाची निर्मिती होते. भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या पंचसूत्रीतील पहिले सूत्रही 'ग्रंथ हे वापरण्यासाठी असतात' असेच आहे. त्यांच्या मते ग्रंथपालाला ग्रंथालयातील स्रोत आणि वाचकांच्या गरजा यांची सांगड घालता येते. प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ व लेखक मायकेल फुको नेहमी म्हणत की, त्यांचे लेखन श्रोते किंवा वाचकांसाठी नसून वापरकर्त्यांसाठी आहे. त्यांच्या मते पुस्तकाच्या सीमारेषा कधीही स्पष्ट नसतात. त्याचे शीर्षक, पहिल्या ओळी आणि शेवटच्या पूर्णविरामापलीकडे ते इतर पुस्तके, इतर ग्रंथ, इतर स्रोतांमधील वाक्यांच्या संदर्भामध्ये जोडले गेलेले असते. या अशा जोडणीचे ग्रंथपालाला ज्ञान असते. म्हणूनच ग्रंथपाल कोणत्याही संस्थेमध्ये अपरिहार्य ठरतो. बदलत्या काळातील त्याची भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे. गरज आहे ती या ज्ञानशाखेकडे करीअर म्हणून वेगळ्या दृष्टीने पाहण्याची.

**(लेखिका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'ग्रंथालयशास्त्र विभाग' आणि 'सेंटर फोर पब्लिकेशन एथिक्स' येथे कार्यरत आहेत.)**

Pune, Main
15/07/2023 Page No. 6

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

सकाळ

# प्रवेश रद्द केल्यास मिळणार संपूर्ण शुल्क

## उच्च शिक्षण संस्थांना परतावा धोरणाच्या अंमलबजावणीचे आदेश

**पुणे, ता. १४ :** विद्यार्थ्यांनो, तुम्ही एखाद्या उच्च शिक्षण संस्थेत अथवा विद्यापीठात शुल्क भरून प्रवेश घेतला असेल आणि तो प्रवेश रद्द करून अन्य संस्थेत प्रवेश घेतल्यास संबंधित शिक्षण संस्थेला तुम्ही भरलेले संपूर्ण शुल्क परत द्यावे लागणार आहे. होय, विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता शुल्क परतावा धोरण जाहीर केले आहे, त्यानुसार आता विद्यापीठे, शिक्षण संस्थांना विद्यार्थ्यांना शुल्क परत करावे लागणार आहे.

आयोगाच्या या धोरणानुसार विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास १०० टक्के शुल्क, तर ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास प्रवेश प्रक्रिया शुल्क म्हणून कमाल एक हजार रुपये वजा करून उर्वरित संपूर्ण शुल्काचा परतावा उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठांना देणे बंधनकारक असणार आहे. उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना शुल्क आणि मूळ कागदपत्रे परत न केल्यास कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट केले आहे.

शिक्षण संस्थांकडून शुल्क परतावा दिला जात नसल्याच्या तक्रारी देशभरातील विद्यार्थी आणि पालकांकडून विद्यापीठ अनुदान आयोगाकडे येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर आयोगाने जूनमध्ये घेतलेल्या बैठकीत शुल्क परताव्यासंदर्भात चर्चा केली. त्यानुसार आयोगाने शुल्क परताव्यासंदर्भातील परिपत्रक जाहीर केले आहे. त्याबाबत आयोगाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एम. जगदीश कुमार यांनी आयोगाच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरून देशातील उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांना सूचना दिल्या आहेत.

### 'ट्विटर'वरून अधिकृत सूचना

- "आपल्या आवडीच्या कोणत्याही विद्यापीठातून शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना आहे. विद्यार्थी एखाद्या विद्यापीठात किंवा शिक्षण संस्थेत प्रवेश घेतात, तेथील शुल्क भरतात. परंतु, त्यानंतर दुसऱ्या शिक्षण संस्थेत किंवा विद्यापीठात त्यांना प्रवेश मिळतो. या विद्यार्थ्यांना अगदी सहज दुसरीकडे प्रवेश घेता यावा यासाठी आयोगाने यापूर्वी शुल्क परताव्यासंदर्भात परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास त्यांना १०० टक्के शुल्क परत मिळावे, तर विद्यार्थ्यांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास त्यांना प्रवेश प्रक्रिया शुल्क म्हणून कमाल एक हजार रुपये वजा करून उर्वरित संपूर्ण शुल्क शिक्षण संस्थांनी परत करावे," अशी सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एम. जगदीश कुमार यांनी आयोगाच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरून दिली आहे.

Pune, Main
15/07/2023 Page No. 2

सकाळ

# अकरावी प्रवेशाची विशेष फेरी जाहीर

## विद्यार्थ्यांना पसंतीक्रम सोमवारपासून नोंदविता येणार

**पुणे, ता. १४ :** इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतंर्गत पहिली विशेष फेरी जाहीर झाली आहे. प्रवेश फेरीतंर्गत विद्यार्थ्यांना सोमवारपासून (ता. १७) ते गुरुवारपर्यंत (ता. २०) प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविता येणार आहे. या प्रवेश फेरीतंर्गत २४ जुलैला प्रवेशासाठी महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांची निवड यादी जाहीर होणार आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रातील ३२५ कनिष्ठ महाविद्यालयात अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया (कॅप) राबविण्यात येत आहे. कॅप फेरीअंतर्गत एकूण ९० हजार १६३ जागा उपलब्ध होत्या. त्यातील ३७ हजार ६३४ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असून, अजूनही ५२ हजार ५२९ जागा रिक्त आहेत. या प्रक्रियेतील तीन नियमित फेऱ्या संपल्या. आता पहिली विशेष फेरी जाहीर केली आहे.

### विद्यार्थी-पालकांसाठी सूचना

- या फेरीपूर्वी सर्वांचे पसंतीक्रम अर्ज भाग दोन अनलॉक केले जातील
- विशेष फेरीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपला पसंतीक्रम नोंदवून अर्ज पुन्हा लॉक करणे बंधनकारक आहे
- प्रत्येक विद्यार्थ्यास ऑनलाइन संमती द्यावी लागेल
- या प्रवेश फेरीपासून पुढील प्रत्येक फेरीसाठी विद्यार्थ्यांना पसंतीक्रम देऊन अर्ज भाग दोन लॉक करणे आवश्यक असेल
- नियमित फेऱ्यांमध्ये प्रतिबंधित केलेले सर्व विद्यार्थी या फेरीत सहभागी होऊ शकतात
- विशेष फेरीपासून पुढे कोणत्याही विद्यार्थ्यास प्रतिबंधित केले जाणार नाही

### पहिल्या विशेष फेरीचे वेळापत्रक

- प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे, पसंती अर्ज भाग दोन ऑनलाइन सादर करणे : **१७ ते २० जुलै**
- विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालय निवड यादी जाहीर करणे, विद्यार्थी लॉगिनमध्ये प्रवेशासाठी मिळालेले महाविद्यालय दर्शविणे, संबंधित महाविद्यालयास प्रवेशासाठी मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी दर्शविणे, या फेरीचा कट-ऑफ जाहीर करणे : **२४ जुलै**
- प्रवेश निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे, प्रवेश नाकारणे : **२४ ते २७ जुलै**

Pune, Main
15/07/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# शालेय शिक्षणात सत्र पद्धतीला तज्ज्ञांचा विरोध

## निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** भारतातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये सत्रांत पद्धत लागू केल्याचे परिणाम सकारात्मक नाहीत. असे असतानाही आता शालेय शिक्षणात सत्रांत पद्धती लागू केली जाणार आहे. परंतु, असे केल्याने घाईगडबडीने अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर दिला जाईल. परिणामी, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया कच्चा राहण्याची भीती आहे. त्यामुळे शालेय शिक्षणात सत्रांत पद्धती लागू करण्याबाबत पुनर्विचार व्हावा, अशी मागणी या क्षेत्रातील तज्ज्ञांनी केली आहे.

नववी ते बारावीपर्यंत सत्रांत पद्धत लागू करण्याचा निर्णय राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याद्वारे (नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क एनसीएफ) घेण्यात आला आहे. नववी, दहावीसाठी आठ शाखांमध्ये किमान तीन समूहांतील चार विषय विद्यार्थ्यांना निवडता येतील. प्रत्येक विषयाचे चार-चार पेपर असतील. विद्यार्थ्यांना १५० विषयांच्या पर्यायांतून आपले विषय निवडायचे आहेत. आतापर्यंत अकरावी व बारावीच्या स्तरावर विज्ञान, वाणिज्य, कला अशा शाखांतील विषय असायचे. मात्र, आता वेगळी पद्धती अस्तित्वात येणार आहे. संगीत, खेळ आदी विषयांचा दर्जा गणित, विज्ञान, मानव्य शाखा विषय, भाषा, सामाजिक शास्त्र यांच्याबरोबरीनेच गणला जाणार आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच्या महिन्यांत तिसरी, सहावी व नववीची नवीन पाठ्यपुस्तके उपलब्ध होण्याची शक्यता आहे. मात्र, या निर्णयाला आता विरोध होत आहे. नागपूरसह इतर विद्यापीठांच्या प्रधिकरणांवर काम केलेले शिक्षणतज्ज्ञ. प्रा. डॉ. संजय खडक्कार यांनी निर्णयावर आक्षेप घेत पुनर्विचाराची मागणी केली आहे.

### आक्षेप काय?

- सत्रांत पद्धतीमध्ये शिक्षकांना शिकवण्यास व विद्यार्थ्यांना शिकण्यास कमी वेळ मिळतो.
- शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही अभ्यासक्रमाचे व्यवस्थापन कमी वेळात करावे लागते.
- वेळेअभावी सत्रांतचा अभ्यासक्रम पूर्ण करणे कठीण झाल्यास शिक्षक विषयाचे संपूर्ण ज्ञान विद्यार्थ्यांना देऊ शकत नाही.
- विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त इतर उपक्रमांमध्ये भाग घेणे शक्य होत नाही.
- यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे कठीण आहे.

> सध्या शालेय शिक्षणात वार्षिक पद्धतीत घटक चाचण्या व दोन सत्रांमध्ये दोन परीक्षा घेतल्या जातात. भारतासारख्या देशात ज्याची लोकसंख्या १४२ कोटींच्यावर आहे तेथे शालेय शिक्षणात सत्रांत पद्धती लागू करणे योग्य ठरणार नाही. याबाबत पुनर्विचार व्हावा.
> -प्रा. डॉ. संजय खडक्कार, शिक्षणतज्ज्ञ

लोकसत्ता Sat, 15 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72941530

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

लोकमत

# अकरावी प्रवेशप्रक्रियेची विशेष फेरी रविवारपासून

## तीन फेऱ्या पूर्ण : २४ जुलैला गुणवत्ता यादी लागणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अकरावीची ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या तीन नियमित फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर आता विशेष फेरी रविवारपासून (दि. १६) सुरू होणार आहे. प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही विशेष फेरी घेतली जाणार असून, नियमित फेऱ्यांमध्ये प्रतिबंधित झालेले सर्व विद्यार्थी विशेष फेरीत सहभागी होऊ शकणार आहेत.

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीची प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. नियमित तिसऱ्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश घेण्याची मुदत शुक्रवारी (दि. १४) रोजी संपली. यानंतर विशेष फेरीला सुरुवात होत आहे. दि. १६ जुलै रोजी उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोटांतर्गत रिक्त जागा केंद्रीय प्रवेश समितीकडे प्रत्यार्पित करता येईल.

### १७ ते २० जुलै पर्यंत पसंतीक्रम अर्ज भरता येणार

- दि. १७ ते २० जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना पसंतीक्रम दर्शवणे, विशेष फेरी १ साठी पसंती अर्ज भाग दोन ऑनलाइन सादर करता येणार आहे. नवीन विद्यार्थी ऑनलाइन नोंदणी करून अर्ज भाग १ प्रमाणित करू शकतात.



- **विद्यार्थ्यांना त्यांचा अर्ज भाग १ मध्ये दुरुस्ती करता येईल. या फेरीपूर्वी सर्वांचे पसंतीक्रम अर्ज भाग २ अनलॉक केले जातील. जे विद्यार्थी या फेरीत सहभागी होऊ इच्छितात त्यांनी आपला पसंतीअर्ज पुन्हा लॉक करणे बंधनकारक असेल.**
- नियमित फेऱ्यांमध्ये प्रतिबंधित झालेले सर्व विद्यार्थी या फेरीमध्ये सहभागी होऊ शकतात. विशेष फेरीपासून पुढे कोणत्याही विद्यार्थ्यास प्रतिबंधित केले जाणार नाही.
- **दि. २४ जुलैला सकाळी १० वाजता विशेष फेरीची गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. तसेच, कटऑफ पोर्टलवर प्रसिद्ध केले जाणार आहे.**
- दि. २४ ते २७ जुलै या कालावधीत प्रत्यक्ष प्रवेश, प्रवेश रद्द करणे व प्रवेश नाकारणे ही प्रक्रिया सुरू राहील.

### द्विलक्षी विषय प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर

द्विलक्षी विषय प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर झाले असून, विद्यार्थ्यांना दि. १७ जुलैपासून प्रवेशित विद्यार्थी, द्विलक्षी विषय प्रवेशासाठी ऑनलाइन पसंती नोंदवू शकतात. दि. २४ जुलै रोजी विद्यार्थ्यांच्या विषयनिहाय गुणवत्ता याद्या आरक्षण व पात्रता नियमानुसार तयार करून प्रसिद्ध करता येणार आहे. दि. २४ ते २७ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश घेता येईल.



Hello Pune
Page No. 4 Jul 15, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# विद्यापीठ कारभाराला गती

## कुलगुरू गोसावी 'अॅक्शन मोड'मध्ये; प्र-कुलगुरू नियुक्ती, प्राध्यापक भरती होणार

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अॅक्शन मोडमध्ये आले असून, त्यांनी अधिष्ठांच्या नेमणुकीसोबतच प्र-कुलगुरू नेमण्याच्या आणि प्राध्यापक भरतीच्या प्रक्रियेला गती दिली आहे. त्यामुळे येत्या महिना अखेरीस पूर्णवेळ प्र-कुलगुरू मिळणार आहेत, तर पुढच्या महिन्यात विद्यापीठातला चार नवे अधिष्ठाता मिळणार आहे. यासोबतच पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवानिमित्त बोधचिन्ह स्पर्धेपासून विविध उपक्रमांच्या आयोजनाला सुरुवात झाली आहे.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून डॉ. सुरेश गोसावी यांनी सहा जूनला पदभार स्वीकारला. मात्र, जी- २० च्या बैठकींच्या आयोजन आणि पदवी प्रदान समारंभामुळे त्यांना पुरेसा वेळ मिळाला नाही. आता डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाच्या कारभारावर आपली पकड बसवायला सुरुवात केली असून, रखडलेल्या मुद्द्यांवर तातडीने निर्णय घ्यायला सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून विज्ञान व तंत्रज्ञान, मानव्यविद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, आंतरविद्याशाखीय अभ्यास अशा चारही विद्याशाखांसाठी पूर्णवेळ अधिष्ठात्यांच्या नेमणुकीला सुरुवात केली असून, अर्ज मागविण्यात आले आहेत. साधारण सव्वा वर्षापासून प्रभारी अधिष्ठात्यांकडून कारभार पाहण्यात येत होता. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यात असल्याने, पूर्णवेळ अधिष्ठात्यांची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर अधिष्ठाता होण्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १० ऑगस्ट असल्याने, अर्जांची पडताळणी आणि मुलाखती होऊन ऑगस्टच्या अखेरीस नवे अधिष्ठाता मिळण्याची शक्यता आहे.

माजी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी निवृत्त झाल्यानंतर, विद्यापीठाला पूर्णवेळ प्र-कुलगुरू मिळाले नाहीत. त्यामुळे वर्षभर प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून डॉ. संजीव सोनवणे यांनीच कारभार चालविला. यापूर्वी राज्यपालांकडून प्र-कुलगुरूंची निवड होत होती. मात्र, सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील नव्या तरतुदीनुसार प्र-कुलगुरू निवडीसाठी पात्र असणारी नावे मॅनेजनेंट कौन्सिलच्या बैठकीत मांडायची आहेत. या बैठकीचे अध्यक्ष कुलगुरू असतात. त्यामुळे संबंधित नावांवर चर्चा आणि विचार विनिमय करून त्यातील एक नाव सर्वानुमते मान्य करायचे आहे. त्यानुसार ही बैठक येत्या २२ जुलैला होणार असून, बैठकीच्या अजेंड्यावर प्र-कुलगुरू निवडीवर चर्चा अपेक्षित आहे. त्यामुळे त्याच दिवशी निवड जाहीर होण्याची शक्यता आहे. यातच नव्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात होणार असल्याने, विद्यापीठाने १३३ जागांवर सहायक प्राध्यापकांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे डॉ. गोसावी यांनी पदभार स्वीकारताच कामांना गती दिल्याचे चित्र दिसत आहे.

### नवसंशोधन केंद्राला नवे संचालक मिळणार

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नावीन्यपूर्ण संशोधनासोबतच स्टार्टअप संस्कृती आणि नवउद्योजक विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. मात्र, पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेसच्या माजी संचालक डॉ. अपूर्वा पालकर यांची नियुक्ती राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणून झाली. त्यांच्यानंतर या केंद्राचा अतिरिक्त पदभार डॉ. संजय ढोले यांच्याकडे सोपविण्यात आला. डॉ. गोसावी यांच्या सूचनेनुसार, विद्यापीठ प्रशासनाने या पदासाठीही अर्ज मागविले आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या नवसंशोधन केंद्राला पूर्ण वेळ नवे संचालक मिळणार आहे.



### प्र-कुलगुरू प्राचार्यांमधूनच असावा

पुणे विद्यापीठाला अजूनही ८०० पेक्षा अधिक महाविद्यालये आणि रिसर्च सेंटर संलग्न आहेत. त्यामुळे या सर्व महाविद्यालयांचे प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी प्राचार्यांचा प्रतिनिधी म्हणून अनुभवी आणि चाणाक्ष प्राचार्यांची प्र-कुलगुरू म्हणून निवड करण्यात व्हावी, अशी अनेकांची इच्छा आहे. प्र-कुलगुरूंकडे संपूर्ण शैक्षणिक कामकाजाची जबाबदारी असते. या शैक्षणिक कामकाजात महाविद्यालयांचा सहभाग हा महत्त्वाचा असतो. त्यामुळे प्राचार्यांची निवड प्र-कुलगुरू म्हणून झाल्यास, पुणे विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये चांगला दुवा निर्माण होऊ शकतो, असे प्राचार्यांचे म्हणणे आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलातील प्राध्यापकाची कुलगुरू म्हणून निवड झाल्यावर, आता प्र-कुलगुरू म्हणून प्राचार्यांना प्रतिनिधित्व मिळावे, अशीही मागणी आहे.

Maharashtra Times 16.7.23

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

पुढारी

# पाठ्यपुस्तकांचा अनुवाद आवश्यक !

## मातृभाषेतून शिक्षणाबाबत 'यूजीसी'कडून मार्गदर्शक सूचना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमही मातृभाषेतून उपलब्ध करण्यात येणार आहे. त्यासाठी पाठ्यपुस्तके भारतीय भाषांमध्ये अनुवादित होण्याची गरज व्यक्त करून विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार उच्च शिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम रचना, अभ्यासक्रम, अभ्यास साहित्य भारतीय भाषांमध्ये तयार करणे आवश्यक आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना मातृभाषेत किंवा स्थानिक भाषेत परीक्षा देणे शक्य होईल. त्यामुळे स्थानिक भाषेत किंवा मातृभाषेत अध्ययन अध्यापन करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठांनी नव्याने अभ्यासक्रमांची निर्मिती करतानाच मोठ्या प्रमाणात भारतीय भाषांमध्ये अनुवाद करणेही आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

मूळ अर्थ कायम ठेवून विद्यार्थ्यांना कळेल इतक्या सोप्या भाषेत संकल्पनांची मांडणी आणि अनुवाद करणे आवश्यक आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) अनुवादासाठी अनुवादिनी ही प्रणाली विकसित केली आहे. त्याचा वापर पाठ्यपुस्तकांच्या अनुवादासाठी करता येऊ शकतो. त्यात स्पीच टू टेक्स्टसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यात या प्रणालीचा वापर करून अनुवाद केल्यावर पुढील टप्प्यात अधिक प्रभावी पद्धतीने संपादन करता येऊ शकते. कमिशन फॉर सायंटिफिक अँड टेक्निकल टर्मिनॉलॉजी यांच्याकडून विविध क्षेत्रांसाठी प्रमाणित शब्दकोश तयार करण्यात आले आहेत.

अनुवाद प्रक्रियेत त्याचा वापर करता येऊ शकतो. तांत्रिक संज्ञा विद्यार्थ्यांना नेमक्या पद्धतीने कळण्यासाठी अनुवादासह इंग्रजी संज्ञा किंवा इंग्रजी संज्ञा प्रादेशिक लिपीत देता येऊ शकतात. राज्य सरकारांचे ग्रंथ विभाग, विद्यापीठांतील भाषा विभागांनी प्रसिद्ध केलेल्या शब्दकोशांचा वापर करता येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

Pune Edition
Jul 17, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

प्रभात

# ७० हजारांवर जागा रिक्त

## अकरावी प्रवेशाकडे विद्यार्थ्यांची पाठ; फक्त ४४,२०६ प्रवेश

### आयटीआय, तंत्रशिक्षणसह अन्य अभ्यासक्रमांकडे कल

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १६** - पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीसाठी केवळ ४४ हजार २०६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहे. तर, तब्बल ७० हजार ३४४ जागा रिक्त पडल्या आहेत. विद्यार्थ्यांचा आयटीआय, तंत्रशिक्षणसह अन्य अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकडे अधिक ओढा असल्यामुळ अकरावीकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरवल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. इयत्ता दहावीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशाची चिंता लागलेली असते. प्रवेशासाठीचा पालकांना आग्रह, विद्यार्थ्यांची असलेली आवड यात बऱ्याचदा तफावतही आढळून येते. विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळण्याची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शाखांऐवजी कौशल्याधारित अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याला पसंती दिल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

पुणे विभागात ३२५ कनिष्ठ महाविद्यालयांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. प्रवेशासाठी ९९ हजार ३४ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केलेली आहे. ८८ हजार ५८५ विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन लॉक केलेले आहेत. ८८ हजार १९७ अर्जांची पडताळणी झाली आहे. ७९ हजार ८६९ विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविलेली आहे. प्रवेशासाठी तीन नियमित फेऱ्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. यात बहुसंख्य विद्यार्थ्यांनी अद्यापही प्रवेश नोंदविलेले नाहीत. काही विद्यार्थ्यांनी नामांकित महाविद्यालय न मिळाल्यामुळेही प्रवेश निश्चित केलेला नाही. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेत प्रवेशाला प्राधान्य दिले आहे. त्यानंतर वाणिज्य, कला शाखेत प्रवेशासाठी विचार केला जात आहे.

### कनिष्ठ महाविद्यालये अडचणीत सापडणार?

प्रवेशासाठी पहिल्या विशेष फेरीला सुरुवात झालेली आहेत. दि.२७ जुलैपर्यंत या फेरीची प्रक्रिया सुरु राहणार आहे. या फेरीत तरी विद्यार्थ्यांचे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित होणार का, असा प्रश्न उपस्थित करण्यात येवू लागला आहे. विद्यार्थीच न मिळाल्यास महाविद्यालयांच्या खर्चाचा डोलाराही कोलमडणार आहे. महाविद्यालये आर्थिक संकटात सापडण्याची शक्यता वर्तविण्यात येऊ लागलेली आहे.

**पुणे विभागातील इयत्ता अकरावी प्रवेशाची सद्यस्थिती**

| कोटा | प्रवेश क्षमता | प्रवेश निश्चित | रिक्त जागा |
|---|---|---|---|
| कॅप | ८८६९२ | ३७६३३ | ५८६१३ |
| इनहाऊस | ८७७८ | ३५९९ | ३८२९ |
| अल्पसंख्याक | १२५८३ | २२५४ | ४४९३ |
| व्यवस्थापन | ४४९७ | ७२० | ३४०९ |
| एकूण | ११४५५० | ४४२०६ | ७०३४४ |



PuneCity, 17 July 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

प्रभात

# 'पाठ्यपुस्तके अनुवादित होण्याची गरज'

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १७** - नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षणास प्राधान्य दिले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे आता उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम मातृभाषेतून उपलब्ध करून दिले जाणार असून, त्यासाठी पाठ्यपुस्तकांचा भारतीय भाषांमध्ये अनुवादित होण्याची गरज आहे. त्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत.

उच्च शिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम रचना, अभ्यासक्रम, अभ्यास साहित्य भारतीय भाषांमध्ये तयार करणे आवश्यक आहे.

त्यानंतर विद्यार्थ्यांना मातृभाषेत परीक्षा देणे शक्य होईल. त्यामुळे स्थानिक भाषेत किंवा मातृभाषेत अध्ययन अध्यापन करण्यासाठी विद्यापीठांनी नव्याने अभ्यासक्रमांची निर्मिती करतानाच मोठ्या प्रमाणात भारतीय भाषांमध्ये अनुवाद करणेही आवश्यक असल्याचे यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

### अनुदानासाठी अनुवादिनी प्रणाली

आशय कायम ठेवत विद्यार्थ्यांना समजेल, अशा सोप्या भाषेत संकल्पनांची मांडणी आणि अनुवाद करणे गरजेचे आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) अनुवादासाठी 'अनुवादिनी' ही प्रणाली विकसित केली आहे. त्याचा वापर पाठ्यपुस्तकांच्या अनुवादासाठी करता येऊ शकतो. त्यात स्पीच टू टेक्स्टसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

PuneCity, 18 July 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

लोकमत

# सरकारी असंवेदनशीलतेची मठ्ठ, बहिरी भिंत हलेल?

## उच्चशिक्षण संस्थांमधील रॅगिंगबाबत संवेदनशील असलेले सरकार अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना सोसाव्या लागणाऱ्या भेदभावाबाबत गप्प कसे?

**उच्चशिक्षण संस्थांमधील** अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी निश्चित धोरण विकसित करण्याकडे सरकारकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे निराश होऊन पीडित रोहित वेमुला आणि पायल तडवीच्या आईने सर्वोच्च न्यायालयात न्याय मागण्यासाठी धाव घेतली होती. वेमुलाच्या प्रकरणात विद्यार्थी आणि शिक्षकांनी जातिभेद हा फौजदारी गुन्हा ठरवण्यासाठी कायदा करण्याची मागणी केली होती, याशिवाय ज्या कुलगुरूंवर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी होती. सरकारने योग्य धोरण-आखणी आणि कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते; परंतु केले नेमके उलटे..! जातीय भेदाभेदाविरुद्ध कायदा आणला नाहीच, या उलट वेमुलाच्या आईला ओबीसी म्हणून घोषित करून कुलगुरूंवर अॅट्रॉसिटी अत्याचाराचा खटला चालणार नाही, याची दक्षता घेतली. ज्या कुलगुरूंना रजेवर पाठविण्यात आले होते त्यांना सन्मानाने या पदावर रुजू करून घेतले गेले. सरकारच्या या कृत्यांमुळे रोहित वेमुलाची आई आणि आंदोलक विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरणे स्वाभाविकच होते.


**डॉ. सुखदेव थोरात**



माजी अध्यक्ष,
विद्यापीठ अनुदान आयोग


विद्यापीठ अनुदान आयोगाची याबाबतची भूमिका काय आणि आयोगाने कोणते धोरण स्वीकारले आहे, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली. विद्यापीठ अनुदान [illegible] नियमांकडे बोट दाखवले. या नियमांमध्ये उच्च जातीचे विद्यार्थी/ शिक्षक/ प्रशासक यांच्याकडून होणाऱ्या एकूण पस्तीस प्रकारच्या भेदभावांबद्दल नियमांचा समावेश आहे; परंतु २०१२ ची ही नियमावली बंधनकारक नसल्यामुळे बहुसंख्य शिक्षण संस्थांनी ती लागूच केलेली नाही. अनेक शिक्षण संस्थांना तर त्याबाबत काही माहितीही नाही.

या एकूण पार्श्वभूमीवर प्रश्न असा आहे : आजवर अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शेकडो आत्महत्या होऊनही, त्यावर कारवाई करण्याबाबत सरकारची एवढी टाळाटाळ का? यावरचे उपाय सरकारला माहिती नाहीत, असे म्हणणे हास्यास्पद ठरेल, तरीही काही हालचाल होत नाही याचे प्रमुख कारण म्हणजे संवेदनशीलतेचा अभाव! जाती -आधारित भेदभाव आणि अत्याचार थांबवण्यासाठी सरकारमधील संवेदनशीलतेचा अभाव. अनेक उच्च शिक्षण संस्थांच्या आवारात रॅगिंग होत असते. या रॅगिंगला तथाकथित उच्च आणि खालच्याही जातीतले विद्यार्थी बळी पडतात. याबाबत सरकार अधिक संवेदनशील आहे. रॅगिंगला आळा घालण्याच्या हेतूने अनेक स्तरावर प्रयत्न होतात, नियमावल्या तयार केल्या जातात; परंतु जेथे अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना सोसाव्या लागणाऱ्या भेदभावाचा प्रश्न येतो, तेथे मात्र सरकारची इच्छाशक्ती कमी पडते, असे सातत्याने दिसलेले आहे.

यावर सातत्याने चर्चा होतात, मी स्वतः अनेक लेख [illegible]




सरकारी असंवेदनशीलतेची बहिरी भिंत ढिम्म हलत नाही. सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाला मी तीन उपाय सुचवू इच्छितो :

**एक : कायदेशीर तरतुदी**

इक्विटी रेग्युलेशन, २०१२ अंतर्गत ओळखल्या जाणाऱ्या जाती भेदभावाच्या एकूण ३५ प्रकारच्या वर्तनांना फौजदारी गुन्हा मानावा किंवा त्या सुधारित अॅट्रॉसिटी कायदा २०१५ शी जोडण्यात याव्यात.

**दोन : विद्यार्थ्यांचे समुपदेशन**

भेदभाव आणि असमानतेच्या समस्येबद्दल विद्यार्थ्यांना शिक्षित आणि संवेदनशील करण्यासाठी अनिवार्य अभ्यासक्रम सुरू करावा. भारतीय संविधान आणि कायद्यातील तरतुदीच्या विरोधात जाणारी अनेक कौटुंबिक, पारंपरिक, सामाजिक मूल्ये विद्यार्थ्यांच्या वाढीच्या वयात त्यांचे वर्तन ठरवत असतात. कुटुंब आणि सामाजिक परिसरानुसार मुलांचे विचार घडतात आणि पक्के होतात. हीच मुले शैक्षणिक परिसरात आली, की त्यांचे ते विचार जातिभेद पाळणाऱ्या वर्तनात प्रतिबिंबित होतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर कायदा किती आणि का [illegible] कायद्याबरोबरच सामाजिक संवेदनशीलतेच्या जोपासनेकडे लक्ष पुरवण्याबाबत आग्रह धरला होता. एका अविचारी गुन्हेगाराला कायदा शिक्षा करू शकतो; पण कायदा कधीही संपूर्ण समाजामध्ये परिवर्तन आणू शकत नाही, असे त्यांचे म्हणणे होते.

सामाजिक विवेक हाच अखेरीस मानवी हक्कांचे रक्षण करतो. सामाजिक सद्सद्विवेकबुद्धी जागी असेल, तरच ती कायद्याने निवडलेल्या अधिकारांना ओळखते आणि तरच हे हक्क सुरक्षित राहतात. अमेरिका आणि इतर काही देशांमधील विद्यापीठांनी अशा स्वरूपाचे नागरी शिक्षण अभ्यासक्रम सुरू केले आहेत. वर्गखोलीत विद्यार्थ्यांना समोरासमोर आणून, खुल्या चर्चेने पूर्वग्रहाचे लिंपण काढणे आणि रूढीवादी विचारप्रक्रियेला छेद देण्याचे प्रयत्नही जगभरातल्या अनेक विद्यापीठांमध्ये होत आहेत.

भारतातही अशा स्वरूपाचे अभ्यासक्रम महत्त्वाचे ठरतील. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना आपल्या समाजातील भेदभाव आणि असमानतेबद्दल जागरूक करतील. त्याचा दीर्घकालीन उपयोग होईल.

**तीन : शैक्षणिक आणि कायदेविषयक मदत**

मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत तसेच इंग्रजी भाषा आणि मुख्य विषय सुधारण्यासाठी उपचारात्मक साहाय्य.. विद्यापीठ अनुदान आयोगाने असे कार्यक्रम अनिवार्य केल्यास विद्यार्थ्यांवरचा मानसिक दबाव दूर होऊन त्यांची शैक्षणिक कामगिरी सुधारण्यास मदत होईल. शेवटी इक्विटी रेग्युलेशन २०१२ ची अंमलबजावणी करण्यासाठी शैक्षणिक संस्थामध्ये 'समान संधी कक्ष' तयार करून स्वतंत्र कक्ष -अधिकाऱ्याची नेमणूक करणे! भविष्यात शैक्षणिक संस्थांमधल्या आत्महत्या टाळण्यासाठी सरकारने वरील गोष्टींवर तातडीने पावले उचलण्याची वेळ आली आहे.

Pune Main
Page No. 6 Jul 18, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम कोणासाठी ?

दिलीप चव्हाण

**परदेशातील काही विद्यापीठांप्रमाणे भारतातसुद्धा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करावा, अशी विद्यार्थ्यांची मागणी असल्याचे धोरणकर्त्यांनी गृहीत धरले आहे का ?**

**महाराष्ट्रातील उच्च** शिक्षण क्षेत्रात पदवी अभ्यासक्रमाविषयी अभूतपूर्व गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. या शैक्षणिक वर्षापासून स्वायत्त महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा असेल; तर संलग्नित महाविद्यालयांमध्ये तीन वर्षांचा. यामुळे विद्यार्थी, शिक्षक व पालकांत संभ्रम निर्माण झाला आहे. अशीच परिस्थिती भारतभर आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या (याला यापुढे 'ऑनर्स' म्हटले जाईल) अंमलबजावणीतून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल होणार आहेत. चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाविषयीची चर्चा इतिहासात अनेकदा झाली आहे. विशेषत: विविध पदव्यांचा कालावधी वाढवून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अधिक काळ गुंतवून ठेवायचे आणि या क्षेत्रात वाढत जाणारा विद्यार्थ्यांचा ओघ नियंत्रित करायचा, असे दोन्ही उद्देश यात होते.

१९६४-६५च्या धोरणानुसार आपण १०+२+३ असा नवा आकृतिबंध स्वीकारला. त्यावेळीदेखील पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा असावा, अशी चर्चा केली गेली. त्याकाळी विद्यार्थ्यांचा आर्थिक प्रश्न मोठा होता म्हणून त्या आयोगाने तो प्रस्ताव रद्दबातल ठरवला. यानंतर चार वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या चर्चेला वेग आला तो २०१३-१४ दरम्यान! हार्वर्ड विद्यापीठाचे पदवीधर असलेले तत्कालीन मानव संसाधन मंत्री कपिल सिब्बल यांनी दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू आणि इतर प्राधिकरणांना दिमतीला घेऊन विद्यार्थी व शिक्षकांना विश्वासात न घेता चार वर्षांचा अभ्यासक्रम लादण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेतील चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचे हे अनुकरण होते. विद्यार्थी व प्राध्यापकांनी दीर्घकाळ संघर्ष करून याला जोरदार विरोध केला. शेवटी, विद्यापीठ अनुदान आयोगाने हस्तक्षेप करून दिल्ली विद्यापीठाला हा अभ्यासक्रम रद्द करण्याविषयी सुचविले. सर्वोच्च न्यायालयानेदेखील यामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. विशेष म्हणजे, भारतीय जनता पक्ष व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांनी ऑनर्स पदवीला विरोध केला होता!

या पार्श्वभूमीवर भारतात २०१६ मध्ये पुन्हा एकदा चार वर्षांच्या 'ऑनर्स' अभ्यासक्रमाची चर्चा सुरू झाली. सुरुवातीला सुब्रमणियन समितीच्या २०१६च्या अहवालामध्ये बी.एड. हा अभ्यासक्रम समोर ठेवून ऑनर्स पदवीचा नाममात्र उल्लेख करण्यात आला. त्यानंतर २०१९मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यामध्ये ऑनर्स अभ्यासक्रमाची चर्चा विस्ताराने करण्यात आली. संपूर्ण भारतात सर्वच पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचे असावेत, अशी चर्चा तेव्हाही करण्यात आली नव्हती. परंतु, २०२०च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात ही चर्चा सक्तीचा कार्यक्रम म्हणून अलोकशाही मार्गाने करण्यास सुरुवात झाली. यामुळे गोंधळ वाढत गेला.

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात सर्वांत महत्त्वाचा घटक असलेले विद्यार्थी वा प्राध्यापक किंवा प्राचार्य अथवा कुलगुरूंच्या संघटना किंवा पालकांनी अशी ऑनर्स पदवीची मागणी केली नव्हती. परदेशातील काही विद्यापीठांप्रमाणे भारतामध्येसुद्धा विद्यार्थ्यांची अशी मागणी आहे, असे धोरणकर्त्यांनी गृहीत धरले! भारतातील अत्यल्प विद्यार्थी वर्ग उच्च शिक्षणासाठी अमेरिकेसारख्या देशांमध्ये जातो. हा अत्यल्प घटक समोर ठेवून बहुसंख्य विद्यार्थ्यांना सरकार अकारण वेठीस धरीत आहे, असा आरोप अखिल भारतीय शिक्षण अधिकार मंचाने केला आहे. अर्थात, विकसित देशांमध्ये सर्वच पदवी अभ्यासक्रम हे चार वर्षांचे नाहीत. तरीदेखील, समकक्षतेच्या नावाखाली हा अभ्यासक्रम राबविण्यासाठी सरकार आग्रही आहे.

भारतात ज्या कारणांमुळे १९६४-६५ मध्ये ऑनर्स अभ्यासक्रम रद्दबातल ठरविण्यात आला होता, ती कारणे अजूनही अस्तित्वात आहेत. आपल्याकडे पायाभूत सुविधांचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. 'नॅक'चा 'अ' दर्जा प्राप्त केलेल्या शहरी महाविद्यालयांची ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि क्रीडांगणे सुसज्ज नाहीत. प्राध्यापकांची पदभरती झालेली नाही. एकट्या उस्मानिया विद्यापीठात ५००हून अधिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत. जवळपास २५ हजार महाविद्यालये आणि ६०० विद्यापीठांनी स्वत:चे मूल्यांकन करून घेतलेले नाही. याचे मुख्य कारण हे त्यांच्याकडे असणारा पायाभूत सुविधांचा अभाव आणि त्यामुळे ढासळलेली गुणवत्ता. ही गुणवत्ता केवळ पदवी समकक्ष करून येणार नाही!

शालेय गळतीप्रमाणेच महाविद्यालयीन गळतीचासुद्धा प्रश्न गंभीर आहे. ज्या महाविद्यालयामध्ये बी.ए.च्या पहिल्या वर्षाच्या सात तुकड्या असतात, त्याच महाविद्यालयांमध्ये दुसऱ्या वर्षाच्या चार आणि तिसऱ्या वर्षाच्या तीन तुकड्या असतात. याचं कारण पदवीदरम्यान मोठ्या प्रमाणावर होत असलेली गळती हे आहे. शहरात पदवीसाठी येणारे विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीतून येतात. तीन वर्षे कुठल्याही मोठ्या आधाराशिवाय राहणे, हे त्यांना अवघड असते. अशा वेळी, गळती वाढत जाते. आंध्र प्रदेशमध्ये पदवी मिळेपर्यंत जवळपास निम्मे विद्यार्थी गळतात. महाराष्ट्रातही हीच स्थिती आहे. भारतीय प्रौद्योगिक संस्थांमधून (आयआयटी) गेल्या दोन वर्षांत दोन हजार ४०० विद्यार्थ्यांची गळती झाली आहे, असे एका पाहणीत आढळून आले आहे. या गळालेल्या विद्यार्थ्यांमध्ये एका पाहणीनुसार ५० टक्के आणि दुसऱ्या पाहणीनुसार ६० टक्के विद्यार्थी मागासवर्गीय होते. गळणाऱ्या विद्यार्थ्यांना सामाजिक सुरक्षिततेचे कवच आहे, असे म्हणता येत नाही. ऑनर्स पदवी अभ्यासक्रमातील 'मल्टिपल एन्ट्री-एक्झिट' धोरणामुळे या गळतीला अधिमान्यता तर मिळेलच; पण पदवीधरांमध्ये नवी विषमता निर्माण होईल. गळतीच्या समस्येची मुळापासून सोडवणूक करण्याची राज्यकर्त्यांवरील जबाबदारी आपोआपच टळेल!

ऑनर्स पदवीची पाठराखण करताना सरकारची भूमिका अशी आहे की, विद्यार्थ्यांना अनेक विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असेल. पण, आपल्याकडे संस्कृत, पाली, अर्धमागधी, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, नीतिशास्त्र असे अनेक विषय यापूर्वीच बंद करण्यात आले आहेत. मराठी हा विषयही याच मार्गावर आहे. या विषयांची रोजगाराभिमुखता न राहिल्यामुळे हे विषय स्वेच्छेने निवडले जाण्याची शक्यता नाही. अशा वेळी 'मोठ्या प्रमाणावर निवडीची संधी' या ध्येयवादाला फारसा काही अर्थ नाही. मराठवाड्यात एखाद्याच महाविद्यालयामध्ये मानसशास्त्रामध्ये पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेण्याची सुविधा आहे. मराठवाड्यासारख्या प्रदेशाला मानसशास्त्राची आवश्यकता नाही, असेच जणू काही सरकारला वाटते. निवडीच्या या तथाकथित स्वातंत्र्यानंतर हे कमकुवत विषय इतर रोजगाराभिमुख विषयांसोबतच्या स्पर्धेत थेटपणे ओढले जातील आणि हळूहळू संपतील, हे नक्की. अमेरिकेत विविध विषयांच्या निवडीचे स्वातंत्र्य दिले जाताना 'कोअर' विषयाला कमी लेखले जात नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

ऑनर्स केल्यानंतर विशिष्ट अर्हता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना थेट पीएच.डी.ला प्रवेश मिळणार आहे. सरकारने या धोरणाद्वारे एका फटक्यात कोणतेही कारण न देता एम. फिल. हा अभ्यासक्रम बंद केला. आता पदवीनंतर थेट पीएच.डी.! भारतीय संशोधनाच्या गुणवत्तेचे वाभाडे यापूर्वीच निघाले असताना पदवीनंतर थेट पीएच.डी.साठी पात्र ठरविणे, हे अगदीच अनाकलनीय आहे. यातून संशोधनाचे किरकोळीकरण तर होईलच; पण नवी अराजकदेखील निर्माण होईल.

चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाची स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्रात झालेली चर्चा व्यथित करणारी पण उद्बोधक आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा ब्राह्मणेतर विद्यार्थी हे हळूहळू शिक्षणाच्या क्षेत्रात येऊ लागले, तेव्हा सनातनी पुढाऱ्यांना भीती वाटू लागली. असे घडले तर उच्चजातीय तरुणांमधील बेरोजगारी अधिक वाढेल, अशी त्यांना काळजी होती. या प्रश्नावर मात करण्यासाठी बाळ गंगाधर टिळक यांनी तीनऐवजी चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाची पाठराखण केली होती. याची विस्तृत चर्चा परिमला व्ही. राव यांनी त्यांच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला सादर केलेल्या टिळकांवरील प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणामध्ये केली आहे. इतिहासातील या चर्चेच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या हेतूविषयी अधिकच संशय निर्माण होतो.

या धोरणात उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचे प्रमाण २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा ध्येयवाद बाळगण्यात आला आहे. ऑनर्स अभ्यासक्रमातील गुंतागुंत आणि भारतातील सामाजिक-शैक्षणिक दुरवस्था लक्षात घेता, हे ध्येय गाठण्यात ऑनर्स अभ्यासक्रम ही एक मोठी समस्या असणार आहे, हे नक्की!

(लेखक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक आहेत.)
dilipchavan@srtmun. ac. in

लोकसत्ता Tue, 18 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72969862

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*


# 'कमवा व शिका'तून नेमके काय मिळते?

**कमवा व शिका योजनेकडे केवळ गरजूंना मदत एवढ्या संकुचित दृष्टिकोनातून पाहून धोरणकर्त्यांनी मोठी चूक केली आहे. विद्यार्थ्यांचा वापर स्वस्तातील शिपायांसारखा केला जाणे योग्य नाही. शिक्षणास पूरक कौशल्ये रुजविण्यासाठी या योजनेचा उपयोग करून घेणे गरजेचे नाही का?**

तुषार कलबुर्गी

**महाविद्यालयीन आणि** विद्यापीठस्तरीय विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' ही योजना राबवली जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लागावा हा योजनेमागचा उद्देश आहे. या योजनेचा गरीब घरांतील हजारो विद्यार्थ्यांना, विशेषतः ज्या कुटुंबांतील पहिली पिढी शिक्षण घेत आहे, त्यांना खूप फायदा झाला आहे. या माध्यमातून मिळणाऱ्या मानधनामुळे विद्यार्थी महिनाभराच्या मेसचा आणि शैक्षणिक शुल्काचा काही खर्च भागवू शकतात. परंतु ही योजना ज्या रीतीने राबवली जाते, त्यात अनेक दोष निर्माण झाले आहेत. त्यामुळे योजना मूळ हेतूपासून भरकटली आहे. मानवी संसाधनांचा सुयोग्य वापर करण्याची दृष्टीही त्यात राहिलेली नाही. त्यामुळे कमवा आणि शिका योजना आगामी आव्हाने पेलण्यासाठी अधिक कालसुसंगत होणे अत्यंत गरजेचे आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उदाहरण घेऊ या. विद्यापीठाच्या मार्गदर्शिकेनुसार या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत- आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि होतकरू विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी मदत करणे, मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे, विद्यार्थ्यांना ज्ञानसेवक बनवणे, स्वयंरोजगाराबाबत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृतीची जाणीव निर्माण करणे वगैरे. ही उद्दिष्टे कागदावर वाचायला निर्दोष वाटत असली, तरी या योजनेची अंमलबजावणी विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन पातळीवरील उद्दिष्टांना धरून होतेच असे नाही. ही योजना केवळ राबवायची म्हणून राबवली जाते का, असा प्रश्न पडतो. विद्यार्थ्यांना ज्ञानसेवक बनवण्यासारखे उद्दिष्ट तर अंमलबजावणीत कुठेही अस्तित्वात नाही. कमवा व शिका या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दोन प्रकारची कामे दिली जातात. एक 'फील्ड वर्क' आणि दुसरे 'ऑफिशियल वर्क'. 'फील्ड वर्क'मध्ये मुख्यतः नर्सरीची कामे सांगितली जातात. त्यात खोदकाम करणे, बिया गोळा करणे, रोपे लावणे, रोपांना रोज पाणी देणे वगैरे. शिवाय विद्यापीठात किंवा महाविद्यालयांत आयोजित केल्या जाणाऱ्या काही प्रदर्शन अथवा कार्यक्रमांत सजावट करण्यापासून ते खुर्च्या लावण्यापर्यंत सगळीच कामे करून घेतली जातात. कधी कधी स्वच्छतेच्या नावाखाली कचरा, प्लास्टिक, बाटल्या गोळा करायलाही लावले जाते. ऑफिशियल वर्कमध्ये लायब्ररीमध्ये पुस्तके लावून घेणे, त्यावर क्रमांक लिहिणे, विद्यार्थ्यांना पुस्तके देणे आणि त्याच्या नोंदी ठेवणे; तसेच विद्यार्थ्यांच्या असाइनमेंट्स गोळा करणे, पत्र टाइप करून ती संबंधितांकडे पोहोचवणे, विविध कागदपत्रे हाताळणे, झेरॉक्स काढणे, ओळखपत्रे देणे, प्रयोगशाळेत प्राध्यापकांना साहाय्य करणे अशी कामे सांगितली जातात. ऑफिशियल कामांत विभागांमध्ये धूळ साफ करण्यास किंवा वस्तू नीटनेटक्या ठेवण्यासही सांगितले जाते.



उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रकारची कामे करायला लावून आपण काय साधतो? भारत हा तरुणांचा देश आहे असे ओरडून सांगितले जात असताना, या तरुणांच्या बुद्धीचा उपयोग त्यांच्यासाठी आणि देशासाठी करून घेण्याचा विचार का केला जात नाही? एक उदाहरण पाहा. एक विद्यार्थी बॅचलर्स इन व्होकेशनल स्टडीज (बी. व्होक.) हा अभ्यासक्रम करत आहे. पदवीधरांना रोजगारासाठी पुरेशा ज्ञानाबरोबरच कौशल्येही आत्मसात करता यावीत यासाठी बी. व्होक. हा अभ्यासक्रम असतो. यामध्ये विविध उद्योगांतील संधींनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते आणि कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते. असा अभ्यासक्रम करणाऱ्या एका विद्यार्थ्याला कमवा व शिका या योजनेत गेल्या वर्षभरात नर्सरीची कामे, साफसफाईची कामे, इव्हेंटची पोस्टर्स लावणे, खुर्च्या लावणे, पिशव्या शिवणे अशी कामे देण्यात आली.

आणखी एक उदाहरण पाहा. एक विद्यार्थी अर्थशास्त्रात पदवीचे शिक्षण घेत आहे. त्याला महाविद्यालयाच्या वाचनालयातील पुस्तकांवर क्रमांक टाकणे, ती नीट लावणे, ओळखपत्रे स्कॅन करणे आणि भौतिकशास्त्र विभागातील (जो त्याचा विभागच नाही) विद्यार्थ्यांच्या असाइनमेंट अपलोड करणे याशिवाय दुसरे कामच दिले गेले नाही.

विद्यार्थ्यांशी बोलताना अशा अनेक गोष्टी समजतात. त्यांचे म्हणणे असे की, कमवा व शिकाच्या प्रत्येक विद्यार्थ्याला आपण शिकतोय त्याच विभागात काम करण्याची संधी मिळतेच असे नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना सांगितल्या जाणाऱ्या कामाचा आणि अभ्यासक्रमांचा काहीच संबंध नसतो. एका महाविद्यालयात कमवा व शिकामध्ये काम करणारा एक अंध विद्यार्थी तर म्हणाला, 'शिपाईपदाच्या पेक्षाही खालच्या दर्जाची कामे आम्हाला सांगितली जातात.'

या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महाराष्ट्रातील शिक्षकेतर संघटनांनी विविध मागण्यांसाठी आंदोलने केली आणि आपल्या मागण्या राज्य सरकारपुढे ठेवल्या. त्यातली एक मागणी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरा ही होती. मात्र सरकार अशी भरती करण्यास अनुकूल नाही. विद्यापीठांकडून आणि महाविद्यालयांकडून आवश्यक कामे कंत्राटी तत्त्वावर करून घेतली जातात. कमवा व शिका या योजनेतील विद्यार्थ्यांकडे स्वस्त शिक्षकेतर (शिपाई) कर्मचारी म्हणून पाहिले जात आहे का, महाविद्यालयांना असलेली शिपायांची गरज कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांमार्फत भागवली जात आहे का, असे प्रश्न उपस्थित होतात. मागच्या वर्षी केवळ पुणे विद्यापीठामध्ये आणि विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये कमवा व शिका योजनेअंतर्गत अंदाजे नऊ ते दहा हजार विद्यार्थी काम करत होते.

एकीकडे 'स्किल इंडिया'चा गाजावाजा होत आहे, पण विद्यापीठ स्तरावर त्याची जी अंमलबजावणी करण्याची संधी कमवा व शिका योजनेतून साधता येऊ शकते. आपण ती संधी गमावत आहोत. जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन बाहेरच्या जगात नोकरी मिळवण्यासाठी जाणार आहेत, ते कमवा व शिकामध्ये निव्वळ अल्प प्रमाणात कौशल्यांची आवश्यकता असलेली (अनस्किल्ड) कामे करताना दिसत आहेत. या योजनेत विद्यार्थ्यांना जी कामे सांगितली जातात, ती ते मुकाट्याने स्वीकारतात. कारण महिन्याकाठी काही रक्कम त्यांच्या पदरी पडणार असते. पण अनेक विद्यार्थ्यांना अशी कामे आवडत नाहीत, मात्र त्यांच्या स्वप्रतिमेला धोरणकर्त्यांच्या विचारचौकटीत काही किंमत आहे, असं वाटत नाही. श्रमप्रतिष्ठेचा चुकीचा अर्थ लावून तोंडाला पाने पुसण्याचाच उद्योग आतापर्यंत होत आला आहे. या योजनेकडे गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना होणारी मदत एवढ्या संकुचित दृष्टीने न बघता, त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने कौशल्य प्रशिक्षण योजना म्हणून पाहिले गेले पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित आणि कौशल्याधारित कामे मिळणे, त्यातून त्यांच्या अनुभवात भर पडणे गरजेचे आहे. असे झाले तर ही योजना प्रत्यक्ष काम आणि त्यासाठी लागणारी कौशल्ये यातली दरी मिटवणारी ठरू शकेल.

जाताजाता 'कमवा व शिका'अंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मानधनाबद्दलही बोलले पाहिजे. विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या मेसचे आणि वसतिगृहांचे दर वाढले आहेत, पण कमवा व शिका योजनेचे मानधन मात्र तेवढेच आहे. वाढत्या महागाईमुळे या योजनेच्या माध्यमातून मिळणारे पैसे विद्यार्थ्यांना परवडेनासे झाले आहेत.

नव्या शिक्षण धोरणाअंतर्गत कौशल्याधारित आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणे आणि 'स्किल इंडिया'च्या माध्यमातून कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यातील दरी कमी करणे ही केंद्र सरकारची उद्दिष्टे आहेत. पण महाविद्यालयांतील विद्यार्थी कमवा व शिकाअंतर्गत अकुशल कामगारांनाही शक्य होतील, अशी कामे करत आहेत? हे धोरणकर्त्यांना दिसत नाही का? वास्तविक दोन्ही धोरणांमध्ये कमवा व शिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण कामे देण्याची तरतूद केली जाऊ शकते. महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचे झाल्यास उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'कमवा व शिका' योजनेसाठी राज्यात लवकरच धोरणाची निर्मिती करण्यात येणार असून या धोरणांतर्गत इतरही खासगी संस्था, कंपन्यांना सहभागी करून घेण्यात येईल, असे नुकतेच जाहीर केले. हे धोरण विद्यार्थ्यांतून कुशल मनुष्यबळाची निर्मिती करणारे ठरो, एवढीच अपेक्षा!

tusharkalburgi31@gmail.com

लोकसत्ता Wed, 19 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72977974

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

**लोकमत**

# उच्च शिक्षण संस्थांतील शिक्षकांनाही पुरस्कार!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : उच्च शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने आता प्राध्यापकांसाठी देखील राष्ट्रीय पुरस्कार-२०२३ जाहीर केला आहे. पदक, प्रमाणपत्र आणि पन्नास हजार रुपये रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. यासाठी येत्या ३० जुलैपर्यंत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर नामांकन पाठविता येणार आहे. पुरस्कार जाहीर झालेल्यांना नवी दिल्ली येथे येत्या ५ सप्टेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

शिक्षक हा ज्ञाननिर्मित्ती, प्रसार आणि विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षकांना आदर दिला असून, उत्कृष्ट शिक्षक अध्यापनाच्या व्यवसायात यावे यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. दोन विभागांत पुरस्कार दिला जाणार असून, पहिल्या विभागात व्यावसायिक प्रशिक्षण आयटीआय, पॉलिटेक्निक, एनएसटीआय, पीएमकेव्हीआय संस्था आणि उद्योजकता विकास यामधील शिक्षक तर दुसऱ्या विभागात उच्च शिक्षण संस्थांमधील प्राध्यापकांना पुरस्कार दिला जाणार आहे. दोन्ही विभागांतून प्रत्येकी २५ असे एकूण पन्नास शिक्षकांना दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येणार आहे. नामांकन भरणे तसेच नियमावली संदर्भात अधिक माहिती https://www.awards.gov.in आणि https://nat.aicte-india.org या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

Hello Pune
Page No. 6 Jul 19, 2023
Powered by: erelego.com

# संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठांमध्ये कक्ष

## 'यूजीसी'च्या नव्या मार्गदर्शक सूचनांचा मसुदा जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : उद्योगांशी सहकार्याद्वारे संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पुढाकार घेतला आहे. यानुसार उद्योगांशी सहकार्य संबंध निर्माण करण्यासाठी विद्यापीठांमध्ये उद्योग संबंध कक्ष (इंडस्ट्री रिलेशन सेल) स्थापन करण्याची शिफारस केली असून, उद्योगांना देणगीच्या माध्यमातून विद्यापीठांमध्ये प्रगत सुविधा निर्मिती, अध्यासनाची निर्मिती करता येणार आहे.

शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात सेतू निर्माण करण्याची तरतूद आहे. त्याद्वारे देशाच्या विकासात योगदान देणाऱ्या कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीने 'सस्टेनेबल अँड व्हायब्रंट युनिव्हर्सिटी इंडस्ट्री लिंकेजेस सिस्टिम फॉर इंडियन युनिव्हर्सिटीज' या मार्गदर्शक सूचनांचा मसुदा प्रसिद्ध केला.

विद्यापीठांतील प्राध्यापक आणि उद्योगातील गट यांच्यात प्रकल्प निर्मिती करणे हे उद्योग संबंध कक्षाचे मुख्य उद्दिष्ट आहे. स्थानिक गरजांनुसार संशोधनासाठी विषय निवडणे, उद्योग आणि विद्यापीठांना संशोधनात येणाऱ्या अडचणी ओळखणे, संशोधनासाठी निधीचे स्रोत शोधण्याचे काम या कक्षामार्फत केले जाईल. उद्योगांच्या गरजांनुसार विद्यापीठांमध्ये सुविधा आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी उद्योग विद्यापीठांना शिक्षणाच्या उद्देशाने देणगी देऊ शकतात. त्याद्वारे विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध होतील आणि उद्योगांना चाचण्या, प्रमाणीकरणासाठी त्याचा उपयोग करता येईल. उद्योगांना विद्यापीठांमध्ये अध्यासनांची निर्मिती करता येणार आहे, तसेच गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना विद्यापीठांमध्ये आकर्षित करण्यासाठी शिष्यवृत्तीसाठी सहकार्यही करता येईल. विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्यासाठी उद्योगांच्या सहकार्याने प्रात्यक्षिकांवर भर असलेला सहयोगी पदवी अभ्यासक्रम सुरू करता येईल. या पदवी अभ्यासक्रमातील प्रकल्प, प्रात्यक्षिके शिक्षक आणि उद्योगांतील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करता येईल, असे नमूद केले आहे.

### प्रयोगशाळांमध्ये नवीन तंत्रज्ञानाची निर्मिती ....

तंत्रज्ञानाचा वापर करून राज्य पातळीवर विद्यापीठे, उद्योगांचा समूह निर्माण करण्याची शिफारसही करण्यात आली आहे. त्यात प्रत्येक समूहाला स्थानिक समस्या शोधण्यासाठी तंत्रज्ञानाधिष्ठित प्रणाली तयार करता येईल. त्यानंतर तो प्रकल्प पायाभूत आणि मनुष्यबळाच्या उपलब्धतेनुसार संबंधित संस्थेतील विद्यार्थ्यांना देता येऊ शकतो. या माध्यमातून विद्यापीठांतील प्रयोगशाळांमध्ये नवीन तंत्रज्ञानाची निर्मिती होऊन त्याचा फायदा तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी होऊ शकतो. उद्योग आणि विद्यापीठे एकत्र येण्यासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस'ची मदत घेता येऊ शकते, असे नमूद करण्यात आले आहे.

### कार्यप्रशिक्षणाची शिफारस...

संशोधन सहकार्यासह विद्यार्थ्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची शिफारसही मार्गदर्शक सूचनांमध्ये करण्यात आली आहे. यूजीसीच्या अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखड्याअंतर्गत कला, विज्ञान, अभियांत्रिकी अशा कोणत्याही क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाला कार्यप्रशिक्षण लागू करता येईल. श्रेयांक आराखड्यानुसार विद्यार्थ्यांना कार्यप्रशिक्षणातून श्रेयांक देता येतील. कार्यप्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची संख्या, कार्यप्रशिक्षणाचे प्रकार, त्यासाठी प्राध्यापक संख्या या बाबतचा निर्णय विद्यापीठे त्यांच्या स्तरावर घेऊ शकतात. या कार्यप्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यात यावे. तसेच कंपन्यांकडून विद्यार्थ्यांचा अपघात विमा उतरवण्याबाबतही स्पष्ट करण्यात आले आहे.

**लोकसत्ता** Thu, 20 July 2023
https://epaper.loksatta.com/c/72987594

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

**प्रभात**

# 'एनएसएस'च्या एकक मागणीसाठी पुणे विद्यापीठाने प्रस्ताव मागविले

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १९** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) एकक मागणीसाठी व नियमित उपक्रमांबाबत महाविद्यालयांकडून ऑनलाईन प्रस्ताव मागविले आहेत. प्रस्ताव सादर करण्यासाठी ३१ जुलै ते ३० ऑगस्ट अशी मुदत देण्यात आलेली आहे.

सन २०२२-२३ पासून केंद्र शासनामार्फत 'एनएसएस'च्या अनुदानात वाढ करण्यात आलेली आहे. नियमित कार्यक्रमासाठी प्रति विद्यार्थी ३६० रुपये तर विशेष शिबिरासाठी प्रति विद्यार्थी ७०० रुपये प्रमाणे अनुदान अदा करण्यात येणार आहे. 'एनएसएस'चे एकक मान्यता प्रस्ताव ऑनलाईन जमा झाल्यानंतर महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकाऱ्यांनी मंजूर विद्यार्थी संख्येप्रमाणे स्वयंसेवकाचे शुल्क मुदतीत भरावे लागणार आहे.



१००, २०० या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणातच एकक असले पाहिजे, असे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. यामुळे ५०, १५०, २५० एकक असणाऱ्या महाविद्यालयांनी प्रस्ताव दाखल करताना एककामध्ये अपेक्षित वाढ अथवा कपात नमूद करणे आवश्यक आहे.

प्रत्येकी किमान १०० स्वयंसेवक संख्या असलेल्या दोन किंवा दोनपेक्षा जास्त एककांसाठी किमान एक महिला कार्यक्रम अधिकारी यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. एन.सी.सी., शारीरिक शिक्षण, विद्यार्थी विकास व परीक्षा अथवा तत्सम कोणताही कार्यभार नसलेल्या अधिकाऱ्यांचीच 'एनएसएस'च्या कार्यक्रम अधिकारीपदी नियुक्ती करावी लागणार आहे.

PuneCity, 20 July 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

**सकाळ**

# विद्यार्थी अकरावी प्रवेशापासून अद्यापही वंचित

**पुणे, ता. १९ :** असंख्य विद्यार्थ्यांना ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळूनही अद्याप पसंतीचे महाविद्यालय किंवा प्रवेशासाठी महाविद्यालय मिळाले नसल्याचे दिसून येते. मिळालेले गुण, महाविद्यालयाचा कट-ऑफ आणि रिक्त जागा पाहून पसंतीक्रम देण्याचा सल्ला त्यांना देण्यात आला आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील ३२५ कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावीच्या प्रवेशासाठी रिक्त असणाऱ्या ५९ हजार ६२७ जागांवरील प्रवेशाची प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत प्रवेशाच्या तीन नियमित फेऱ्या झाल्या असून पहिली विशेष फेरी सुरू आहे. या फेरीतंर्गत प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदवून अर्ज लॉक करण्यासाठी गुरुवारपर्यंत मुदत आहे.

दरम्यान, अनेक विद्यार्थ्यांना अद्याप प्रवेशासाठी महाविद्यालय मिळाले नसल्याचे निदर्शनास येत आहे. यामध्ये चांगले गुण असूनही अद्याप पसंतीचे महाविद्यालय न मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे. परंतु, अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी पसंतीच्या महाविद्यालयांमधील याआधीच्या फेरीतील कट-ऑफ पाहून विशेष फेरीत पसंतीक्रम नोंदवावेत. त्याचप्रमाणे अर्जाचा भाग दोन, पसंतीक्रम भरून विद्यार्थ्यांनी अर्ज 'लॉक' करावेत, असा सल्ला शिक्षण विभागाने दिला आहे.

### महाविद्यालय न मिळण्याची कारणे

- अर्जात पसंतीक्रम नोंदवूनही अर्ज पुन्हा 'लॉक' न करणे
- आपल्याला मिळालेले गुण आणि त्या तुलनेत अधिक कट-ऑफ असणाऱ्या महाविद्यालयांना दिलेली पसंती
- नामांकित महाविद्यालयांमध्येच प्रवेशासाठी करण्यात येणारी प्रतीक्षा

"अकरावीच्या प्रवेशाच्या नियमित फेऱ्या संपल्या तरीही अद्याप चांगले गुण असूनही अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकलेला नाही, हे वास्तव आहे. परंतु विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेले गुण, संबंधित महाविद्यालयाचा कट-ऑफ आणि रिक्त असणाऱ्या जागा हे पाहून पहिल्या विशेष फेरीत पसंतीक्रम नोंदवावेत. आपल्या गुणांच्या जवळपास जाणारी महाविद्यालये कोणती आहेत, हे पाहून पसंतीक्रम दिला पाहिजे.

**— सचिन हलदुले,**
सदस्य, इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेशप्रक्रिया समिती

Pune, Main
20/07/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

सकाळ

ऑनलाइन अभ्यासक्रमांना प्रतिसाद; ११ ते १४ वयोगटातील व्यक्तींनी घेतला प्रवेश

# भांडारकर संस्थेची डिजिटल भरारी!

महिमा ठोंबरे : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १९ : अचूक प्रयत्नांच्या आधारे कोणीही आपल्यामध्ये हवा तसा बदल घडवू शकतो, असा विश्वास समर्थ रामदास स्वामी यांनी व्यक्त केला आहे. नेहमी दुसऱ्याने सुरुवात करावी असे प्रत्येकाला वाटते, पण बदलाची सुरुवात नेहमी स्वतःपासून व्हायला हवी. स्वतःमध्ये बदल घडवून दुसऱ्यांमध्येही बदल घडवावा, असेही समर्थ म्हणतात. बदलत्या काळानुसार बदलत्या माध्यमांमधून ज्ञानाचे जतन आणि संवर्धन करण्याची गरज आहे. हेच ओळखून १०६ वर्षे जुनी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था आता डिजिटल व्यासपीठाच्या माध्यमातून ज्ञानप्रवाहाची नवी परंपरा निर्माण करत आहे.

पुस्तकांचे डिजिटायझेशन, डिजिटल लायब्ररी ते ऑनलाइन अभ्यासक्रमांचे संकेतस्थळ, अशा विविध माध्यमांतून संस्थेने 'डिजिटल भरारी' घेतली आहे. त्यामुळे 'भारतीय विद्या' हा विषय केवळ अभ्यासकांपुरताच मर्यादित न राहता शालेय विद्यार्थ्यांपासून ते या विषयात रस असणाऱ्या कोणत्याही सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचू शकणार आहे. तसेच, ज्ञानप्रवाहांच्या मौखिक आणि लिखित परंपरेत आता 'डिजिटल' परंपरेची भर टाकण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न संस्था यामार्फत करत आहे. आजपर्यंत या संकेतस्थळावर एकूण दहा अभ्यासक्रम उपलब्ध असून विविध विषयांवरील अधिक अभ्यासक्रम लवकरच यात समाविष्ट होणार आहेत. काश्मीर, भूज, अरुणाचल प्रदेश ते कन्याकुमारी व परदेशातील ११ ते १४ वयोगटातील व्यक्तींनी प्रवेश घेतला आहे. संस्थेच्या या सर्व डिजिटल प्रकल्पांची धुरा विभागप्रमुख म्हणून डॉ. गौरी मोघे आणि चिन्मय भांडारी हे सांभाळत आहेत. हे अभ्यासक्रम नव्या शैक्षणिक धोरणातील अपेक्षा पूर्ण करण्यास उपयुक्त ठरतील, असा विश्वास डॉ. मोघे आणि भांडारी यांनी व्यक्त केला.

### महत्त्वाचे टप्पे

- संस्थेच्या सर्व डिजिटल कामांची सुरुवात २०१४ मध्ये झाली.
- पुस्तकांचे डिजिटायझेशन हा त्यातील पहिला टप्पा होता.
- याअंतर्गत आजपर्यंत संस्थेतील दुर्मीळ आणि महत्त्वाच्या अशा सुमारे सोळा हजार पाचशे पुस्तकांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे.
- सुमारे एक कोटी पाने यात स्कॅन करण्यात आली.
- या पुस्तकांची डिजिटल लायब्ररीदेखील २०१९ मध्ये सुरू करण्यात आली.
- शिक्षणासाठी एक कायमस्वरूपी व्यासपीठ तयार करावे, ही संकल्पना संस्थेने मांडली.
- एप्रिल २०२० मध्ये 'भारतीय वारशाची ओळख' हा पहिला ऑनलाइन अभ्यासक्रम पार पडला.
- त्याला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर वर्षभर विविध विषयांवरील अभ्यासक्रम पार पडले.
- त्यापुढील वर्षी महाभारतावरील अभ्यासक्रम झाला.
- सप्टेंबर २०२२ मध्ये या सर्व अभ्यासक्रमांसाठी 'भारतविद्या' हे संकेतस्थळ आकारास आले.

"येत्या काळात एक हजार तासांचा आशय आणि शंभर अभ्यासक्रम या व्यासपीठावर उपलब्ध व्हावेत, असा आमचा प्रयत्न असेल. भविष्यात प्रत्येकाला सहज उपलब्ध असणारे ज्ञानाचे एक दालन, म्हणून हे व्यासपीठ कार्यरत राहील.

**- भूपाल पटवर्धन**, कार्याध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था

### अभ्यासक्रमांचे विषय

- वेद ते वेदांग, महाभारत, हिंदू धर्मशास्त्राची परिचयात्मक व्याख्यानमाला, पुरातत्त्वशास्त्र, छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती, दर्शनशास्त्र, वैदिक सूक्ते, संस्कृत नाटकांची ओळख, स्पोकन (संभाषणात्मक) संस्कृत

### ऑनलाइन अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये

- अभ्यासक्रम संपल्यावर संदर्भ ग्रंथांची यादी
- प्राथमिक संदर्भ व संशोधनावर आधारित माहितीचाच समावेश
- प्रत्येक माहितीच्या सत्यतेची तज्ज्ञांद्वारे पडताळणी
- दृकश्राव्य व्याख्यानात स्लाइड्स, छायाचित्रे यांचा सुयोग्य वापर
- सुनिश्चित अभ्यासक्रम, सुलभ रचना आणि सोपी भाषा
- अभ्यासक्रम कायमस्वरूपी पाहण्याची सुविधा

### डिजिटल प्रगती

| | |
|---|---|
| एकूण अभ्यासक्रम **१०** | प्रवेश घेतलेले **६,५००** |
| सहभागी तज्ज्ञ **३०** | एकूण तास **५००** |

Pune, Main
20/07/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# प्राध्यापक भरतीसह विविध मागण्यांसाठी सत्याग्रह आंदोलन

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे** : राज्यात शिक्षक भरतीसह प्राध्यापक भरती प्रक्रियाही प्रलंबित आहे. शिक्षक भरतीसाठी उपोषण सुरू झाले असताना प्राध्यापक भरती करण्याच्या मागणीसाठी नेट-सेट, पीएचडीधारक संघर्ष समितीने गुरुवारपासून पुण्यातील उच्च शिक्षण विभागाच्या कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलन सुरू केले.

विद्यापीठे आणि अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची १० हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. राज्य शासनाने रिक्त जागांच्या ४० टक्के पदे भरण्यास मान्यता दिली आहे. तसेच ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक पदांची भरती प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र प्राध्यापक भरती प्रक्रिया तांत्रिक कारणांनी रखडल्याने हजारो पात्रताधारक उमेदवारांमध्ये अस्वस्थता आहे. प्राध्यापक भरतीसाठी वारंवार मागण्या करून, आंदोलने झाली. या पार्श्वभूमीवर नेट-सेट, पीएचडीधारक संघर्ष समितीने पुन्हा सत्याग्रह आंदोलन सुरू केले. आयोगाच्या निर्देशांनुसार १०० टक्के प्राध्यापक भरती करावी, तासिका तत्त्व धोरण बंद करून समान काम समान वेतन धोरण लागू करावे, प्राध्यापक भरती गतिमान करून वेळेत पूर्ण करावी, विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी पूर्णवेळ प्राध्यापकांची नियुक्ती करावी, अशा मागण्या संघटनेने केल्या आहेत.

लोकसत्ता Fri, 21 July 2023 https://epaper.loksatta.com/c/72994384

# तासिका प्राध्यापकांकडून दोन महाविद्यालयांत अध्यापन

**प्रतिज्ञापत्र दिल्यानंतरही शासनाची फसवणूक केल्याचा आरोप**

**देवेश गोंडाणे, लोकसत्ता**

**नागपूर** : १४ नोव्हेंबर २०१८ मध्ये राज्य शासनाने तासिका प्राध्यापकाचे मानधन वाढवले. त्यावेळी तासिका तत्त्वावर नियुक्त प्राध्यापकाला एकाच महाविद्यालयात अध्यापन करता येईल, अशी अट घालण्यात आली होती. मात्र अटीचे उल्लंघन करत अनेक तासिका प्राध्यापक दोन महाविद्यालयांत अध्यापन करून शासनाची फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शासकीय आणि अशासकीय महाविद्यालय, विद्यापीठांचे शैक्षणिक विभाग यातील तासिका प्राध्यापकांचे मानधन सारखे केले आहे. त्यानंतर आता तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांनी एकाच महाविद्यालयात काम करणे अपेक्षित आहे. त्यासंबंधीचे प्रतिज्ञापत्रदेखील प्राध्यापकांकडून घेण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही नागपुरात वसंतराव नाईक समाज विज्ञान संस्था, शासकीय विज्ञान संस्था आणि विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागातील तासिका प्राध्यापक इतर काही महाविद्यालयांत, तर काही रात्रकालीन महाविद्यालयांत काम करत असून दोन्हीकडून मानधन घेत आहेत. ही बाब अनेक विभागप्रमुखांना माहिती असूनही महाविद्यालयाचे प्राचार्य आणि विद्यापीठ, सहसंचालक यांच्याकडून दुर्लक्ष केल्याचा आरोप झाला आहे.

> “तासिका प्राध्यापकाची नियुक्ती करताना त्यांच्याकडून एकाच ठिकाणी काम करण्याचे प्रतिज्ञापत्र लिहून घेतले जाते. त्यामुळे कुणी दोन महाविद्यालयात काम करत असल्याचे समोर आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल.
>
> - डॉ. संजय ठाकरे, सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग

लोकसत्ता Fri, 21 July 2023 https://epaper.loksatta.com/c/7

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

पुढारी

### विविध मागण्यांसाठी प्राध्यापकांचे आंदोलन

पुणे : पुढारी वृत्तसेवा

प्राध्यापक भरतीसह विविध मागण्यांसाठी नेट-सेट, पीएच. डी. धारक संघर्ष समितीच्या वतीने मध्यवर्ती इमारतीतील उच्च शिक्षण विभागाच्या संचालक कार्यालयाबाहेर सत्याग्रह व बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात समितीचे पदाधिकारी सहभागी झाले आहेत.

२०१७ मध्ये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापकांची ३१ हजार १८५ पदे मंजूर असून, यातील ८ हजार ९४९ पदे रिक्त होती. २०१७ च्या रिक्त पदांच्या ४० टक्के, तसेच ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांची १०० टक्के भरती सुरू केली आहे. तरीही अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील या रिक्त पदांची संख्या दहा हजारांच्या पुढे गेली आहे. अकृषी विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापकांच्या मंजूर पदांच्या ८० टक्के जागा भरती करण्यास ७ ऑगस्ट २०२२ व १६ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयांनी मंजुरी दिली आहे.

अकृषी विद्यापीठांमध्ये २ हजार ५३४ पदे मंजूर असून, यातील १ हजार १६६ पदे रिक्त आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची आवश्यकता पडणार आहे, अशी माहिती राज्य समन्वयक डॉ. परमेश्वर पौळ यांनी दिली.

My Pune Edition
Jul 21, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

पुढारी

### शैक्षणिक हिताचा निर्णय!

**विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१८ मध्ये देशातील विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापकपदासाठी करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांच्या संदर्भातील नियमांमध्ये बदल केला आहे. सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांत सहायक प्राध्यापकपदासाठी पीएचडीची पदवी बंधनकारक करणे हे सध्याच्या शिक्षण व्यवस्थेनुसार अनुकूल नाही. यामागचे प्रमुख कारण म्हणजे, देशात पीएचडीधारकांची संख्या कमी असणे. तसेच नेट, सेट, स्लेट परीक्षा उत्तीर्ण होणेदेखील सोपे नाही. या गोष्टींचा सारासार विचार करत किमान पात्रतेच्या निकषांत बदल करून पीएचडीची अट काढून टाकली आहे.**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहायक प्राध्यापकपदासाठी करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांच्या संदर्भातील नियमांमध्ये बदल केला आहे. या पदावर नियुक्त करण्यासाठी उमेदवार पीएचडीधारक असणे गरजेचे नाही; मात्र पीएचडीला पात्र असण्याचा पर्याय राहणार आहे. एका अर्थाने पीएचडीची अट काढून टाकलेली नाही; पण यात आणलेली शिथिलता समजून घेणे गरजेचे आहे. १ जुलैपासून लागू झालेल्या नियमानुसार उच्च शिक्षण संस्थेतील सहायक प्राध्यापकाच्या पदावर थेट भरती करताना राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट), राज्य पात्रता परीक्षा (सेट) आणि राज्यस्तरीय पात्रता परीक्षेचे (एसएलईटी) किमान निकष पाळावे लागणार आहेत. याप्रमाणे भरती नियमात बदल झाला आहे.

२०१० मध्ये या पदावर नियुक्तीसाठी नेट, एसईटी, एसएलईटी पात्र असणे बंधनकारक होते; पण पीएचडीधारक व्यतिरिक्त नेटच्या माध्यमातून या पदाला उमेदवार पात्र मानले जात होते. त्यानंतर पुन्हा २०१८ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापकपदावरील भरतीसाठी काही निकष निश्चित केले. त्यात पीएचडीचे बंधन घालण्यात आले. नोकरीच्या काळात उमेदवारांना पीएचडी पूर्ण करण्यासाठी ३ वर्षांचा कालावधी देण्यात आला. सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांत सहायक प्राध्यापक पदासाठी पीएचडीची पदवी असणे बंधनकारक करणे, हे सध्याच्या शिक्षण व्यवस्थेनुसार अनुकूल नाही. यामागचे प्रमुख कारण म्हणजे, देशात पीएचडीधारकांची संख्या कमी असणे. तसेच नेट, सेट, स्लेट परीक्षा उत्तीर्ण होणेदेखील सोपे नाही. या गोष्टींचा सारासार विचार करत पुन्हा सहायक प्राध्यापकपदासाठी



किमान पात्रतेच्या निकषांत बदल करून १ जुलैपासून नवे नियम लागू करण्यात आले.

प्रतिभावान लोकांना या क्षेत्राकडे आकर्षित करायचे असेल, तर ही अट ठेवणे योग्य राहणार नाही. सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापकच्या पातळीवर त्याची गरज आहे; मात्र एक सहायक प्राध्यापकासाठी पीएचडीची अट ही आपल्या व्यवस्थेला अनुकूल नाही आणि त्यामुळेच त्यात सुधारणा केली आहे. आता ज्या विषयात पीएचडीधारक मिळत नाही, तेथे सहजपणे नेट परीक्षा उत्तीर्ण होणारे शिक्षक मिळतील. यानंतर ते सहयोगी प्राध्यापक होण्यासाठी पीएचडी करू शकतील. आपल्याकडे दरवर्षी २५ हजार मंडळी पीएचडी करतात. आजघडीला प्रमुख विषयांत स्पर्धा खूप आहे. जसे की गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, राज्यशास्त्र आदी. या प्रकारच्या विषयासाठी प्राध्यापकांची नियुक्ती करताना संस्था या आपल्या पद्धतीने उच्च पातळीवरचे निकष ठेवतात. स्वायत्त शिक्षण संस्थाही गरजेनुसार निवडीचे नियम लागू करतात. जसे परकीय भाषेसाठी एखाद्या सहायक प्राध्यापकाची नियुक्ती करायची असेल, तर त्यास मास्टर्स पदवीबरोबरच नेट परीक्षा पात्र होण्याची अट घातली जाते.

कायद्याच्या अभ्यासात पदवीधर मिळत नसेल, तर एलएलएमबरोबरच नेट उत्तीर्ण उमेदवाराला सहायक प्राध्यापक म्हणून निवडता येते. तसेच रसायनशास्त्रात एकापेक्षा अधिक उमेदवार असतील, तर पीएचडीबरोबरच दोन पेपर प्रसिद्ध झाल्याची अट ही नियुक्तीसाठी यूजीसीने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वापरू शकतात. सहायक प्राध्यापकपदासाठी किमान नेट, एसईटी, एसएलईटी पात्र असणे गरजेचे आहे. पीएचडीधारक उमेदवारांना प्राधान्य द्यावे लागेल. सध्याच्या काळात हा बदल नव्या शिक्षण धोरणानुसार केला जात आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरणात बदल घडवून आणण्यासाठी ३४ वर्षांच्या कालखंडानंतर जुलै २०२० मध्ये नव्या शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली आहे. नवीन शिक्षण धोरणाचा उद्देश विद्यार्थ्यांची विचारसरणी आणि कल्पनाशक्ती वाढविण्याबरोबरच शिकण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचा आहे.

- प्रा. एम. जगदीश कुमार,
अध्यक्ष, यूजीसी

Pune Edition
Jul 21, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

**प्रभात**

### महाविद्यालयांमध्ये ग्रीन क्लबला प्राधान्य

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २०** - पुणे जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन व पाणी बचतीबाबत जनजागृतीपर अभियाय राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक महाविद्यालयात ग्रीन क्लबची स्थापना करण्याला प्राधान्य द्यावे लागणार आहे.

महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबविणार आहे. जिल्ह्यातील अशासकीय अनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालयात एक ग्रीन क्लब फॅकल्टी कॉर्डीनेटर नियुक्त करायचे आहेत. ही नियुक्ती प्रक्रिया २५ जुलैपर्यंत पूर्ण करण्यासाठी मुदत देण्यात आलेली आहे. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, विद्यार्थी कल्याण सदस्यचे कार्यक्रम अधिकारी नसलेल्यांनाच ग्रीन क्लब फॅकल्टी कॉर्डीनेटर म्हणून संधी देता येणार आहे. अभियान सक्षमपणे राबविण्याबाबत पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.किरणकुमार बोंदर यांनी पुणे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आदेश बजाविले आहेत.

PuneCity, 21 July 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

**पुढारी**

# यंदा 50 संस्थांमध्ये नवे शिक्षण धोरण

## राज्यात तीन तंत्रशिक्षण विद्यापीठांतही होणार अंमलबजावणी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्यातील ५० शैक्षणिक संस्था आणि तंत्रशिक्षणच्या तीन विद्यापीठांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण यंदापासून लागू करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित संस्थांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी दिली.**

डॉ. मोहितकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताला ज्ञान महासत्ता बनवण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्य व ज्ञानप्राप्ती आणि विज्ञान, तंत्रज्ञान शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्रामधील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी भारतातील




लोकसंख्येला गुणवत्तापूर्ण शिक्षण, नावीन्यपूर्ण शिक्षण व संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू केले आहे. महाराष्ट्र राज्याने ते अंगीकारले आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षण प्रणालीचा अंतर्भाव करण्यात आला असून, ज्याचा उद्देश मानवाच्या सर्व क्षमतांचा नैतिक एकालिक पद्धतीने

**या विद्यापीठांचा समावेश**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणारे
- इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, माटुंगा, मुंबई
- सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ



विकास करणे आहे. नवीन शैक्षणिक धोरण महाराष्ट्र राज्याने शैक्षणिक वर्ष २०२३- २४ पासून राबविण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून तंत्रशिक्षण संचालनालयाशी संलग्न असलेल्या ५० शैक्षणिक संस्था तसेच तीन विद्यापीठांमध्ये नवीन धोरणानुसार अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहे.

My Pune Edition
Jul 22, 2023 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

## पाच महिन्यांत एकही कार्यक्रम नाही

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष कोरडेच

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणून नावलौकिक मिळवलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृतमहोत्सवी वर्ष सुरू आहे. जूनपर्यंत विद्यापीठात 'प्रभारीराज' असल्याने काही कार्यक्रम झाले नाहीत. त्यामुळे अमृतमहोत्सवी वर्षातील कार्यक्रमांच्या आयोजनासाठीची विशेष समिती नियुक्त करण्याव्यतिरिक्त विद्यापीठाने पाच महिन्यांत एकही कार्यक्रम आयोजित केलेला नाही



तत्कालीन पुणे विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली. त्यामुळे यंदा १० फेब्रुवारीला विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू झाले. राज्यात आघाडीचे विद्यापीठ म्हणून ओळख मिळवलेल्या विद्यापीठाच्या वाटचालीत अमृतमहोत्सवी वर्ष हा महत्त्वाचा टप्पा असल्याने वर्षभर कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा अर्थसंकल्पीय अधिसभेत करण्यात आली होती. त्यासाठी अर्थसंकल्पात १० लाख रुपये निधीची तरतूदही करण्यात आली. त्यानंतर अमृतमहोत्सवी वर्षात कार्यक्रमांच्या आयोजनासाठी एप्रिलमध्ये विद्यापीठाच्या व्यवस्थापन समिती सदस्यांचा समावेश असलेली विशेष समिती स्थापन करण्यात आली. या समितीकडून कार्यक्रम निश्चित करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते.

> "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त येत्या काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्यात शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचा समावेश असेल. कार्यक्रमांची रुपरेषा लवकरच जाहीर करण्यात येईल.
>
> - डॉ. सुरेश गोसावी,
> कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गेले वर्षभर विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू नव्हते. वर्षभराहून अधिक काळ डॉ. कारभारी काळे यांच्याकडे विद्यापीठाचा अतिरिक्त कार्यभार होता. डॉ. सुरेश गोसावी यांची जूनच्या पहिल्या आठवड्यात कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर त्यांचा बराच वेळ विद्यापीठाच्या कामकाजाचा आढावा, जी-२० परिषदेअंतर्गत झालेल्या बैठका, कार्यक्रमांमध्ये गेला. विद्यापीठाकडून अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त नुकतीच बोधचिन्ह स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेचा अपवाद वगळता आतापर्यंत विद्यापीठाने अमृतमहोत्सवी वर्षात एकही विशेष कार्यक्रम आयोजित केलेला नाही. त्यामुळे विद्यापीठाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

लोकसत्ता Sat, 22 July 2023
https://epaper.loksatta.com/c/73002571

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

प्रभात

## पदवी प्रवेशासाठी प्रक्रिया पुन्हा सुरू

### पुणे विद्यापीठांतर्गत अनेक अभ्याक्रमांच्या जागा रिक्त



प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २१ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विविध पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन विद्यापीठाच्या प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमांमध्ये बी.एस्सी. ब्लेन्डेड तसेच बी.ए. लिबरल आर्टस असे पदवी अभ्यासक्रम आहेत. त्याचप्रमाणे बी.व्होक. अभ्यासक्रमांचाही समावेश आहे.

पुणे विद्यापीठाने काही दिवसांपूर्वी पदवी, पदव्युत्तर पदवी अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेतली. मात्र, या प्रवेश परीक्षेसाठी फार कमी अर्ज आले. या अर्जांची संख्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेपेक्षा कमी आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या प्रशासनाने या अभ्यासक्रमांसाठी रिक्त झालेल्या जागांसाठी पुन्हा प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. आंतरविद्याशाखीय स्कूलकडून बी.एस्सी. ब्लेन्डेड आणि बी.ए. लिबरल आर्टस असे अभ्यासक्रम सुरू आहेत. यात काही जागा रिक्त आहेत.

**■ अन्य अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त**

स्किल डेव्हलपमेंट सेंटरकडून बी.व्होक इन मॅन्युफॅक्चरिंग स्किल्स, रीन्युएबल एनर्जी स्किल्स आणि रीटेल मॅनेजमेंट असे कोर्सेस सुरू आहेत. या अभ्यासक्रमांना प्रवेशासाठी काही जागा रिक्त आहेत. बी.व्होक इन रीटेल मॅनेजमेंट या अभ्यासक्रमासाठी द्वितीय वर्षात आणि तृतीय वर्षात विद्यार्थ्यांना स्टायपेंड मिळणार आहे. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

PuneCity, 22 July 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## विद्यापीठांमध्ये 'उद्योग संबंध कक्ष'

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

विद्यापीठे आणि उद्योगांमधील दरी कमी करण्यासोबतच संशोधन आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विद्यापीठांमध्ये उद्योग संबंध कक्ष (इंडस्ट्री रिलेशन सेल) स्थापन करण्याची सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) केली आहे.

याद्वारे खासगी आस्थापना, कंपन्या, उद्योगांना आर्थिक सहकार्याच्या माध्यमातून विद्यापीठांमध्ये प्रगत सुविधा निर्मिती, संशोधन केंद्रे, अध्यासनाची निर्मिती करता येणार आहे. उद्योग आणि विद्यापीठे यांनी एकत्र येण्यासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस'ची मदत घेता येऊ शकते, असे सुचविण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रांमध्ये समन्वय निर्माण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याद्वारे देशाच्या विकासात योगदान देणाऱ्या कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर 'यूजीसी'ने 'सस्टेनेबल अँड व्हायब्रंट युनिव्हर्सिटी इंडस्ट्री लिंकेजेस सिस्टीम फॉर इंडियन युनिव्हर्सिटीज' या मार्गदर्शक सूचनांचा मसुदा प्रसिद्ध केला. या मसुद्यावर ३१ जुलैपर्यंत विविध शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील घटकांकडून हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत.

विद्यापीठांतील प्राध्यापक आणि उद्योगातील गट यांच्याद्वारे प्रोजेक्टची निर्मिती करणे हे उद्योग संबंध कक्षाचे मुख्य उद्दिष्ट आहे. स्थानिक गरजांनुसार संशोधनासाठी विषय निवडणे, उद्योग आणि विद्यापीठांना संशोधनात येणाऱ्या अडचणी ओळखणे, संशोधनासाठी निधीचे स्रोत शोधण्याचे काम या सेलमार्फत करण्यात येईल. उद्योगांच्या गरजांनुसार विद्यापीठांमध्ये प्रगत सुविधा आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी उद्योगांकडून मदत घेता यणार आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण अद्ययावत सुविधा उपलब्ध होतील आणि उद्योगांना चाचण्या, प्रमाणीकरणासाठी त्याचा उपयोग करता येईल. या सेलमार्फत उद्योगांना विद्यापीठांमध्ये संशोधन केंद्र आणि अध्यासनांची निर्मिती करता येणार आहे. या सेलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यासोबतच, शिष्यवृत्तीसाठी सहकार्यही करता येईल. विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्यासाठी उद्योगांच्या सहकार्याने प्रात्यक्षिकांवर भर असलेला पदवी अभ्यासक्रम सुरू करता येईल. विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमातील प्रकल्प, प्रात्यक्षिके शिक्षक आणि उद्योगांतील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करता येतील, असे मसुद्यात सांगण्यात आले आहे.

### महत्त्वाचे निर्णय घेता येणार



'यूजीसी'च्या अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखड्यानुसार आर्टस्, सायन्स अँड इंजिनीअरिंग अशा क्षेत्रांतील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाला इंटर्नशिप लागू करता येईल. या इंटर्नशिपमुळे विद्यार्थ्यांना क्रेडिट्स देता येतील. इंटर्नशिपसाठी विद्यार्थ्यांची संख्या, प्रकार, त्यासाठी प्राध्यापकांची संख्या याबाबतचे निर्णय विद्यापीठांना घेता येईल. या इंटर्नशिपसाठी विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यात यावे; तसेच कंपन्यांकडून विद्यार्थ्यांचा अपघात विमा उतरवण्याबाबतही सांगितले आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून राज्य पातळीवर विद्यापीठे, उद्योगांचा समूह निर्माण करण्याबाबत सूतोवाच करण्यात आले आहे. प्रत्येक समूहाला स्थानिक समस्या शोधण्यासाठी तंत्रज्ञानाधिष्ठित प्रणाली किंवा प्रोजेक्ट तयार करता येईल. या प्रोटेक्टमध्ये पायाभूत आणि मनुष्यबळाच्या उपलब्धतेनुसार संबंधित संस्थेतील विद्यार्थ्यांना काम करता येईल. या माध्यमातून विद्यापीठांतील प्रयोगशाळांमध्ये नवीन तंत्रज्ञानाची निर्मिती होऊन, त्याचा फायदा प्रत्यक्ष तंत्रज्ञान हस्तांतरासाठी होऊ शकतो, असे नमूद करण्यात आले आहे.

Maharashtra Times 22.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# नवभारत

## सड़क पर उतरे नेट-सेट व पीएचडी धारक

■ पुणे, (सं.) राज्य में शिक्षक भर्ती के साथ-साथ प्रोफेसर भर्ती प्रक्रिया भी लंबित है. फैकल्टी भर्ती की मांग समेत विभिन्न मांगों को लेकर पीएचडी धारक संघर्ष समिति ने शिक्षक भर्ती के लिए भूख हड़ताल के बीच गुरुवार से पुणे में उच्च शिक्षा विभाग कार्यालय के सामने सत्याग्रह शुरू कर दिया है. राज्य के विश्वविद्यालयों और अनुदानित कॉलेजों में प्रोफेसरों के 10 हजार से ज्यादा पद खाली हैं. राज्य सरकार ने 40 फीसदी रिक्त पदों को भरने की मंजूरी दे दी है. साथ ही लाइब्रेरियन और शारीरिक शिक्षा निदेशक के पदों पर भर्ती प्रक्रिया शुरू कर दी गई है.



### शिक्षा विभाग के सामने सत्याग्रह

- लेकिन कई तकनीकी कारणों से प्रोफेसर भर्ती प्रक्रिया रुकी होने से राज्य भर के हजारों पात्र अभ्यर्थी परेशान हैं. अब तक प्रोफेसरों की भर्ती की मांग को लेकर बार-बार आंदोलन किया जा चुका है. इसी पृष्ठभूमि में नेट-सेट, पीएचडी धारक संघर्ष समिति द्वारा पुनः सत्याग्रह आंदोलन प्रारंभ किया गया है.
- संगठन ने केंद्र सरकार और विश्वविद्यालय अनुदान आयोग के निर्देशानुसार प्रोफेसरों की शत-प्रतिशत भर्ती करने, प्रति घंटे की नीति को बंद कर समान काम के लिए समान वेतन की नीति लागू करने, प्रोफेसरों की चल रही भर्ती में तेजी लाने और उन्हें समय पर पूरा करने, गैर सहायता प्राप्त कॉलेजों में स्थायी आधार पर पूर्णकालिक प्रोफेसरों की नियुक्ति करने जैसी मांगें की हैं.

Pune-plus Edition
22-july-2023 Page No. 4
epaper.enavabharat.com

# प्रभात

## कला शाखेच्या तुकड्या संकटात

### प्रवेशाकडे पाठ : शिक्षकांच्या नोकऱ्याही धोक्यात

पुणे, दि. २३ (प्रभात वृत्तसेवा) - राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेकडे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे कला शाखेच्या तुकड्यांची संख्याही कमी होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. तसे झाल्यास शिक्षकांच्या नोकऱ्याही संकटात सापडण्याची शक्यता आहे.

कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावी प्रवेशासाठी कला, वाणिज्य या शाखांच्या तुलनेत विज्ञान शाखेकडे प्रवेश घेण्याला विद्यार्थ्यांकडून अधिक पसंती दिली जात आहे. त्यातच यंदा अकरावी प्रवेशाच्या बऱ्याचशा जागा रिक्तच राहण्याची शक्यता आहे. आधार



नोंदणीकृत विद्यार्थी संख्येवर आधारित शिक्षक, कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांची संचमान्यता निश्चित करण्यात येत आहे. संच मान्यतेमध्ये कला शाखेच्या अनुदानित तुकड्या कमी अथवा बंद होणार आहेत. यात काही कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे शिक्षक व कर्मचारी अतिरिक्त ठरणार आहेत. या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन कुठे करायचे? असा मोठा गंभीर प्रश्नही निर्माण होणार आहे. या संबंधित शिक्षकांचे समायोजन करण्यासाठीही कुठेच फारशा जागाही उपलब्ध होणार नाहीत अशी भीतीही निर्माण झालेली आहे.

यापूर्वी शासनाने वेळोवेळी तुकड्या टिकविण्यासाठी तुकडीतील किमान विद्यार्थी संख्येची अट शिथिल केलेली आहे. तुकड्या टिकविण्यासाठी शहरी भागात ३० विद्यार्थी तर ग्रामीण, आदिवासी भागात २० विद्यार्थी याप्रमाणे एका तुकडीसाठी विद्यार्थी संख्या ग्राह्य धरण्यात यावी. अनुदानित तुकडी वाचली तरच विद्यार्थ्यांना मोफत किंवा अल्प खर्चात शिक्षण घेता येणार आहे.

विद्यार्थी हिताचा विचार करुन तुकडी टिकविण्यासाठी शासनाने योग्य ते धोरण ठरवावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे अध्यक्ष प्रा.डॉ.संजय शिंदे, सचिव प्रा.संतोष फाजगे, सरचिटणीस प्रा.संभाजी कमानदार, समन्वयक प्रा. मुकुंद आंदळकर, उपाध्यक्ष प्रा. सुनील पूर्णपात्रे, प्रा. विलास जाधव, प्रा. डॉ. अविनाश बोर्डे, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. अशोक गव्हाणकर, प्रा. अविनाश तळेकर आदींनी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याकडे केली आहे.

PuneCity, 24 July 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

प्रभात

### पहिल्या विशेष फेरीची गुणवत्ता यादी आज

#### अकरावी प्रवेश प्रक्रिया : अजूनही सुमारे ७२ हजार जागा रिक्त

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३** - पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता अकरावी प्रवेशाच्या पहिल्या विशेष फेरीची गुणवत्ता यादी सोमवारी (दि.२४) सकाळी १० वाजता जाहीर होणार आहे. या फेरीत प्रवेश जाहीर होणाऱ्या उमेदवारांना २७ जुलैपर्यंत प्रत्यक्ष महाविद्यालयात प्रवेश नोंदवावा लागणार आहे.

पुणे विभागात इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी ३२६ कनिष्ठ



महाविद्यालयांनी नोंदणी केली असून १ लाख १५ हजार ९५० एवढ्या प्रवेशाच्या जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. प्रवेशासाठी एकूण ९९ हजार ७३५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली असून ८९ हजार ४७४ विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन लॉक केलेले आहे. ४१ हजार १३६ अर्ज ऑटोव्हेरिफाइड झाले आहेत. ४८ हजार १३० अर्जांची मार्गदर्शन केंद्राद्वारे पडताळणी झालेली आहे.

कॅपअंतर्गत ९७ हजार ८१५ प्रवेशाच्या जागा उपलब्ध झाल्या असून त्यातून ३७ हजार ५५० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. कोट्याअंतर्गत १८ हजार १३५ प्रवेशाच्या जागांपैकी ६ हजार ५६४ जागांवर प्रवेश निश्चित झाले आहेत. तीन नियमित फेऱ्यांमध्ये ४४ हजार ११४ जागांवर प्रवेश निश्चित झाले. कॅपअंतर्गतच्या ६० हजार २६५ तर कोट्याअंतर्गत ११ हजार ५७१ अशा ७१ हजार ८३६ प्रवेशाच्या जागा रिक्तच आहेत.

PuneCity, 24 July 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

### ‘प्राध्यापकांना उद्योग जगतात प्रशिक्षण देण्याबाबत लवकरच निर्णय’

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** प्राध्यापकांनी त्यांचे शिक्षण घेऊन आणि संशोधन करून खूप दिवस झालेले असतात. त्यामुळे प्राध्यापकांना आपले ज्ञान अद्ययावत करण्यासाठी, नावीन्यपूर्ण घडामोडींची माहिती होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांना उद्योगजगतात काही दिवस प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवण्याचा राज्य सरकारचा विचार सुरू आहे. त्याबाबत येत्या काही दिवसांत निर्णय होईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी दिली.

एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये (आयओआयटी) अॅडव्हीट एआय लॅब, ओरॅकल अॅकॅडमी आणि ड्रोन अॅकॅडमीचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे मानद सचिव मालोजीराजे छत्रपती, संस्थेचे कोषाध्यक्ष अजय पाटील, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवान साळुंखे, प्राचार्य डॉ. पी. बी. माने या वेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, की राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात ५० स्वायत्त इंजिनीअरिंग कॉलेज, ८७ पारंपरिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये आणि १०० पदव्युत्तर पदवी महाविद्यालयांमध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून धोरणाची अंमलबजावणी होणार आहे. येत्या २९ जुलैला नवी दिल्लीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होऊन तीन वर्षे होणार आहे. त्या अनुषंगाने मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्राकडून विविध शैक्षणिक प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

लोकसत्ता Mon, 24 July 2023
https://epaper.loksatta.com/c

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी

# अकरावी प्रवेश विशेष फेरीची गुणवत्ता यादी आज

## पुढारी ANCHOR विद्यार्थ्यांना २७ जुलैपर्यंत घेता येणार प्रवेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी प्रवेशाच्या विशेष फेरीची गुणवत्ता यादी आज (दि. २४) सकाळी १० वाजता जाहीर करण्यात येणार आहे, तर प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना २७ जुलैपर्यंत महाविद्यालयांमध्ये जाऊन प्रवेश घेता येणार आहे. अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या विशेष फेरीचे कोटा तसेच कॅपचे वेळा-पत्रक जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार १७ ते २० जुलैदरम्यान विद्यार्थ्यांना पहिल्या भागात दुरुस्ती करण्याबरोबरच पसंतीक्रम भरण्याची संधी देण्यात आली होती, तर २४ जलै रोजी गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येऊन २७ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे.

१७ ते २७ जुलैदरम्यान कोटाअंतर्गत प्रवेशदेखील होणार असल्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात अकरावी प्रवेशासाठी ३२६ महाविद्यालयांत ९७ हजार ८१५ कॅपच्या तसेच १८ हजार १३५ कोटा प्रवेशाच्या अशा एकूण १ लाख १५ हजार ९५० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी आत्तापर्यंत झालेल्या तीन फेऱ्यांमध्ये कोटा आणि कॅप मिळून ४४ हजार ११४ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे, तर प्रवेशासाठी ७१ हजार ८३६ जागा उपलब्ध आहेत. परंतु विशेष फेरीसाठी २८ हजार ९६३ विद्यार्थ्यांनीच पसंतीक्रम भरले आहेत. त्यामुळे हेच विद्यार्थी प्रवेशाच्या स्पर्धेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. आत्तापर्यंत नियमित फेरीत प्रतिबंधित झालेल्या विद्यार्थ्यांना या फेरीत प्रवेशाची संधी मिळणार आहे. विशेष फेरीपासून कोणत्याही विद्यार्थ्याला प्रतिबंधित केले जाणार नाही. जर विद्यार्थ्याला मिळालेल्या विद्यालयात प्रवेश निश्चित करायचा असेल, तर विद्यार्थी लॉगिनमध्ये जाऊन प्रोसिड फॉर ॲडमिशन करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत आणि विद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करणे गरजेचे आहे.

### वैद्यकीय प्रवेशासाठी आजपासून नोंदणी

**पुणे :** राज्यातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेसाठी सोमवारपासून (दि. २४) नोंदणी करता येणार आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून यासंबंधीची माहिती देण्यात आली आहे. नीट परीक्षेचा निकाल लागून अनेक दिवस उलटले तरी सीईटी सेलकडून राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू केले जात नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती.




अखेर सीईटी सेलकडून रविवारी प्रवेश प्रक्रियेची घोषणा करण्यात आली आहे. नीट यूजीअंतर्गत वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ऑल इंडिया कोटा (एआयक्यू) जागांवर पहिल्या फेरीसाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्याची प्रक्रिया शनिवारपासून (दि. २२) सुरू झाली आहे. नीट यूजीअंतर्गत वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ऑल इंडिया कोटा जागांवर प्रवेशासाठी यावर्षी चार फेऱ्यांमध्ये समुपदेशन होणार आहे. प्रत्येक फेरीच्या नोंदणीनंतर उमेदवारांना उपलब्ध पर्यायांच्या यादीतून महाविद्यालये निवडून त्यांची पुष्टी करावी लागेल. त्यानुसार उमेदवारांची पडताळणी आणि जागावाटप केले जाणार आहे. दरम्यान, गुणवत्ता यादी कधी प्रसिद्ध होणार आणि समुपदेशन फेऱ्यांचे वेळापत्रक कधी प्रसिद्ध होणार याबाबत माहिती देण्यात आलेली नाही. विद्यार्थ्यांना cetcell. net. in/ NEET- UG-2023 या संकेतस्थळावर अधिक माहिती मिळेल.

Pune Edition
Jul 24, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# नव्या धोरणामुळे शिक्षण खुले होणार

## डॉ. नितीन करमळकर यांचे मत



**पुणे** : नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे बंदिस्त असलेले शिक्षण खुले होणार आहे. आंतरविद्याशाखीय शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना हवी असणारी सर्व कौशल्ये आत्मसात करता येतील. त्यासाठी सर्व प्राध्यापकांनी आपले कर्तव्य योग्य पद्धतीने पार पाडावे. कारण या विद्यार्थ्यांमुळेच पुढे सशक्त व सुदृढ समाज निर्माण होणार आहे, असे मत नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या सुकाणू समितीचे अध्यक्ष व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले.

'अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' (एबीआरएसएम) यांच्यामार्फत सर परशुरामभाऊ महाविद्यालयात आयोजित गुरुवंदना कार्यक्रमात डॉ. करमळकर बोलत होते. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळींच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण चितळे, डॉ. मनोहर सानप, डॉ. महेश अबाळे व डॉ. ए. पी. कुलकर्णी, एबीआरएसएम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. डी. बी. पवार उपस्थित होते.

नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात डॉ. करमळकर यांनी माहिती देऊन भारतीय ज्ञान परंपरा व परंपरेचे आजच्या काळातील शैक्षणिक महत्त्व यावर मार्गदर्शन केले. डॉ. महेश अबाळे व डॉ. ए. पी. कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी एबीआरएसएम संघटनेच्या एसपी महाविद्यालयाच्या स्थानिक कार्यकारिणी मंडळाचे डॉ. चेतन भुजबळ, कर्वे स्त्री शिक्षण संस्था कार्यकारिणी मंडळाचे डॉ. सुभाष पवार, वाडिया महाविद्यालय कार्यकारिणी मंडळाचे डॉ. मनोहर सानप, डॉ. अनिल शिरोळे आदी उपस्थित होते.

डॉ. भारती बालटे यांनी संस्कृत भाषेतील सरस्वती वंदना सादर केली. डॉ. रचना ठोंबरे यांनी संघटनेचे गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. चंद्रशेखर उपासनी यांनी केले. तर डॉ. नीता मोहिते यांनी आभार मानले.

Kesari 24.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

पुढारी

# स्वायत्त महाविद्यालयांना 451 पदांचे वाटप

## ९४ महाविद्यालयांनी मागणी प्रस्ताव सादर न केल्याने उच्च शिक्षण विभागाचा निर्णय

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्यातील २ हजार ८८ पदांच्या सहायक प्राध्यापकभरतीसाठी ९४ महाविद्यालयांनी 'ना हरकत' प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव सादर केलेले नाहीत. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापक संवर्गातील उर्वरित ४५१ पदांचे ६६ अनुदानित स्वायत्त महाविद्यालयांना समप्रमाणात वाटप करण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे.**



शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात आले आहे. या धोरणामुळे अभ्यासक्रमात रचनात्मक बदल होत असल्याने अभ्यासक्रम आणि मूल्यमापन प्रक्रियेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कौशल्यपूर्ण प्राध्यापकांची गरज आहे. सहायक प्राध्यापक संवर्गातील २ हजार ८८ पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने 'ना हरकत' प्रमाणपत्रासाठी मागणीपत्र सादर करण्याच्या सूचना संबंधित महाविद्यालयांना देण्यात आल्या होत्या. मात्र, दिलेल्या कालमर्यादित महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले नाहीत. प्रस्ताव सादर करण्यासाठी आणखी एक संधी देऊनही महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले नाहीत. महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर न करण्यामागे संस्थेची अनुसूची अद्ययावत नसणे, व्यवस्थापनात अंतर्गत वाद, संस्था-महाविद्यालयांतील न्यायालयीन प्रकरण, बिंदुनामावली प्रमाणित असणे, अशी कारणे असल्याचा अहवाल उच्च शिक्षण संचालनालयाने सादर केला. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांना या पदांची आवश्यकता नाही, असे गृहीत धरून त्या महाविद्यालयांची पदे अनुदानित स्वायत्त महाविद्यालयांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.

अतिरिक्त ठरलेल्या सहायक प्राध्यापकांचे रिक्त जागेवर समायोजन करावे. संबंधित विषयासाठी सहायक प्राध्यापकपद अतिरिक्त नसल्याचे सहसंचालकांनी प्रमाणित केल्यावरच पदभरतीची जाहिरात देता येईल. संबंधित पदांना आरक्षण लागू राहील. अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक, शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध अद्याप निश्चित झालेला नाही. त्यामुळे २०१७ च्या विद्यार्थिसंख्येनुसार लागू होणारी रिक्त पदे आधारभूत मानण्यात आली आहेत. आकृतिबंध अंतिम झालेला नसल्याने आकृतिबंधास वित्त विभागाची अंतिम मान्यता मिळेपर्यंत ही पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत. पदभरती करताना विद्यापीठ अधिनियमातील तरतुदींचे काटेकोर पालन करून प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच नियुक्ती आदेश देण्याबाबत स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Jul 25, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# साडेचारशे सहायक प्राध्यापकांची पदे भरणार

## राज्यशासनाची मान्यता : ६६ स्वायत्त महाविद्यालयांतील ४५१ सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील पदभरतीसाठी नाहरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव शासनाकडे सादर न केलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील रिक्त सहायक प्राध्यापक पदे स्वायत्त महाविद्यालयांना वाटप करण्यात येणार आहेत. त्यानुसार राज्यातील ६६ स्वायत्त महाविद्यालयांतील ४५१ सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

उच्चस्तरीय सचिव समितीने मंजूर केलेल्या ३ हजार ५८० पदांपैकी १४९२ पदे वगळता उर्वरित २०८८ पदभरतीस वित्त विभागाने मान्यता दिली आहे. प्राध्यापक भरतीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेले निर्देश तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणीसाठी रिक्त पदे भरणे गरजेचे आहे. अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना संधी देऊनही पदभरतीबाबत दाखवलेली अनास्था विचारात घेऊन अद्यापही नाहरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापक पदे स्वायत्त महाविद्यालयांना वाटप केली जाणार आहेत. राज्यात ८४ स्वायत्त महाविद्यालये आहेत. त्यापैकी १८ महाविद्यालयांनी पदभरती केली आहे. उर्वरित ६६ महाविद्यालयांना अटी व शर्तीनुसार ४५१ पदे भरण्यास मान्यता दिली आहे.

**९४ महाविद्यालयांनी दिले नाही नाहरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव**

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना दि. ३० ऑक्टोबर २०२२ पूर्वी ना हरकत प्रमाणपत्रासाठी मागणीपत्र सादर करण्याच्या सूचना १० ऑक्टोबर २०२२ रोजी दिल्या होत्या. मागणीपत्र सादर न केल्यास त्यांची पदे नॅक ए प्लस तसेच ए दर्जा प्राप्त महाविद्यालयांना वाटप करण्यात येतील, असे शासनाच्या विचाराधीन होते. विविध कारणांमुळे दि. १९ जून २०२३ अखेर ९४ महाविद्यालयांनी ना हरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव सादर केले नाहीत.

**पदभरतीसाठी अटी व शर्ती :**

अतिरिक्त सहायक प्राध्यापक यांच्या रिक्त पदांवर तातडीने समायोजित करण्यात यावे. संबंधित विषयाकरिता सहायक प्राध्यापक पद अतिरिक्त नसल्याचे विभागीय सहसंचालकांनी प्रमाणित केल्यानंतरच कॉलेजला पदभरतीची जाहिरात देता येईल. केंद्राच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणानुसार पदांना आरक्षण लागू राहील.

शासनाने मंजूर केलेल्या पदसंख्येच्या मर्यादित पदभरती करावी. मात्र, रिक्त पदांपैकी कोणत्या विषयाची पदे प्रथम भरावीत हा निर्णय संबंधित महाविद्यालयाला दिला आहे. आकृतिबंधास वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळेपर्यंत सदरची पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत.

Pune Main
Page No. 3 Jul 25, 2023
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

# तंत्रशिक्षण महाविद्यालयांत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू

## ५० महाविद्यालये, तीन विद्यापीठांचा समावेश

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील तंत्रशिक्षणाची ५० महाविद्यालये आणि तीन विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यंदापासून लागू करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित संस्थांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी दिली.

देशाला ज्ञानाच्या क्षेत्रात महासत्ता बनवण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्य आणि ज्ञानप्राप्ती, विज्ञान, तंत्रज्ञान शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्रामधील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी, गुणवत्तापूर्ण, नावीन्यपूर्ण शिक्षण, संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने लागू केलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० महाराष्ट्राने स्वीकारले आहे. शैक्षणिक धोरणामध्ये सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षण प्रणालीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. शैक्षणिक धोरणाची राज्यात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अंमलबजावणी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून तंत्रशिक्षण संचालनालयाशी संलग्न ५० महाविद्यालये, तीन विद्यापीठांमध्ये नव्या रचनेनुसार अभ्यासक्रम राबवण्यात येणार असल्याचे डॉ. मोहितकर यांनी स्पष्ट केले आहे.

तीन विद्यापीठांमध्ये लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, मुंबईतील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, पुण्यातील सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाचा समावेश आहे.

लोकसत्ता Tue, 25 July 2023
https://epaper.loksatta.com/c/73029750

---

लोकमत

अर्जासाठी १४ ऑगस्टपर्यंत मुदत

# नामांकित संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याच्या समाज कल्याण विभागाकडून देशातील नामांकित संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जाती/नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. यात विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळनिहाय १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. त्यासाठी १४ ऑगस्टपर्यंत मुदत आहे.

एम्स, आयआयएम, आयआयटी, एनआयटी, आयआयएससी, आयसर व अन्य राष्ट्रीय शैक्षणिक संस्थांसह केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या मान्यता प्राप्त नामांकित संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जाती/नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना दिली जाते. ही योजना राज्याच्या समाज कल्याण विभागाकडून राबविली जाते. अनुसूचित जातीच्या /नवबौद्ध घटकांतील १०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. सर्व विभागातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याच्या उद्देशानेशिक्षण मंडळनिहाय विद्यार्थ्यांची निवड



करण्यात येते. या योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांस संबंधित विद्यापीठ, संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, नोदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादी शुल्क संबंधित विद्यापीठ, शैक्षणिक संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केले जाते.

### युपीएससीच्या तयारीसाठी महाज्योतीमार्फत आर्थिक साहाय्य

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (महाज्योती) संघ लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ३१४ विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रत्येकी ५० हजार रुपये आर्थिक साहाय्य वितरित करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती संस्थेने दिली आहे.

**संघ लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षेचा निकाल १२ जून रोजी जाहीर झाला असून, महाज्योतीमार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून ५० हजार रुपये अर्थसहाय्याकरिता १६ जून ते ८ जुलै या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते.**

या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी ३५६ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ३१४ विद्यार्थी या योजनेच्या लाभासाठी पात्र ठरले आहेत. यापैकी २९८ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी ५० हजार रुपयांप्रमाणे एकूण १ कोटी ४९ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. उर्वरित पात्र विद्यार्थ्यांनी बँक तपशील सादर केल्यावर त्यांचे अर्थसहाय्य वितरित करण्यात येईल.

संघ लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा १५ सप्टेंबर रोजी होणार असून, संबंधित विद्यार्थ्यांना वितरित केलेल्या अर्थसहाय्याचा या परीक्षेच्या तयारीसाठी लाभ होणार आहे, अशी माहितीही महाज्योतीचे प्रकल्प व्यवस्थापक कुणाल शिरसाठे यांनी दिली आहे.

Hello Pune
Page No. 6 Jul 25, 2023
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*


# विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद गैरव्यवहाराच्या आरोपांनी गाजली

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत झालेल्या बैठक भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराच्या आरोपांनी गाजली. सदस्यांना अंधारात ठेवून नियमबाह्य पद्धतीने बेकायदेशीररित्या नोकर भरती केल्याचा आरोप या बैठकीत करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात काही वर्षांपूर्वी बोगस नोकर भरती घोटाळा समोर आला होता. अजूनही त्यातील मूळ सूत्रदारांच्या शोध लागला नाही. त्यानंतर आता एकदा पुन्हा व्यवस्थापन परिषदेला अंधारात ठेवून विद्यापीठात काही कर्मचाऱ्यांची भरती झाल्याचा प्रकार सदस्यांसमोर आला. विशेष म्हणजे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्यांनीच यावर आवाज उठवला. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सागर वैद्य यांनी राज्यपाल नियुक्त सदस्यांच्या कार्यपद्धती विषयी आक्षेप घेतला. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेसह इतर संस्था, संघटनांना विद्यार्थी हिताच्या आंदोलन करत असतील आणि त्यांना धमक्या व अपमानास्पद वागणूक दिली जात असे तर हे योग्य नाही. टेंडर पासून बदल्यापर्यंत प्रत्येक मुद्द्यावर राज्यपाल नियुक्त सदस्यांकडून होत असलेल्या हस्तक्षेपामुळे आणि मनमानीमुळे प्रशासनही वैतागले आहे, अशा स्वरूपाची चर्चा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत झाली असल्याचे बोलले जात आहे. परिणामी विद्यापीठाच्या सर्वोच्च असणाऱ्या अधिकार मंडळांमध्येच असे वाद होत असतील तर विद्यापीठात काहीही अलबेला सुरू नाही, असे स्पष्ट होते. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना व्यवस्थापनाच्या परवानगीशिवाय वारंवार नोकरीत सामावून घेतले जात आहे. यावरही बैठकीत आक्षेप घेण्यात आला.

विद्यापीठाच्या हाउस कीपिंगसाठी एकच कंत्राटदार डोळ्यासमोर ठेवून त्या दृष्टीने टेंडर प्रक्रिया राबवली जात असल्याचा आरोपही या बैठकीत करण्यात आला. तसेच जी २० सह इतर गेल्या चार महिन्यातील आर्थिक व्यवहाराची चौकशी करून श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. नोकर भरतीसाठी राबविण्यात आलेल्या प्रक्रियेत अनुमोदक, सूचक म्हणून ज्या व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नाव घेण्यात आले, त्यांनी याबद्दल कोणतीही कल्पना नसल्याचे या बैठकीत नमूद केले, असेही सूत्रांनी सांगितले. त्यामुळे विद्यापीठात नेमकं काय सुरू आहे ?, असा प्रश्न निर्माण होतो.



व्यवस्थापन परिषद हे विद्यापीठाचे उच्च अधिकार मंडळ आहे. या सदस्यांच्या बैठकीत झालेल्या वादग्रस्त विषयांची चर्चा मला समाज माध्यमात जाहिरपणे करायची नाही. तो विद्यापीठाचा अंतर्गत विषय आहे. आम्हा सर्व शिक्षण घटकातून निवडून आलेल्या सदस्यांचे जे आक्षेप, तक्रारी होत्या त्या आम्ही माननीय कुलगुरू यांच्याकडे सभेत जाहीर केल्या आहेत. कुलगुरूंवर आमचा विश्वास आहे. ते त्यावर योग्य ती कार्यवाही करतील अशी आमची अपेक्षा आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य यांनी दिली.

Kesari 25.7.2023

---

**प्रभात**

# नामदेव गाथ्यासाठी विद्यापीठ प्रयत्न करेल

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २४ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सार्थ श्री नामदेव गाथा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. सार्थ श्री नामदेव गाथा प्रकल्पातील ८७१ अभंगाचा पहिला खंड प्रकाशित केला. विद्यापीठातील संत नामदेव सभागृहात या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये सार्थ श्री नामदेव गाथा प्रकल्प सुरु करणारे सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ एकमेव आहे. विद्यापीठाच्या संत अध्यासनांचे शैक्षणिक सल्लागार डॉ. ओमश्रीश श्रीदत्तोपासक यांनी हा प्रकल्प पूर्ण केलेला आहे. शासकीय नामदेव गाथा प्रमाण मानून अभंगाची संहिता, शक्य असेल तेथे उपलब्ध पाठभेदाची नोंद आणि सुगम अर्थ असे या प्रकल्पाचे प्रारूप आहे. जाणीवपूर्वक मराठी अभंगावरच लक्ष केंद्रित केले आहे.

संत नामदेव अध्यासनाचे प्रमुख डॉ. सदानंद मोरे, संत तुकाराम महाराज अध्यासनाचे प्रमुख प्रा. अभय टिळक, संत ज्ञानदेव अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे या मान्यवरांनी हा प्रकल्प प्रकाशित होण्यासाठी पुढाकार घेतला. डॉ. सदानंद मोरे यांनी या प्रकल्पामागील भूमिका विषद केली. या समारंभास संदीप लवके, सुभाष मुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

uneCity, 25 July 2023, Page
ttps://epaper.dainikprabhat.c

---

**लोकमत**

# प्राध्यापकांना प्रशिक्षणासाठी पाठविणार : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** प्राध्यापकांना शिक्षण अथवा संशोधन करून मोठा कालावधी झालेला असतो. आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे तसेच नावीन्यपूर्ण घडामोडींची माहिती प्राध्यापकांना होण्यासाठी उद्योग जगतात काही दिवस प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार आहे. याबाबतचा विचार राज्य सरकारचा विचार करत असून, येत्या काही दिवसांत निर्णय होईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये (आयओआयटी) अॅडव्हिट एआय लॅब, ओरॅकल अकॅडमी आणि ड्रोन अकॅडमीचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे मानद सचिव मालोजीराजे छत्रपती, संस्थेचे कोषाध्यक्ष अजय पाटील, नियामक मंडळाचे अध्यक्ष भगवानराव साळुंखे, प्राचार्य डॉ. पी. बी. माने आदी मान्यवर उपस्थित होते.

पाटील म्हणाले की, राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात ५० स्वायत्त इंजिनिअरिंग कॉलेज, १०० पदव्युत्तर पदवी महाविद्यालयांमध्ये धोरणाची अंमलबजावणी होणार आहे.

Pune Main
Page No. 2 Jul 25, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

सकाळ

# तंत्रशिक्षण महाविद्यालयांनाही नवे धोरण

## सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षण प्रणालीचा समावेश

**पुणे, ता. २५ :** तंत्रशिक्षण देणारे राज्यातील तीन विद्यापीठे आणि ५० स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये यावर्षीपासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अभ्यासक्रमात सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षण प्रणालीचा समावेश केला जात आहे.

औद्योगिक क्षेत्रातील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी गुणवत्ता, नाविन्यपूर्ण शिक्षण आणि संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू केले आहे. राज्य सरकारनेही हे धोरण स्वीकारले आहे. त्याप्रमाणे राज्यात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून तंत्रशिक्षण संचालनालयाशी संलग्न ५० स्वायत्त महाविद्यालये आणि तीन विद्यापीठांमध्ये नव्या रचनेनुसार अभ्यासक्रम राबविणार आहेत, अशी माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी दिली.

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, मुंबईतील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, पुण्यातील सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ या तीन विद्यापीठांत नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तर तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या ५० स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये धोरणानुसार अंमलबजावणी होणार आहे. त्यात पुण्यातील नऊ महाविद्यालयांचा समावेश आहे.

### अभ्यासक्रम राबविणारी पुण्यातील स्वायत्त महाविद्यालये...

- १. जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, ताथवडे
- २. एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग, आळंदी
- ३. जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, वाघोली
- ४. पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग
- ५. बन्सीलाल रामनाथ अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बिबवेवाडी)
- ६. कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वूमेन, कर्वेनगर
- ७. ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी
- ८. विद्या प्रतिष्ठानचे कमलनयन बजाज इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, बारामती
- ९. बीआरएसीटी विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, कोंढवा बुद्रूक

Pune, Main
26/07/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

# अकरावी प्रवेशाच्या विशेष फेरीत १५ हजार प्रवेश

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीची प्रक्रिया राबवण्यात येत आहे. आतापर्यंत झालेल्या तीन फेऱ्यांमध्ये प्रवेश जाहीर होऊनही प्रत्यक्ष प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांनी विशेष फेरीत मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे. त्यामुळे दोनच दिवसांत सुमारे १५ हजार प्रवेश झाले आहेत. यंदा ३२६ कनिष्ठ महाविद्यालयांमणध्ये एक लाख १५ हजार ९५० जागा प्रवेशांसाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ९९ हजार ८४६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तर विशेष फेरीसाठी २८ हजार ९६३ विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरले होते. विशेष फेरीच्या सोमवारी जाहीर झालेल्या गुणवत्तायादीत २५ हजार ९७३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. आतापर्यंतच्या तीन नियमित फेऱ्यांमध्ये ४४ हजार ११४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला होता.

लोकसत्ता Wed, http

# सहायक प्राध्यापकांच्या ४५१ पदांचे अनुदानित स्वायत्त महाविद्यालयांना वाटप

## उच्च शिक्षण विभागाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील २ हजार ८८ पदांच्या सहायक प्राध्यापक भरतीसाठी ९४ महाविद्यालयांनी ना हरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव सादर केलेले नाहीत. त्यामुळे संबंधित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक संवर्गातील उर्वरित ४५१ पदांचे ६६ अनुदानित स्वायत्त महाविद्यालयांना समप्रमाणात वाटप करण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात आले आहे. या धोरणामुळे अभ्यासक्रमात रचनात्मक बदल होत असल्याने अभ्यासक्रम आणि मूल्यमापन प्रक्रियेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कौशल्यपूर्ण प्राध्यापकांची गरज आहे. सहायक प्राध्यापक संवर्गातील २ हजार ८८ पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ना हरकत प्रमाणपत्रासाठी मागणीपत्र सादर करण्याच्या सूचना संबंधित महाविद्यालयांना देण्यात आल्या होत्या. मात्र दिलेल्या कालमर्यादेत महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले नाहीत. नैसर्गिक न्यायानुसार आणखी एक संधी देऊनही महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले नाहीत. महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर न करण्यामागे संस्थेची अनुसूची अद्ययावत नसणे, व्यवस्थापनात अंतर्गत वाद, संस्था-महाविद्यालयातील न्यायालयीन प्रकरण, बिंदुनामावली प्रमाणित असणे अशी कारणे असल्याचा अहवाल उच्च शिक्षण संचालनालयाने सादर केला. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांना या पदांची आवश्यकता नाही असे गृहित धरून त्या महाविद्यालयांची पदे अनुदानित स्वायत्त महाविद्यालयांना देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच भरती प्रक्रियेबाबतच्या सूचनाही शासन निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आल्या.

अतिरिक्त ठरलेल्या सहायक प्राध्यापकांचे रिक्त जागेवर समायोजन करावे. संबंधित विषयासाठी सहायक प्राध्यापक पद अतिरिक्त नसल्याचे सहसंचालकांनी प्रमाणित केल्यावरच पदभरतीची जाहिरात देता येईल. संबंधित पदांना आरक्षण लागू राहील. अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक, शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध अद्याप निश्चित झालेला नाही. त्यामुळे २०१७ च्या विद्यार्थिसंख्येनुसार लागू होणारी रिक्त पदे आधारभुत मानण्यात आली आहेत.

आकृतिबंध अंतिम झालेला नसल्याने आकृतिबंधास वित्त विभागाची अंतिम मान्यता मिळेपर्यंत ही पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत. पदभरती करताना विद्यापीठ अधिनियमातील तरतुदींचे काटेकोर पालन करून प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच नियुक्ती आदेश देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 26 July 2023 https://epaper.loksatta.com/c/

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# 'स्वायत्त'मध्ये भरती होणार

## राज्यातील ६६ महाविद्यालयांत ४५१ प्राध्यापक पदांच्या भरतीला मान्यता

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

प्राध्यापक भरतीसाठी राज्यातील ९४ महाविद्यालयांनी उच्च शिक्षण विभागाकडे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मागणीचा प्रस्ताव सादर केला नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या महाविद्यालयांतील मंजूर पदे स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालयांना देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार राज्यातील ६६ स्वायत्त महाविद्यालयांत ४५१ पदांच्या भरतीला मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान, या निर्णयामुळे प्राध्यापक भरतीची आतुरतेने वाट पाहणाऱ्या उमेदवारांना अद्याप काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

याबाबतचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रसिद्ध केला आहे. राज्य सरकारने दोन हजार ८८ पदांच्या प्राध्यापक पदभरतीला मान्यता दिली होती. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांना 'एनओसी'साठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयांना संधी देऊनही त्यांच्या प्रशासनाने पदभरतीला उदासीनता दाखवली होती. त्या पार्श्वभूमीवर ही सर्व पदे स्वायत्त दर्जा प्राप्त असणाऱ्या महाविद्यालयांना भरण्याला मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्येक स्वायत्त महाविद्यालयाला ८० टक्क्यांपेक्षा अधिक पदे भरता येतील.

'राज्यात अनुदानित महाविद्यालयात स्वायत्त दर्जा प्राप्त असणारी एकूण ८४ महाविद्यालये आहेत. त्यापैकी १८ महाविद्यालयांमध्ये ७० टक्क्यांपेक्षा अधिक पदे भरलेली आहेत. उर्वरित ६६ महाविद्यालयांना दोन हजार ८८ पैकी शिल्लक असलेल्या एकूण ४५१ पदभरतीला मान्यता देण्यात आली आहे,' असे निर्णयात सांगण्यात आले आहे.



### 'पदभरतीसाठी संस्थांचा प्रस्ताव नाही'

महाविद्यालयांनी प्राध्यापक पदभरतीसाठी 'एनओसी'चे प्रस्ताव सादर केले नसल्याने त्यांना प्राध्यापक भरती करता येणार नाही. संस्थेचे व्यवस्थापनांतर्गत वाद, अनुसूची अद्ययावत नसणे, न्यायालयीन प्रकरण आणि रोस्टर प्रमाणित नसणे अशा प्रमुख कारणांमुळे प्राध्यापक पदभरतीसाठी संस्थांनी प्रस्ताव सादर केला नाही,' अशी माहिती उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**दहा स्वायत्त महाविद्यालयांत ५५ पदे**

पुण्यातील दहा स्वायत्त महाविद्यालयांमध्ये एकूण ५५ प्राध्यापकांची पदे भरता येणार आहे. या महाविद्यालयांत नौरोसजी वाडिया, फर्ग्युसन, एस. पी., आबासाहेब गरवारे, गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, मॉडर्न (शिवाजीनगर), बीएमसीसी, सिम्बायोसिस, प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय (बारामती) अशा महाविद्यालयांचा समावेश आहे.

Maharashtra Times 27.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

लोकमत

# 'एनईपी'मध्ये शिक्षकांच्या क्षमता संवर्धनावर भर; कार्यशाळा सुरु

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तिसऱ्या वर्धापननिमित्त दिल्लीत कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांच्या क्षमता संवर्धनावर भर दिला जात आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी वीस कोर्सेस तयार केले आहेत. राज्यातील शाळांमध्ये एनईपी राबविण्यास सुरुवात केली असून, बदलाची प्रक्रिया पुढील दहा वर्षे चालणार आहे. शालेय शिक्षण विभागाने २९७ कार्ये हाती घेतली असून, त्यातील ३६ कार्ये पूर्ण झाली आहेत, अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या उपसंचालक डॉ. नेहा बेलसरे यांनी दिली.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त नवी दिल्ली येथील प्रगती मैदान येथे २९ आणि ३० जुलै रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि राज्य शिक्षण विभाग त्यामध्ये सहभागी होणार आहे.

नवोदय विद्यालय समिती, पुणे विभागाचे उपायुक्त बी. वेंकटेश्वरन, सहाय्यक आयुक्त रवींद्र लाड, सीबीएसईचे पुणे विभागीय अधिकारी राम वीर यांनीही उपक्रमांबाबत माहिती दिली.

वीर म्हणाले, सीबीएसईने शाळांमध्ये एनईपी राबविली जात असून, त्याअंतर्गत पाचवीपर्यंत बहुभाषिक माध्यमातून सूचना दिल्या जातील.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृतीसाठी 'एक विद्यार्थी, एक झाड' ही मोहीम हाती घेतली आहे; तसेच वीज आणि पाणी बचत, अन्न वाया न घालविणे आणि वाढता ई कचरा याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

### ५९ नवोदय विद्यालये झाल्या पीएमश्री शाळा



वेंकटेश्वरन म्हणाले, पुणे विभागाअंतर्गत ७३ नवोदय शाळांपैकी ५९ नवोदय विद्यालये पीएमश्री शाळा झाल्या आहेत. या शाळांना प्रत्येकी अडीच कोटींचा निधी मिळणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

देशभरात १४ हजार ५०० पीएमश्री शाळा तयार करणे, शालेय शिक्षणासाठी डिजिटल पायाभूत सुविधेसाठी राष्ट्रीय डिजिटल शैक्षणिक आर्किटेक्चर, आधारभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र मिशन म्हणजेच 'निपुण भारत', विद्यांजली, फाउंडेशन स्टेजसाठी 'राष्ट्रीय अभ्यासक्रम फ्रेमवर्क', नॅशनल मिशन फॉर मेटरिंग, एकात्मिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम आदी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

Hello Pune
Page No. 4 Jul 27, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

सकाळ

# एनईपीच्या माध्यमातून साक्षरता वाढविणार

## समन्वयक नेहा बेलसरे; शिक्षण आराखड्याचे काम सुरू

**पुणे, ता. २६ :** नवीन शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अनुषंगाने शालेय शिक्षणाच्या आराखड्याला अंतिम स्वरूप प्राप्त झाले नाही. त्यामुळे पायाभूत शिक्षणातल्या महत्त्वपूर्ण बदलांना पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरवात होईल. एनईपीच्या पार्श्वभूमीवर भारत साक्षरता अभियान राबवले जात असून, राज्यातील १२ लाख ४० हजार निरीक्षरांना साक्षर करण्याचे काम हाती घेतले आहे, अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या उपसंचालिका व 'एनईपी'च्या राज्य समन्वयक नेहा बेलसरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी प्रक्रियेला तीन वर्ष झाल्यानिमित्त नवी पेठेतील पत्रकार भवनात पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. त्यात बेलसरे बोलत होत्या. या वेळी सीबीएसईचे पुणे विभागीय संचालक रामवीर, केंद्रीय विद्यालय आणि नवोदय विद्यालयाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

New Education Policy

Educate Encourage Enlighten

नई शिक्षा नीति को साकार, ज्ञान, कौशल और रोज़गार।

### बिंदू नामावली अंतिम

■ शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव आणि राज्याच्या शिक्षण आयुक्तांनी शिक्षक भरती संदर्भात प्रत्येक आठवड्याला एक अशा चार बैठका घेतल्या आहेत. सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी याबाबत संवाद साधला आहे. तसेच, बिंदू नामावली अंतिम करण्याचे काम सुरू केले आहे.

बेलसरे म्हणाल्या, "राज्याचा शिक्षण आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. एनईपीनुसार इयत्ता दहावी-बारावीचे महत्त्व कमी करणे, विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाकडे घेऊन जाणे आदी गोष्टी केल्या जात आहेत. 'एनईपी'नुसार पायाभूत शिक्षणाचा टप्पा पुढील शैक्षणिक वर्षापासून अमलात आणला जाणार आहे. त्या संदर्भातील सर्व पूर्वतयारी राज्य सरकारने केली आहे."

केंद्र सरकारतर्फे महाराष्ट्राला पाच शैक्षणिक वाहिन्या मिळाले असून त्यांचे काम सुरू आहे. लवकरच या वाहिन्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केल्या जातील, असेही बेलसरे यांनी सांगितले. रामवीर म्हणाले, "विद्यार्थ्यांनी वीज व अन्नाची बचत करणे, प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करणे, असे उपक्रम सर्व शाळांमध्ये राबवले जात आहेत."

Pune, Main
27/07/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# NEP will play a pivotal role in propelling India

As the National Education Policy (NEP) 2020 completes three years of implementation this week, it stands as a milestone in India's pursuit of universal access and quality education. The policy has encompassed diverse aspects of equitable education, assessment reforms, teacher empowerment and technological integration, and is proving to be a catalyst in giving India's education system a new dimension and making it an inspiration globally. NEP 2020 brought unprecedented flexibility to the education system and its curricular revamp bridged gaps between different streams and activities, creating a more balanced and integrated educational framework. By introducing the National Credit Framework (NCrF), NEP 2020 empowered learners across levels with increased flexibility. Multiple entry and exit options, assessment frameworks, and multidisciplinary curricula granted students the freedom to shape their learning paths.



Abhay Karandikar

In higher education, the implementation of the Academic Bank of Credit (ABC) was a game changer. With 10 million students enrolled, the ABC system has been pivotal in the seamless transfer of credits, ensuring student mobility, and personalised learning paths. This reform has empowered students to choose their preferred institutions and complete degrees based on their preferences. In IIT Kanpur, for example, the revamped undergraduate curriculum has significant flexibility in programme template with new interdepartmental majors, honours, management track and online courses as open electives. The curriculum also mandates a course on ethics and an increase in credits from social sciences, humanities, environment, economics, and management science. There is an evident shift from mere problem-identifying to finding solutions.

NEP 2020 is helping schools and colleges, too, to become enablers of solution-driven grassroots innovation. The Vidya Amrit initiative is helping students to become problem-solvers, while the 10,000 Atal Tinkering Labs and the Smart Indian Hackathons are grooming the next generation of young innovators. The striking correlation between the policy and aspects of Education 4.0, which prioritises inclusivity and skill-based learning, and aims to transform teachers from mere educators to collaborators and enablers, is noteworthy. The DIKSHA (Digital Infrastructure for Knowledge Sharing) platform, hosting nearly half-a-million collections of e-content in 33 Indian languages, including Indian sign language, has catered to 150 million students, teachers, parents, and other learners nationwide.

NEP 2020 recognises the transformative potential of Artificial Intelligence (AI), and remote learning platforms in enriching academic excellence and skill development of students. The integration of AI through personalised learning, automated grading, and improved teacher-student interactions, is a big push for the Indian education system. The AI for All platform, educating millions in 11 regional languages, demonstrates its broad reach. The policy's emphasis on the formation of a digital university that focuses on personalised learning experiences and content availability in various Indian languages and ICT formats, is noteworthy. The upcoming National Digital University, operating under a networked hub-spoke model, will integrate cutting-edge ICT expertise and collaborate with public universities and institutions nationwide.

NEP 2020 acknowledges the role of research and innovation in driving sustainable growth. The recent approval by the Cabinet for setting up the National Research Foundation (NRF) will foster collaborative research and development endeavours among academia, industry, and the government. NEP 2020 has brought a paradigm shift in entrepreneurship and skill development among students. IITs are now leading in providing credit-based entrepreneurship opportunities to students. Various IITs are either giving semester breaks for entrepreneurship or have integrated it as part of curriculum. At IIT Kanpur, we have a student entrepreneurship policy, where pupils can launch entrepreneurial ventures either by taking a semester off or by opting for Innovation and Entrepreneurship Credits (IEC).

Despite the steady advancements and growth in the past, India's education system was lacking international impact. NEP 2020 opens up a new path with the provision of international collaboration, and the scope to open offshore campuses. The establishment of the first offshore IIT campus in Tanzania marks a significant development in this regard. This global recognition, especially among the Global South, marks a shift. By embracing a holistic multidisciplinary, and technology-driven approach, NEP 2020 is set to propel India through a comprehensive academic as well as research-oriented transformation. The policy can play a decisive role in shaping the future of the nation.

*Abhay Karandikar is director, IIT Kanpur*
*The views expressed are personal*

Hindustan Times 27.7.2023

# News Paper Clippings During July 2023

## Section: Education

Kesari
28.7.2023

### 'एनईपी'नुसार पायाभूत शिक्षणाचा टप्पा पुढील शैक्षणिक वर्षापासून

**पुणे** : राज्याचा शिक्षण आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता दहावी–बारावीचे महत्त्व कमी करणे, विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाकडे घेऊन जाणे आदी गोष्टी केल्या जात आहेत. 'एनईपी'नुसार पायाभूत शिक्षणाचा टप्पा पुढील शैक्षणिक वर्षापासून अंमलात आणला जाणार आहे. त्या संदर्भातील सर्व पूर्वतयारी राज्य सरकारने केली आहे, अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या उपसंचालिका व 'एनईपी'च्या राज्य समन्वयक नेहा बेलसरे यांनी दिली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी प्रक्रियेला तीन वर्ष झाल्यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. या वेळी सीबीएसईचे पुणे विभागीय संचालक रामवीर, केंद्रीय विद्यालय आणि नवोदय विद्यालयाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

बेलसरे म्हणाल्या, नवीन शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अनुषंगाने शालेय शिक्षणाच्या आराखड्याला अंतिम स्वरूप प्राप्त झाले नाही. त्यामुळे पायाभूत शिक्षणातल्या महत्त्वपूर्ण बदलांना पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरवात होईल. एनईपीच्या पार्श्वभूमीवर भारत साक्षरता अभियान राबवले जात आहे. राज्यातील १२ लाख ४० हजार निरक्षरांना साक्षर करण्याचे काम हाती घेतले आहे.

केंद्र सरकारतर्फे महाराष्ट्राला पाच शैक्षणिक वाहिन्या मिळाले असून त्यांचे काम सुरु आहे. लवकरच या वाहिन्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केल्या जातील. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव आणि राज्याच्या शिक्षण आयुक्तांनी शिक्षक भरती संदर्भात प्रत्येक आठवड्याला एक अशा चार बैठका घेतल्या आहेत. सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी याबाबत संवाद साधला आहे. तसेच, बिंदू नामावली अंतिम करण्याचे काम सुरू केले असल्याचे यावेळी बेलसरे यांनी सांगितले.

रामवीर म्हणाले, विद्यार्थ्यांनी वीज व अन्नाची बचत करणे, प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करणे, असे उपक्रम सर्व शाळांमध्ये राबवले जात आहेत.

लोकमत

### एनईपीनुसार ११ महाविद्यालयांत पदवी अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांच्या ११ शासकीय तसेच स्वायत्त महाविद्यालयांत या वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रम अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. एनईपीनुसार नवीन अभ्यासक्रम तयार केले असून, त्यानुसार अनेक महाविद्यालयांमध्ये पदवीच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यास प्रारंभही झाला आहे.

यासह स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तंत्रज्ञान विद्यापीठे अशा एकूण दीडशे संस्थांमध्ये यंदापासून एनईपीनुसार पदवी अभ्यासक्रम सुरू होतील, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०' अंमलबजावणीला राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांत सुरुवात झाली आहे. एकूण दीडशे स्वायत्त पदवी महाविद्यालयांसह पदव्युत्तर पदवीची महाविद्यालये आणि १३ अकृषी विद्यापीठांतही या वर्षीपासून पीजी अभ्यासक्रम एनईपीनुसार शिकविण्यात येणार आहे. त्यानुसार पदव्युत्तर पदवीसाठी नवीन अभ्यासक्रम तयार करण्यात आले असून, प्रवेश प्रक्रिया पार पडल्यानंतर ते राबविण्यात येतील. तसेच २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये राज्यात एनईपी लागू होईल, त्यानुसार सर्व महाविद्यालयात नवा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे, असे डॉ. देवळाणकर यांनी सांगितले.



#### तंत्रशिक्षण महाविद्यालयातही एनईपी लागू

राज्यातील तंत्रशिक्षण देणारे ५० स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तीन तंत्रशास्त्र विद्यापीठांमध्येही या शैक्षणिक वर्षापासून 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'नुसार अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहेत.

#### संशोधनाच्या सुविधा

औद्योगिक क्षेत्रामधील मनुष्यबळाची कमतरता दूर करणे यांसह गुणवत्ता तसेच नावीन्यपूर्ण शिक्षण आणि संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'ची देशात अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. या धोरणामध्ये सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षणप्रणालीचा अंतर्भाव करण्यात आला आहे, अशी माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी दिली.

#### ५० महाविद्यालयांत शिकवणार अभ्यासक्रम

तंत्रशिक्षण संचालनालयाशी संलग्न असलेल्या ५० महाविद्यालये आणि लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, मुंबईतील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, पुण्यातील सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठांमध्ये एनईपीनुसार नव्या रचनेनुसार अभ्यासक्रम राबविला जाणार आहे.

Hello Pune
Page No. 6 Jul 29, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# शिक्षण पुनर्रचनेच्या वाटचालीत राज्य अग्रेसर

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला तीन वर्षे पूर्ण होत आहेत. याचे औचित्य साधून या धोरणाच्या महाराष्ट्रातील अंमलबजावणीचा संबंधित खात्याच्या मंत्रिमहोदयांनी घेतलेला आढावा.**

**चंद्रकांत पाटील**

माणसाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करावे लागते. शिक्षण हे त्यासाठीचे महत्त्वाचे साधन आहे. देशाचा विचार करता येत्या दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरवण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल.

भारताने २०१५ मध्ये स्वीकारलेल्या 'शाश्वत विकास- २०३०'च्या कृती कार्यक्रमाच्या चौथ्या उद्दिष्टात 'जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम' समाविष्ट आहे. हे उद्दिष्ट २०३० पर्यंत समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण निश्चित करण्यासंबंधी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला ज्ञान महासत्ता आणि विश्वगुरू बनवण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी वेगाने कार्यरत आहेत. या उत्तुंग उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी शिक्षणप्रणालीची नव्याने रचना करण्याच्या प्रयत्नांतून 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' आखले गेले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने केलेल्या प्रयत्नांची माहिती देण्यासाठी या लेखाचा प्रपंच.




धोरणाच्या कार्यवाहीसाठी माजी कुलगुरू नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती तयार करण्यात आली. सदर समितीने विविध कार्यबल गट स्थापन केले. त्यांनी आपापले अहवाल दिले. शैक्षणिक क्षेत्रातील विविध घटकांसमवेत अनेक बैठका घेण्यात आल्या.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० संदर्भात डॉ. रवींद्र कुलकर्णी अहवालाचा स्वीकार करून त्याच्या अंमलबजावणीसाठी विविध बैठकांचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय श्रेयांक संचयिनीमध्ये (अॅकॅडमिक बँक) सर्वाधिक नोंदणीत राज्य देशात अग्रेसर आहे. नव्या धोरणानुसार शिक्षण देणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना या संचयिनीमध्ये नोंदणी करावी लागते. विद्यार्थ्यांनीसुद्धा स्वतःचे ABC ओळखपत्र तयार करणे बंधनकारक आहे. (लिंक - www.abc.gov.in) विद्यार्थ्यांनी त्यासाठी त्यांचा आधार क्रमांक आणि नोंदणीकृत मोबाईल क्रमांक वापरायचा आहे. केवळ नोंदणीकृत उच्च शिक्षण संस्थांच विद्यार्थ्यांनी मिळवलेले श्रेयांकन (क्रेडिट) अपलोड करू शकतात. महाराष्ट्र हे सर्वाधिक नोंदणीकृत उच्च शिक्षणसंस्था (१०७) असणारे राज्य आहे. सर्वाधिक विद्यार्थी नावनोंदणी करणाऱ्या पहिल्या पाच विद्यापीठांपैकी तीन विद्यापीठे महाराष्ट्रातील आहेत.

## क्लस्टरच्या निर्मितीला प्रोत्साहन

महाविद्यालये/ विद्यापीठांच्या क्लस्टर्सच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यात राज्य पुढे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचे बहुविद्याशाखीय संस्थांमध्ये रूपांतरण होणे अपेक्षित आहे. स्वायत्त महाविद्यालयांची वाढती संख्या (१५२), कायद्यानुसार स्वायत्त महाविद्यालयांना (२५) अधिकारप्राप्त स्वायत्त दर्जा देणे आणि क्लस्टर महाविद्यालये/ विद्यापीठे यांकरता Statutes तयार करणे, यातून सरकारने बहुविद्याशाखीय संस्थांचे जाळे निर्माण करण्यासाठी वाटचाल सुरू केली आहे. याबरोबर 'Professor of Practice and Digital Adjunct Faculty' संकल्पनेची अंमलबजावणी महाराष्ट्र सरकार करत आहे. उच्च शिक्षण संस्थांच्या नॅक व एनबीए मान्यताप्राप्तीच्या बाबतीतही राज्य अग्रेसर आहे. सर्वोत्कृष्ट शैक्षणिक पद्धती आणि अभ्यासक्रम समकक्षता यांच्या सामायिकतेसाठी राज्यस्तरीय 'ई-बोर्ड ऑफ स्टडीज'ची स्थापना करण्यात आली. उच्च शिक्षणाचे परिदृश्य बदलण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षणशिक्षणसंस्थांमधील शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी 'महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थे'ची स्थापना करून एक वेगळा दृष्टिकोनही देशासमोर ठेवला आहे.

## मातृभाषेतून शिक्षण

प्रादेशिक भाषांमध्ये शिक्षणाचा प्रसार व प्रचार हे तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रमुख तत्त्व आहे. त्यानुसार मोठ्या प्रमाणात मराठीत तांत्रिक अभ्यासक्रमांचे भाषांतर करण्यास प्रोत्साहन देत आहोत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च व तंत्रशिक्षण खात्याने २० एप्रिल, १६ मे आणि चार जुलै रोजी काढलेल्या विविध शासनआदेशांनुसार संपूर्ण महाराष्ट्रात बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून तयार केलेल्या एकसमान कौशल्याधारित 'क्रेडिट फ्रेमवर्क अभ्यासक्रमा'ची ठळक वैशिष्ट्ये अशी आहेतः

१) विविध शाखांमध्ये आणि संस्थांमध्ये अभ्यासक्रम निवडण्यात लवचिकता आणि स्वातंत्र्य.

२) पदवी पातळीवरील तीन/चार वर्षीय बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम, श्रेयांक व्यवस्थेसंदर्भात नियम. कप्पेबंदपणा दूर करून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार, त्यांनी निवडलेल्या करिअरकरिता विविध विद्याशाखांत आणि संस्थांत अभ्यासक्रमांचे अध्ययन करण्यासाठी स्वातंत्र्य.

३) विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार पर्यायी शिक्षण आणि अध्ययनपद्धतींची (ऑफलाईन, खुली आणि दूरस्थ अध्ययन पद्धती, ऑनलाईन अध्ययन आणि संकरित-हायब्रीड) उपलब्धता.

४) चार वर्षांचा बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या मुख्य व उपविषयांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याची मुभा.

५) प्रत्येक सम सत्रानंतर विद्यार्थ्यांसाठी प्रवेश-निर्गमन धोरण आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार क्रेडिट्स मिळविता येणार; विद्यार्थ्यांना या चार वर्षीय बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रमांमध्ये आवश्यक श्रेयांक संरचनेसह किती कालाराम्य अभ्यासक्रम निवडायचा याचे स्वातंत्र्य असेल. या धोरणांतर्गत एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम, तीन वर्षांची बॅचलर्स पदवी, चार वर्षांची बॅचलर्स पदवी (ऑनर्स/ संशोधन) आणि बहु आगमन-निर्गमन पर्याय देणारी पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय दिलेली आहे.

यात व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण, कौशल्य विकास घडवणारे अभ्यासक्रम, क्षमता विकास करू शकणारे अभ्यासक्रम, भारतीय ज्ञानप्रणाली, मूल्याधिष्ठित शिक्षण, क्रीडा, कला, सांस्कृतिक कार्यक्रम यांसारखे सह-अभ्यासेतर अभ्यासक्रम यांचा समावेश होतो. यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यगुणांना प्रोत्साहन देणे आणि शिक्षणासोबत छंदही जोपासणे शक्य होईल. विद्यापीठांना आणि स्वायत्त महाविद्यालयांना यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ संस्थांचे संघटन तयार केले गेले आहे. असे क्रांतिकारी आणि दीर्घ दृष्टी असलेले धोरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याला दिले, यासाठी मी कृतज्ञता व्यक्त करतो. हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना त्यांचे आयुष्य यशस्वीपणे जगण्याचे सामर्थ्य देईल आणि भारताला ज्ञान महासत्ता आणि विश्वगुरू बनविण्याचा मार्ग सुकर करील, याचा विश्वास वाटतो.

**(लेखक महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आहेत.)**

Sakal 29.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Education*

### शैक्षणिक कामगिरी उंचावण्यासाठी बहुभाषिक शिक्षण

**पुणे** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्थानिक भाषांमध्ये शिक्षणावर भर देण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई संलग्न शाळांमधील पूर्व प्राथमिक ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सध्या उपलब्ध असलेल्या पर्यायात भारतीय भाषेचा अधिकचा पर्याय देण्याची मुभा दिली आहे. उपलब्ध असणारे स्रोत, संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत, अन्य शाळांतील चांगल्या कार्यपद्धतींसाठी सहकार्य घेऊन बहुभाषिक शिक्षण प्रत्यक्षात आणण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षणाच्या विविध स्तरांवर मातृभाषा, स्थानिक भाषा किंवा प्रादेशिक भाषांचा वापर शिक्षणाचे माध्यम म्हणून करण्याची शिफारस करण्यात आली आहे. या धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत बहुतांश सीबीएसई शाळांमध्ये इंग्रजी आणि हिंदी माध्यम वापरले जाते. या पार्श्वभूमीवर शिक्षणाचे माध्यम म्हणून स्थानिक भाषांचा वापर करण्याबाबतचे निर्देश सीबीएसईच्या शैक्षणिक विभागाचे संचालक डॉ. जोसेफ इमॅन्युएल यांनी परिपत्रकाद्वारे देशभरातील शाळांना दिले.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेला (एनसीईआरटी) देशातील २२ भाषांमध्ये नवी पाठ्यपुस्तके तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. एनसीईआरटीकडून पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम सर्वोच्च प्राधान्याने करण्यात येत आहे.

Kesari 29.7.2023

**प्रभात**

**प्रभात** पुणे, रविवार, दि. ३० जुलै २०२३ || ३

# नवीन शैक्षणिक धोरणाने होईल युगांतर

## नरेंद्र मोदी : अखिल भारतीय शैक्षणिक परिषदेचा शुभारंभ

**नवी दिल्ली, दि. २९** - देशाला यशस्वी करण्याची आणि देशाचे भवितव्य घडवण्याची कमाल शक्ती शिक्षणात आहे. आज एकविसाव्या शतकात भारत ज्या उद्दिष्टांसाठी पुढे जात आहे, त्यात आपली शिक्षण व्यवस्थाही खूप महत्त्वाची आहे. त्यामुळेच नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलात आणल्यास युगांतर झाल्याचा अनुभव नागरिकांना येईल, असे प्रतिपादन पंतपधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

प्रगती मैदान, दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासह कन्व्हेन्शन सेंटर कॉम्प्लेक्स अर्थात 'भारत मंडपम' येथे अखिल भारतीय शैक्षणिक अधिवेशनाचा शुभारंभ मोदींच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. १२ भारतीय भाषांमध्ये अनुवादित शिक्षण आणि कौशल्य अभ्यासक्रमावरील पुस्तकांचे प्रकाशनही पंतप्रधानांनी केले. यावेळी मोदींनी 'पीएम श्री योजने' अंतर्गत शाळांसाठी निधीचा पहिला हप्ताही जारी केला.

अखिल भारतीय शैक्षणिक परिषदेत शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते, उद्योग प्रतिनिधी, शाळांमधील शिक्षक, उच्च शिक्षण आणि कौशल्य संस्था आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतर्दृष्टी, यशोगाथा राबविण्यासाठी



आमंत्रित केले जाईल. या परिषदेमध्ये १६ सत्रे असतील. त्या सत्रांमध्ये दर्जेदार शिक्षण आणि प्रशासन, न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटांचे प्रश्न, राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क, भारतीय ज्ञानप्रणाली, शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण या विषयांवर चर्चा केली जात आहे.

मोदी पुढे म्हणाले, 'तुम्ही सर्वजण या व्यवस्थेचे प्रतिनिधी आहात, ध्वजवाहक आहात. म्हणूनच अखिल भारतीय शिक्षण परिषदेचा भाग बनणे ही माझ्यासाठी खूप महत्त्वाची संधी आहे. शिकण्यासाठी चर्चा आवश्यक आहे, संवाद आवश्यक आहे. अखिल भारतीय शिक्षण समागमाच्या या सत्राच्या माध्यमातून आपण आपली चर्चा आणि चिंतनाची परंपरा पुढे नेत आहोत. यापूर्वी असा कार्यक्रम काशीच्या नवनिर्मित रुद्राक्ष सभागृहात आयोजित करण्यात आला होता. यावेळी हे अधिवेशन नव्याने बांधण्यात आलेल्या भारत मंडपम या सभागृहात होत आहे.

भारताच्या शिक्षण व्यवस्थेच्या महत्त्वाबाबत पीएम मोदी म्हणाले, 'अखिल भारतीय शिक्षण परिषदेच्या काशीच्या रुद्राक्षापासून ते आधुनिक भारतमंडपपर्यंत या प्रवासातही एक संदेश दडलेला आहे.

### काय आहे 'पंतप्रधान श्री योजना?'

'पंतप्रधान श्री' या योजनेंतर्गत, केंद्र सरकार आणि राज्य सरकारे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे व्यवस्थापित शाळांमधून विद्यमान शाळांचे बळकटीकरण करून १४,५०० हून अधिक 'पंतप्रधान श्री' शाळांची निर्मिती करण्याची तरतूद आहे. या शाळा विद्यार्थ्यांचे अशा प्रकारे पालनपोषण करतील की ते राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार एक समान, सर्वसमावेशक आणि बहुलतावादी समाज निर्माण करण्यासाठी योगदान देणारे नागरिक बनतील.

PuneCity, 30 July 2023, Page:003
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची तीन वर्षे

## केंद्राने राबविलेल्या विविध उपक्रमांचा आढावा

**नवी दिल्ली, ता. ३० (पीटीआय) : देशामध्ये ३४ वर्षे जुन्या शैक्षणिक धोरणाऐवजी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्याबाबतच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला आज तीन वर्षे झाली. मागील तीन वर्षांत केंद्राने या धोरणाअंतर्गत अनेक उपक्रम राबविले आहेत. केंद्राने राबविलेल्या या उपक्रमांपैकी प्रमुख दहा उपक्रमांचा आढावा.**



### १ पायाभूत टप्प्यासाठी 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा' (एनसीएफ एफएस)

वयवर्ष तीन ते आठ या गटातील मुलांसाठी सामायिकपणे तयार करण्यात आलेला अशा पद्धतीचा हा पहिलाच आराखडा आहे. या आराखड्याअंतर्गत फेब्रुवारी महिन्यापासून 'जादुई पेटारा' ही संकल्पना राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या संकल्पनेनुसार, विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागावी यासाठी रंजक शैक्षणिक साहित्य आणि खेळांच्या माध्यमातून शिक्षण दिले जात आहे.

### २ 'विद्याप्रवेश'

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या(एनसीईआरटी) माध्यमातून पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'विद्याप्रवेश' नावाचा तीन महिन्यांचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची पहिलीच्या अभ्यासक्रमासाठीची पूर्वतयारी करून घेण्यात येत आहे. देशातील सिक्किम, मणिपूर आणि केरळ ही राज्ये वगळता अन्य सर्व राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी २०२२-२३मधील शैक्षणिक वर्षापासून 'विद्याप्रवेश' हा उपक्रम सुरू केला आहे.

### ३ 'पीएमश्री' योजना

या योजनेअंतर्गत असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यानुभवाच्या माध्यमातून शिक्षण देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे शाळांत पायाभूत आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पंतप्रधान मोदींनी २९ जुलैला या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या निधीपैकी पहिल्या टप्प्यातील निधीचे वितरण केले.

### ४ भारतीय भाषांत शिक्षणाला प्रोत्साहन

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे भारतीय भाषांतून शिक्षणाला प्राधान्य देण्यात येत आहे. या अंतर्गत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) देशभरातील १२ राज्यांतील अभियांत्रिकीचे ४९ अभ्यासक्रम प्रादेशिक भाषांतून शिकविण्यास परवानगी दिली आहे. 'एमबीबीएस' हा वैद्यकीय अभ्यासक्रम आता हिंदीतूनही शिकविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठ सामाईक प्रवेश परिक्षा, जेईई आणि एनईईटी या अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणाच्या अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश परिक्षा १३ प्रादेशिक भाषांतून घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तके देखील प्रांतिक भाषांत भाषांतरित करण्यात येत आहेत.

### ५ एकाचवेळी दोन अभ्यासक्रमांना प्रवेश

केंद्रीय अनुदान आयोगाने नुकत्याच काढलेल्या परिपत्रकानुसार आता, विद्यार्थ्यांना एकाचवेळी दोन अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येणार आहे. पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र ही योजना लागू होणार नाही.

### ६ तज्ज्ञ 'मार्गदर्शक प्राध्यापक' नेमता येणार

विद्यापीठे आणि उच्चमहाविद्यालयांत विविध विषयातील तज्ज्ञांना 'प्राध्यापक' म्हणून नेमता येणार आहे. यासाठी शैक्षणिक पात्रतेचे बंधन शिथिल करण्यात आले आहे. यासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' ही योजना केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाने लागू केली आहे. यामध्ये देशभरातील सुमारे पावणेसात हजार तज्ज्ञांची नोंद करण्यात आली आहे.

### ७ पदवी अभ्यासक्रम ४ वर्षांचा

देशातील १०५ विद्यापीठांनी २०२३ पासून पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी चार वर्षांचा केला आहे. या अभ्यासक्रमाची दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर, संबंधित अभ्यासक्रमाचे पदविका प्रमाणपत्र मिळणार आहे.

### ८ विदेशातही आयआयटी

भारतीय तंत्रज्ञान संस्था(आयआयटी)मद्रास ही अभियांत्रिकीचे शिक्षण देणारी संस्था टांझानियामध्ये 'आयआयटीची' शाखा सुरू करत आहे. आयआयटी दिल्ली ही अबुधाबी येथे आणि आयआयटी खरगपूर ही मलेशियात आयआयटीची शाखा सुरू करत आहे.

### ९ परदेशी विद्यापीठे भारतात

परदेशी विद्यापीठांना त्यांच्या शाखा भारतात सुरू करण्यासाठीची सुधारित मार्गदर्शक तत्त्वे लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत.

### १० उच्च शिक्षण

उच्चशिक्षणाच्या धोरणात्मक निर्णयासाठी यूजीसी, एआयसीटीई, एनसीटीई यांच्या समावेशातून सामायीक संस्थेच्या निर्मितीसाठी प्रयत्न

Sakal 31.7.23

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# ब्रँडिंगसाठी पैशांची उधळपट्टी

## सावित्रीबाई फुले विद्यापीठाचा अमृतमहोत्सवानिमित्त 'पीआर'वर खर्च

म. टा. प्रतिनिधी, पुणे



"सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नावातच ब्रँड आहे. ब्रँडिंगसाठी खासगी संस्थेच्या माध्यमातून जादाचे पैसे खर्च करण्याची आवश्यकता काय? विद्यापीठाचे माजी विद्यार्थी, शैक्षणिक विभाग आणि जनसंपर्क विभाग यांनी विद्यापीठाच्या प्रचार-प्रसिद्धीची जबाबदारी व्यवस्थित पार पाडल्यास कोणत्याही खासगी संस्थेची आश्यकता भासणार नाही.

- धनंजय कुलकर्णी, माजी सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात जनसंपर्क विभागासोबतच देशभरात नावजलेले 'डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज' (डीएमसीएस) आणि 'संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग' (रानडे इन्स्टिट्यूट) अशा नामवंत संस्था आहेत. मात्र, विद्यापीठाच्या प्रशासनाला अमृतमहोत्सवानिमित्त ब्रँडिंगसाठी खासगी जनसंपर्क संस्थेची (पीआर संस्था) आवश्यकता भासत आहे. या कामासाठी काही लाख रुपयांचा खर्च विद्यापीठ करीत आहे. विद्यापीठाकडे जनसंपर्क आणि ब्रँडिंगच्या कामांसाठीचे स्रोत उपलब्ध असताना खासगी संस्थेची नेमणूक करून निधीची उधळपट्टी करण्याचा नवा पायंडा कशासाठी, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष फेब्रुवारीपासून सुरू झाले असून, हे वर्ष सुरू झाल्यापासून विद्यापीठाने एकही कार्यक्रम आयोजित केलेला नाही. अमृतमहोत्सवी वर्षात जनसंपर्क, समाजमाध्यमे, चित्रफिती तयार करणे आदी कामांसाठी खासगी (पीआर संस्था) नियुक्त करण्यासाठीची निविदा विद्यापीठाने नुकतीच प्रसिद्ध केली आहे. या कामासाठी १० लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे.

त्यासाठीची निविदा विद्यापीठाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यात मात्र पत्रकारितेचे धडे देणारी रानडे इन्स्टिट्यूट, दृकश्राव्य माध्यमाचे शिक्षण देणारे डीएमसीएस आणि माहितीपट तयार करण्यासाठी 'ईएमआरसी' कार्यरत आहेत. या कामाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना 'हँन्डस् ऑन ट्रेनिंग' मिळू शकते. त्यांना त्याचा फायदा प्रत्यक्ष शिक्षण आणि प्रशिक्षणात होण्यासोबत नोकरीच्या संधींसाठी उपयुक्त ठरणार आहे.

त्याचप्रमाणे जनसंपर्क विभागही विद्यापीठात कार्यरत आहे. असे असतानाही विद्यापीठाकडून १० लाख रुपयांचा खर्च जनसंपर्क आणि ब्रँडिंगवर करण्यात येणार आहे. त्यातही अमृतमहोत्सवी वर्षाचे केवळ सहाच महिने बाकी आहेत. त्यामुळे सर्व साधने उपलब्ध असताना आणि कमी कालावधी असताना पैशांची उधळपट्टी कशासाठी, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

### जनसंपर्क विभाग दुर्लक्षित?

पुणे विद्यापीठाच्या निर्णयांची आणि विविध लोकोपयोगी उपक्रमांची माहिती पोहोचवण्याची जबाबदारी जनसंपर्क विभागाकडे आहे. मात्र, या विभागाला पूर्ण वेळ अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येत नाही. विद्यापीठाच्या प्रशासनातील अधिकाऱ्याला अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येतो. त्याचप्रमाणे मुष्यबळाची कमतरता असतानाही, अधिकारी-कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येत नाही. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाने जनसंपर्क विभागाकडे दुर्लक्ष करण्याचे ठरवले आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

Maharashtra Times 31.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठाला प्रसिद्धीचा सोस

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अमृतमहोत्सवी वर्षात जनसंपर्क, समाजमाध्यमे, चित्रफिती तयार करणे आदी कामांसाठी जनसंपर्क संस्था नियुक्त करण्यासाठीची निविदा प्रसिद्ध केली आहे. या कामासाठी दहा लाखांचा खर्च प्रस्तावित आहे. मात्र, विद्यापीठाकडे जनसंपर्क आणि संबंधित कामांसाठीचे स्रोत आधीच उपलब्ध असताना आता स्वतंत्र संस्थेची नेमणूक करून निधीची उधळपट्टी करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यापीठाला प्रसिद्धीचा सोस आहे का? असा प्रश्न विद्यार्थी संघटनांनी उपस्थित केला आहे.



**यंत्रणा असूनही १० लाखांची उधळपट्टी**

विद्यापीठाचे अमृत महोत्सवी वर्ष फेब्रुवारीपासून सुरू झाले. मात्र, अमृत महोत्सवी वर्ष सुरू झाल्यापासून विद्यापीठाने एकही कार्यक्रम आयोजित केलेला नाही; परंतु आता दृकश्राव्य साहित्यनिर्मिती, जनसंपर्क आणि ब्रँडिंगच्या कामासाठी विद्यापीठाकडून जनसंपर्क संस्थेची नेमणूक करण्यात येणार आहे. त्यासाठीची निविदा विद्यापीठाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यात पत्रकारितेचे धडे देणारा जनसंज्ञापन आणि वृत्तविद्या विभाग (रानडे इन्स्टिट्यूट), दृकश्राव्य माध्यमाचे शिक्षण देणारा जनसंज्ञापन विभाग (डिपार्टमेंट ऑफ मास कम्युनिकेशन), माहितीपट तयार करण्यासाठी ईएमआरसी, तसेच जनसंपर्क विभागही विद्यापीठात कार्यरत आहे. असे असतानाही विद्यापीठाकडून दहा लाखांचा खर्च जनसंपर्क आणि ब्रँडिंगवर करण्यात येणार आहे. त्यातही अमृत महोत्सवी वर्षाचे आता जेमतेम सहाच महिने बाकी आहेत. त्यामुळे सर्व स्रोत उपलब्ध असताना आणि कमी कालावधी असताना दहा लाखांच्या निधीची उधळपट्टी कशासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

Pune Edition
Jul 31, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Education*

# College complains of plagiarism; two institutes say sorry to NAAC, 'let off'

Hemali.Chhapia
@timesgroup.com

**Mumbai:** A Chembur-based teacher training college, which was recently accredited by the National Assessment and Accreditation Council (NAAC) in the fourth cycle, was shocked to find that two other institutes had submitted identical self-study reports (SSR). When it raised an alarm about its report being "plagiarised", the nation's assessment body merely closed the cases after accepting a "doddering" excuse of a "technical glitch" from the institutes.

> Either there should be a restricted view of such documents or the documents should be protected using technological tools. We need to look into this and address the issue on priority to avoid discrepancies in future
>
> **Reni Francis** | PRINCIPAL, PILLAI COLLEGE OF EDUCATION & RESEARCH

An SSR is like a statement of purpose — it highlights the college's core strengths in academics, infrastructure, staff and students, its achievements, research carried out, laurels won, as well as a roadmap of its grand plans and how it plans to achieve them. In its SSR, Pillai College of Education and Research wrote about how it developed a holistic approach and coined an acronym, 'EXCEL' with its own expanded form. Similarly, another best practice was termed 'TEST' and 'Atmanirbhar Shishak', for which the college was awarded a prize in a NAAC-sponsored conference.

Sangamner-based Gokhale Education Society (GES)'s College of Education allegedly picked contents from Pillai college's SSR, using the same abbreviations and several other features under various criteria. Royal College of Education for Women at Mira Road too picked most of the answers of one NAAC criterion. Amusingly, while one college picked instances from Pillai college on the importance of value-based courses conducted, under the question of the number of value-based courses conducted, it said no such courses were conducted.

"Either there should be a restricted view of such documents or these documents should be protected using modern technological tools. We need to look into this and address the issue on a priority to avoid discrepancies in the future," said Reni Francis, the principal of Pillai College of Education and Research.

NAAC wrote to both the colleges and closed the cases in a fortnight after receiving an apology with an explanation regarding a "technical glitch". NAAC executive committee chairman Anil Sahasrabudhe said the assessment body was developing an in-house software to check plagiarism, and once implemented, "such instances would be caught right at the first stage".

The Times of India 31.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Career*

लोकमत

राजकारणातील करिअरसाठी राज्यशास्त्र हा विषय महत्त्वाचा ठरतो. भारतीय राज्यघटना व मूलभूत हक्क व कर्तव्ये, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व शहरी व ग्रामीण प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करून जागरूक व सुजान नागरिक घडविण्यासाठी या विषयाचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते.

# राज्यशास्त्र अभ्यासा अन् बना राज्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी




कोणत्या क्षेत्रात आहेत संधी ?

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारण, जागतिक प्रश्न, समस्यांचे निवारण करण्यासाठी राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग होतो. जागतिकीकरणानंतर भारताचे विविध देशासोबत आर्थिक तसेच राजकीय संबंध वाढले. देशांतर्गत राजकारण तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सामाजिक आणि राजकीय डावपेचांना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे राज्यशास्त्र पदवीधरांना शासकीय तसेच खासगी क्षेत्रात अनेक संधी निर्माण होत आहेत.

राज्य व शासन संस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय. तसेच सत्ता विषयक शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र (राजनीतीशास्त्र) होय. राज्यशास्त्र विषयाला दोन ते अडीच हजार वर्षांपूर्वीचा इतिहास आहे. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ व विचारवंत प्लेटो यांनी अथेन्स राज्यात प्लेटॉनिक अकादमी सुरू केली. गुरु सॉक्रेटिस व शिष्य ॲरिस्टॉटल यांच्या समवेत प्लेटोने नैसर्गिक तत्वज्ञान, शास्त्र व पाश्चिमात्य तत्वज्ञानाचा पाया घातला. पुढे प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ व राजकीय विचारवंत ॲरिस्टॉटल यांना 'राज्यशास्त्राचा जनक' मानले गेले . त्यांनी ' दि पॉलिटिक्स ' हा ग्रंथ लिहून राज्यशास्त्र विषयाचा पाया घातला. तसेच भारतात कौटिल्य यांनी ' अर्थशास्त्र ' या ग्रंथांत धर्मशास्त्रापासून राजनीतीशास्त्र वेगळे असून त्याच्या स्वतंत्र अभ्यासाचा विचार मांडला. म्हणून कौटिल्य यांना "भारतीय राज्यशास्त्राचा जनक' संबोधले जाते.

## कोठे घेता येईल राज्यशास्त्राचे शिक्षण?

दहावीनंतर अकरावी आणि बारावीसाठी राज्यशास्त्र हा विषय घेता येतो. राज्यशास्त्र विषयात करिअर करण्यासाठी बारावीनंतर पदवी आणि दोन वर्षांची पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेता येते. राज्यातील महाविद्यालयात पदवी आणि पदव्युत्तर पदवी तसेच विद्यापीठांमध्ये शिक्षण घेता येते.

## राजकीय पक्षाचे सल्लागार, निवडणूक तज्ज्ञ

१ राज्यशास्त्राचे पदवीधर विविध राजकीय पक्षांचे सल्लागार म्हणून काम करू शकतात. सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात विविध राजकीय पक्षांचे कॅम्पेन चालविण्यासाठी राजकीय तज्ज्ञांची नितांत गरज असते. विशेषत: राजकीय पक्षाचे धोरण ठरवणे व उमेदवारांकडून लोकांसमोर मांडण्यात येणारे विविध मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणे. राजकीय पक्षासाठी टॅगलाईन, घोषवाक्य तयार करणे व प्रचार यंत्रणा राबविणे. यासाठी तज्ज्ञांची गरज असते. राजकीय नेतृत्व, कार्यक्षमता, निर्णय क्षमता व अंमलबजावणी यासाठी राज्यशास्त्र, राजकारणाचा अभ्यास गरजेचा आहे. यासह स्वत:ची पॉलिटिकल रिसर्च फर्म्स, राजकीय विश्लेषक व राजकीय समालोचक तसेच राजकीय विषयांचे लेखक, राजकीय नाट्य लेखक, सर्वेक्षण तज्ज्ञ, निवडणूक पूर्व विश्लेषक, पब्लिक अफेअर्स रिसर्च ॲनालिस्ट, कॅंपेन डिझायनर म्हणूनही काम करता येते.




## माध्यम क्षेत्रात करता येईल करिअर

२ विविध वृत्तपत्रे, न्यूज चॅनेलसाठी स्थानिक, राज्य तसेच देशातील राजकारणाचा अभ्यास असणारे पत्रकार तसेच राजकीय विश्लेषकांची गरज असते. राज्यशास्त्राचा अभ्यास असलेल्या विद्यार्थ्यांना माध्यम क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

## स्पर्धा परीक्षेसाठी स्कोरिंगचा विषय

३ एमपीएससी, यूपीएससी परीक्षेच्या माध्यमातून विविध पदांवर नोकरी मिळविण्यासाठी राज्यशास्त्र अत्यंत महत्त्वाचा आणि स्कोरिंगचा विषय आहे. पूर्व तसेच मुख्य परीक्षेत चांगले गुण प्राप्त करण्यासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी या विषयाची निवड करतात. तसेच विधी क्षेत्रात वकिली व्यवसाय तसेच विविध न्यायिक पदावर नोकरीसाठी या विषयाचे ज्ञान गरजेचे आहे.

## सरळसेवा भरती परीक्षेला पूरक

४ शासकीय सरळ सेवा भरतीमध्ये विशेषत: पोलिस, आर्मी, तलाठी, कृषी, पाटबंधारे, समाजकल्याण, ग्रामसेवक, वनरक्षक व ग्रामीण विकास इत्यादी विभागात राज्यशास्त्र (पॉलिटिकल सायन्स) या विषयात पदवीधरांना विशेष संधी आहे.

## प्राध्यापक, संशोधक म्हणून संधी

५ विषयात सहायक प्राध्यापक होण्यासाठी सेट, नेट आणि पीएच.डी. पदवी मिळवता येते. त्यानंतर कॉलेज व विद्यापीठात प्राध्यापक म्हणून करिअर करता येईल. राज्यशास्त्र हा विषय भारतासह इतर देशातही लोकप्रिय असून देश विदेशातील महाविद्यालयात राज्यशास्त्राचे अध्ययन, अध्यापन केले जाते.

## राज्यशास्त्र विषयाचे महत्त्व

- भारत हा जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. लोकशाहीत निवडणुकीस असाधारण महत्त्व असून ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगरपालिका, महानगरपालिका तसेच विधानसभा व लोकसभा निवडणुका होतात.
- **राज्यशास्त्राच्या अभ्यासात भारतीय राज्यघटना व शासनसंस्था व इतर देशांच्या राज्यघटनेचा तौलनिक अभ्यास, सार्वजनिक धोरण, लोकप्रशासन, राष्ट्रीय धोरण व सुशासन तसेच राजकीय सिद्धांत, आंतरराष्ट्रीय संबंध यांचा विशेष समावेश होतो.**
- भारतीय लोकशाही संरचना, उभारणी व मांडणी अंमलबजावणी याचे शास्त्रीय विश्लेषण व शिक्षण खऱ्या अर्थाने राज्यशास्त्र या विषयाद्वारे मिळते. राज्यशास्त्रातील विषय हे सरकारी यंत्रणा आणि कार्यपालन यंत्रणेत महत्त्वाची भूमिका बजावत असतात.



**प्रा. शरद मनसुख**
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

Hello Pune
Page No. 7 Jul 06, 2023
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Career*

प्रभात

# बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन

पारंपरिक वीटकमध्ये जाऊ इच्छित नसलेल्यांसाठी विद्यापीठांनी बीसीएच्या स्वरूपात एक व्यवहार्य पर्याय आणला आहे. बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (बीसीए), ज्यांना कॉम्प्युटर आवडते आणि ते कसे ऑपरेट करतात, सॉफ्टवेअर, हार्डवेअर आणि संबंधित टूल्स तसेच तंत्रज्ञान याविषयी सखोल अभ्यास करू इच्छित असलेल्यांसाठी ते एक आदर्श असल्याचे दिसून येते. या अभ्यासक्रमाबद्दल आणि एकूणच बीसीए यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर करिअरच्या व्याप्तीबद्दल अधिक जाणून घेणे उपयुक्त ठरू शकते.

■ विद्यावाचस्पती विद्यानंद



### बीसीएची व्याप्ती

प्रभात Career



### पात्रता निकष

CET BCA, AIMA UGAT, KIITEE BCA, LUCSAT BCA ... IELTS, TOEFL ... LOP ...

### बीसीए अभ्यासक्रमामधील विषय



... VB/C++ ...

### सरकारी क्षेत्रातील बीसीएची व्याप्ती



### भारतात, परदेशात बीसीएची व्याप्ती







- **वेब डेव्हलपर** : ... JavaScript, XHTML, PHP ...
- **डेटाबेस प्रशासक** : ...
- **सॉफ्टवेअर डेव्हलपर** : ... C++, Python, Java ...
- **संगणक अभियंता** : ...
- **प्रणाली अभियंता** : ...
- **संगणक प्रणाली विश्लेषक** : ...
- **सिस्टम प्रशासक/आयटी प्रशासक** : ... (LAN) ... (WAN) ...
- **संगणक शास्त्रज्ञ** : ...

### प्रमुख रोजगार क्षेत्रे



PuneCity, 31 July 2023, Page:010

https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Miscellaneous*

# तीन शतके जुने वृत्तपत्र बंद

## ऑस्ट्रियातील 'वीनर झाइतुंग' दैनिक थांबले

**वृत्तसंस्था,** बर्लिन

गेल्या सुमारे तीन शतकांहून अधिक काळ चाललेले आणि जगातील सर्वांत जुन्या वृत्तपत्रांपैकी एक असलेल्या 'वीनर झाइतुंग' या ऑस्ट्रियातील वृत्तपत्राची दैनिक मुद्रित आवृत्ती बंद करण्याचा निर्णय शुक्रवारी घेण्यात आला.

या वृत्तपत्राचा पहिला अंक आठ ऑगस्ट १७०३ रोजी प्रसिद्ध झाला. त्या वेळी या वृत्तपत्राचे नाव 'वीनरिशेस डायरीयुम' असे होते. कोणत्याही आलंकारिक भाषेविना संयतपणे बातम्या वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हे वृत्तपत्र सुरू करण्यात आले होते. शुक्रवारी, ३० जून रोजी त्याचा शेवटचा मुद्रित अंक प्रसिद्ध करण्यात आला. त्याच्या पहिल्या पानावर मोठ्या आकारात ३२० वर्षे, १२ अध्यक्ष, १० सम्राट, २ प्रजासत्ताक, १ वृत्तपत्र असे लिहिले आहे.




**या वृत्तपत्राचा १७८०मधील अंक.**




**वीनर झाइतुंगचा अखेरचा अंक.**

फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकी राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, दोन्ही महायुद्धे, जगभर पडलेले दुष्काळ, युरोपातील औद्योगिक क्रांती आदी विविध ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार हे वृत्तपत्र आहे.

हे वृत्तपत्र ऑस्ट्रिया सरकारच्या मालकीचे असले, तरी त्याचा संपादकीय विभाग स्वायत्त आहे. देशातील; तसेच परदेशांतील विविध विषयांवरील बातम्या आणि लेख असा दर्जेदार मजकूर देण्यासाठी हे वृत्तपत्र प्रसिद्ध होते.

व्यावसायिक कंपन्यांना वर्षाकाठी काही विशिष्ट जाहिराती वृत्तपत्रात देणे बंधनकारक असल्याची अट नुकत्याच लागू झालेल्या नवीन कायद्यान्वये काढून टाकण्यात आली होती. त्यानंतर 'वीनर झाइतुंग'च्या उत्पन्नात मोठी घट झाली होती. परिणामी, वृत्तपत्राचा तोटा बेसुमार वाढला. त्यामुळे गेल्या काही दिवसांत त्यांनी कर्मचारीसंख्येत कपात करून ही संख्या ६३ वरून २० वर आणली होती.

या वृत्तपत्राची दैनंदिन छापील आवृत्ती बंद करण्यात आली असली, तरी ऑनलाइन आवृत्ती सुरू राहणार आहे; तसेच मासिक छापील आवृत्ती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

Maharashtra Times 1.7.2023

# *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Miscellaneous*

लोकमत

गाजलेले पुणेकर

# चालता बोलता ज्ञानकोश



डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर

गेल्या शतकातील एक असामान्य बुद्धिमत्ता असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर. त्यांचे वडील सरकारी नोकर, तर आजोबा पोथ्या लिहून त्या बैलगाडीत भरून गावोगाव नेऊन विकण्याचा व्यवसाय करीत.

श्रीधरला लहानपणापासूनच अभ्यासाची आवड होती. हुशारीमुळे वर्गात शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना चटकन उत्तर देण्यात तरबेज असलेल्या श्रीधरला शिक्षक 'चालता बोलता ज्ञानकोश' असेच म्हणत. अमेरिकेत जाऊन पीएच.डी. संपादन करून भारतात परतल्यावर त्यांनी कोलकात्यामध्ये काही काळ प्राध्यापकी केली व नंतर पुण्यात आले. एकदा कामानिमित्त मद्रास येथे गेले असताना त्यांच्या पाहण्यात तेलगू भाषेतील ज्ञानकोश आला. मराठी भाषेतही असा ज्ञानकोश असावा, असे त्यांना वाटले. अमेरिका, इंग्लंड अशा पाश्चात्त्य देशांतील वास्तव्यामधून त्यांना विविध धर्मांचे, भिन्न संस्कृतींचे थेट दर्शन झालेले होते. तसेच, समाजशास्त्रज्ञ असल्याने दृष्टीही व्यापक होती.

आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी मराठी ज्ञानकोश निर्मिती प्रकल्पाचा धाडसी निर्णय घेतला. अपार मेहनत घेऊन पूर्णत्वास नेलेला हा अनेक खंडांचा महाराष्ट्रीय ज्ञानकोश मराठीतील पहिलाच ज्ञानकोश ठरला. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या, तिसऱ्या दशकात निर्माण झालेल्या या कोश प्रकल्पाला चार लाखांच्या आसपास खर्च झाला. केतकरांनी सर्वसामान्यांना आर्थिक मदतीचे आवाहन केले व त्याचबरोबर स्वतः घरोघरी जाऊन ज्ञानकोशांची विक्री केली. या कामात त्यांना कमीपणा वाटला नाही. त्यांच्या दृष्टीने ज्ञान वाटले जाणे महत्त्वाचे होते. स्वातंत्र्य चळवळींमध्ये सारा देश मग्न असताना राष्ट्रभक्तीबरोबरच अभ्यासूवृत्ती, ज्ञान प्राप्तीही गरजेची आहे. समाज ज्ञानी झाल्यास त्याला स्वातंत्र्य योग्य तऱ्हेने उपभोगता येईल,' असे ते म्हणत. अशा विचारधारेतून डॉ. केतकरांनी निर्माण केलेला महाराष्ट्रीय ज्ञानकोश आजही तितकाच प्रेरक व मार्गदर्शक आहे.

• प्रसाद भडसावळे

Pune Main
Page No. 9 Jul 05, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During July 2023*

### *Section: Miscellaneous*

महाराष्ट्र टाइम्स

माझे पुणे

विश्व ग्रंथालयांचे

# इतिहासाची पाने उलगडून दाखवणारे ग्रंथालय

अस्मिता चितळे

asmita.chitale@timesgroup.com

"इतिहासाच्या अभ्यासकांसाठी हे ग्रंथालय म्हणजे माहेरघर आहे. ग्रंथालयात इतिहासासंदर्भातील अभ्यासकांसाठी महत्त्वाची दुर्मीळ अशी पुस्तके आहेत. येत्या काही काळात ग्रंथालयातील सर्व पुस्तकांचे डिजिटायझेशन करण्यात येणार असून, हा सर्व ठेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

– पांडुरंग बलकवडे, सचिव, इतिहास संशोधन मंडळ








सर्व फोटो : स्वप्नील शिंदे

पुणे : मराठ्यांच्या इतिहासासंबंधी कोणताही अभ्यास करायचा असेल, तर 'भारत इतिहास संशोधन मंडळा'च्या ग्रंथालयाला पर्याय नाही. येथील २५ हजार पुस्तके म्हणजे इतिहासाच्या अभ्यासाशी संबंधित अमूल्य ठेवा आहे.

'भारत इतिहास संशोधन मंडळा'ची स्थापना १९१०मध्ये विश्वनाथ काशिनाथ राजवाडे आणि खंडेराव चिंतामण मेहेंदळे यांनी पुण्यातील मेहेंदळे वाड्यात केली. त्या वेळी वि. का. राजवाडे आणि सरदार मेहेंदळे यांच्या वैयक्तिक पुस्तक संग्रहाद्वारे ग्रंथालयाची स्थापना झाली. त्यानंतर १९२३मध्ये सदाशिव पेठेत इतिहास संशोधन मंडळाची वास्तू झाली आणि ग्रंथालय नव्या वास्तूमध्ये सुरू झाले.

ग्रंथालयाबद्दल माहिती देताना संस्थेचे सचिव पांडुरंग बलकवडे म्हणाले, 'अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकातील अनेक महत्त्वाची पुस्तके ग्रंथालयात आहेत. मराठ्यांच्या इतिहासावरील अभ्यासकांसाठी पुस्तकांचा खजिनाही येथे आहे. लंडनमध्ये १६८७ मध्ये प्रकाशित 'ट्रॅव्हल्स ऑफ मॉनिफर द थिओनॉट इन टू द लेव्हंट' हे छत्रपती शिवाजी महाराजांवरील पुस्तक सर्वांत जुने आहे. पर्शियन - अरेबिक आणि इंग्रजी असा १७७७मधील शब्दकोशही दुर्मीळ आहे.'

'भारतात १८८०पर्यंत शिळाप्रेसची पुस्तके होती. मात्र, ट्रॅव्हल्स ऑफ मॉनिफर द थिओनॉट इन टू द लेव्हंट हे पुस्तक छापील आहे. मराठीत एलफिन्स्टनचा शब्दकोश १८२२मध्ये प्रसिद्ध झाला. त्यात क्रमवंत यांच्यासह नऊ पंडितांनी काम केले होते. याची प्रतही ग्रंथालयात आहे,' अशी माहिती मंडळाचे सदस्य मंदार लवाटे यांनी दिली. सन १९००च्या आधीची वर्तमानपत्रे, मंडळाने प्रसिद्ध केलेली त्रैमासिके, शिवचरित्र साहित्याचे खंड, वि. का. राजवाडे यांचे मराठ्यांच्या इतिहासाची साधने, वासुदेवशास्त्री खरे यांचे ऐतिहासिक लेख संग्रहाचे १५ खंड, पेशवे दफ्तराचे सर्व खंड, पेशव्यांच्या रोजकिर्दीचे सर्व खंड, ब्रिटिशांनी तयार केलेले जिल्हे आणि शहरांची माहिती असणारी गॅझेटिअर, एशियाटिक सोसायटीची जर्नल्स उपलब्ध आहेत. महाराजांविषयी संशोधन-अभ्यास करण्यासाठी हे खंड महत्त्वाचे मानले जातात. बॅरिस्टर परांजपे लंडनला गेले असता, त्यांना भारतातील वखारींसंदर्भातील कैक लाख कागद पाहायला मिळाले. त्यावरून त्यांनी लिहिलेले 'इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी' अशी अनेक दुर्मीळ पुस्तके आहेत. दत्तो वामन पोतदार, शं. ना. जोशी, स. गो. जोशी, आबासाहेब मुजुमदार, बाबासाहेब पुरंदरे, निनाद बेडेकर, गजानन मेहेंदळे आदी विद्वान संशोधकांनी या वाचनालयाचा लाभ घेतला आहे.

### ग्रंथालयाचे शुल्क

'मंडळा'च्या आजीवन सदस्यांना वाचनालय मोफत आहे; तसेच त्यांना पुस्तके घरीही नेता येतात. इतरांना महिना १०० रुपये भरून मासिक सदस्यत्व घेता येते. त्यांना पुस्तके घरी नेता येत नाहीत. अभ्यासकांनी अर्ज केल्यावर त्यांना आवश्यक पुस्तकातील माहितीची छायाप्रत दिली जाते.

### मोडी कागदपत्रांचा खजिना

'जवळपास वीस लाख मोडी कागदापत्रे मंडळाच्या दफ्तरखान्यात आहेत. इसवी १५५० ते १९२५ या काळातले कागद असणारे हे एकमेव दफ्तर आहे. मंडळाच्या सदस्यांनी हे कागद घरोघरी जाऊन अत्यंत कष्टाने गोळा केले होते. सुमारे ४० हजार संस्कृत आणि प्राकृतमधील पोथ्याही आहेत,' अशी माहिती मंदार लवाटे यांनी दिली.

Maharashtra Times 18.7.2023

## *News Paper Clippings During July 2023*

## *Section: Miscellaneous*

लोकमत

# ग्रंथव्यवहारात देखील वाढला बोगसगिरीचा सुळसुळाट

## ही बोगसगिरी चालते कशी? : लेखक, प्रकाशकांना वाटाण्याच्या अक्षता : यावर आळा घालण्यात पोलिसांना येतेय अपयश

तनया नेवे
लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लेखक व मूळ प्रकाशकांनाही वाटाण्याच्या अक्षता लावत मूळ पुस्तकाच्या बोगस आवृत्त्या तयार करून त्याची विक्री करण्याचा प्रकार राज्यात, राज्याबाहेरही अनेकजण करत आहेत. चालणाऱ्या गोष्टींची कॉपी करून विक्री करण्याचा प्रकार पुस्तकांच्या जगात शिरून बरीच वर्षे झाली; पण त्याचा आता सुळसुळाट झाला आहे. त्याला आळा घालण्यात पोलिसांना अपयश येत आहे.



### अशी करतात बोगसगिरी

मागील काही वर्षांत पदपथावरील पुस्तक विक्रीत वाढ झाली ती पायरेटेडमुळे झाल्याचे लेखक व प्रकाशकांचे म्हणणे आहे. स्वस्तात विकल्या जाणारी ही पुस्तके मुळ पुस्तकाची भ्रष्ट आवृत्ती असते. लेखक किंवा मूळ प्रकाशकाची यात परवानगी घेतलेली नसते. पुस्तकातील मजकूर कॉपी करून त्याचे स्वस्त कागदावरचे पुस्तक काढले जाते. यात प्रकाशक विक्रेते, त्यांचे उपविक्रेते अशी मोठी चेनच आहे.

### पुण्यातही विक्री जोरात

पुण्यात अप्पा बळवंत चौकामध्ये पुस्तकांची मोठी बाजारपेठ आहे. त्याशिवाय प्रकाशकांची स्वत:ची स्वतंत्र विक्री दालने आहेत. अनेक दुकाने ५० वर्षांपेक्षाही जुनी आहेत. मागील काही वर्षात पुण्यामध्ये पदपथावरील पुस्तक विक्रीत मोठी वाढ झाली आहे. अप्पा बळवंत चौकात तर अशी विक्री होतेच, डेक्कन, कर्वे रस्ता, शिवाजी रस्ता, कोथरूड अशा काही ठिकाणीही पदपथावर पुस्तकांची विक्री सुरू असलेली दिसते. फडके, खांडेकर, अत्रे अशा जुन्या लेखकांपासून ते अलीकडच्या बोकील, गुप्ते अशा लेखकांचीही गाजलेली पुस्तके त्यात दिसतात.

### तक्रारी का होत नाहीत?

पुस्तक कमी दरात उपलब्ध होत असल्याने वाचक आक्षेप घेत नाहीत. काही प्रकाशक आक्षेप घेतात, काही नाही घेत. या मागे पुस्तक विक्रेत्यांनी दोन प्रमुख कारण सांगितली. न्यायालयीन प्रक्रियेचे अनुकरण करत यांचा पाठलाग करायचं म्हटलं तर बराच पैसा आणि वेळ खर्च होईल, दुसरं म्हणजे प्रकाशकांचं लेखकाला दर प्रतीमागे द्यावं लागणार मानधन वाचतं.

### निर्मितीमूल्य खराब

यातली बहुसंख्य पुस्तकं ही त्या पुस्तकांच्या मूळ प्रती नसून बनावट प्रती असतात. हातात घेतली तरी त्याचा स्वस्तपणा दिसतो. अस्पष्ट छपाई असलेले मुखपृष्ठ, कागद खराब, आतील छपाई त्यापेक्षा खराब. आणखी थोडं बारकाईनं पाहिलं तर मजकुरातील काही पानेही गायब असतात. त्यामुळेच मूळ पुस्तक ५०० रुपयांचे असेल तर विक्रेते हे पुस्तक सुरुवातीला ४०० रुपयांना सांगतात व त्यानंतर २०० रुपयांनाही देतात. स्वस्तात मिळते आहे म्हटल्यावर ग्राहकही ते लगेच घेतो. मात्र यात त्याची तर फसवणूक होतेच, शिवाय मूळ पुस्तक ज्यांनी काढले ते प्रकाशक व प्रामुख्याने ज्याने लिहिलं त्या लेखकाचेही नुकसान होते.

ऑनलाइन संकेतस्थळांवर पी. डी. एफ.च्या स्वरूपातसुद्धा अशा प्रती उपलब्ध असतात. यासाठी सायबर लॉ आणखी कडक करायला हवा, तक्रार करूनसुद्धा सरकार आणि पोलिसांकडून फार काही सहकार्य मिळालं नाही. त्यांच्यासाठी हे वेळ वाया घालवणं आहे. ऑनलाइन संकेतस्थळावर बनणाऱ्या प्रतींचा अंत नाही. इतक्या प्रमाणात ती आहेत. नवी मुंबईमधील एक प्रख्यात गुंड हे सगळं रॅकेट चालवतो असा आमच्या ऐकण्यात आलेलं. त्यामुळे नवी मुंबई या सगळ्या गोष्टीसाठीचा एक अड्डा असू शकतो. वाचकांनी हे लक्षात घ्यायला हवं की, बनावट प्रती या एका वाचनात खराब होतात याउलट मूळ प्रत कितीही वेळा वाचू शकतात.

- अखिल मेहता, मेहता पब्लिकेशन्स

### प्रकाशक म्हणतात...

विविध पुस्तकांच्या बनावट प्रतींच्या संदर्भात कारवाई करायची म्हटले तर न्यायालयीन प्रक्रियेनुसारच पुढे जावे लागते. त्यात बराच वेळ जातो आणि पैसाही खर्ची होतो. तसेच न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यावरही सगळीच लोकं पकडली जातीलच, असंही होत नाही. याबाबत वाचकांनीही थोडी जागरूकता बाळगायला हवी, बनावट प्रतीची पुस्तक बनवणं जसा गुन्हा आहे तसाच बनावट प्रती सोबत बाळगणंसुद्धा गुन्हाच आहे. हे ध्यानात घेऊन खरेदी केली पाहिजे.

- क्षीरसागर, के. सागर पब्लिकेशन्स

### लेखकांना वाटते..

लेखकाच्या परवानगीशिवाय पी. डी. एफ. करणंसुद्धा गुन्हा आहे. लेखकाच्या मानधनाचे नुकसान होते. १० वर्षांपूर्वी ठाण्यात पोलिसांनी एक फार मोठे गोदामच यासंदर्भात पकडले होते. वाचकांना मी इतकंच सांगेन की पुस्तक घेताना बघून घेत जा. बनावट प्रतींचा कागद हा अतिशय निकृष्ट दर्जाचा असतो. जो काही महिन्यातच खराब होतो.

-विश्वास पाटील, लेखक



### या बनावट प्रती येतात तरी कुठून?

ज्या पुस्तकांचे वाचकांमध्ये बेसुमार आकर्षण आहे आणि जी वाचकांमध्ये लोकप्रिय आहेत अशाच पुस्तकांच्या बनावट प्रती बनवल्या जातात. एका अधिकृत पुस्तक विक्रेत्याने 'लोकमत'ला माहिती देताना सांगितले की अशा पुस्तकांची छपाई साधारणत: मुंबई किंवा दिल्लीसारख्या मोठ्या शहरात होते. १०० रुपये किमतीच्या पुस्तकाच्या मुद्रणाचा खर्च हा साधारण २० ते २५ रुपये इतकाच असतो, त्यातले बाकी ८० रुपयांमध्ये लेखकाचे मानधन, प्रूफरीडिंग, कव्हर पेज आणि मग त्यातच प्रकाशकांचा नफासुद्धा असतो. बनावट प्रतींना फक्त कागद आणि मुद्रणाचाच खर्च होतो.

Hello Pune
Page No. 8 Jul 28, 2023
Powered by: erelego.com

पुढारी

# ग्रंथालयांतील पुस्तकांच्या 'डिजिटायझेशन'ला गती

पुढारी वॉच

## कोरोना अन् निधीअभावी रखडले होते काम

सुवर्णा चव्हाण
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : कोरोनामुळे आणि निधीअभावी पुण्यातील ग्रंथालयांमधील जुन्या पुस्तकांच्या डिजिटलायझेशनचे काम गेल्या अडीच वर्षांपासून रखडले होते. पण, ग्रंथालयांच्या अनुदानाचा प्रश्न सुटल्याने आणि निधी उपलब्ध असल्याने विविध ग्रंथालयांमधील जुन्या पुस्तकांच्या डिजिटलायझेशनच्या कामाला गती मिळाली आहे. शंभर ते ६० वर्षे जुन्या पुस्तकांच्या डिजिटलायझेशनकडे ग्रंथालयांकडून भर दिला जात असून, काही ग्रंथालयांची एक हजार पुस्तके आणि काही ग्रंथालयांची ५०० ते ६०० पुस्तके पहिल्या टप्प्यात डिजिटलाईज झाली आहेत.**

शहरातील बहुतांश ग्रंथालयांमध्ये अनेक जुनी आणि दुर्मीळ पुस्तके आहेत. काही शंभर वर्षे जुनी तर काही पुस्तके ६० ते ७० वर्षे जुनी आहेत. काही पुस्तकांची अवस्था खराब झाली असून, या पुस्तकांच्या डिजिटलायझेशनची आवश्यकता आहे. त्यासाठी ग्रंथालयांकडून विशिष्ट निधी खर्च करण्यात येत असून, टप्प्याटप्प्याने पुस्तके डिजिटलाईज करण्यात येत आहेत.

पुणे मराठी ग्रंथालयाचे अध्यक्ष धनंजय बर्वे म्हणाले, आम्ही काही दुर्मीळ आणि जुन्या पुस्तकांची सूची तयार करून त्या पुस्तकांचे डिजिटायझेशनचे काम हाती घेतले होते. परंतु, कोरोनामुळे आणि काही कारणांमुळे हे काम रखडले होते. पण, आता जवळपास एक हजार



पुस्तकांचे डिजिटलायझेशन झाले आहे. हे काम पुणे नगर वाचन मंदिराच्या सहकार्याने करण्यात येत आहेत.

पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे म्हणाले, आम्ही ग्रंथालयांना पुस्तकांच्या डिजिटलायझेशनची विनामूल्य सुविधा उपलब्ध करून दिली आहे. आताच्या घडीला चार ग्रंथालयांमधील पुस्तकांच्या डिजिटलायझेशनचे काम सुरू आहे. आमच्याही ग्रंथालयातील पुस्तकांचे डिजिटलायझेशन केले जात आहेत. सर्व ६० वर्षांपूर्वीची जुनी पुस्तके डिजिटलाईज करत आहोत. त्यांना आम्ही ही सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देत आहोत.

"वाचनालयातील काही पुस्तकांचे डिजिटलायझेशन झाले आहे. वाचनालयात १८३२ ते १९०० या काळातील ४८ पुस्तके आणि २ हस्तलिखिते आहेत. त्यातील २४ पुस्तके आणि १ हस्तलिखिताचे डिजिटलायझेशन झाले असून, त्याला राज्य मराठी विकास संस्थेकडून अनुदान देण्यात आले आहे.


- राजेंद्र सुतार,
सार्वजनिक वाचनालय, राजगुरुनगर

My Pune Edition
Jul 28, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *Upcoming Events*

# August 2023

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 *Annabhau Sathe Jayanti*  | 2 | 3 *Krantisingh Nana Patil Jayanti*  | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 *Sadbhavana Diwas* | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*